या स्मरणिकेचे अंतरंग लोकधर्मी व नाट्यधर्मी या संज्ञेच्या स्पष्टीकरणातून उमलत आहे. मराठी रंगभूमीचे व्यापक निरीक्षण, राज्य नाट्य स्पर्धांच्या फलितांची चर्चा, मराठवाड्यातील रंगभूमी, नाट्यसंमेलने व नाट्यचळवळी, श्रीपाद नृसिंह बेंडे एकांकिका स्पर्धा, रंगधर्मी लोटू पाटील, राम मुकादम यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख, नाट्यशास्त्र विभाग, मराठी सामाजिक नाटक, उचक्कांचे सादरीकरण, बालरंगभूमीची आवश्यकता वसंत कानेटकर यांचे स्मरण, ग्रामीण रंगभूमी तिचे विविध प्रश्न, डॉ.अलोक चौधरी सारख्या तंत्रज्ञानाचा परिचय, रंगमंचावरील उमेदवारी, खेड्यातील नाट्य बीड जिल्ह्याची नाट्यचळवळ, बीडचे पाणी, राष्ट्रसेवादल कलापथकाची यशोगाथा, शांतता/ कोर्ट चालू आहे या विजय तेंडुलकरांच्या नाट्यविषयी हयवदन या गिरीष कर्नाडच्या नाट्यशिल्पाच्या रुपाबाबत मराठी नाट्यातील स्त्री समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न अशा अनेकांगांनी सुंदर असलेल्या या स्मरणिकेत जिल्हा नाट्यचळवळ, नाट्यनिर्मिती, कलावंत रसिक अशा सर्वांचेच प्रतिबिंब पडलेले आहे. नाट्य संमेलनाच्या व्यापक आयोजनाने हे अंतरंग खुललेले आहे.

रंगकर्मींच्या जीवनात ही आत्मसंवाद करायला लावणारी महत्वपूर्ण गोष्ट आहे. रंगाशी संवाद करत करतच कलावंताचा आत्मरंग खुलतो. कलावंतांच्या भावजीवनाशी हा संवाद होतो. नाटकांच्या लखलखत्या चंदेरी दुनियेत रंगकर्मींच्या आत्मरंगाच्या असंख्य छटांचेच प्रतिबिंब रंगसंवादमध्ये आपल्याला पडलेले दिसेल.

मागील एक ते दीड महिन्यापासून संपादक मंडळाने स्मरणिकेच्या कार्यास वाहून घेतलेले आहे. त्याच बरोबर जाहिराती, छपाई, मुखपृष्ठाची निर्मिती ह्या सर्व बाबी अत्यंत जिकिरीच्या असतात. ही स्मरणिका संग्राह्य व संदर्भग्रंथ व्हावी असाच तिचा दर्जा आहे. लेखांची विपुलता व स्मरणिकेच्या पृष्ठांची मर्यादा लक्षात घेता ही स्मरणिका समग्र नाही याची नम्र जाणीव संपादक मंडळास आहे.

व्यापक संयोजन, उत्कृष्ट रंगमंच, प्रभावी व बहारदार कार्यक्रम, व्यापक प्रसिध्दी यामुळे हे संमेलन यशस्वी होईल असा विश्वास वाटतो.

स्मरणिका केवळ लेखांचा संग्रह नसून नाट्यसंस्कृतीच्या सदैव कायम स्मरणात राहील अशी सिध्द करण्यात अक्षरजुळणी करणाऱ्या संगणक तज्ञापासून ती वाचकांच्या, रसिकांच्या हातात पडेपर्यंत ज्या ज्या सर्व मान्यवरांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या ऋणात राहणेच संपादक मंडळाला आवडेल.

या रंगसंवाद स्मरणिकेच्या निर्मितीत महत्वाचे योगदान ठरलेल्या जाहिरातदार, लेखक, वाचक, रसिक, कलावंतांचे व आपणा सर्वांचे हार्दिक आभार !




बीज नही सोना है
bejo
बेजो शीतल सीडस् प्रा. लि.
बेजो शीतल कॉर्नर, मंठा रोड, जालना – ४३१ २०३
फोन :(०२४८२)२४४०००(३० लाईन) फॅक्स :२३०३९८
Email : info@bejosheetalseeds.com, bejosheetal@rediffmail.com
Website : www.bejosheetalseeds.com

# अंतरंग

| | |
|---|---|
| मराठी रंगभूमीः काही निरीक्षणे | डॉ.वि.भा.देशपांडे |
| हयवदन -एक अम्लान नाट्यशिल्प | डॉ.सुहासिनी इर्लेकर |
| राज्यनाट्य स्पर्धेचे फलित काय ? | रा.रं.बोराडे |
| लोकधर्मी व नाट्यधर्मी : नाट्यसंज्ञा | डॉ.प्रकाश मेदककर |
| बीड जिल्ह्याची नाट्य चळवळ | डॉ.दीपा क्षीरसागर |
| मराठवाडयाची रंगभूमी | प्रा.डॉ.दिलीप घारे |
| मराठवाडयातील नाट्य संमेलने व नाट्य चळवळ | डॉ.सुरेश पुरी |
| माझी रंगमंचीय उमेदवारी | डॉ.विजय दिवाण |
| श्रीपाद नृसिंह बेंडे एकांकिका स्पर्धा | प्रा.कालिदास कुलकर्णी |
| शक्तिपीठातील नाट्य परंपरा | प्रा.संभाजी भोसले |
| अखेरचा सवाल (कविता) | प्रभाकर साळेगावकर |
| कोल्हापूरची सांस्कृतिक रंगभूमी | डॉ.एन.व्ही.चिटणीस |
| आधुनिक मराठी रंगभूमीचे नामसंकीर्तन | डॉ.दासू वैद्य |
| रंगमंचीय भाषेची अप्रतिम अभिव्यक्ती 'उचक्का' | डॉ.सतीश पावडे |
| रंगधर्मी लोटू पाटील | प्रा.ज्ञानेश्वर सोनवणे |
| रंगकर्मींनो तुमच्या बँकेचं काय ? | प्रा.सूर्यकांत सराफ |
| कुठे हरवली रंगभूमी ? | प्रा.संयुक्ता थोरात |
| आई .... लाईटस | प्रा.मुस्तजीब अ.खान |

रंगसंवाद

# अंतरंग

| | |
|---|---|
| नाटकाशी नातं जोडलेली ग्रामीण रंगभूमी | प्रा.राजकुमार तांगडे |
| ' लोकल ' कडून ' ग्लोबल ' कडे जाणारा विद्यापीठाचा नाट्शास्त्र विभाग | डॉ.शशिकांत बऱ्हाणपूर |
| शांतता ! कोर्ट चालू आहे | डॉ.अलका चिडगोपकर |
| स्व.विजय तेंडुलकरांची अखेरची मुलाखत | डॉ.संदीप बनसोडे |
| ज्योतीने तेजाची आरती | प्रा.संपदा कुलकर्णी |
| मराठी सामाजिक नाटकाची वाटचाल | डॉ.ललित अधाने |
| खेड्यातील नाटक | डॉ.कांचन पाडगावकर |
| अजुनी त्या झुडपाच्या मागे | प्रा.वैशाली गोस्वामी |
| बीडचं पाणी | अरविंद जगताप |
| राष्ट्रसेवादल कलापथकाच्या नाट्य चळवळीचा एक टप्पा | डॉ.शैला लोहिया |
| मराठी नाटकात प्रतिबिंबीत झालेल्या स्त्री समस्या. | डॉ.कांचन शृंगारपुरे |
| प्रायोगिक कलाः एक चिंतन | प्रा.केशव देशपांडे |
| पारंपारिक लोककलांचा माणसपुत्र - तमाशा | ॲड.सुभाष निकम. |
| नाटक : नीतिमूल्यांचे जतन करणारी कला | प्रा.प्रशांत सौंदत्तीकर |

# मराठी रंगभूमी :काही निरीक्षणे

डॉ.वि.मा.देशपांडे

नाटक आणि रंगभूमी यांच्या परिप्रेक्षाचा विचार करताना किंवा आलेख मांडताना वेगवेगळया पध्दतीने विचार करणे शक्य असते.तो विचार केवळ तेवढयाच परिघात करून चालणार नाही.कारण ती 'समग्र सांस्कृतिक ' घटना असते.अनेक बंध त्याच्याशी निगडीत असतात. राजकीय, सामाजिक, वाङ्.मयीन, आर्थिक, धार्मिक, अशा विविध विषयांच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या गोष्टींवर आपण लक्ष केन्द्रित करू शकतो. किंबहुना अशा पार्श्वभूमीवर नाटक – रंगभूमीविषयक निरीक्षणे तपासून पाहणे योग्य ठरते. हे गृहीत धरून विषयाची मांडणी केलेली आहे.

विसाव्या शतकात जागतिक स्तरावर अनेकविध घटना घडल्या. त्यामध्ये आपल्या दृष्टीने दोन महायुध्दे महत्त्वाची. प्रत्यक्षात आपण या महायुध्दात सहभागी नसलो तरी त्याचे दूरवर झालेले परिणाम भोगत राहिलो.विशेषत: दुसरे महायुध्द आणि युध्दोत्तर कालखंड आपल्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला.१९४५ सालची हिरोशिमाची घटना घडल्यानंतर एक वेगळाच कालखंड आरंभित झाला.केवळ राजकीय स्तरावरच उलथापालथ झाली असे नव्हे तर एकूणच मानवी जीवनमूल्यांची, मानवी अस्तित्वाची पडझड मोठया प्रमाणात झाली.या राजकीय ,सामाजिक ,आर्थिक महाकल्लोळाचे साहित्य,कला क्षेत्रात पडसाद अपरिहार्यपणाने उमटत गेले.प्रथम ते जागतिक स्तरावर व्यक्त होत गेले. नंतर ते स्वाभाविकपणाने मराठी वाङ्.मय, नाटक ,रंगभूमी क्षेत्रात येत राहिले. तुलनेने पाहता कविता, कथा,कादंबरी, क्षेत्रांत जे ज्या गतीने आणि गुणवत्तेने आले,तसे नाटक रंगभूमीच्या क्षेत्रात यायला वेळ लागला.ते बदल स्वीकारायला ,पचनी पडायलाही वेळ लागत राहिला.

दुस–या महायुध्दाच्या काळात आणि नंतर भारतीय जीवनातही असंख्य महत्त्वाच्या लक्षवेधी घटना घडत गेल्या विशेषत: १९४० ते १९५० च्या दशकात १९४२ ची भारत छोडो, चलेजावची चळवळ, १९४७ ला झालेली स्वातंत्र्य प्राप्ती, १९५० साली मिळालेले प्रजासत्ताक रूप, १९६२ चे भारत– चीन युध्द आणि गोवा मुक्ती संग्राम,भारत – पाकिस्तान युध्द, बांगलादेशची निर्मिती आदी ठळक राजकीय घटना आपण अनुभवलेल्या आहेत.त्याचे बरेवाईट परिणामही भोगले आहेत, अद्यापही भोगत आहोत.

१९५०–६० च्या दशकात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, भाषावार प्रांत रचनेच्या आराखडयानुसार महाराष्ट्र राज्याची स्थापना आपल्या दृष्टीने अधिक महत्त्वाची मराठी भाषिक राज्य निर्माण झाल्यावर अर्थातच महत्त्वाच्या गोष्टी घडत गेल्या.विश्वकोश निर्मिती मंडळ,साहित्य संस्कृती मंडळ, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, आकाशवाणी,दूरदर्शन माध्यमांची निर्मिती, नंतरच्या काळातले त्यांचे बहुरंगी रूप वाहिन्यांच्या रूपाने आपले जीवन आक्रमित गेले.१९४५– ६० या काळात मराठी कथा, कविता आणि काही प्रमाणात कादंबरी नवे रूप धारण करीत होती.पारंपारिक रूप राखत असतानाच सशक्तपणाने नव्या खुणा निर्माण करीत होती. कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळ,अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर,पु.भा.भावे. दि.बा.मोकाशी होते.कवितेच्या परिघात बा.सी.मर्ढेकर, वि.दा.करंदीकर,पु.शि.रेगे यांच्यासारखे द्रष्टे कवी होते. नंतरच्या काळात कथा – कविता,कादंबरी क्षेत्रात जी.ए.कुलकर्णी ,भालचंद्र नेमाडे, चि.त्र्यं.खानोलकर, भाऊ पाध्ये, दिलीप चित्रे अशा अनेक नावांची भर पडत गेली,ती परंपरा आजवर टिकून आहे.

अन्य वाङ्.मय प्रकारापेक्षा नाटक – रंगभूमीच्या क्षेत्रात आधुनिकता ,नवीनता,प्रयोगशीलता तुलनेने उशिराने आली.कारण मूलत : नाटक ही पराश्रयी,परावलंबी कला आहे. संहिता आणि प्रयोग अशी तिची दोन रूपे आहेत.एकाचवेळी नाटक स्वतंत्र ,स्वायत्त आहे; पण त्याचवेळी ते प्रयोगशरण आहे. कोणत्याही नाट्यलेखनाची परिणती प्रयोगरूपात व्हावी.
अशी अपेक्षा असते. त्यामुळे एका मर्यादिपर्यंत नाटयसंहितेचा साहित्य म्हणून जरूर विचार करता येतो.परंतु तो विचार करताना त्या नाटयसंहितेशी असलेले रंगमंचीय नाते सतत तपासून पाहावे लागते. हे सारे गृहीत धरून भारतीय स्तरावरच्या रंगभूमीचे ठळक विशेष पाहता येतील.त्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळात किंवा नंतरच्या उत्तर आधुनिक मराठी रंगभूमी विषयक निरीक्षणे नोंदविता येतील.

आपण अनेकदा आंग्ल रंगभूमी, ग्रीक रंगभूमी या शब्दप्रयोगांप्रमाणे भारतीय रंगभूमी असा शब्दप्रयोग करीत असतो.तो करीत असताना एक मूलभूत गोष्ट ध्यानी घेणे अगत्याचे आहे,ती म्हणजे जगातील अनेक रंगभूमी क्षेत्रे दर्शनी एक भाषीय ,एक संस्कृती गटातील आहेत. त्यामध्ये लहानमोठे पोटविभाग आहेतच, तरीही ते आपल्यापर्यंत एकजिनसी रूपात आलेले आहेत.त्या हिशोबात ' भारतीय रंगभूमी' ह्या शब्दप्रयोगाला मर्यादा आहेत.आपला देश बहुभाषिक,बहुधर्मीय जातीय मिश्रणाचा आहे.धर्म,भाषा,प्रांत यातली बहुलता ही आपली जशी ताकद आहे ,तसेच अनेक सीमा– मर्यादा करणारीही आहे. मुळात आपले नाटक शाब्दिक – भाषिक अंगाने व्यक्त होत असल्याने त्या त्या प्रादेशिक भाषेची गुणविशेषता घेऊन येते.अपरिहार्यपणाने संस्कृतीविशेष घेऊन येते. परिणामी ते नाटक किंवा रंगभूमी ही त्या त्या प्रदेशाची नाममुद्रा घेऊन येते. म्हणूनच आपण बंगाली,कन्नड,गुजराती, हिन्दी,तामीळ आणि मराठी रंगभूमी असे भाषानिहाय ,प्रांतनिहाय शब्दप्रयोग करीत असतो .त्यामुळे ती भारतीय न राहता प्रांतीय किंवा भाषीय स्वरूपाची राहते. याच कारणासाठी नाट्याभ्यासकांना 'भारतीय रंगभूमी 'हा शब्दप्रयोग खटकतो, आक्षेपार्ह वाटतो ! याच ठिकाणी मुद्दा उपस्थित होतो,की विशिष्ट भाषिक रंगभूमी आपले पृथ्थकपण सिध्द करीत असली,अभिमान बाळगत असली तरी तिचे अन्य भारतीय भाषिक रंगभूमीशी नाते आहे किंवा नाही ? परस्परांना जोडणारे अंत:सूत्र आहे का ? एका मर्यादिपर्यंत ते अंत:सूत्राचे नाते निश्चितच आहे.ते सूत्र संस्कृती विशेषांनी बांधलेले आहे.आपण जसे आणि जितके मराठी – महाराष्ट्रीय आहोत. तितके किंबहुना त्याआधी भारतीय आहोत.धर्म, संस्कृती आणि त्यात असणारे नीतीविषयक– जीवनविषयक –कलाविषयक विविध मूल्यांना जोडणारे सूत्र समान पातळीवर आहे.निदान असावे अशी अपेक्षा आहे.ही मूल्य सापेक्षता महत्त्वाची आहे. या मूल्यविवेकातली सबलता आणि सीमीतता गृहीत धरून भारतीय रंगभूमी या संकल्पनेचा आणि सांस्कृतिक संचिताचा विचार करायला हवा .

भारतीय रंगभूमी असा शब्दप्रयोग करताना त्यातही नागर रंगभूमी आणि लोकरंगभूमी अशा दोन स्तरावर तिचा विचार करणे भाग असते. निरनिराळ्या प्रांतात ते स्वरूप भिन्न आहे.त्या प्रत्येकीला दीर्घ स्वपरंपरा आहे.ती परंपरा तिथल्या
भौगोलिक,ऐतिहासिक ,धार्मिक घटकत्वांशी घट्टपणाने धरून उभी आहे. त्यामुळे त्यात विविधता –विचित्रता –विभिन्नता जाणवत राहते. मराठी,हिन्दी ,बंगाली,कन्नड,तामीळ,तेलगु,पंजाबी,गुजराथी,ओडीसी,आसामी,सिंधी,तंजावरी,उर्दू अशा अनेक भाषांमधून आणि प्रांतामधून निर्माण झालेली रंगभूमी ही भारतीय रंगभूमीची रूपे घेऊन शतकानुशतके आपल्यासमोर आहे. त्या त्या भाषेतल्या वा प्रांतातल्या लहानथोर अनेक कलाकारांनी रंगभूमीला परंपरा जतन करतानाच भारतीय रूप दिले.त्यातल्या काहींनी आपल्या भाषेतले –शैलीतले नाटक जागतिक स्तरावरही नेले.संस्कृत नाटक वगळता अन्य भारतीय भाषेतील रंगभूमीला एक शतक ते दोन शतकांची परंपरा आहे. ही परंपरा पाहात असताना आपल्या देशावर गेल्या काही शतकांमध्ये ज्या रक्तपिपासूंनी आक्रमणे केली,वसाहती निर्माण केल्या,आपली संस्कृती रूजविण्याचा प्रयत्न

केला आणि त्या खुणा मागे ठेवल्या त्या सर्वांचे अवशेषात्मक विशेषही ध्यानात घ्यायला हवेत.राष्ट्रकूट, सातवाहन यांच्यापासून यवनसत्ता आणि नंतरची ब्रिटिश राजसत्ता यांचा संदर्भ ध्यानी घेणे महत्वाचे ठरते.कारण यातल्या अनेकांच्या संस्कृती विशेषांच्या मुद्रा भारतीय रंगभूमीवर प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणाने आलेल्या आहेतच.त्या मूळ संस्कार खुणांचा धांडोळा हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

गेल्या चार – पाच दशकांपुरता भारतीय रंगभूमीचा विचार करताना काही ठळक संदर्भ समोर येतात. बंगाली नाटक – रंगभूमीच्या क्षेत्रात बादल सरकार,शंभू मित्र,उत्पल दत्त,मोहिते, चटोपाध्याय ,कुमार रॉय आदी अनेकांनी नवा आयाम निर्माण केला.एका बाजूने बंगाली अभिजात नाटकांची परंपरा शंभू मित्रांसारख्या सर्जनशील कलावंताने राखली .पाश्चात्य आणि भारतीय अशा विविध नाट्यशैलींचा मेळ त्यांनी साधला .एका बाजूने रविन्द्रनाथ टागोर यांच्या नाटकांचे प्रयोग करीत असतानाच त्यांनी ' तीन पाशेर पाला ' ( थ्री पेनी ऑपेरा) 'आवदुपाउस ' ,( अिडी परू रेक्स) ,'पुतुल खेला ' ( डॉल्स हाऊस) ही जागतिक कीर्तीची नाटके केली. तितक्याच ताकदीने 'रक्त करबी ' चा प्रयोग केलेला मी पाहिला.तर बादल सरकारांनी ' जुलूस ,' पगला घोडा' ,' एवम् इन्द्रजीत' ,' बाकी इतिहास' इ. नाटके सादर करताना' भोमा' सारखे वर्तमान संवेदनांना प्रयोग देऊन रंगभूमी विषयक नवी संकल्पना भारतीय रंगभूमीमध्ये निर्माण केली.ती 'थर्ड थिएटर ' या नावाने सर्वश्रुत आहे.रंगभूमी ही लोकांची – लोकांसाठी असल्याने तिथपर्यंत आपण जायला हवे, त्यासाठी परंपरेच्या चौकटी मोडायला हव्यात ही त्यामागे धारणा होती.' जात्रा' सारख्या लोककला प्रकारांतून उत्पल दत्तसारखा बहुआयामी रंगकर्मी किती ताकदीने रंगभूमी माध्यम हाताळतो हे मी स्वत: त्यांच्या सहवासात राहून अनुभवलेले आहे.विशेषत: आपल्या साम्यवादी विचारसरणीचा लोकजागर करण्यासाठी लेनीन ,स्टॅलीन यांचे चरित्र – कार्यविशेष किती परिणाम करू शकतात हे त्यांनी दाखवून दिले.' टीनेर तलवार 'आणि ' दु:स्वप्न नगरी 'ही त्याची बंगाली रंगभूमीला महत्त्वाची देणगी आहे. १९७० नंतरच्या दहा –पंधरा वर्षात ब्रेश्टच्या नाटकांनी बंगाली रंगभूमी भारलेली होती.राजकीय विचारसरणीचा प्रचार आणि प्रसार रंजनमूल्यांबरोबर अतिशय गांभीर्याने करीत राहणे ही त्यांची खासियत आहे.या दृष्टिकोनाच्या बरोबरीने रंगमंचतंत्रांचा प्रभावी वापर ही देखील विशेषता आहे.त्यामध्ये नेपथ्य, प्रकाशयोजना यांना प्राधान्य असे.प्रकाश योजनेच्या संदर्भात 'तापससेन' ही जागतिक रंगभूमीला दिलेली बंगाली रंगभूमीची विशेष देणगी आहे. त्यांनी केलेली प्रकाश योजना हा एक अुभव असतो. उदाहरणार्थ ( बंगालीत अनेक नाटके ) याच सर्जनशील प्रकाश योजकाने मराठीत 'तुघलक 'आणि ' विषवृक्षाची छाया' नाटकांना केलेली प्रकाशयोजना हे मोठे योगदान ठरले. राजकीय विषय ,वेगळा आशय ,भावी प्रयोगतंत्रांचा वापर अशा विविध कारणांनी बंगाली रंगभूमी १९८० – ८५ पर्यंत भारतीय स्तरावर अग्रेसर राहिली. श्यामानंद जलान हे बंगाली गृहस्थ ( मूळचे मारवाड देशातले )कलकत्त्यात बंगालीबरोबर हिन्दी नाटक मोठया प्रमाणात करतात.त्यांचे स्वत:चे नाट्यगृह आहे.त्या छोटया नाट्यगृहाच्या उद्घाटन प्रसंगी नाटककार विजय तेंडुलकर आणि मी स्वत: उपस्थित होतो .अशीच स्वत:च्या घरात नाटयप्रेमापायी नाट्यगृह बांधणारे आणखी दोन उदाहरणे कलकत्त्यात पाहिली आहेत.अनेक लहानमोठ्या नाट्यसंस्था बंगाली नाटक सशक्तपणाने एकेकाळी करीत असत.स्वत:च्या गुणसंपदेच्या बळावर कित्येक वर्षे बंगाली रंगभूमी भारतात अग्रेसर होती. मात्र गेल्या पंधरा–वीस वर्षात त्याला उतार लागला. आता ते अढळ स्थान राहिले नाही.सध्या नाटके होतात पण शंभू मित्र, उत्पल दत्त, बादल सरकार ,या गुणवत्तेचे नाटक कार आजमितीला तरी नाहीत. बंगालीत प्रायोगिक निमव्यावसायिक नाट्यसंस्था मोठ्या प्रमाणात आहेत, परंतु पूर्णत: व्यावसायिक नाट्यसंस्था अल्प आहेत. त्यामुळे बंगाली व्यावसायिक नाटक असा शब्द प्रयोग सहसा ऐकायला मिळत नाही. प्रामुख्याने राजकीय विचारसरणी नाट्यमाध्यमातून मांडून तो विचार जन सामान्यापर्यंत पोहोचवायाचा .हेच मुख्य सूत्र आहे. मात्र बंगाली नाटयधर्मींना मराठी नाटकांचे किंवा मराठी रंगभूमीचे आकर्षण मोठया प्रमाणावर आहे. आपल्याकडच्या प्रयोगिक स्तरावरच्या नाट्यकर्त्यांचा संपर्क चांगल्या पध्दतीने टिकून आहे. काही महत्त्वाची मराठी नाटके बंगालीत भाषांतरीत झाली,तशीच बंगाली नाटके मराठीत आली.विशेषत: १९७० – ८० या दशकात रंगभूमी संबंधित काही गोष्टी जतन करण्याचे कार्य श्रीमती प्रतिभा अगरवाल मोठया प्रमाणात करीत असतात.बंगालीप्रमाणेच कन्नड भाषेतील नाटक –रंगभूमी महत्त्वपूर्ण कामगिरी करणारी आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचे निकटचे सान्निध्य परिचित आहे. त्यातले सीमावादही दीर्घकाळ सुपरिचित आहेत. आजही ( ५० वर्षानंतर )त्याचे पडसाद उमटताना आपण अनुभवतो .पण महाराष्ट्राचे आणि कन्नड रंगभूमीची परस्पर सौहार्द देवाण घेवाण जेवढया प्रमाणातली आहे तेवढी अन्य भारतीय भाषांत कमी आहे. मुळात मराठी रंगभूमीच्या निर्मितीला जे काही प्रेरणास्त्रोत कारणीभूत झाले, त्यात कन्नड लोक रंगभूमीचा संदर्भ मौलिक स्वरूपाचा आहे.विशेषत: यक्षगान या नाट्यप्रकाराचा सहभाग मोठा आहे. १९४२ साली' कर की मेळा' या संस्थेने सांगली आणि बडोदा या दोन शहरी प्रयोग केले. ते प्रयोग पाहूनच सांगलीच्या राजे पटवर्धनांनी आपल्याकडे असे काही घडावे अशी इच्छा व्यक्त केली. त्यातूनच विष्णुदास भावे यांनी प्रेरणा घेऊन १८४३ साली ' सीता स्वयंवर 'नाटकाच्या निमित्ताने मराठी नाटक – रंगभूमीचा ओनामा केला हे आपण जाणतोच .ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर हे मुळात कर्नाटकातलेच ते नोकरी – व्यवसायाच्या निमित्ताने मराठी मुलुखात आले आणि त्यांनी ' शाकुंतल ' ,' सौभद्र ' सारख्या नाट्यकृती निर्माण करून मराठी संगीत नाटकाचे बीज रूजवले .नाटक आणि संगीत यांच्या अनेक कन्नड कलाखुणा पहिल्या काळातील मराठी नाटकात पाहावयास मिळतात. जे यक्षगान मराठी नाटक – रंगभूमीला प्रेरणादायी ठरले तो नाट्यप्रकार मी स्वत: कर्नाटकात जाऊन, काही काळ तिथे राहून आभ्यासलेला आहे.

आधुनिक काळात कन्नड भाषेत महत्वाचे नाटयधर्मी किंवा रंगधर्मी असलेली नावे म्हणजे ज्ञानपीठावर डॉ.के.शिवराम कारंत, डॉ.सुब्रण्णा, गिरीश कर्नाड, बी.व्ही.कारंत, आद्य रंगाचार्य ( जहागीरदार), चंद्रशेखर कांभार ,बी.जयश्री,प्रसन्ना इत्यादी कन्नड भाषेत व्यावसायिक नाटकाची दीर्घ परंपरा आहे. अगदी मराठी इतकीच .वीरण्णा गुब्बी हे त्यातले महत्त्वाचे नाव .कन्नड भाषेतले यक्षगान केवळ भारतीय स्तरावर नाही तर जागतिक स्तरावरच्या रंगभूमीचे प्रतिष्ठित व्हावे यासाठी के. शिवराम कारंत यांनी मनस्वी प्रयत्न केले.नृत्य, नाट्य,संगीत या त्रिकलांतून सिध्द होणारे यक्षगान नेत्रसुखद–श्रवणसुखद असते. त्यातल्या उत्स्फूर्त संवादांचे मोलही तितकेच आहे.भाषेचा अडसर दूर करण्यासाठी डॉ.कारंतांनी यक्षगानातील संवादांचे प्रमाण कमी करून नृत्य– संगीत यांचे विलोभनीय मिश्रण तयार केले.अर्थात अशा प्रयोगशील –सर्जनशील रंगधर्मीला विरोधाला सामोरे जावे लागले. तरीही त्यांनी ते कार्य सोडले नाही .१९७८– ८० या काळात त्यांचे हे कार्य मी स्वत: उडुपी,शालीग्राम गावी प्रत्यक्षपणाने पाहिलेले आहे.केवळ प्रयोग करून ते थांबले नाहीत.त्यासाठी ग्रंथरूपाने लेखन तर केलेच ;पण रंगभूमी परंपरा अखंडित राहावी म्हणून यक्षगान प्रशिक्षण केन्द्राचीही निर्मिती केली.ते केन्द्र प्रामुख्याने उडुपी या गावी आहे.

डॉ.सुब्रण्णा हे शिमोगा गावात कन्नड भाषेतून शेक्सपिअरची अनेक नाटके करतात.अर्थात मूळ कन्नड नाटकांचे प्रयोगही करीत असतात.पण कन्नड समाजापर्यंत शेक्सपिअरचे नाटक मोठया प्रमाणात पोहोचावे अशी त्यांची नाट्यधारणा आहे. त्यांचे नाट्यकार्य केवळ कन्नडपुरते नाही तर त्या कार्याचे मोल भारतीय आणि अभारतीय स्तरावरही तितकेच महत्त्वपूर्ण आहे.डॉ.गिरीश कर्नाड हे नाव भारतीय स्तरावर सर्व परिचित आहेत.इतिहास आणि पुराण यातील कथांश किंवा मिथकाचा वापर करून वर्तमान जीवनाशी,त्यातल्या संवेदनांशी नाते सांगणारे अर्थगर्भ नाट्य लेखन त्यांनी केले.'हायवदन' तुघलक' ' ययाति' ' नागमंडल' ,' वर्षा ' आणि ' अग्नि' आदी महत्त्वाच्या नाट्यकृतींनी

कन्नड भाषक रंगभूमीबरोबरच भारतीय रंगभूमी संपन्न केली. आशयघन केली. कर्नाडांची सर्व नाटके मराठी आणि अन्य भारतीय भाषांत गेली. लेखन , अभिनय,दिग्दर्शन, निर्मिती अशा अनेक अंगानी कर्नाड आपल्याला भेटत गेले. ज्या नाटयकारांनी भारतीय रंगभूमी सशक्त,आशयगर्भ करून अन्य देशांत नेली, त्या रंगकार्यात गिरीश कर्नाडाची कामगिरी महत्त्वाची ठरलेली आहे. तितकेच मोलाचे कार्य बी.व्ही.कारंत यांनी केले .ते 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा ' दिल्ली, या संस्थेचे संचालक होते. भोपाळच्या भारत भवनच्या शिल्पकारापैकी एक होते. कन्नड भाषक असूनही त्यांचे हिन्दी भाषेवर प्रभुत्व होते.त्यामुळे ते हिन्दीतून आपली नाटके पेश करीत .नाट्य दिग्दर्शना- बरोबरीनेच संगीतावरचे त्यांचे प्रभूत्व भारतीय रंगभूमीला समृध्दीच्या वाटेवर नेणारे ठरले.त्यांच्या दिग्दर्शनाचा आणि संगीताच्या सर्जनाचा अनुभव हिन्दी ' महानिर्वाण',' घाशीराम कोतवाल 'आदी प्रयोगातून मी स्वत: अनुभवला आहे.डॉ.चंद्रशेखर कांभार हे आधुनिक कन्नड भाषकातल्या नाटयलेखनातले महत्त्वाचे नाव 'जो कुमार स्वामी '(१९७२) , मुळे अन्य भारतीयांना परिचित झाले.त्या व्यतिरिक्त' व्हिक्टरी ऑफ सिध्दनायक', 'हराकेया कुन' , 'हुलिया नेराली' ,' शिरी संपाकिगे 'इत्यादी नाटयकृतीनी १९७२ ते ९० या काळात त्यांनी नाटककार म्हणून स्वत:ची नाममुद्रा प्रस्थापित केली.वर्तमान परिस्थितीत बी.जयश्री आणि प्रसन्ना यांचे नाट्यकार्य कन्नड रंगभूमीत लक्षवेधी स्वरूपाचे आहे.कवलम नारायणन पणिक्कर हे केरळमध्ये महत्त्वाचे रंगधर्मी .मल्याळम भाषेतील रंगभूमी आज त्यांच्या नावाने ओळखली जाते. मुळात शिक्षणाने आणि काही काळ व्यवसायाने वकील असलेल्या पणिक्करांनी १९६१ पासून पूर्णत: रंगभूमी हेच आपले कार्यक्षेत्र निश्चित केले.स्वत:ची नाट्यसंस्था काढून नाट्यप्रयोग केले.त्यांची महत्त्वाची नाटके 'सक्षी',' दैव अत्तार' ,' तिरूवझीथान' ' अवनवन कथम्पा' ,' अर्जी' , ' ओटाय्यन' ,' करीमकुट्टी' , 'तैय्यातैयम' ,' पोरा नदी ' इत्यादी आजमितीला भारतीय स्तरावर संस्कृत अभिजात नाटके जाणतेपणाने पेश करणारे रंगधर्मी म्हणून पणिक्करांची ओळख आहे. त्यांच्या सादरी करणाच्या नाट्यशैलीत ' कलारी ' (मार्शल आर्ट) कथ्थकली, कुडीआट्टम यांचा वापर महत्त्वाचा असतो. त्यामुळेच त्यांच्या नाट्यप्रयोगांचे आणि नाट्यकार्यांचे वेगळेपण ध्यानात येत जाते. त्यांनी केलेल्या'उरूभंगम','कर्णभारम','विक्रमोवशिय','अभिज्ञान शाकुंतलम्' या संस्कृत नाटकांचे प्रयोग पुणे आणि उज्जैन याठिकाणी पाहिलेले आहेत.हिन्दी आणि उर्दू भाषेत नाटकांचे प्रयोग करून स्वत:चे वेगळे नाट्यकार्य सिध्द केलेले हबीब तन्वीर हे भारतीय रंगभूमीवरचे आधुनिक काळातले लक्षवेधी नाव रायपूर,छत्तीसगढ परिसरातल्या या रंगधर्मीने १९५४ पासून दिल्लीत येऊन आपले नाट्यकार्य आरंभित केले.त्यांची महत्त्वाची नाटके 'आगरा बझार','चरणदास चोर','बहादूर कलारीन' ,'हिरमा की अमर कहानी' याचबरोबर बर्टोल्ड ब्रेश्टच्या 'द गुड वुमन ऑफ सेत्सुअन' चे हिन्दी नाटक केले.तसेच बिशाखा दत्तचे 'मुद्राराक्षस' केले.हिन्दी उर्दू, इंग्रजी, संस्कृत अशा अनेक भाषांतील नाटके सादर करणारा अगदी वेगळ्या नाट्यशैलीतला हा रंगधर्मी आहे.यांनी आपल्या नाट्य सादरीकरणासाठी छत्तीसगढचे ग्रामीण भागातील कलाकार सतत साथीला ठेवले आहेत. डाव्या विचारसरणीचा प्रभाव असलेले तन्वीर हे ब्रेश्टच्या नाट्यविचारांनी प्रभावीत झालेले आहेत.

गेल्या काही वर्षात रतन थिय्यम हे नाव आपण ऐकतो आहोत.मणिपुरी भाषेतला हा दिग्दर्शक मूलत: कवी आणि चित्रकार आहे.त्याच्या नाटकांचे प्रयोग पाहतांना किंवा त्याच्याशी संवाद साधताना ते सहज ध्यानी येतेच.त्याची महत्त्वाची नाटके 'चक्रव्युध्द' , 'अंधायुग','उरूभंगम' ,'हिरोशिमा' ,'उत्तरा प्रियदर्शिनी ' ही सारी नाटके मणिपुरीत होत राहतात.त्याच्या नाटकाच्या सादरीकरणात मार्शल आर्टचा वापर मोठया प्रमाणात केला जातो.आजच्या भारतीय रंगभूमीवरचा अत्यंत महत्त्वाचा हा रंगधर्मी आहे.

गुजराथीत प्रायोगिक रंगभूमीची निर्मिती मर्यादित आहे. व्यावसायिक, धंदेवाईक स्वरूप अधिक आहे. तरीही त्यात मधुराम ,प्रवीण-सरिता जोशी यांचे कार्य मोठे आहे.हिन्दी भाषेत नाटक उदंड लिहिले गेले आणि जाते आहे.परंतु ज्या प्रमाणात नाट्यलेखन होते आहे.त्या प्रमाणात ते मंचस्थ होत नाही.तरीही गेल्या तीस चाळीस वर्षात ज्यांनी हिन्दी भाषेत नाटक लिहून आणि सादर करून विशेष भर घातली, भारतीय रंगभूमी अधिक सधन बनवली.त्यामध्ये मोहन राकेश, धर्मवीर भारती,राजिंदरनाथ ,श्यामानंद जालान,सत्यदेव दुबे,हबीब तनवीर ,मोहन उपरेती अशी महत्त्वपूर्ण नावे सांगता येतील. यामध्ये मोहन राकेश यांनी भारतीय रंगभूमीच्या संदर्भात दिलेले योगदान दीर्घकालिन परिणाम करणारे ठरले. ' आधे-अधुरे, 'आषाढचा एकदिन'या दोन नाटकांनी भारतीय रंगभूमीवर नवचैतन्य निर्माण केले.विशेषत: आधे अधुरे मुळे नाट्यभाषेला एक नवा आयाम प्राप्त झाला.वास्तवदर्शी,अर्थगर्भ संवादभाषा किती परिणामी ठरू शकते याचे ते उत्तम उदाहरण सांगता येईल. जसे विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे ' चे भारतीय स्तरावरच्या महत्त्वाच्या भाषांमध्ये स्वागत झाले, तसेच मोहन राकेश यांच्या 'आधे अधुरे' चेही झाले .तसाच माहोल धर्मवीर भारती यांच्या 'अंधायुग' नाटकाने निर्माण केला.या नाटकाचा पहिल्या काळातील (१९६२-६३) प्रयोग ईब्राहीम अल्काशी यांनी दिल्लीत केला.त्यानंतर पंडित सत्यदेव दुबे यांनी नेहरू जन्मशताब्दी निमित्त १९८९ ला केला.तो प्रयोग मी पाहिला होता. त्यामध्ये अमरीशपुरी ,नसिरूद्दीन शहा,ओमपुरी, यासारखी सृजनशील कलाकार मंडळी होती. दिग्दर्शक दुबेच होते. पंडित सत्यदेव दुबे हे केवळ हिन्दी, मराठी भाषेतील नाट्यनिर्मितीतले नाव नाही,तर ते भारतीय रंगभूमीवरचे एक अत्यंत महत्त्वाचे नाव आहे.त्यांनी मराठी,हिन्दी, इंग्रजी, गुजराथी भाषेतील नाटके दिग्दर्शित करून सादर केली .दिग्दर्शक म्हणून आपली नाममुद्रा भारतीय स्तरावर निर्माण केली.त्याचबरोबर आणखी महत्त्वाचे म्हणजे १९६५-७० पासूनची पुढची तीस-पस्तीस वर्षे भारतीय भाषांतील नाटकांचे आदानप्रदान कसे होईल याकर लक्ष केंद्रित केले.त्यांनी मराठीतले तेंडुलकर ,खानोलकर अन्य भाषेत कसे जातील यासाठी प्रयत्न केले .तसेच मोहन राकेश, गिरीश कर्नाड, बादल सरकार, आद्य रंगाचार्य आदी महत्त्वाच्या नाटककारांच्या नाट्यकृती मराठीत कशा येतील याकडे लक्ष दिले .ती नाटके आपल्याकडे सादर होतील .यावर भर दिला. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नाट्यलेखक निर्माण करणे,ज्यांच्याकडे ती प्रतिभा आहे ते स्फुल्लिंग प्रज्वलित करणे यासाठी घेतलेल्या कार्यशाळा ही नाट्ययोगदानाची वाटचाल विशेष कौतुकाची आहे.स्वत: अमराठी असूनही' घडणे - घडविणे ' या प्रक्रियेत दुबे अग्रभागी राहिले.

आधुनिक काळात किंवा नंतरही भाषांतरे, रूपांतरे करून विविध भारतीय भाषांतील नाटक सर्वत्र माहित व्हायला मदत होत गेली. त्याचबरोबर वेगवेगळे नाट्यमहोत्सव ,नाट्यचर्चा,परिसंवाद यांतूनही भारतीय नाटक-रंगभूमी परस्परांच्या जवळ येण्यास मदत झाली.ही सारी नावे घेत असताना किंवा भारतीय रंगभूमीचा आलेख उभा करीत असताना आणखी काही महत्त्वाच्या मंडळींचा उल्लेख महत्त्वाचा ठरेल. त्यामध्ये ईब्राहिम अल्कांझी, अलक पदमसी ,के.नारायण काळे,पु.ल.देशपांडे,आळतेकर, पी.डी.शेणॉय,कुमुद मेहता,विजया मेहता ,अरविंद देशपांडे,अमोल पालेकर, डॉ.श्रीराम लागू ,दामू केंकरे ,वामन केंद्रे, सतीश आळेकर इत्यादी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा ,आय.एन.टी. संगीत नाटक अकादमी,गोवा कला अकादमी, थिएटर अकादमी भारत भवन थिएटर युनिट, नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस अशा विविध संस्थांशी ही मंडळी संबंधित होती. यांनी कार्यशाळा,चर्चा- परिसंवाद ,प्रयोगदर्शन ,महोत्सव ,प्रदर्शने आदी माध्यमांतून भारतीय रंगभूमीचे अभिसरण जाणतेपणाने केले.

## हयवदन - एक अम्लान नाट्यशिल्प

**डॉ.सुहासिनी इर्लेकर**

'हयवदन' हे एका नाटकाचं पुस्तक मूळचं कानडी भाषेतलं.गिरीश कर्नाड या भारतीय नाट्यसृष्टीतील ज्येष्ठ-श्रेष्ठ नाटककाराचं. मराठीतील नाट्यसृष्टीत अनोख्या पाऊलवाटेने जाणा-या कै.चि.त्र्यं. खानोलकरांच्या नाट्यप्रतिमेला भिडलेलं आणि त्यामुळेच तिच्या माध्यमातून थेट मराठी नाट्यवाङ्.मयात आणि रंगभूमीवर उतरलेलं. एवढया पारदर्शित्वानं की अथपासून इतिपर्यंत अंतर्बाह्य केवळ गिरीश कर्नाडांच्या नाट्यप्रतिभेचं, त्यांच्या नाट्यविषयक दृष्टिकोनाचं आपण नाट्यप्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडविणारं !

गिरीश कर्नाड हे केवळ नाटककार नाहीत. ते नाट्याचे शोधक आहेत.नाट्य म्हणजे काय ? नाट्यास्वाद म्हणजे काय ? इत्यादी प्रश्न त्यांच्या प्रतिभेला सतत पडतात.विशेष म्हणजे पाश्चात्य नाट्यप्रभावापासून मुक्त अशा निखळ भारतीय नाट्यपरंपरेचे सूत्र नेटकेपणाने हाताळून कर्नाड आधुनिक नाट्यदर्शनातून भारतीय जीवनपरंपरावर व प्राचीन मध्ययुगीन श्रध्दा - संकेतांवर प्रकाश टाकतात.भारतीय नाट्यपरंपरेचा आश्रय करून आधुनिकच नव्हे तर समग्र मानवी जीवनातील मूलभूत नात्यांवर प्रकाश टाकू पाहातात. चि.त्र्यं.खानोलकरांच्या शब्दांत भारतीय परंपरेचा ठसा अद्यावत नवनाटयाशी भिडविण्यात गिरीश कर्नाड यशस्वी ठरले.'हयवदन' नाटकातील आशय सूत्र अस्तित्ववादाकडे झुकणारे असले तरी त्याच्या आकृतिबंधाचे स्वरूप परंपरेने चालत आलेल्या भारतीय रंगभूमीशी तसेच कीर्तन,दशावतारादी लोकजीवनातून स्फुरलेल्या समृध्द लोकनाट्य परंपरेशी नाते सांगणारे आहे.

नाटकाच्या प्रारंभी 'भागवत' रूपाने वावरणारा सूत्रधार श्रीगणेश,शारदा व रंगदेवतेची स्तुती करतो.त्यानंतर 'हयवदन' नाटकाच्या स्थलकाल संदर्भाचे ,त्यांतील पात्रांचे, त्या पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे तो निवेदन करतो.

ते संपते न संपते तोच घाबरलेल्या अवस्थेत धावत आलेल्या एका पात्राशी झालेल्या सूत्रधाराच्या संवादातून 'हयवदन' ह्या नाटकातील पूर्वरंगाला प्रारंभ होतो.ह्या नाटकातील पूर्वरंग व उत्तररंगात विभागलेला आशय भरतप्रणित नाट्यशास्त्राशी व नाट्यपरंपरेशी थेट नाते जोडतो.त्यानंतर हयवदनचा रंगभूमीवर प्रवेश होतो.हयवदन म्हणजे घोडयाचे तोंड व मनुष्याचा देह लाभलेला प्राणी.आपल्या ह्या विचित्र रूपाबद्दल हयवदन मनातून दु:खी आहे. त्यातून त्यास खरी तर मुक्तता हवी आहे.पूर्णत: अश्वरूप हवे आहे.तथापि अनेक प्रयत्न करूनही तो अद्यापि पूर्ण अश्व होऊ शकलेला नसल्याने दु:खी आहे.ह्या वैचित्र्यपूर्ण दु:खाचे कारण भगवतांनी विचारलं असता हयवदन जी पूर्वकथा सांगतो ती अशी

'हयवदन' ची आई ही कर्नाटक देशातील एक लावण्यवती राजकन्या असते.तिच्या पित्याने आयोजित केलेल्या तिच्या स्वयंवरप्रसंगी जमलेल्या अनेक राजकुमारांत अरब देशातील एक राजकुमार असतो.राजकन्येला मात्र ह्या राजकुमारापेक्षा त्याचा पांढरा अरबी घोडाच आवडल्याने त्याच्याशीच लग्न करण्याचा ती निग्रह करते.निरूपाय झाल्याने राजकन्येचे ह्या घोड्याशी लग्न लावले जाते. पंधरा वर्षानंतर ह्या घोडयाचे एका गंधर्वात रूपान्तर होते. कुबेराच्या शापामुळे त्यास प्राप्त झालेले अश्वरूप कुबेराच्या उ:शापामुळेच मानवप्राण्याबरोबर पंधरा वर्षे संसार केल्याने नाहीसे झालेले असते.हा गंधर्व इंद्रलोकी प्रयाण करताना राजकन्येलाही स्वत:बरोबर चलण्याचा आग्रह धरतो.तिने

नकार दिल्याने क्रुध्द होऊन तो तिला अश्वरूप (घोडी) प्राप्त होईल असा शाप देतो.अश्वरूप गंधर्वास असे मानवरूप लाभते तर मानवरूप असलेल्या राजकन्येस अश्वरूप लाभते.अशा मातापित्याच्या पोटीच हयवदनाचा जन्म झालेला असल्याने त्यास अर्धे अश्वरूप व अर्धे मानवरूप लाभलेले असते.आपल्या ह्या विचित्र रूपातून तो मुक्त होऊ पाहतो.हयवदन निराश आहे .हे पाहून भागवत त्यास चित्रकूट पर्वतावरील महाकालीचे दर्शन घेण्यासंबंधी सूचवितो.त्यास अनुमती देऊन हयवदन चित्रकूट यात्रेस निघून जातो.यावर भागवत भाष्य करतो ते असे.'विधिलिखित अटळ आहे.माणसाचे भाग्य व इच्छा परिपूर्ण झाल्यासारख्या भासल्या तरी त्यास अपूर्णतेचा शाप आहे.'

पूर्वरंगातील ही कथा व तिचे तात्पर्य उत्तरार्धातील नाट्यदर्शन पाहता प्रतिकात्मक वाटते.उत्तरार्धातील नाट्याशय कपिल, देवदत्त व पद्मिनी ह्यांच्याशी निगडित आहे.धर्मपुरीत कपिल व देवदत्त ह्यांच्या प्रगाढ व अतूट स्नेहासंबंधी बोलबाला आहे.ह्यापैकी कपिल हा उंच, धिप्पाड ,ताम्रवर्णी व प्रसन्न मुद्रेचा पण सुमार बुध्दीचा आहे.तर देवदत्त अशक्त ,गौरवर्ण,अखंड चिंतातुर पण श्रेष्ठ दर्जाचे बुध्दिवैभव लाभलेला आहे.दोघेही परस्परांच्या शक्तिस्थानासंबंधी आदर बाळगून आहेत. उत्तरार्धास प्रारंभ होतो तेव्हा देवदत्त एका सुंदर युवतीच्या दर्शनाने प्रेमविव्हळ झालेला दिसतो.आपल्या परम मित्राच्या जीवनाची परिपूर्णता ही आपल्याच जीवनाची परिपूर्ती असे मानणारा कपिल त्या युवतीचा - पद्मिनीचा शोध घेऊन देवदत्तासाठी तिला मागणी घालतो.दरम्यान देवदत्त पद्मिनीची प्राप्ती झाली वा तिचे ओझरते दर्शन झाले तरी आपले हात चरणी वाहीन व मस्तक छेदून गळयात घालीन .अशी दुर्गामातेस व महारूद्रास उद्देशून प्रतिज्ञा करतो.तिकडे कपिल व पद्मिनी ह्यांच्या पहिल्या भेटीत कपिलचाच तिच्यावर जीव जडतो.पद्मिनीलाही देवदत्ताच्या बुध्दिमत्तेचे अप्रूप वाटत असले तरी कपिलच्या सुडौल,बळकट, रांगडया देहाचेही तितकेच आकर्षण वाटत असते.तिला एकाच वेळी देवदत्त व कपिल एकाच देहात पती म्हणून हवे असतात.

त्यामुळेच देवदत्ताशी विवाह होऊनही पद्मिनी कपिलकडे अधिकाधिक आकर्षिली जाते.तिला स्वप्नातही ध्यास असतो तो कपिलचाच .म्हणूनच देवदत्ताची प्रतिज्ञा कळताच ती कालिमातेच्या दर्शनास जाण्याचा घाट घालते.प्रवासात कपिलशी होणारी तिची जवळीक पाहून निराश झालेल्या देवदत्तास स्वत:च्या प्रतिज्ञेची आठवण होते.कालिमातेचे दर्शन घेऊन तो स्वत:चा शिरच्छेद करतो.ह्याच सुमारास तेथे आलेल्या कपिलला मित्रवियोगाचे दु:ख न सहवून तोही स्वत:चा शिरच्छेद करतो.अशा रीतीने कपिल व देवदत्त यांची शिरे त्यांच्या धडापासून वेगळी होतात.पण पद्मिनीने केलेल्या प्रार्थनेमुळे देवी प्रसन्न होऊन तिला वर देते.त्याच्या सामर्थ्यामुळे पद्मिनी ह्या दोघांना जिवंत करते.मात्र असे करताना तिच्या हातून कळत वा नकळत एक चूक होते.ती कपिलचे मस्तक देवदत्ताच्या देहास व देवदत्ताचे मस्तक कपिलच्या देहास जोडते.

ह्यातून एक नवी समस्या पद्मिनीसमोर उभी राहते. पद्मिनीचा खरा पती कोण ? ह्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न कर्नाडांनी सूचित केले आहेत. माणसाच्या ख-या अस्तित्वाची ओळख त्याच्या शरीरामुळे होते की,त्याच्या

चेह-यामुळे ? स्त्रीचे पुरूषाशी होणारे लग्न त्याच्या देहाशी निगडित असते की मस्तकाशी ? परिणामी कपिलचा देह देवदत्ताच्या मस्तकाचा आधार घेऊन तर कपिलचे मस्तक देवदत्ताच्या शरीराचा आधार घेऊन पदमिनीवर वैवाहिक हक्क सांगू लागते.

येथे निर्णय घ्यावचा आहे तो पद्मिनीने ! अस्तित्ववादी भूमिका माणसाचं परावलंबीत्व ,त्याची परात्मता मान्य करूनही त्यास

इच्छा ,स्वातंत्र्याचा हक्क बहाल करते.मात्र इच्छास्वातंत्र्य व निर्णयस्वातंत्र्य मिळूनही पद्‌मिनीला निर्णय घेणे त्रासाचे ठरते.अखेर कपिलचा देह व देवदत्ताचे मस्तक असलेल्यालाच ती खरा देवदत्त वा पती मानून त्याचा स्वीकार करते.असे करण्यात श्रेष्ठ बुध्दिमत्ता व सुडौल पौरुषत्व एकाच पतिरूपात मिळविण्याचे तिचे स्वप्न साकार झाल्याचा व जीवनास परिपूर्णता लाभल्याचा फक्त आभास निर्माण होतो.कपिलचे शरीर व देवदत्ताचे मस्तक असलेल्यासच पद्‌मिनी आपला पती मानते आणि त्याच्यासह धर्मपुरीस परतते.येथे प्रश्न पडतो की,देवदत्त व कपिल याची तुटलेली शिरे देहास जोडताना पद्‌मिनीने खरोखरच गफलत केली, की जाणीवपूर्वकच तसे करून आपला हेतू साध्य केला ? मात्र ह्या गफलतीमुळे तिला एकाच वेळी बलवान देह असलेला व तैलबुध्दीचे मस्तक असलेला पती मिळाला .नव्हे तिने तो मोठया कौशल्याने मिळवला.कालिमातेची यात्रा ही मग पद्‌मिनीची पूर्वयोजना तर नव्हती ? येथे पद्‌मिनीच्या हेतुसंबंधाने जाणीवपूर्वक मौन बाळगून कर्नाडांनी वाचकांच्या कल्पनाशक्तीस पुरेपूर वाव दिला आहे.

इच्छास्वातंत्र्याचा लाभ घेऊनही माणसास अखेर नियतीच्याच वाटेने जावे लागते. सुखाच्या शोधाच्या प्रत्येक मार्गावर अंतिम वळण अखेर नियतीचेच असते. पद्‌मिनी देवदत्ताबरोबर घरी परतते तर कपिल जंगलातच राहतो.पण त्याबरोबर महत्वाची गोष्ट घडते ती ही की देवदत्ताचे मस्तक असलेला कपिलचा देह हळूहळू अशक्त ,क्षीण व दुबळा बनत जातो आणि जंगलातील कपिलचे मस्तक असलेला देवदत्ताचा देह मात्र हळूहळू सुदृढ व बलवान बनत जातो. म्हणजे पुन्हा त्यांना त्यांची मुळस्थिती लाभते. तशी पद्‌मिनी पराभूत होते.

पद्‌मिनीचे हेतू असफल झाले तरी तिची इच्छाशक्ती तीव्र असल्याने ती जत्रेच्या निमित्ताने पुन्हा दुर्बल झालेल्या देवदत्तास बाहेर पिटाळून स्वत: जंगलातील कपिलकडे परतते व त्याच्या देहाचा उपभोग घेते.देवदत्तही याचा सुगावा लागून त्याच जंगलात येतो.कपिल व देवदत्त यांच्यातील अखेरचा, जीवघेणा संघर्ष प्रारंभित होतो.

ह्या संघर्षाचे स्वरूपही वैचित्र्यपूर्ण असेच आहे. देवदत्ताचे मस्तक आपल्या देहाशी तर कपिलचा देह आपल्या मस्तकाशी संघर्ष करीत असताना दिसतो.खरे तर हा त्याचा आत्मसघर्षच होय.ती जणू त्यांची आत्महत्या असते.जीवनातील अर्थ लोप पावल्याने व अनर्थाला अर्थरूप आल्याने त्यांचे जगण्यातील स्वारस्यच संपते.ह्या संघर्षात कुणालाच यश मिळवायचे नसते.कारण त्यांची जगण्याचीच इच्छा संपलेली असते परिणामी दोघेही प्राणांतिक घाव बसून मरण पावतात. आणि उरते ती पद्‌मिनी व तिचे ते कपिलपासून झालेले मूल. पद्‌मिनीच्या जगण्यालाही आता अर्थ उरलेला नाही.त्यामुळे ती आपले मूल जंगलातील आदिवासींच्या स्वाधीन करून देवदत्त व कपिल यांच्या चितेत प्रवेश करून सती जाते.अशा प्रकारे कपिल, देवदत्त व पद्‌मिनी यांच्या जीवनाची ह्या नाटकात कर्नाडांनी शोकान्तिका झाल्याचे

दर्शविले आहे.पूर्वरंगातील हयवदनच्या कथेला समांतर अशी ही उत्तररंगातील पद्‌मिनीची कथा आहे.ज्याप्रमाणे राजकन्येला पौरुषाची आसक्ती आहे तशीच ती पद्‌मिनीलाही आहे.राजकन्या ज्याप्रमाणे गंधर्वास त्याप्रमाणे पद्‌मिनी देवदत्तास नकार देते.राजकन्येस ' हयवदन' सारखे मूल लाभते तसे ते पद्‌मिनीलाही लाभते .दोघींही अखेर सुखाच्या मार्गाने विनाशाच्या उंबरठयावर येऊन पोहोचतात .हयवदनला आपले हरवलेले मानवीपण हवे आहे.कारण जंगलातील आदिवासींच्या सहवासात मोठा झाल्याने तो आपले हसणे, गाणे,भाषा,शब्द व मूलपणच विसरून पशूत्वाच्या पातळीवर जगत आहे.

ह्या नाटकांच्या अखेरच्या वळणावर कालिमातेच्या आशीर्वादाने हयवदनचे मानवी शरीर नाहीसे होऊन त्यास अश्वशरीर म्हणजे पूर्णत्वास प्राप्त झाल्याने तो अत्यानंदाने नाचू लागतो.त्यास पाहून मूलही आनंदित होऊन गाऊ,नाचू, बोलू लागते.ह्या पूर्णरूप अश्वाच्या पाठीवर स्वार होऊन गाणा-या मुलाचे गाणे म्हणजे त्याने आईच्या मुखाने बालपणी ऐकलेले अंगाईगीतच असते.हयवदन व मूल ह्या दोघांनाही आपले स्वाभाविक अस्तित्व लाभते.राजकन्या व पद्‌मिनी ह्यांनी आत्यंतिक सुखाच्या लालसेने जणू त्यांच्यावर अस्वाभाविक अस्तित्व लादलेले असते.त्यातून ह्या दोघांना मुक्तता लाभते.मुक्ततेच्या ह्या क्षणापाशीच हे नाटक संपते.

' हयवदन' च्या रूपाने मराठी रंगभूमीवर एका श्रेष्ठ अस्तित्व वादी नाट्यकृतीचा आविष्कार झाला.ही सर्वात मोठी जमेची बाजू होय. मराठी रंगभूमीवर प्रथमच भारतीय रंगभूमीच्या दिशेने काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले गेले. प्रेक्षकांच्या वा वाचकांच्या रूढ समजुती व श्रध्दा ह्यांना प्रथमच भारतीय जीवनाची चौकट न मोडता धक्का देण्याचा व त्यांना अंतर्मुख करण्याचा गिरीश कर्नाडांचा प्रयत्न यशस्वी ठरला.पद्‌मिनी ही देवदत्ताची पत्नी पण तिला पातिव्रत्याच्या रूढ चौकटीतून काढले जाते व कपिलच्या बळकट देहाची आसक्ती बाळगणारी देवदत्ताची पत्नी अशी एक नवी चौकट तिच्याभोवती आखली जाते.मानवी मनाला परिपूर्ण सुख मिळविण्यासाठी जिवाचा आकांत करणा-या मानवी इच्छाशक्तीचे 'पद्‌मिनी' हे एक प्रतीक आहे.आपली इच्छा तृप्त करण्यासाठी देवदत्ताच्या प्रतिज्ञेचा पद्‌मिनी उपयोग करून घेते.देवदत्ताने मस्तक छेदताच मनाने कोसळलेला कपिलही आपले मस्तक छेदतो.त्यामुळे पद्‌मिनीपुढे नवीच समस्या निर्माण होते खरी .पण देवीच्या आशीर्वादाने तिची इच्छा पुन्हा पल्लवीत होते आणि शिरांची अदलाबदल करून ती देवदत्ताची बुध्दिमत्ता व कपिलचा देह एकाच पतिरूपात मिळविण्यात कमालीचे कौशल्य प्रकट करते.माणूस आपल्या बुध्दिकौशल्याने नियतीवर मात करू शकत असल्याचा आभास निर्माण केला जातो.पण नियतीची गती संथ, निश्चित व अटळ असते ही जाणीव नंतर होणा-या परिवर्तनातून वाचकांच्या मनावर बिंबविली जाते.आपला भूतकाळ आपल्या हाती नसतो, हे हयवदनच्या स्वरूपात अधोरेखित होते, तर आपले भविष्यही आपल्या हाती नसते हे पद्‌मिनीच्या रूपाने सूचित होते.देवदत्ताचे मस्तक असलेले कपिलचे शरीर दुबळे करण्यात नियती आपले अस्तित्व दर्शवितेच .अखेर पद्‌मिनी ज्यासाठी आपल्या पातिव्रत्यावर पाणी सोडते,ते सुख व जीवनार्थही तिच्या हातून निसटून जातो.मग तिच्या हाती उरते ती फक्त पराभूतता,अर्थशून्यता व एकाकीपण !

पद्‌मिनीचे सतीत्व ज्यामुळे सार्थकी लागणार असते ते दोन पुरुष शरीरांशी संबंध आल्याने लोप पावते.पद्‌मिनीचे जीवनच अर्थशून्य झाल्याने तिचे सती जाणे कळाहीन व हास्यास्पद ठरून नाटक शोकान्त होते.गिरीश कर्नाड यांच्या
'हयवदन'नाटकाने भारतीय रंगभूमीवर आपल्या परंपरा सांभाळत अस्तित्ववादी जीवनतत्वप्रणालीचा जो सहज,अर्थपूर्ण व नाट्यलक्षी आविष्कार साधला,तो मराठीच नव्हे तर भारतातील सर्व भाषिक रंगकर्मींना व नाट्यनिर्मात्यांना आदर्श म्हणून अनुकरणीय आहे.

पाश्चात्य नवनाट्य प्रवाहातील नाटककारांनी स्वीकारलेल्या दिशा,त्यांनी संशोधिलेले नाट्यतंत्र आणि त्याच्या साह्याने अस्तित्ववादी जीवननाट्याचा साक्षेपी आविष्कार करणारी नाट्यशैली आदींना आपल्या प्रतिभेत रूजवून गिरीश कर्नाड 'हयवदन' मधील आपल्या नाट्यानुभवाला सामोरे गेले आहेत .प्राचीन भारतीय संस्कृती आणि लख्ख जीवन जाणिवा यांचा स्पर्श होताच ह्या नाट्यरसायनातून 'हयवदन' हे अम्लान आणि वैश्विक परिमाण लाभलेले नाट्यशिल्प सिध्द झाले.गिरीश कर्नाड यांनी मराठी नाट्यरसिकांना असे कायमचेच ऋणी करून ठेवले आहे.

# राज्य नाट्य स्पर्धेचे फलित काय ?

**प्राचार्य रा.रं बोराडे**

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ४८ व्या मराठी राज्य नाट्यस्पर्धामहाराष्ट्रातील विविध केंद्रावर नुकत्याच पार पडलेल्या आहेत. आणखी दोन वर्षांनी या स्पर्धेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होईल. एखादा सांस्कृतिक उपक्रम शासनाने सलग पन्नास वर्षे नेटकेपणाने पार पाडावा, ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातली एक अतिशय महत्त्वपूर्ण धटना आहे असे मी मानतो.

या निमित्ताने नाट्यक्षेत्राशी जिव्हाळ्याने संबंध असलेल्या माझ्या सारख्याच्या मनात आलेल्या विचारांना मी व्यक्तरूप दिले तर ते या क्षेत्रातील विविध घटकांना मार्गदर्शन होतील, असा मला विश्वास आहे.गेली अठ्ठेचाळीस वर्षे सलगपणे घेण्यात आलेल्या या नाट्यस्पर्धेचे फलित काय ? असा या संदर्भात उपस्थित होणारा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे.या स्पर्धेचे सूवर्ण महोत्सवी वर्ष जेव्हा सुरू होईल तेव्हा या प्रश्नांचा गांभीर्याने विचार व्हावयास हवा .हा विचार जसा अंतर्मुख करणारा असेल त्याचप्रमाणे तो या स्पर्धेला दिशा देणारा असेल . मराठी रंगभूमीला फार मोठी परंपरा आहे ही परंपरा आपण जोपासण्याचा प्रयत्न मराठी रंगभूमीचे पाईक प्रारंभीच्या काळापासून मोठ्या निष्ठेने करीत आहेत.मराठी रंगभूमीची ही परंपरा जपण्या-जोपासण्याच्या उत्तरदायित्वाचा एक भाग महाराष्ट्र शासन अन्य काही सांस्कृतिक उपक्रमाबरोबरच याही उपक्रमाचे प्रतिवर्षी आयोजन करीत आले आहे.नाटकाचा प्रेक्षकवर्ग तयार करणे हे जसे या स्पर्धेचे उद्दीष्ट असावयास हवे, त्याचप्रमाणे या नाट्यस्पर्धेच्या माध्यमातून नाट्यलेखकांचा ,अभिनेते,अभिनेत्री,नेपथ्यकार,प्रकाशयोजनाकार आदींचा शोध घेणे व त्यांना बळदेणे ,हेही या नाट्यस्पर्धेचे उद्दीष्ट असावयास हवे .या राज्य नाट्यस्पर्धेने हे उद्दीष्ट साध्य केले काय ? केले नसल्यास का केली ? वेगळया व स्पष्ट शब्दात सांगायचे तर या राज्य नाट्य स्पर्धेने शोध घेतलेल्या व बळ दिलेल्या किती नाटकारांना,अभिनेते,अभिनेत्रींना ,तत्रज्ञांना मराठी प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीने आपल्यामध्ये सामावून घेतले.

असा पडताळा घेताना एक गोष्ट ,सहज लक्षात येईल आणि ती ही की, या राज्य नाट्यस्पर्धेत स्वत:ची गुणवत्ता सिध्द करणा-या कलावंतांपैकी मोजक्याच कलावंताना प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमींची दारे उघडली गेली आहेत आणि ज्या कलावंताना प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीची दारं उघडली गेली आहेत.त्यांच्यापैकी बहुसंख्य कलावंत जिथे प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमी स्थिरावलेली आहे तिथले म्हणजेच मुंबई,पुण्याचे आहेत.कलावंताना स्वत:च्या वाटा स्वत:च शोधायच्या असतात.या वाटा शोधतांना काही अडचणी ,अडथळे आले तर त्यावर मात करायची असते, हे कितीही खरे असले तरी प्रत्यक्षात ते खूप अवघड असते. अशा परिस्थितीत या संदर्भात मी काही सूचना केल्या तर त्या अस्थानी होतील,असे मला वाटत नाही.अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राज्य नाट्य स्पर्धेच्या संदर्भात एक अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापूर्वी व्यावसायिक रंगभूमीवर गाजलेली नाटकेदेखील राज्य नाटस्पर्धेत सादर होत असत.परिणामी नव्या नाट्यसंहिता मराठी रंग भूमीवर क्वचितच सादर होत असत.माणसांच्या जगण्याचे संदर्भ वरचेवर प्रचंड वेगाने बदलत चालले आहेत.माणसाच्या जगण्यातलं हे वास्तव मराठी साहित्यिक आपल्या कथा,कविता ,कादंब-य आदि वाङ:मय प्रकारातून समर्थपणानं अभिव्यक्त करीत आहेत .नव्या नाट्यसंहिता रंगभूमीवर सादर झाल्यामुळे मराठी माणसाचं वास्तव जगणं नाट्यप्रयोगातून सादर होईल.अलीकडच्या काळात व्यावसायिक रंगभूमीवर सादर होणा-या नाटकांनाही काही अटीवर अनुदान सुरू केले आहे.व्यावसायिक रंगभूमीवर सादर होणा-या नाटकांना अनुदान द्यावे की न द्यावे ,हा मतभेदाचा विषय होऊ शकेल,त्यांचा उहापोह मी इथं करणार नाही.या निमित्ताने एक प्रस्ताव मी शासनासमोर ठेवू इच्छितो.तो प्रस्ताव असा काही व्यावसायिक नाट्यनिर्मात्यांनी नाट्यनिर्मितीची आपली दारे नव्या,होतकरू नाट्यकामासाठी, नाट्यकल्पकतासाठी व तंत्रज्ञानासाठी किलकिली केली आहेत, ही अतिशय स्वागतार्ह बाब आहे.या संदर्भात मी एक पर्याय सुचवीत आहे.तो पर्याय असा.राज्यनाट्यस्पर्धेची अंतीम फेरी जेव्हा होईल तेव्हा वरील प्रकारच्या नाट्यनिर्मात्यांना अंतिम फेरीत सादर होणा-या नाट्यप्रयोगाला उपस्थित राहण्याचे आवाहन करावे .या अंतिम फेरीत सादर होणा-या नाट्यप्रयोगातील जी नाट्यसंहिता ,जे नाट्यकलावंत व जे तंत्रज्ञ त्यांच्या पसंतीस उतरतील त्यांना सामावून घेऊन व्यावसायिक रंगभूमीवर त्याचे प्रयोग सादर करू इच्छित असतील त्या निर्मात्यांना प्रत्येक प्रयोगागणीस ठराविक अनुदान शासनाने द्यावे.शासनाने ही योजना मान्य केली तर त्याचा तपशील ठरविणे अवघड नाही.

राज्यनाट्यस्पर्धा अद्यापही नागरी विभागापुरत्या मर्यादित राहिलेल्या आहेत.शासनाच्या बहुतांश योजना ग्रामीण भागातल्या तळागाळातील माणसापर्यंत गेलेल्या आहेत.शासनाच्या ज्या योजना तळागाळातील माणसापर्यंत गेलेल्या नाहीत .त्या योजनापैकी राज्यनाट्यस्पर्धा ही एक आहे.ग्रामीण भागातल्या माणसांना नाटकाचे किती वेड असते याचा पडताळा घ्यावयचा असेल त्यांनी या वर्षीच्या साधना साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात प्रकाशित झालेल्या श्री.राजकुमार तांगडे या ग्रामीण युवा नाटककाराचा ' घर का ना घाटका ' हा लेख अवश्य वाचावा. श्री.राजकुमार तांगडे हा मराठवाडयातील जालना जिल्हयातल्या घनसांगवी तालुक्यातल्या जांब संमर्थ या खेडयातला राहाणारा. आजपर्यंतच मराठी ग्रामीण साहित्य शेतक-यांच्या ' शहरी 'मुलांनी लिहिलेले आहे.श्री.राजकुमार तांगडे हा फारसं शिक्षण न झालेला खेडयात राहून शेती करता करता ग्रामीण साहित्यनिर्मिती करणारा शेतकरी साहित्यिक आहे.त्यानं लिहलेली 'श्वेत अंगार' हा लघुपट आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवास पात्र ठरला आहे 'आकडा 'ही त्यांची एकांकिका महाराष्ट्रातल्या नाट्यरसिकांच्या प्रशंसेस पात्र ठरली आहे.ग्रामीण नाट्य चळवळीविषयी त्याचे मत प्रातिनिधिक ठरावे यासाठी त्याच्या या अल्प परिचयाचा प्रबंध 'साधना' दिवाळी अंकातल्या ' घर का ना घाटका ' या लेखात खेडयातल्या माणसांना नाटकाचे किती वेड आहे. हे त्यांनी नेमक्या शब्दात सांगितले आहे. ते म्हणतात, आम्ही शेतक-यांच्या समस्या घेऊन जेव्हा नाटकं करायला सुरूवात केली तेव्हा आमचा एक नवा प्रेक्षकवर्ग तयार होताना दिसू लागला .जिल्ह्यातल्या पाच हजार आदर्श (प्रयोगशील)शेतक-यांनी आमच नाटक पाहिलं. तो आकडा आम्ही पाच लाखापर्यंत सहज नेऊ शकलो असतो; पण आमचं आर्थिक दारिद्रय आड आलं. जर कापूस विकून नाटक करणं परवडत नाही आणि ते फिरविणे तर नाहीच नाही( ते जर कारखान्यात पिकत असतं )नाही तर सरासरी काढली तर दर चार गावात एक , या प्रमाणात एका तालुक्यात तीस ते पस्तीस गावची मुलं नाटकं करतात. वर्षासाठी वेगवेगळया उत्सवात जिल्ह्यातून किमान २०० ते ३०० नाटकं बसू शकतात.त्यातले दहा टक्के जरी दर्जेदार धरले तरी क्रिकेटपेक्षा जास्त लोकप्रिय नाटक होईल, त्यासाठी वरून प्रयत्नाची गरज आहे.

श्री.राजकुमार तांगडे यांनी निर्देशित केलेली ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर नाटकांचं अंगभूत वेड असलेल्या या लोकांसाठी ग्रामीण स्तरावर राज्य नाट्यस्पर्धा घेणे किती निकडीचे आहे,हे सहज लक्षात येऊ शकेल.ग्रामीण स्तरावर या नाट्यस्पर्धा घ्यायच्या म्हटल्यानंतर काही अडचणी उद्‌भवण्याची शक्यता आहे.विशेषत: नाट्यगृहाचा प्रश्न सोडविणे अवघड जाईल हे खरं; पण या नाट्यस्पर्धा नाट्यगृहातच घ्यावला हव्यात अस थोडंच आहे .तालुका स्तरावर वेगळं नियोजन करून या नाट्यस्पर्धा घेता येतील. एकूण लोकसंख्येपैकी ७०% लोक खेडयात राहतात. गेली अठ्ठेचाळीस वर्षे आपण ग्रामीण माणसांना या सांस्कृतिक उपक्रमापासून वंचित ठेवले.किमान यापुढे तरी हे असे घडू नये. ही अपेक्षा.

# लोकधर्मी व नाट्यधर्मी : नाट्यसंज्ञा

**डॉ. प्रकाश मेदककर**

नाटक या कलाप्रकाराचा कला आणि वाड्.मय प्रकार या दोन्ही प्रकारांनी विचार केला जातो. पारंपारिक,पारिभाषिक संज्ञांच्या परिभाषेत बोलायचे झाल्यास नाटकाचा विचार दृश्य काव्य आणि श्राव्यकाव्य या दोन्ही दृष्टींनी केला जातो.नाट्य किंवा नाटक यांची चर्चा करतांना भरतमुनींचे नाट्यशास्त्र आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र या बीजग्रंथामधील विवेचनाचा आधार घ्यावाच लागतो.

भरतमुनींनी नाट्यशास्त्रात लोकस्वभाव जेव्हा सौंदर्य व्यापारातून अभिव्यक्त होतो तेव्हा नाट्य निर्माण होते, असे विवेचन करून लोकस्वभाव आणि सौंदर्य व्यापार यांचे शास्त्रीय विवक्षित स्वरूप विशद करण्यासाठी सहाव्या व तेराव्या अध्यायात लोकधर्मी आणि नाट्यधर्मी या संज्ञा वापरल्या आहेत.या संज्ञा भिन्न असल्या तरी त्या सर्वस्वी स्वतंत्र , स्वंयभूत कृतिप्रवण नसतात तर नाट्य सिध्दीत या दोन्ही संज्ञा परस्पराश्रयी स्वरूपात कृतिप्रवण होतात आणि त्यातूनच नाट्य निर्माण होते, असे भरतमुनींच्या विवेचनाचे सार आहे. नाट्यनिर्मिती भावावस्थांच्या सौंदर्यात्मक अनुकृतीतून होते,असे भरतमुनी म्हणतात. लोकवृत्तात दिसून येणा-या भाव अथवा अवस्था म्हणजे लोकस्वभाव याला भरतमुनी लोकधर्मी असे संबोधतात. या लोकधर्मीचे सौंदर्यपूर्ण अभिनयन म्हणजे नाट्यधर्मी असे भरताला म्हणावयाचे आहे. सारांश, लोकधर्मी ही अनुभवाभिनयाशी संलग्न संज्ञा आहे. तर नाट्यधर्मी ही नाट्यगत अभिनय , नेपथ्य, पार्श्वसंगीत इ.घटकांच्या एकत्रित प्रयत्नातून साकार होणा-या सौंदर्यपूर्ण आविष्काराशी संलग्न संज्ञा आहे. हे सूत्र मनात बाळगूनच आपल्याला लोकधर्मी आणि नाट्यधर्मी या संज्ञांचे स्वरूप आणि त्यांचे परस्परसंबंध यांच्याबद्दल चर्चा करणे क्रमप्राप्त आहे.नाट्यप्रयोगाच्या संदर्भात लोकधर्मी आणि नाट्यधर्मी या दोन संज्ञांचे स्वरूप साधारणत: असे सांगता येईल की, लोकस्वभावानुरूप शुध्द अथवा अविकृत मुद्रा केली जाते आणि ज्यात प्रतिकात्मक आंगिक मुद्रांचा अभाव असतो ;त्या नाट्याला लोकधर्मी अभिनय म्हटले जाते.ज्या नाट्यात वाणीचा , शारीरिक क्रियांचा, सात्विक भावांचा आणि अंगहारयुक्त अभिनयाचा समन्वय झालेला असतो; त्याला नाट्यधर्मी अभिनय म्हटले जाते. लोकांमध्ये अभिनयाच्या दृष्टीने योग्य असते अशा काव्याचा मूर्त आविष्कार कलात्मक पातळीवर नाट्यधर्मी करते. थोडक्यात मानवस्वभावजन्य सुखदु:खात्मक क्रियांचे आंगिक अभिनयाच्या साह्याने अभिनयन केले जाते. तेव्हा त्या पदधतीला नाट्यधर्मी, म्हटले जाते. याचाच अर्थ असा की, नाट्यधर्मीच्या अनुभवाच्या आशयाच्या सामग्रीचे अस्तित्व लोकधर्मीत, लोकस्वभावात असते तर लोकधर्मीच्या कलात्मक, सौंदयात्मक आविष्काराच्या साधनांची सामग्री नाट्यधर्मीत असते. भारतीय दर्शनामध्ये विशद केलेल्या आत्मा आणि शरीर यांच्या परस्परसंबंधासारखे लोकधर्मी- नाट्यधर्मी यांच्या परस्पर संबंधाचे स्वरूप असते.

भरतमुनीच्या नाट्यशास्त्राचा साक्षेपी आणि अधिकारी टीकाकार अभिनवगुप्ताने लोकधर्मी आणि नाट्यधर्मी यांचे स्वरूप आणि परस्परसंबंध यांच्याबद्दल मूलगामी स्वरूपाचे विवेचन केले आहे. त्याच्या मते,'लोकधर्मी आणि नाट्यधर्मी लोकस्वभावाचेच अनुवर्तन करतात.लोक म्हणजे जनसमुदाय.त्यांचा स्वभाव त्यांच्या वृत्तिप्रवृत्तीतून प्रकट होतो. ' भरताने अशा वृत्तिप्रवृत्ती विशेषांतून भावावस्थांचे दर्शन त्या त्या प्रदेशातील नाट्यप्रयोगांमधून घडवले पाहिजे असे सांगितले. या वृत्ति-प्रवृत्तीशीच लोकधर्मी आणि नाट्यधर्मी संबंधित आहेत. नाट्यातील अभिनय त्या-त्या लोकप्रवृत्तींच्या विशेषांशी संवादी असला पाहिजे. त्याबरोबरच तो सौंदर्यपूर्णही असला पाहिजे,असे सांगून अभिनवगुप्त पुढे म्हणतो की, 'लोकप्रवृत्तीशी संवादी असणारा अभिनयातील भाग लोकधर्मी असतो तर त्यातील सौंदर्यधारक भाग नाट्यधर्मी होय.'असे असले तरीही ,संस्कृत परंपरेतल्या पूर्वसुरींनी नाट्यधर्मीला नाट्याचे आद्यस्थान दिले आहे. भरताच्या मते,'लोकस्वभावाचे दर्शन होणे हे नाट्याचे फल असले तरी त्याचे एकमेव साधन अभिनय हेच आहे. अभिनयाच्या साधनाने लोकस्वभावाचे दर्शन होणे हेच नाट्य होय.इतर कोणत्याही प्रकारे दर्शन झाल्यास ते नाट्य होत नाही. नाट्यप्रयोग नेहमी नाट्यधर्मीनीच युक्त असला पाहिजे 'असे भरतांनी नि:संदिग्ध शब्दांत सांगितले आहे. तर' नाट्यधर्मित्व हे लोकस्वभावाचे नाटकगत विधान आहे ',असे अभिनवगुप्त स्पष्टपणे म्हणतो .ही विधाने सकृतदर्शनी लोकधर्मीला गौणत्व देणारी वाटतात; पण सूक्ष्मपणे विचार केल्यास या आचार्यांना नाट्यधर्मीची कक्षा अधिक व्यापक व विस्तृत अपेक्षित आहे ,हे लक्षात येईल.नाट्यधर्मीमध्ये लोकांमध्ये जे अभिनयाच्या दृष्टीने योग्य असते,अशा काव्याचा मूर्त अविष्कार केला जातो, असे मानले जाते. यात निवडीचे तत्त्व अनुस्युत आहे. लोकजीवन , लोकस्वभाव कधीच सुविहित , सुनियोजित नसतो.त्याचे स्वरूप विस्कळीत असते. लोकस्वभावाची जडण-घडण करणा-या अनुभवांमधील नाट्यात्मकतेची, काव्यात्मतेकची प्रत्ययकारकता त्याच- त्यापणामुळे बोथट झालेली असते. अशा परिस्थितीत नाट्यधर्मीच्या निवडीच्या तत्त्वांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. लोकानुभवाच्या विस्कळीत स्वरूपातील अनुभवांच्या मधले नाट्य, अभिनयाच्या जागा नेमकेपणाने शोधणे, त्या अनुभवातल्या पार्श्वसंगीताच्या 'स्पेस' कलात्मक पातळीवर हेरणे यासाठी एक विवेकशील कलात्मकतेची गरज असते. ही गरज नाट्यधर्मी भागवते.नाटधर्मीसाठी संवादी नाट्यानुभव लोकजीवनात ,लोकस्वभावात विस्कळीत रूपात विखुरलेल्या स्वरूपात, सपाट (Horigental line ) रेषेत असतो. तो नेमकेपणाने हेरून उचलला जातो आणि कलात्मक पातळीवर ऊर्ध्वगामी (A vertical line ) नेला जातो. ही प्रक्रिया घडताना त्याला अभिनयाचा स्तर कसा प्राप्त होतो, तेही भरतमुनींनी सांगितले आहे. 'लोकवार्ताक्रियोपेत' मध्ये कवी वा नट आपल्या कल्पनेने भर घालतो किंवा बदल करतो त्याला भरत 'अतिवाक्य क्रियोपेत' म्हणतात. लोकधर्मीमधील लोकस्वभाव किंवा चित्तवृत्ती 'अविकृत' किंवा 'शुध्द' असतात कवी किंवा नट नाट्यधर्मीला अनुसरून सौंदर्याविष्कारासाठी या चित्तवृत्तीमधील काही बदल करतो. नट आंगिक अभिनयाच्याद्वारे त्या भावांचे अभिनयन करतो.त्यात वाणी शारीरिक क्रिया,सात्त्विक भाव, अंगहारयुक्त अभिनय यांचा समन्वय होतो. लोकधर्मीतील स्वभावभावोपगत अनुभवाला स्वर, अलंकार,अस्वस्थपुरुषाश्रित अभिनयातून व्यक्त होतो.लोकधर्मीचे नाट्यधर्मीत रूपांतर होतांना सृजनशीलता ,कल्पकता, नवनिर्माण -क्षमता ,सौंदयदृष्टी इ.घटकांचा महत्त्वपूर्ण सहभाग असतो. लोकधर्मीमध्ये हे सर्व घटक क्षीण स्वरूपात असतात. लोकधर्मीतील या घटकांच्या मागे योजकतेचा, जाणीवपूर्वकतेचा अभाव असतो.म्हणून नाट्याचार्यांनी नाट्यधर्मीचे महत्त्व अधोरेखित केले असावे. परंतु केवळ नाट्यधर्मीलाच केंद्रिय महत्त्व दिले आणि लोकधर्मीला अतिदुय्यम स्थान दिले तर नाट्यप्रयोगाचे रूप सांकेतिक होते.त्यांच्या प्रेक्षकगत प्रत्ययकारकतेचे स्वरूप शबलित होते, हे मराठीतील अनेक नाट्यसंहिता आणि नाट्यप्रयोगावरून दाखवून देता येईल.

संस्कृत नाट्याचार्यांनी नाट्यधर्मीला महत्त्व दिले आहे. त्याचे एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे लोकांमध्ये जे अभिनयाच्या दृष्टीने योग्य असते, असे काव्य म्हणजे नाट्यात्मकता हेरण्याची नाट्यधर्मीची क्षमता हे आहे . हे नाट्य लोकस्वभावाची, लोकमानसाची जडणघडण करणारे असते.तेव्हा लोकमानसातील या नाट्याचे स्वरूप कसे असते. लोकमानसाच्या जडणघडणीत ते कोणत्या स्वरूपात सक्रिय असते,ते तपासून पाहणे निकडीचे ठरते.

मिळविला .राज्य नाट्य परिषदेतर्फे डोंबिवली येथे एकांकिका सादर करण्याचा मान मिळाला. 'चिकून गुनिया' या पथनाट्याचे सादरीकरण 'उचल', 'मनवा', 'एक एप्रिल' इ.एकांकिका 'ब्रोकन चेन' 'आम्ही लेकी कष्टक-यांच्या' अशा एकांकिकांचे प्रयोग महाराष्ट्रात झाले . नाट्य परिषद शाखा बीडची ४५० सभासदांची नोंदणी केली. विविध विषयावर परिसंवाद घेतले.विद्यार्थ्यांना कॅमेरा फेसिंग व स्टील फोटोग्राफीचे प्रशिक्षण दिले. नाट्य लेखक म्हणून सुधीर निकम व त्याचे सहकारी डॉ.संजय पाटील देवळाणकर ,प्रा.सौ.दुष्यंता रामटेके यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.रंगभूमी दिन,उन्हाळी बालनाट्ये,विविध नाट्य उत्कृष्ट सादरीकरण,कलावंतांना मार्गदर्शन नवनाट्यलेखक शिबीर तसेच विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन या विभागाने केले आहे.

डॉ.वामन केंद्रे बीडचे भूमीपूत्र असून महाविद्यालयीन शिक्षण सौ.के.एस.के.महाविद्यालयात पूर्ण केले. 'प्रेमा तुझा रंग कसा 'या तीन अंकी नाटकात प्रथम भूमिका केली. नाट्यशास्त्राची पदविका, पदवी त्याचबरोबर नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा दिल्ली येथे शिक्षण घेतलेले आहे.मुंबई विद्यापीठाच्या ॲकडमी ऑफ थिएटर ऑर्टसचे पहिले निर्देशक, रंगमंचकला अकादमीची स्थापना करून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे.संशोधन ,लेखन,प्रशिक्षण, व निर्मिती अशा सर्व क्षेत्रात मौलिक कार्य केले, नृत्य प्रशिक्षणाचे कार्य केले. अमेरिकेत कार्यशाळेचे विशेष आमंत्रण मिळाले. मॉरिशस मध्ये भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून गेले. बृहन्महाराष्ट्रात कलाविष्काराचे सादरीकरण केले. राज्य मराठी विकास संस्था, ड्रामा स्क्रूटिनी बोर्ड, महाराष्ट्र कलाविष्काराचे सादरीकरण, महाराष्ट्र फौंउडेशन अवार्ड कमिटी, अभ्यास मंडळाचे सदस्य इ.सर्व ठिकाणी कार्य करतात.८० च्या जवळपास नाटके बसविली , ५० पेक्षा अधिक नाटकातून अभिनय केलेला आहे.डॉ.वामन केंद्रे यांना अनेकविध उत्कृष्ट पुरस्कार मिळालेले आहेत. 'झुलवा' या नाटकाचे प्रयोग आंतरराष्ट्रीय रंगभूमी महोत्सवात दिल्ली, बेंगलोर, पुणे येथे सादरीकरण केले. असे हे प्रभावी व्यक्तिमत्व नाट्यक्षेत्राला मिळालेली देणच आहे.

डॉ.दीपा क्षीरसागर ह्या सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयीन जीवनापासून नाट्याची आवड .बीड येथे रसराजनाट्य मंडळ व नटराज नाट्यसंस्थेत नाट्य अभिनय केला. नाट्य परिषद शाखा बीड अध्यक्षपदी निवड झाल्या पासून महत्वपूर्ण योगदान दिले. महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभागाची सुरूवात करून ख-या अर्थाने नाट्यचळवळ रूजविण्यात यशस्वी वाटचाल. रंगभूमी दिन, उन्हाळी बालनाट्य शिबीर, तेंडुलकर महोत्सव, एकांकिकाची निर्मिती व संगीत विभागाची सुरूवात करून नाट्य पोषक वातावरण निर्मिती शहरात केली. मराठी नाट्य संमेलनाच्या व्यापक आयोजनाची धुरा सांभाळण्याचे कार्य करित आहेत.

डॉ.सतीश साळुंके हे बीड येथे परिवर्तन ग्रुपच्या माध्यमातून कार्य करणारे ,नावारूपाला आलेले नाव आहे. त्यांच्या पूर्णसत्य ,पूर्णयुध्द, अंधार वेडा होतोय, उध्वस्त चौकट,मला उत्तर हवंय अशा एकापेक्षा एक सरस एकांकिकाचे लेखन, निर्मिती, दिग्दर्शन व भूमिका करणारे कलावंत म्हणून बीड शहरात त्यांची ओळख आहे.राज्य नाट्य स्पर्धा मध्ये सहभागी होतात.महाराष्ट्र शासनाचे नाट्यलेखनाचे अनेक पुरस्कार त्यांना लाभलेले आहेत. परिवर्तन ग्रुपच्या माध्यमातून बालनाट्य चळवळ रूजविण्याचे ,वाढविण्याचे कार्य त्यांनी केले.या काळात बीड येथे नाट्य चळवळी उत्साहात कार्य करत होत्या.डॉ.सतिश सांळुके व शक्तिकुमार केंडे यांच्या प्रेरणेने व अथक परिश्रमाने अल्पावधीत नावारूपाला आलेली ही नाट्य चळवळ आहे. त्यांनी बालरंगभूमी विकसित करण्याचे कार्य केले. नाट्यप्रशिक्षण,परिसंवाद,विविध कार्यशाळाचे आयोजन करतात.स्वलिखित एकांकिकाचे सादरीकरण, नाट्यनिर्मिती करून तरूणांना ,बालकांना मार्गदर्शन करतात.प्रतिवर्षी कार्यक्रमाचे आयोजन करून व्यापक सहभाग प्राप्त करतात.गणपती उत्सवात नृत्य स्पर्धांचे आयोजन केले जाते. बीड न.प.व परिवर्तन संस्थेतर्फे घेण्यात येणा-या बीड फेस्टिव्हलच्या या उपक्रमास बाल व तरूण कलावंताचा उदंड प्रतिसाद असतो

बीडच्या सांस्कृतिक चळवळीतील अत्यंत महत्वपूर्ण नाव भरत लोळगे होय. गणेशोत्सवाच्या संगीत मेळ्या पासून कार्याला सुरूवात केली.गायन,वादन, संगीत साथ करण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले आहे.नाट्य परिषद शाखा बीडचे सन्माननीय सदस्य म्हणून ही कार्यरत आहे नाट्य चळवळ गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील राहणारे व्यक्तिमत्व आहे.आकाशवाणी, दूरदर्शनवर सातत्याने कार्यक्रम ,उत्तम गायक, वादक म्हणून ख्याती .जाणकार रसिक म्हणून सर्वच क्षेत्रात कार्य करतात. विविध सन्मान, पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. बीड शहरात संगीत कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रीय सहभाग घेतात. संगीताचे विपुल ज्ञान व सतत कार्य करत राहणारे निगर्वी व्यक्तिमत्व आहे.

कुलदीप धुमाळे हे वयाच्या आठव्या वर्षीच नाट्यक्षेत्रात पदार्पण करून विद्यार्थी जीवनातच अनेक नाटकात कामे केली. बेंडे एकांकिका स्पर्धेत स्वलिखित एकांकिका सादर करून फिनिक्स ड्रॅमॅटिक असोसिएशन नाट्य संस्थेत अंबेजोगाईत काम केले.राज्यनाट्य स्पर्धेत ही पडद्यामागे राहून शक्य ती कामे केली.

आष्टीत आल्यावर भोवरा मध्ये त्यांनी भूमिका केली. राज्यनाट्य स्पर्धेत नाटक यशस्वीपणे सादर केले. कलारंग, संस्थेच्या वतीने नाटके बसविली. अंतिम फेरी गाठली. स्मारक घाशीराम कोतवाल या नाटकातील नेपथ्य, दिग्दर्शनाची पारितोषिके मिळविली. तनमाजोरी तील देखाव्यासाठी रौप्यपदक मिळविले. त्यानंतर सतत नाटके करून विविध संस्था, शाळा,गणेश उत्सवासाठी प्रयोग सादर केले. बीड येथे झाल्यावर मंथन संस्थेद्वारे आमुषा, पंगू, दोन्ही एकांकिकेचे सादरीकरण केले. मुक्तिपूजा या नाट्य कलाकृतीचे अ.भा.म.नाट्य परिषद बीड शाखेतर्फे आयोजित कार्यक्रमात सादरीकरण केले. भारत हमारी मां है ! चे स्वत: लेखन करून संस्कार भारती महाराष्ट्र प्रांताने नागपूर येथे सादर केले. 'उषकाल होता होता' चे यशस्वी लेखन व दिग्दर्शनही त्यांनी केले.

पथनाट्ये ,नभोनाटयाचे लेखन व सादरीकरण केले ,नाट्यलेखन, अभिनय, दिग्दर्शन ,नेपथ्य, प्रकाश योजना यासाठीचे त्यांना पुरस्कार मिळालेले आहेत. उत्तर प्रदेश सरकारने सफदर हाश्मी हा पुरस्कार १९९८ ला लखनौ येथे मा.अटलबिहारी वाजपेयींच्या हस्ते दिला. असे हे चतुरस्त्र कलावंत सध्या बीड येथेच आहे. ज्ञानद्वीप प्रतिष्ठान ही संस्था कल्याण वडमारे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध लोककला महोत्सव घेऊन कार्यरत होती.श्री.भगवान कांडेकर यांनी स्थापन केलेल्या सप्तरंग प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय दलित एकांकिका स्पर्धाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आलेले होते. सतत चार वर्षे त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे.कलाश्री कलामंचचे श्री.लक्ष्मीकांत दोडके यांनी नृत्य क्षेत्रात स्पर्धाविजेता संघ म्हणून कार्य केले. क्रियटिव्ह ग्रुपचे खालेद यांनी व त्यांच्या सहका-यांनी नवीन कलावंतांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे कार्य केले. व्ही.एम. कल्चरल ग्रुपच्या वतीने विवेक सरवदे व सहकारी यांनी राज्यस्तरीय एकांकिकेच्या स्पर्धेत पारितोषिके मिळविली. प्रतिक या सेवाभावी संस्थेचे बबन वडमारे यांनी दलित एकांकिका स्पर्धाचे आयोजन केले.सांची कला मंच या महादेव सवाई व सहका-यांनी दलित- नाट्य एकांकिका स्पर्धेत अनेक पारितोषिके मिळवून एशियन एकांकिका स्पर्धेतही पारितोषिके मिळविली. घाटसावळी महोत्सव, बीड फेस्टिवल ,राज्य नाट्यस्पर्धा,शारदा महोत्सव एक्सपो शेतकी पथनाट्य पु.ल.देशपांडे एकांकिका स्पर्धा, कुर्ला फेस्टीव्हल ,बेंडे एकांकिका स्पर्धा, कोळीगीत,लोकगीत,लोकनृत्य,भारूड त्याचबरोबर एड्स जनजागृती अभियान,जलस्वराज्य,पांदण मुक्ती अशा विविध विषयावरील स्पर्धा महोत्सवातून बीड शहरातील कलावंताचे मौलिक योगदान दिसून येते.

डॉ.संजय पाटील देवळाणकर ,डॉ.सुधीर निकम या द्वयांनी बीडच्या नाट्यचळवळीला तंत्रशुध्द करून विविध एकांकिका ,बालनाट्ये,तीन अंकी नाटक,मुकनाट्ये,विडंबन नाट्य ,पथनाट्य आदींचे विविध स्पर्धेत सादरीकरण करून असंख्य पारितोषिके मिळवली.त्यांच्या उचल,धुमस,मनवा,वायदा,ब्रोकन चेन,लिंपन आदी एकांकिकांना एकशे बहात्तरच्या पुढे राज्यपातळीवरील सन्मानाचे पुरस्कार मिळाले.या दोघांच्या नाट्यचळवळीमुळे बीडच्या रंगकर्मींचा महाराष्ट्रात आदरयुक्त भीतीचा दबदबा निर्माण झाला.तो आजही कायमच आहे.श्री.एकनाथ आबूज यांनी ही नाट्य लेखन केले आहे.

विवेकोत्कर्ष मनोदय हे नाटक १९२३ साली लिहिलेले असून त्याचे कर्ते गोविंद देशपांडे आंबेकर हे होत.या नाटकात एकही पद्य नाही , ते गद्य आहे .वैचारिक पातळीवर हे नाटक लिहिलेले असून स्त्री- स्वातंत्र्य व स्त्री-शिक्षण यांची चर्चा यातून घडते.अंबेजोगाई शहरातील ही दूर्मिळ नाट्यसंहिता आहे.याच लेखकाने श्री.दत्त जन्म, मदालसा नाटक, सुबोध नाटक, श्री.दत्त ललित इ.गद्यपद्य नाटके लिहिलेली आहेत.

योगेश्वरी शिक्षण संस्थेतील हौशी कलावंतानी कला केंद्र ही संस्था १९५९-६० साली अंबेजोगाई शहरात स्थापन केली. अंबेजोगाई व परिसरात भाग्यवान ,अंमलदार ,ही नाटके सादर केली.नाट्यनिर्मितीची नवी क्षितीजे निर्माण करण्याचे उत्कृष्ट कार्य करून नवोदित कलाकारांना प्रेरणा दिल्या.

कलासंगम या संस्थेने नाट्याभिनयाची चळवळ सार्वजनिक करण्याचे महत्कार्य केले. १९६२ते १९९० अशी जवळपास ३० वर्षे ही संस्था कार्यरत होती.कै.राम मुकादम या जिद्दी कलाप्रेमी समीक्षकाने अनेक नाटके दिग्दर्शित करून 'कलासंगम' या संस्थेद्वारे कलावंत, नाट्यकर्मी घडवून अंबेजोगाई शहराचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे महान कार्य केले.

राष्ट्रसेवा दलाच्या कला पथकाच्या माध्यमातून डॉ.द्वारकादास लोहिया व डॉ.सौ.शैला लोहिया या दाम्पत्याने नाट्याविष्कार आणि नाट्य चळवळीतील सातत्य कायम ठेवत नवीन,हौशी कलावंतांना संधी दिली. व्यासपीठ निर्माण केले. प्रबोधनात्मक वगनाट्य प्रा.रा.द.अरगडे यांनी लिहिले .राष्ट्रसेवादलाच्या कलावंताने ते महाराष्ट्रात सादर केले. सौ.शैला लोहियानी दिग्दर्शनाची धुरा सांभाळत १९६२ ते १९७० या काळात अनेक नाटके केली. अनेक कलावंत मंडळी घडवित वय,पद,सामाजिक प्रतिष्ठा असा कोणताही अभिनिवेश न बाळगता रंगमंच गाजवणारी ही कलावंत मंडळी सहभागी झाली.

नाट्य आराधनाचे संस्थापक प्रा.रंगनाथ तिवारी हे कादंबरीकार,नाटककार, नाट्य दिग्दर्शक व कलावंत म्हणून सुपरिचित आहे. श्री.विश्वास तांबोळी, रेखा महाजन, कै.प्रमोद महाजन, प्रा.केशव देशपांडे ,प्रा.यशवंत देशमुख, डॉ.दिलीप घारे, विजय देशमुख इ.गुणी कलावंताची देण हे या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. फिनिक्स ग्रुप या संस्थेने तरूणांच्या कलेला व अभिनयाला पुनर्जन्म देण्याचे कार्य केले.कुलदीप धुमाळे, कृष्णा भोकरे, मुकुंद हस्तक, सुधीर वैद्य, देशपांडे ,सुरवसे श्रीरंग इ.कलावंतानी राज्य नाट्य महोत्सवात सहभाग घेऊन उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिके मिळविली.

१९७३ साली योगेश्वरी नाट्य मंडळाची स्थापना करण्यात आली. यात प्रा.केशव देशपांडे यांचा पुढाकार महत्वपूर्ण होता. प्राचार्य लवंदे ,प्रा.अरूण भाटे, प्रा.प्रकाश खोत,प्रा.प्रकाश प्रयाग, दिलीप धारे, विजया मुकदम इ त्याचे सहकारी कलावंत होते.कामगार कल्याण केंद्रासाठी सारे तिमिराचे प्रवासी ,इडिपस रेक्स सॉफक्लीस ,जयकेतु ,बेइमान,ससा आणि कासव ,सूर राहूदे, नाती गोती, संभवामी युगे युगे, पहाटपक्षी, पाहिजे जातीचे ,इ.नाट्य प्रयोगाचे सादरीकरण केले .अनेक कलावंतांची ,नवोदित पिढी घडविण्याचे महत्वाचे कार्य केले.

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग झाला ' रंगवेध ही संस्था आकारास आली .१९९२ पासून संस्था, प्राचार्य ,प्राध्यापक, विद्यार्थी ,कलावंत या सर्वानीच नाट्यनिर्मिती, नाट्य महोत्सव, राज्यनाट्य स्पर्धा यात रंगवेधचे नाव अग्रेसर ठेवले.पोस्टर ,माझा खेळ मांडू दे, साती-साती पन्नास , सावल्या ,सार्टलोट, ऋतू आठवणीचे, एक नाटक दोघाचेच, अरे ! मायावी सरोवर बृहन्नडा, चारचौघी इ. नाटके केली. संपदा कुलकर्णी, केशव देशपांडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.शुभांगी महाजन, अरूंधती लोहिया या कलावंतासह रंगतंत्राची पारितोषिके रंगवेधने प्राप्त केली. कलावंत निर्माण केले.

श्री.पद्माकरराव धाट यांनी अंकुर प्रतिष्ठानच्या वतीने नाट्यनिर्मिती करून कामगार कल्याण केंद्र ,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व राज्यनाट्य महोत्सवात दुसरा सामना, थँक यू मिस्टर ग्लाड, मनधुवांधार इ.नाटकाची निर्मिती करून, कलावंत मंडळी निर्माण करून नाट्यचळवळ जोपासली.

योगेश्वरी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने कलावंतांना प्रोत्साहन नाट्यनिर्मिती व सादरीकरण, सक्रिय सहभाग व सहकार्य हे या संस्थेचे वैशिष्ट्य होय .त्यांनी पाहिजे जातीचे, आम्हाला बांधायचय मंदिर, काळा वजीर पांढरा राजा ,कार्टी श्रीदेवी ,इ.नाटके राज्यनाट्य स्पर्धेत बसविली.डॉ.प्रकाश प्रयाग, प्रा.सुधीर वैद्य, प्रा.संपदा कुलकर्णी, संजय सुगावकर,सदानंद देशमुख, गीतांजली जाधव, प्रशांत कुलकर्णी, इ.कलावंत घडविले.अश्विनी कुमार देशपांडे यांनी नियतीच्या बैलाला, चाफा, चाहूल, च्युंइगम-चिंता, आपण सारे धोंडेगावकर, इ.नाटके दिग्दर्शित केली. शोभायात्रा ,देवपूजा ,ही दासोपंत संशोधन मंडळासाठी सादर केली. 'लाली' हे कै .आर. डी.देशपांडे प्रतिष्ठानतर्फे यशस्वीपणे सादर केले.

कै.राम मुकादम यांचा 'बेहोष चालताना' हा काव्य संग्रह ,रंगयात्रिक हा व्यक्तिरेखा संग्रह, दासोपंताची शास्त्रीय गायन, अभिजात कलेतील योगदान यावर लेखन, कला संगम या संस्थेचे मुख्य म्हणून अनेक नाटकाचे दिग्दर्शन, भूमिका, परीक्षक ,व्याख्याता, मराठवाडा संगीत संमेलनांचे आयोजक, शाहिरा सोबत राष्ट्रीय तमाशातून सहभाग, विविध आंदोलनात सहभाग ,सेन्सार बोर्ड सदस्य, संगीत नाटक इ.अनेक पध्दतीने कार्य केले. प्रभावी, बहुआयामी असे व्यक्तिमत्व अंबेजोगाईच्या नाट्य इतिहासातील महत्त्वाचे आहे.

सौ.ललिता मुकादम ह्या अंबाजोगाई येथील या कलावंत महिलेने 'प्रती दुधारीसुरा 'या नाटकापासून आपली कारकीर्द ७८ पासून सुरू केली. ' पती माझा कुणा म्हणू मी ?' ' एखाद्याचं नशीब', ' चांदणे शिंपीत जा', 'अडीच घर वजिराला' , ' नटसम्राट', ' बंदिशाळा' व ' चकवा' इ.नाटके त्यांनी केली. निष्ठापूर्वक नाट्य जपले. गायन कौशल्य पणाला लावले.

रा.द.आरगडे यांनी १९६३ पासून नाट्य चळवळीस योगदान दिले आहे. प्रेम आंधळं असतं, राया मला दिल्लीला घेऊन चला, घट डोईवर घट कमरेवर व असीकन्या इ.नाटके लिहिली व त्याचे प्रयोग केले. त्यांची वगनाट्या सारखी नाटके लावणी, संगीताने ओतप्रोत भरलेली असत. सामाजिक विचार नाट्याच्या माध्यमातून त्यांनी मांडला.

ॲड.पंडित चौसाळकर यांनी कलासंगम या संस्थेची धुरा सांभाळित साष्टांग नमस्कार, वेगळं व्हायचयं मला, रात्र वै-याची आहे.इ.नाटकात भूमिकाही केल्या.उत्कृष्ट अभिनयाचे रौप्यपदक त्यांना मिळाले.नाट्य आवड व कष्ट यांची सांगड त्यांनी घातली.

कांतराव मांडवकर यांचा संगीत नाटकात आवर्जून उल्लेख करावा असे व्यक्तिमत्व हे आहे. अंमलदार, संशय कल्लोळ, भाग्यवान

इ.नाटके केली. गायनाची प्रचंड आवड, नाट्यवेडे सहकारी यामुळे संगीत नाटके होऊ शकली. अंबाजोगाईची नाट्यपरंपरा दृढ केली.

सौ.शैला लोहिया ह्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, पथनाट्य, वगनाट्याचे समाज प्रबोधनासाठी राष्ट्रसेवादलाचे कला पथकात काम केले. बिनबियाचं झाड, कुणाला कुणाचा मेळ नाही, फास इ.नाटके केली. महाराष्ट्र दर्शनचे कार्यक्रम घेतले. कलावंताच्या पिढया घडविण्याचे महत्कार्य त्यांनी केले.

स्वातंत्र्योत्तर काळात यात्रा जत्रेच्या निमित्ताने आष्टी येथे सामाजिक नाटके, तमाशा प्रधान नाटके होऊ लागली .अनेक परिसरातील कलावंत जीव ओतून काम करीत भोवरा, काळेबेट लालबत्ती, काका कुणा म्हणू मी, थँक्यू मिस्टर ग्लाड, स्मारक, घाशीराम कोतवाल, काळोख देत हुंकार, तनमाजोरी ,अथं मनुस जगनं हं, सूडाचा खेळ, हसन गंगू बहामनी, अस्मितेचा सवाल, सम्राज्ञीचे डोमकावळे, सैनिक नावाचा माणूस, अश्रूंची झाली फुले, विच्छा माझी पुरी करा, वस्त्रहरण इ.नाटके समृध्दपणे करण्यात कुलदीप धुमाळे, देवळालीकर, तडवळकर, राम सोळसे व इतर सर्व कलावंताचे श्रेय मोठे आहे. आष्टीसारख्या ठिकाणी देखणे प्रयोग निर्माण करून राज्यनाट्य स्पर्धेत यश मिळवले. नाट्यचळवळ वाढविली.

आष्टी येथील रूपवेधच्या संस्थेच्या वतीने रूपेश निकाळजे, ठिणगी, जहाज फुटलं, जिथे चंद्र सूर्य नाही, तनमाजोरी चे यशस्वी सादरीकरण केले. गौतम निकाळजे यांनी ' चक्रावाकी 'हे नाटक यशस्वी केले. दिलीप परदेशी विठ्ठल सेवाभावी संस्थेद्वारे 'थेंब थेंब आभाळ ' यशस्वी केले .'खेळ' हे गौतम निकाळजेचे स्वलिखित नाटक अलिकडेच यशस्वी ठरले.मधु सोळसे यांनी' व्यथाचक्र' हे संभाजी शिक्षण संस्थेद्वारे सादर केले.अशा आष्टीला' नाटकवाली आष्टी' असेच नाव पडले. आष्टी तालुक्यातील कलावंतांना किती नाट्यवेड लावले होते.याची साक्ष मौजे धानोरा येथील नाट्यगृह होय.' झाशीची राणी' या नाटकाने धानो-यासह आष्टी,बीड येथे प्रयोग करून इतिहास घडविला.धामणगाव कडा,धानोरा ,हिवरा या गावचे हौशी नाट्य कलावंत लोकमनोरंजन, जनजागृती, प्रबोधना बरोबरच ऐतहासिक व पौराणिक नाटके सादर करीत.'झाशीच्या राणीच्या पाठीवर झोळीतील बाळ'ही प्रसिध्द छबी होती. पंचायत समितीचे माजी सभापती बांदल साहेब यांना 'कुमार' हेच नाव त्यामुळे पडले हा ही एक नाट्य ' इतिहास' म्हणावा लागेल.सय्यद गुरूजी,दत्तोपंत देशमुख,देशपांडेसर सर्व शिक्षक या नाट्य चळवळीत होते.धानो-यात फिल्मी तंत्रज्ञान खेडयात पोचले नसताना अभ्रकावर नावे लिहून मोठया पडद्यावर कलावंताची सूची दाखविण्याची कला वाखणण्याजोगी होती. प्राचार्य कैलास देशमुख,हेळकर,राम हंबर्डे,चारूलता वैद्य,वर्षा कुलकर्णी याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक नाट्य चळवळीत कार्यरत असलेले रूपेश निकाळजे यांचा' क्रांतीचा साक्षीदार ' या एकपात्री प्रयोगाचा एक विक्रमच झाला.कलादर्शन नाट्यसंस्था ,लोकमान्य नाट्यसंस्था,रूपवेध इ.नाट्यसंस्थाचा व दलित रंगभूमीचेही योगदान महत्वपूर्ण आहे.प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनीही आपल्या लेखनातून नाट्य चळवळ अधोरेखित केली आहे.

मधुकर द.सोळसे हे चित्रकला शिक्षक असून ता.आष्टी येथील कलावंत आहे.नेपथ्य ,प्रकाश योजनेचे अनेक पुरस्कार त्यांनी मिळविले .व्यथाचक्र ,स्वप्न एका वाल्याचे , गत्यंतर ,चक्रावाकी इ.नाटकाचे दिग्दर्शन केले व कलाकार म्हणून काम केले.वनशेती माहितीपटाचे चित्रीकरण आष्टी येथे केले. श्री.गजानन महाराज शेगावचा माहितीपट त्यांनी केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर दूरदर्शन माहिती पटाचे लेखन व दिग्दर्शन केले.त्यांनी नशीब, मराठा, म्हैस, मोर्चा, मूर्ती इ.नाटकांचे लेखन ही केलेले आहे.

शाहीर शेख हासन कासम हे सरदार कला पथकाचे संस्थापक,कडा ता.आष्टी येथील असून ते आकाशवाणी व दूरदर्शन कलावंत आहेत. १९७५ पासून संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्रम सादर करतात. महाराष्ट्र शासनाच्या दारूबंदी कार्यक्रमातून जनजागृती करतात. अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.पाटोद्यातील रंगकर्मीचे योगदानही महत्त्वाचे असे आहे. १९६५ ते ७५ या दशकात डी.डी.भोसले व ॲड.एन.डी.कांकरिया यांनी 'नवरंग क्लब'ची स्थापना केली. अपराध मीच केला. तो मी नव्हेच, मोरूची मावशी, काका किशाचा , लग्नाची बेडी इ.नाटकांची निर्मिती करून नाट्यचळवळ उभारली. कै.पी.एस.पवार व शरीफ खान, यांनी तर ऑर्केस्ट्रा, व्यावसायिक नाटकांची संधी गणेशोत्सवातून निर्माण करून पाटोद्याची नाट्यभूक भागवली. श्री.रमेश पिसाळ, वसंत जोशी, शिवाजीराव जाधव ,शिवाजी डोरले, इंद्रिस चाउस , महेंद्र नागरगोजे, दिपक खंडागळे, सुनील कांकरिया, श्री.पेंटर ,चंद्रकांत जाधव, कुलदीप धुमाळे, दिवाकरराव तडवळकर यांनी विशेष प्रयत्नाने पाटोदातील चळवळ सांभाळली. पुढे महाविद्यालयाच्या युवक महोत्सवातून ही चळवळ प्रवाहित झाली. पी.व्ही.पी.महाविद्यालयाच्या प्रा.सहदेव खांडे यांच्या मार्गदर्शनाने प्रदीप मांजरे याला युवक महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून पारितोषिक मिळाले. नफरवाडी येथील संघर्ष नाट्यमंडळाच्या माध्यमातून मधुकर क्षीरसागर व सहका-यांनी व्यसनमुक्ती, दारूबंदी, नाट्य प्रयोगाचे तालुक्यात सादरीकरण केले.

माजलगाव सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाचे शहर आहे. १९८२ मध्ये रसिक मंडळाची स्थापना, स्व.शाम पाठक यांनी पसंती, अर्धविराम, ऋणानुबंध ही नाटके लिहून दिग्दर्शित केली. शाम पाठक, ल.ना.देशपांडे, डॉ.निळेकर, सौ.स्नेहल पाठक यांच्या भूमिका श्रेष्ठ ठरल्या. दत्ता भगतांचे 'जहाज फुटलं आहे.' हे नाटक प्रभाकर साळेगावकराच्या सहभागाने आकारास आले.स्व.शाम पाठकांचा वारसा व नाट्य चळवळ जिवंत ठेवण्याचे कार्य अनिल साळवे हा गुणी कलाकार करतो आहे. संदीप पाठक हे आता नावारूपाला आलेलं नाव याच चळवळीतून घडले आहे. सौ.सुजाता पाठकची 'अचानक' मधील वाटचालही कौतुकास्पद आहे.माजलगावच्या सांस्कृतिक चळवळीचा हा आलेख महत्त्वपूर्ण आहे. माजलगावच्या नाट्य चळवळीचा आशादायी किरण म्हणून संदीप पाठकचे नाव घ्यावे लागते.उत्कृष्ट कलाकार म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.घडलय बिघडलय, कॉमेडी एक्सप्रेस व असंभवमालिकेत त्यांच्या भूमिका आहेत. अनेक नाटकातून व चित्रपटातून तो लौकिक मिळवत आहे. वडिलांचा वारसा जतन करण्याचे कार्य तो सतत करत आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेची धार्मिक,वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने नाट्यनिर्मिती करण्याची परपंरा हा जुनी आहे. गेवराईचे गावप्रमुख बाळासाहेब पाटील यांनी नाट्यपरंपरेची मुहूर्तमेढ रोविली.पौराणिक व ऐतिहासिक संगीतनाटके त्यांनी बसविली. त्याच्या परंपरेत पुढे हमीद पटेल या गुणी कलावंताने सहका-यासोबत नाट्य चळवळीला व संगीत चळवळीला बळ दिले .ते स्वत: उत्तम अभिनेते, दिग्दर्शक ,गायक,संगीतकार होते. प्रसिध्दीच्या मागे न लागता त्यांनी शेवटपर्यंत उपासना केली.

यानंतर च्या काळात रामलिंग कापसे यांच्या अप्रतिम स्त्री भूमिकेमुळे त्यांना गेवराई तालुक्याचा 'बालगंधर्व 'म्हणूनच ओळखले जाई. अनेक सहकारी गुणी कलावंत त्यांना लाभले. शंकर भुते यांची 'एकच प्याला 'तील भूमिका खूपच गाजली.सन १९६९ साली श्रीराम प्रासादिक नाट्य मंडळीतील कलावंतानी कलोपासक नाट्यमंडळ या नाट्य मंडळाची सुरूवात केली. अपराध मीच केला, भोवरा, लेक लाडकी, कवडी चुंबक, अंमलदार, आग-याहून सुटका, भाग्य दिले तू मला इ.नाटके सादर केली.ॲड. इंदाणी यांनी हा सांस्कृतिक वारसा पुढे दिला. काळा मारोती नाट्यमंडळ,निकम गल्ली याद्वारे शाहीर राम मुळे व सहका-यांनी दैव जाणिले कुणी ? या नाटकाची सदैव स्मृती ठेवली.हनुमान प्रासादिक नाट्य मंडळाने अनेक सहका-या सोबत नाट्य चळवळ वाढविली.'भंडा-याची डाकूराणी'चे प्रयोग त्यांनी सादर

केले.अॅड.कमलाकर देशमुख लिखित व व दिग्दर्शित 'भग्नमूर्ती'या नाटकाने नाट्य स्पर्धेत यशश्री खेचून आणली. 'उसनी बायको', 'पाहिजे जातीचे,' 'मौजे आनंदवाडी', 'यंत्र मानव', 'ब्रह्मराक्षस'इ.नाटके यशस्वी केली.सुभाष निकम, राजेंद्र बरकसे यांचे योगदान मोलाचे आहे.नंदू माधव यांचं 'प्रेम जमलं', लग्न राहिलंचे एकपात्री प्रयोग ,प्रा.देवदे शिवाजीच्या एकांकिका, सुभाष निकम यांचे 'उसनी बायको पाहिजे 'या नाटकाचे यश महत्त्वपूर्ण आहे.राक्षसभूवन ,साष्ट पिंपळगाव, धोंडराई, जातेगाव, रामपुरी ,मादळमोही ,सिरसदेवी ,पाडळसिंगी ,भेंडटाकळी इ.गावात वार्षिकोत्सवात अडचणींची तमा न बाळगता नाट्यपरंपरा जपली जाते, नाट्यसेवा केली जाते. परळी येथील नाट्य चळवळीतील योगदानही मौलिक असून त्यांच्या कार्याचा उल्लेख करावाच लागतो. १९९५ पासून राज्य नाट्य स्पर्धेशी जोडलेले हे रंगकर्मी आहेत.आकाश पेलताना ,वाहतो ही दुर्वांची जुडी, श्रीमंत ,कापूस कोंड्याची गोष्ट ,मी येतोय ,तुज आहे तुजपाशी ,शेवंता जीती हाय,अंधयुध्द,वेगवेगळे नाटके यशस्वीपणे राज्यनाट्य स्पर्धेत सादर केली. कामगार नाट्य स्पर्धा म.रा.वि.म. अंतिम फेरी पर्यंत त्यांनी नाटके नेऊन पुरस्कार मिळविले. वेडा वृंदावन, टाहो, आक्रोश, सख्खे भाऊ पक्के वैरी ,मन धुवांधार इ.नाटके यशस्वी केली.

आनंद जोशी हे परळी येथील रंगकर्मी असून राज्य नाट्य स्पर्धेत यशस्वी व बक्षीसे घेणारा कलावंत.त्यांनी अनेक नाटकांचे सादरीकरण केले आहे.कामगार नाट्य स्पर्धा व म.रा.वि.म.नाट्यस्पर्धेत यशस्वी सहभाग घेतला आहे.भाऊसाहेब नारनवळे हे परळी येथे १९८५ ते २००४ म.रा.वि.म.च्या नाट्य स्पर्धेत कार्यरत असणारे हे कलावंत असून त्यांनी वेडावृंदावन, सख्खेभाऊ पक्के वैरी,मन धुवांधार, टाहो, आक्रोश अशा विविध नाटकात भूमिका व स्पर्धासाठी सादरीकरण केले.संतोष गच्छेवार हे म.रा.वि.म.मध्ये अभियंता अभिनयात उत्कृष्ट व राज्यनाट्य स्पर्धेच्या अंतीम फेरी पर्यंतची बक्षीसे प्राप्त करणा-या या कलावंताने अनेक नाटकात भूमिका करून ८० कलाकारांचा महाराष्ट्र दर्शन हा कार्यक्रम परळीत लोकप्रिय केला.हेमंत बडवे हे प्रा.केशव देशपांडे यांच्या मार्गदर्शना खाली प्रशिक्षित असा हा कलावंत , अभिनय, प्रकाश योजना, दिग्दर्शन या सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. ते 'मधुशाला' ,कार्यक्रमाचे सादरीकरण करतात.

धारूर येथील सनि कलामंच ही संस्था अल्पावधीत महाराष्ट्रातील सर्व स्पर्धात सहभागी होणारी,नाट्य चळवळीला नवसंजीवनी देणारी बालरंगभूमीशी निगडित बालकांना शिक्षण, प्रशिक्षण देण्यात महत्त्वपूर्ण योगदान असलेली ही संस्था होय.सनी मंच तर्फे एकांकिका महोत्सव, असिफ अन्सारी बालनाट्य महोत्सव, बालनाट्य एकांकिका स्पर्धा ,नाट्य वाचनाचे कार्यक्रम घेतले जातात. आतापर्यंत त्यांनी ५०० बालकलाकार घडविले असून ३०० विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत संधी दिली आहे.

प्रा.आसिफ अन्सारी हे धारूर येथील महाविद्यालयात प्राध्यापक असलेले सनि कला मंचचे संस्थापक अध्यक्ष,हौशी रंगमंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष असून बाल रंगभूमीवरील त्यांचे योगदान मौलिक आहे. एकांकिका लेखन व सादरीकरणात कौशल्य आहे. ओसामा व इतर अनेक एकांकिका लेखन केले. महाराष्ट्रातील सर्व नामांकित स्पर्धा मध्ये सहभाग घेतात व बाल कलाकारांना शिक्षण प्रशिक्षण देतात.
आनंद जोशी हे परळी येथील रंगकर्मी असून राज्यनाट्य स्पर्धेत यशस्वी व बक्षीसे घेणारा कलावंत ,अनेक नाटकांचे सादरीकरण केले आहे. कामगार नाट्य स्पर्धा व म.रा.वि.म.नाट्य स्पर्धेत यशस्वी सहभाग घेतला आहे.

एकूणच बीड जिल्ह्यातील संगीत, नाटयचळवळीचा, संस्थात्मक कार्याचा व व्यक्तींनी केलेल्या नाट्यात्मक कार्याचा हा धावता आढावा आहे. सर्वस्थळांचे व सर्व व्यक्तींचे नाव लेखनात समाविष्ट करणे शक्य नाही ज्यांचे नामोल्लेख झाले नाही अशा कलावंताचेही रंगभूमी व नाट्य चळवळ वाढविण्यात यश आहे. मोलाचा वाटा आहे. हे विसरता येणार नाही. आज मराठी नाट्य व व चित्रपटसृष्टीत अत्यंत आदराने व कौतुकाने ज्यांचे नाव घेतले जाते ते नंदु माधव व मकरंद अनासपूरे हे दिग्गज कलावंत याच बीड जिल्ह्यातील आहेत.

श्री.मकरंद अनासपुरे यांनी बीड येथे बालपणी नाट्य अभिनयाचा शुभारंभ केला तर नंदु माधव गेवराई तालुक्याच्या नाट्य चळवळीतून घडले .मिलींद शिंदे हे सिने कलावंत बीड जिल्ह्यातील निरगुडी येथील रहिवासी आहेत तर कमलाकर सातपुते हे सिनेकलावंतही बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील मूळ रहिवासी आहेत.तसेच कथा,पटकथा ,लेखक ,दिग्दर्शक म्हणून नावारूपाला आलेलेले अरविंद जगताप हे गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी या गावचे रहिवासी आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्शास्त्र विभागप्रमुख डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर ,सरस्वती भूवन महाविद्यालय,नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.दिलीप घारे व यशवंत देशमुख ज्यांचा या गाजराची पुंगी हा द्विपात्री कार्यक्रम महाराष्ट्रभर रसिकांच्या पसंतीस उतरला .ते बीड जिल्ह्याचेच रहिवासी आहेत.नाट्यकलावंत डॉ.विजय देशमुख (खालापूरी )बीड येथील रहिवासी आहेत.

बीड येथे बलभीम महाविद्यालय आणि सावरकर महाविद्यालयातही नाट्यशास्त्र विभाग सुरू झाला आहे.बलभीम महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग प्रा.केशव भागवत हे समर्थपणे सांभाळत असून सावरकर महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग प्रमुखपदी प्रा.प्रशांत तालखेडकर हे आहेत. यामुळे महाविद्यालयीन पातळीवर कलावंताना नाट्यप्रशिक्षण मिळत आहे.

आजही अनेक तरूण कलावंत या नाट्यक्षेत्रात पुढे येत आहेत. श्री.सतीश लोंढे, संजय सरवदे ,बाळू सौंदत्तीकर ,प्रशांत बिवरे,विजय क्षीरसागर ,उषा लवरीकर, रमा सवाई ,सुरेश साळुंके नीलम वाघमारे ,दीपक नायर,रंजीत वाघमारे ,अमोल सावंत ,अजय शेरकर ,संकेत यंदे, परशुराम भोसले,विश्वास रणदिवे, मनिष दळवी, बाबा केंद्रे ,अशोक केंद्रे ,लक्ष्मण सोनवणे,मिलींद शिवणीकर, दत्ता काशी , कुंदन जोगदंड ,महेंद्र खिल्लारे ,राजहंस शिंदे, अनील राऊत, प्रविण वडमारे, जतिन वाघमारे, अॅड.प्रशांत जाधव, राजेंद्र बरकसे अशी तरूण मंडळी नाट्यक्षेत्रात पुढे येत आहे.



# मराठवाडयाची रंगभूमी

**प्रा.डॉ.दिलीप घारे**

मराठी रंगभूमींची सुरूवात १८४३ साली झाली असे म्हटलं जातं ; पण यावर आजही वाद आहेत. मराठी रंगभूमीचा इतिहास लिहिताना नागरी रंगभूमी आणि त्यातही मुख्य प्रवाहाची ,व्यावसायिक रंगभूमी गृहित धरण्यात आली आहे.कार्यकर्ता म्हणून हे लेखन झालेले नाही तर लिहिणा–याच्या समोर जे घडत होतं त्याचीच नोंद झाली आहे.

खेडयापाडयात ,प्रसिध्दीपासून दूर असलेल्या अनेक ज्ञात, अज्ञात कलावंतानी रंगभूमी समृध्द केलेली आहे.सगळया ठिकाणी पोचण्याच्या मर्यादा, हितसंबंध,अशा एक ना अनेक गोष्टी त्यांत अपरिहार्यपणाने येतात.पर्यायानं रंगभूमीच्या अनेक
वारक–यांवर जाणता अजाणता अन्याय झालेला आहे.

मराठवाडयाच्या रंगभूमीचा विचार करताना माझ्या हातून अशा अनेक ज्ञात,अज्ञात अशा रंगभूमीच्या वारक–यांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखील मी व्यक्तिश: या दिंडीत गेली ३० वर्षे सामील असल्यामुळे ९० टक्के रंगकर्मींना मी ओळखतो त्यांच्या कार्याची मला जवळून माहिती आहे.त्यामुळे प्रायोगिक आणि व्यावसायिक चळवळीशी संबंधित रंगकर्मी तर मला माहितच आहेत.त्यांच्याशी माझा संवाद आहेच; पण मराठवाडयाच्या अनेक खेडयापाडयातून खूप पूर्वीपासूनच रंगभूमी विषयक उपक्रम होत असतात.सर्वच ठिकाणी मी पोचणं अशक्य असल्यामुळे त्यांचा उल्लेख होऊ शकणार नाही. त्याबद्दल लेखाच्या सुरूवातीलाच मी दिलगिरी व्यक्त करतो.शक्यतो मराठवाडयाच्या रंगभूमीवरील महत्त्वाच्या घटनांचा समावेश या लेखात माझ्याकडून झाल्याशिवाय राहणार नाही.गेल्या ५० वर्षातल्या मराठवाडयातल्या नाट्य चळवळीकडे पाहिल्यास प्रामुख्याने तीन टप्पे दिसतात.स्वातंत्र्य पूर्व काळातील किंवा १९६० पर्यंतचा एक टप्पा,१९६० ते १९८० हा दुसरा टप्पा तर १९८० ते आज अखेरपर्यंतचा तिसरा टप्पा असे भाग पाडता येतील. कै.लोटू पाटील यांनी सोयगाव सारख्या तसेच अनेक ज्ञात अज्ञात कलावंतानी छोट्या छोट्या खेड्यापाड्यातून केलेले रंगभूमीविषयक महत्त्वपूर्ण प्रयत्न श्री.म.भि.चिटणीस यांनी नागसेनवनात 'युगयात्रा' आणि अनेक दलित रंगभूमीशी संबधित महत्त्वपूर्ण प्रयोग करून मराठवाडयाच्या रंगभूमीवर एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. १९६० नंतर कै.कुसूमबेन जोशी ,पु.बा.जोशी, ॲड.लक्ष्मीकांत पाठक, माया दातार ,मायी दातार,कै.पु.ग.हौलवाला ,श्री.त्र्यंबक महाजन या मंडळींनी हौशी रंगभूमीवर अनेक महत्त्वपूर्ण प्रयोग केलेले आहेत. १९६० नंतर राज्य नाट्य स्पर्धेचे आगमन झाले.अनेक नाट्यसंस्था उदयास आल्या आणि नव्या दमाचे अनेक चांगले कलावंत रंगभूमीशी जोडले गेले. यात प्रामुख्याने श्री.सुरेश देशपांडे, प्रा.कुमार देशमुख, जयंत फडके,चंद्रकांत भालेराव ,मायी भालेराव ,सुरेश बुलगे, जनार्दन अभंगे,डॉ.आलोक चौधरी,श्री.विजय दिवाण ,अनुराधा वैदय,सदा पाटणकर ,अशी एक ना अनेक मंडळी स्पर्धेच्या निमित्ताने आणि एखादया उत्सवाच्या निमित्ताने सातत्याने नाटके सादर करू लागली. या काळात बहुतांश नाटक नामांकित नाटककारांची किंवा व्यावसायिक रंगभूमीवर गाजलेली अशा स्वरूपाचीच दिसून येतात.मराठवाडयातील साहित्यिकांनी नाटक हा प्रकार सातत्याने हाताळलेला दिसून येत नाही.असे प्रयत्न १९८० नंतर थोडयाफार प्रमाणात झालेले दिसून येतात.१९७० पर्यंत मराठवाड्याच्या रंगभूमीचे स्वरूप बहुतांशी हौशी स्वरूपाचेच होते. प्रायोगिक तसेच व्यावसायिक स्वरूपाची रंगभूमी ख–या अर्थाने १९८० नंतरच आकारास आलेली दिसून येते.

**नाट्यशास्त्र विभागाची स्थापना :** १९७५ च्या आसपास डॉ.बा.आं.म.विद्यापीठाने तत्कालीन कुलगुरू श्री.रे.प.नाथ यांनी माननीय श्री.कमलाकर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यशास्त्र विभाग विद्यापीठात सुरू केला.मराठवाडयाच्या रंगभूमीचे स्वरूप आमुलाग्रपणे बदलण्यांचे कार्य नाट्यशास्त्र विभागामुळेच झाले आहे. सोनटक्के सरांनी धर्मवीर भारती यांचे 'अंधायुग' तसेच 'अंधेर नगरी चौपट राजा' ,' जस्मा ओडेन' ,'वेटिंग फॉर गोदो' , अशी एक ना अनेक तांत्रिकदृष्टया सरस असलेली नाटके नाट्य विभागामार्फत सादर केली.या सर्व नाटकांनी वातावरण निर्मिती तर केलीच पण रंगभूमीकडे बघण्याचा एक दृष्टीकोण विकसित केला.लोकांच्या अभिरूचीच्या कक्षा रूदांवल्या गेल्या.इथून पुढे मराठवाड्याच्या रंगभूमीने दमदारपणे वाटचाल सुरू केल्याचे आपणास दिसून येते.नवे आशय, नवे विषय, सादरीकरणाच्या नवनव्या पध्दती आणि तांत्रिकदृष्टया सक्षम असलेली नाटके मराठवाड्याच्या रंगभूमीवर आली.केवळ औरंगाबादच नव्हे तर अंबाजोगाई,बीड,परळी,परभणी,नांदेड,जालना आणि लातूर इथल्या रंगकर्मींमध्ये एक प्रकारचे चैतन्य निर्माण आले.लातूरकराचे 'पुन्हा पुन्हा मोंहोजोदडे' 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' ,श्रीकांत कुलकर्णींचे ' एंवम् इंद्रजित' , डॉ.दिलीप घारे आणि डॉ.शशीकांत ब–हाणपूरकर यांचे 'चेतना चिंतामणीचे गाव 'आणि 'रस गंधर्व 'या नाटकांनी मराठवाडयाच्या रंगभूमीला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला.प्रा.कुमार देशमुख यांच्या' स्मारक' या नाटकाने राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत पहिले येण्याचा बहुमान पटकावला .हे नाटक विषय,आशय आणि तांत्रिक बाबतीत मुंबई पुण्यांच्या तोडीस तोड होते.या नाटकाची नोंद अमोल पालेकर, जब्बार पटेल या दिग्गजांनीही ही घेतली आहे.

१९८० नंतर कौटुंबिक नाटकाची संख्या कमी होवून नवनवे प्रयोग करण्याकडे रंगकर्मींचा कल वाढत गेल्याचे दिसून येते. डॉ.लक्ष्मण देशपांडे यांनी 'व–हाड निघालय लंडनला ' हा अनोखा एकपात्री अविष्कार १९७९–८० ला सादर केला. ज्याची दखल अवघ्या महाराष्ट्राने तर घेतलीच परंतु ३००० व्या प्रयोगाकडे वाटचाल सुरू असलेल्या या प्रयोगाची नोंद गिनीज बुकातही आवर्जुन करण्यात आली आहे. १९८० च्या नंतर मराठवाडयाच्या रंगभूमीला आणखी गती देणा–या घटना घडून आल्या.अजित दळवी चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी या मंडळींनी'परिवर्तन' आणि 'जिगिषा 'या संस्थेतर्फे सभासद योजना राबवून 'पौगंड ','पुरूष' ,'स्त्री' , 'हॅम्लेट' , 'शांकुतल' अशी एकापेक्षा एक सरस नाटके सादर केली.चंद्रकांत कुलकर्णींच्या या नाटकांमुळे नवे तरूण रंगकर्मी रंगभूमीकडे आकर्षित होवू लागले.चंद्रकांत कुलकर्णींचे मराठवाडयाच्या रंगभूमीवरील योगदान खूप महत्त्वाचे यासाठी ठरते. कारण त्याने आणि दळवी बंधूंनी नव्या आशयाची आणि नव्या आकृतीबंधाची नाटके तर सादर केलीच; पण अशा प्रकारची नाटके बघण्यासाठी सामोरे जाणारा प्रेक्षकवर्ग तयार केला.सुरेश देशपांडे, प्रा.कुमार देशमुख यांनी काही व्यावसायिक प्रयत्न करून बघितले. डॉ.दिलीप घारे आणि प्रा.यशवंत देशमुख यांनी' कलावंत'नामक संस्था स्थापन करून संस्थेतर्फे अर्ध व्यावसायिक स्वरूपांची नाटके सादर केली.कलावंत संस्थेतर्फे 'डॉलिंग डॉलिंग', 'सूर राहू दे', 'अश्वमेघ', 'महानिर्वाण' ,'शनिवार–रविवार' आदी नाटके सादर केली गेली कमी प्रेक्षक आले तरीही विनातिकीट कुणालाही प्रेक्षागृहात प्रवेश दयायचा नाही हा प्रकार हाताळून बघण्यात आला आणि त्याला अपेक्षेहून अधिक यश मिळाले. 'गुडबाय डॉक्टर ' चा प्रयोग हाऊसफुल्ल झाला आणि प्रेक्षकांना तिकिटाअभावी परत जावे लागले. थोडक्यात व्यावसायिक स्वरूपाचे काही तुरळक प्रयत्न मराठवाड्याच्या रंगभूमीवर करून बघितले गेले; पण त्यात सातत्य राहू शकले नाही. आजही मराठवाड्याची स्वत:ची व्यावसायिक चेहरा असलेली रंगभूमी नाही, हे सत्य मान्य करावेच लागेल.रा.रं.बोराडे यांचे 'आमदार सौभाग्यवती ' आणि डॉ.दिलीप घारे ,यशवंत देशमुख, यांचे 'गाजराची पुंगी' यांनी थोडेफार

व्यावसायिक यश मिळवलेले दिसून येते. दत्ता भगताचे 'वाटा पळवाटा 'आणि अजित दळवी यांचे 'डॉक्टर तुम्ही सुध्दा' ,'गांधी विरूध्द गांधी' ,'शतखंड' आदी मुंबईच्या संस्थानी केलेली नाटके हेच थोड्याफार प्रमाणात मराठवाड्याच्या व्यावसायिक रंगभूमीचं संचित आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.वामन केंद्रे काही काळ औरंगाबादच्या नाट्यसृष्टीत स्थिरावले . राष्ट्रीय नाट्य विद्यालयाची पदवी घेवून 'झुलवा ' सारखे आगळेवेगळे नाटक सादर करून स्वत:ची आणि पर्यायाने मराठवाड्याची वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले.

महाविद्यालयीन पातळीवर नाट्यशास्त्र विभागाची स्थापना

१९७५ च्या आसपास विद्यापीठाने सुरू केलेल्या नाट्यशास्त्र विभागाने नाट्य चळवळीत जसे नव चैतन्य आणले तसेच १९७८ साली नाट्यशास्त्र हा विषय 'ऐच्छिक' विषय म्हणून महाविद्यालयीन पातळीवर सुरू करण्यात स.भू.कला व वाणिज्य महाविद्यालयाने पुढाकार घेतला. त्यानंतर सौ.के.एस.के. महाविद्यालय ,बीड आणि स्वामी रामानंद तीर्थ या महाविद्यालयाने हा नाट्यशास्त्र विषय सुरू केला . आज जवळपास बारा महाविद्यालयातून नाट्यशास्त्र हा ऐच्छिक विषय म्हणून शिकवला जातो. १९८० नंतर नाटकाचं स्वरूप बदलत जावून दीर्घांक तसेच एकांकिका प्रकाराला महत्व येत गेले आणि या प्रकारात मराठवाड्यात तसेच महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण करणारे सर्व रंगकर्मी स.भू.नाट्यविभाग ,के.एस.के.नाट्यविभाग, एस.आर.टी., एम.जी.एम.आदी विभागाचेच विद्यार्थी आहेत हे उल्लेखनीय आहे.

स.भु.नाट्यशास्त्र विभागाने मागील दहा वर्षात सातत्याने अल्फा महाकरंडक , नाट्यदर्पण, पु.ल.करंडक, सकाळ करंडक आदी महाराष्ट्रातील विविध महत्वाच्या स्पर्धा प्राथमिक फेरीत जिंकून अंतिम फेरीत धडक मारली आहे. स.भू. नाट्य विभागाची 'परिक्रमा'' शिवानी','झाल्या तिन्ही सांजा', 'इस रूटकी सभी लाईने व्यस्त है',तसेच स.भू.चे माजी विद्यार्थी रोहित देशमुख आणि माधुरी भारती यांची ' रेन मेकर ' ही एकांकिका २००८-०९ या वर्षाच्या पु.ल.करंडक अंतिम स्पर्धेत प्रथम आली आहे.सौ.के.एस.के.नाट्यशास्त्र विभागाच्या 'उचल,'धुमस','मनवा',' लिंपन' आदी एकांकिकानी अंतिम फेरीत पोचून आपला दबदबा निर्माण केला आहे.याचे सर्व श्रेय डॉ.संजय पाटील, डॉ.सुधीर निकम, प्रा.दिलीप शिराळे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.दीपा क्षीरसागर आणि त्यांचे सर्व सहकारी यांचेकडे जाते. नाट्यशास्त्र विभागाच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या एकांकिकाच्या जगतात मराठवाडयाने आपला दबदबा निर्माण केला आहेच.त्याचबरोबर बरेचजण मुंबईत जावून आपली ओळख निर्माण करीत आहेत. ग्रामीण नाटकांच्या चळवळीचा आग्रह धरणारे रा.रं.बोराडे, तसेच लोकनाट्याची प्रचंड जाण असलेले डॉ.रूस्तुम अचलखांब विश्वास सोळुंके , राजू सोनवणे, अजय शेगावकर, कै. पंढीरनाथ घनघाव, शोभा दांडगे, शेषराव पठाडे , सयाजी खराट, मधुकर कांबळे आदी मंडळींनी लोक रंगभूमीची शाखा मजबूत करण्याचे कार्य केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या 'केंद्रीय युवक महोत्सवातून' पुढे येणा-या अनेक ज्ञात अज्ञात कलावंतानी १९९० नंतरची मराठवाड्याची रंगभूमी समृध्द केली आहे. यात प्रामुख्याने प्रा.दिलीप महालिंगे यांचे योगदान विशेष उलेखनीय आहे.नाट्यशास्त्र विभाग नसतांनाही वर्षभर शिस्तबध्द प्रशिक्षणाची सुविधा निर्माण करून रंगभूमीकडे गांभीर्याने बघण्याचा दृष्टीकोन त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केल्याचे दिसून येतो.गेली दहा वर्ष सातत्याने विवेकानंद महाविद्यालयाचे नाव प्रा.दिलीप महालिंगे यांनी नावारूपाला आणले आहे. मागच्या दहा वर्षातल्या युवक महोत्सवावर आणि पर्यायाने मराठवाडयाच्या अलिकडच्या रंगभूमी विषयक चळवळीवर विवेकानंद , स.भु.महाविद्यालय,सौ.के.एस.के. महाविद्यालय, एस.आर.टी. महाविद्यालय,अंबाजोगाई,नांदेड,लातूर, येथील विद्यार्थ्यांचा दबदबा नि:संशय निर्माण झाला आहे.

मराठवाड्यात सातत्याने होणा-या 'बेंडे एकांकिका स्पर्धा' ,' वरपुडकर एकांकिका स्पर्धा' ,'साई एकांकिका स्पर्धा' , 'महापौर चषक एकांकिका स्पर्धा ' , 'जाणिवा एकांकिका स्पर्धा,' या अनेक स्पर्धामधून आपली ओळख निर्माण करणारी अनेक तरूण मंडळी मराठवाडयाच्या रंगभूमीचे आशास्थान आहे असे म्हणता येते आज ख-या अर्थाने मराठवाड्याची रंगभूमी हौशी, प्रायोगिक तसेच व्यावसायिक पातळीवर आपली स्वत:ची ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे.मराठवाड्याच्या रंगभूमीच्या विकासात योगदान देणा-या काही अज्ञात रंगकर्मीचे योगदान आणि ऋण मान्य करून काही ज्ञात रंगकर्मींचा उल्लेख केल्याशिवाय हा आढावा पूर्ण होणार नाही.

मराठवाड्याच्या रंगभूमीवर काही निवडक शिल्पकार : १९६० पर्यंत चे मराठवाडीय रंगभूमीवरील महत्त्वाचे शिल्पकार म्हणून कै.लोटू पाटील,कै.श्रीपाद नृसिंह बेडें, कै.कृष्णराव फु लंब्रीकर ,ग.ना.अंबेकर, म.भि.चिटणीस, माया दातार, मायी दातार, पु.ग.होजवाला,श्री.व.सौ.बापू कुलकर्णी, सतीश महाजन,प्रा.त्र्यंबक महाजन,एम.डी.जोशी,सुरेश देशपांडे, माया पत्की,हरिभाऊ आविकर ,चंद्रकांत भालेराव ,गजमल माळी, डॉ.गंगाधर पानतावणे, राम मुकादम,ललिता मुकादम ,पंडित चौसाळकर,स.भ.देशपांडे,रविंद्र गोवंडे, प्रा.पुरोहित आदीचा उल्लेख करावा लागेल.१९६० ते १९८० चे प्रा.कमलाकर सोनटक्के, प्रा.लक्ष्मण देशपांडे, जयंत दिवाण, जयंत फडके, प्रा.कुमार देशमुख,डॉ.आलोक चौधरी,डॉ.रूस्तूम अचलखांब, डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर,प्रा.यशवंत देशमुख,डॉ.दिलीप घारे, प्रा.दत्ता भगत, रा.रं.बोराडे ,प्रा.केशव देशपांडे,प्रा.सुधीर वैद्य, प्रा.प्रकाश प्रयाग,मुकूंद हस्तक, कुलदीप धुमाळे,डॉ.चंद्रकांत व प्रभाकर शिरोळे, प्रा.विजया शिरोळे, जयश्री गोडसे,मधु गायकवाड,अजित दळवी, अनुया दळवी, सुजाता कानगो,सीमा मोघे, विश्वास सांळूके, पंढरीनाथ घनघाव, गंगाधर इंगळे,अविनाश किन्हीकर, दिनेश मिश्रा, सूर्यकांत सराफ, धनाजीराव चौधरी,श्रीराम गोजमगुंडे, राजा काटे, विभाकर मिरजकर,श्रीमती परचुरे, वसंत दातार, माधुरी दातार, जयंत शेवतेकर, अनंत आल्हाड,कालिदास कुलकर्णी, दत्ता चौगुले ,चारूदत्ता चोंगुले, रवि शामराज, श्रीकांत नाडापुडे ,पुरूषोत्तम खोपटीकर, मुरलीधर गोल्हार, विजय करभाजणे, लखुजी जाधव, स्व.नंदकुमार मुळे व तसेच प्रा.र.वि.शिंगारे , प्रा.अविनाश डोळसे ,प्रा.प्रकाश शिरसट यांचा उल्लेख करावा लागेल.

मराठवाड्याच्या रंगभूमीवरील नवीन आशास्थान डॉ.संजय पाटील देवळाणकर, जितेंद्र पानपाटील, कमलेश महाजन,प्रेषित रूद्रवार ,अरविंद जगताप, धनंजय सरदेशपांडे, रमाकांत मुंडे, पदमनाभ पाठक, नाथा चितळे, संजय लकडे, दासू वैदय ,सुधीर निकम, दिलीप भोसले,संभाजी भोसले, प्रसन्ना देशमुख, मदन मि.मराठे, श्रीकांत सराफ ,सुनील पाटील (झरी) , सविता तांदळे, रूपलक्ष्मी चौगुले, सुजाता देशमुख ,शोभा दांडगे, राजू सोनवणे ,दिलीप महालिंगे, बाळकृष्ण धायगुडे, बसू कानडे, योगेश सिरसाठ गिरिधर पांडे, रमाकांत भालेराव ,रोहित देशमुख,माधुरी भारती, गजेंद्र बिराजदार , किशोर जांगडे ,शैलेश देशमुख, प्रियंका वाघमारे, राजकुमार तांगडे,शीतल रूद्रवार ,याशिवाय डॉ.सतीश पावडे, प्रा.अशोक बंडगर,प्रा.गजानन दांडगे, प्रा.स्मिता साबळे, प्रा.ज्ञानेश्वर उडणगावकर ,प्रा.संपदा कुलकर्णी आदी मंडळीचा उल्लेख करतो महाराष्ट्राच्या रंगभूमीवर ओळख निर्माण करणारे महत्वाचे शिल्पकार म्हणून प्रा.अजित दळवी, भारत सासणे,प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी, मकरंद अनासपुरे, मंगेश देसाई, शुभांगी संगवई,प्रतीक्षा लोणकर, नंदू माधव,संदीप पाठक, किरण पोत्रेकर, समीर पाटील, आराधना देशपांडे, नंदू काळे, संजय सुगावकर ,विजय देशमुख, शाम राजपूत,सचिन गोस्वामी,अरविंद जगताप ,विनीत भोंड, आदी.या शिलेदाराच्या उल्लेख शिवाय मराठवाड्याच्या रंगभूमीचा इतिहास पूर्ण होवू शकणार नाही.

# मराठवाड्यातील नाट्य संमेलने व नाट्य चळवळ

डॉ.सुरेश पुरी

मराठवाडा ही जशी संतांची भूमी आहे, तशी कलावंताची नाट्य कर्मीचीही भूमी आहे. मराठवाडयातील नाट्य चळवळ ही जवळपास ७५ वर्षापासूनची जुनी आहे.पण ही चळवळ गेल्या साधारण २० वर्षापासून अत्यंत वेगाने पसरत आहे.संपूर्ण महाराष्ट्राच्या नाट्य चळवळीच्या तुलनेत केवळ आठ वर्षाच्या कालखंडात मराठवाडयात तीन अत्यंत भव्य दिव्य अशी नाट्य संमेलन साकारली आहेत.बीड येथील यंदाचं नाट्य संमेलन हे वरील विधानांच द्योतक आहे.

मराठवाडयातील नाट्य चळवळीचा आरंभ मुळांत संगीत नाटकापासून झाला असे विधान चुकीचे ठरू नये.कै. अण्णासाहेब गुंजकरांनी सुमारे ७० वर्षापूर्वी नांदेड येथे गायन -वादन विद्यालय सुरू केले.गायन - वादन विद्यालयातील त्या काळांतील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने व कै. अण्णासाहेब गुंजकर, कै.ग.ना.अंबेकर व कै.डॉ.स.रा.गाडगीळ यांच्या एकत्रित प्रयत्नाने १९५५-५६ च्या सुमारांस ' भावबंधन' व ' संगीत देवमाणूस' ही संगीत नाटके रंगभूमी वर सादर झाली .आणि मराठवाडयात ख-या अर्थानं नाट्य चळवळीस प्रारंभ झाला असे म्हणता येईल. याच काळात सादर झालेल्या संगीत सौभद्र या नाटकाने एकूणच नाट्य चळवळीला एक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

१९५८ साली नांदेड येथे पहिले मराठवाडा नाट्य संमेलन आयोजीत करण्यांत आले. ' देवमाणूस' ' झाशीची राणी' , ' एक होता म्हातारा ' आणी ' संगीत एकच प्याला ' ही नाटके मराठवाडयातील निरनिराळ्या संस्थानी सादर करून नाट्य रसिकांची दाद मिळवली

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे ४७ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन १९६५ साली नांदेड येथे झाले.या यशस्वी नाट्य संमेलनाचे मुख्य आकर्षण होते .महाराष्ट्राचं लाडकं दैवत कै.पु.ल.देशपांडे किंबहुना कै.पु.ल.देशपांडे यांच्या अध्यक्ष पदामुळे मराठवाडयाचे नांव अख्या महाराष्ट्रांत गाजले .या संमेलनांत' संगीत पंडितराव जगन्नाथ' 'रायगडाला जेव्हां जाग येते' व 'व-हाडी माणसं' ही तीन नाटके सादर झाली तर याच बरोबर नांदेडच्या कलावतांनी सादर केलेले 'संगीत शारदा' हे नाटक वरील नाटकांच्या तोला मोलाचे होते. हे विशेष ! भारतीय बैठकीच्या पध्दतीने हजार एक नाट्य रसिक बसतील असे कला मंदिर नाट्यगृह पुरणार नाही म्हणून १२० ु ९० फुटांचा भव्य मंडप उभारण्यांत आला होता. त्या काळांतही नाट्य रसिकांची दाद तितकीच भव्य होती हे येथे नमूद करावेसे वाटते या नंतरच्या दशकांत मराठवाडयांत अनेक नवे नवे कलाकार पुढे आले. तसेच नाट्य सृष्टीला वैचारिक प्रगल्भता ही प्राप्त झाली.त्यामुळे नुसतेच नाट्य प्रयोग सादर न करता नाट्य वाचन,नाट्य चर्चा, नाट्य समीक्षा,अभिनया संबंधीचे मूलभूत विचार, भरत मुनीचे नाट्यशास्त्र व रससिध्दांत इत्यादी विविध अंगानी नाट्यविचार मंथन सुरू झाले.१९५८ ते १९७५ या कालखंडात 'भावबंधन' , 'कवडीचुंबक' , 'हाच मुलाचा बाप' , 'भ्रमाचा भोपळा' 'अंमलदार' ,'खडाष्टक' ,'श्रीमंत' ,'राणीचा बाग' इत्यादी अनेक नाटके मराठवाडयातील विविध संस्थानी सादर करून रसिकांची दाद मिळवली.

१९७३ साली मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे नाट्यशास्त्र विभाग सुरू झाला व याचा उपयोग मराठवाडयात नाट्य चळवळ जोमाने पुढे नेण्यांत झाला.या विभागाच्या माध्यमांतून बाहेर पडलेल्या अनेक रंगकर्मीनी मराठवाडयात नाट्य चळवळ गतीमान केली इतकेच नव्हे तर व्यावसायिक रंगभूमीला,लोक रंगभूमीला, हौशी रंगभूमीला महत्वाचे
योगदान दिले.एकपात्री प्रयोग व एकांकिका यांच्या माध्यमातून नाट्य चळवळ प्रवाहित झाली.

मराठवाडयातील नाट्य चळवळीने प्रभावित झालेल्या प्रसिध्द रंगकर्मी लीला चिटणीस यांनी स्वत: नांदेड येथे आठ दिवस राहून दिग्दर्शक व रंगकर्मी यांना मार्गदर्शन केले.त्यांनी इंग्रजीतून मराठीत आणलेले 'एक रात्र अर्धा दिवस' (सेक्रेड क्लेम )हे नाटक मराठवाडयातच नव्हे तर इतरत्रही येथील कलावंतानी गाजविले.

१९७३ ते १९८८ या कालखंडाने मराठवाडयातील नाट्य चळवळ फारशी फोफावली जरी नसली तरी तुरळक प्रमाणांत औरंगाबाद,नांदेड,परभणी,लातूर,बीड ,उस्मानाबाद,हिंगोली व जालना इ.मराठवाडयातील शहरांमधून नाट्य चळवळ ही एकांकिका ,नाट्य शिबीर ,परिसंवाद व तुरळक चर्चा सत्रे या माध्यमांतून संथ गतीने वाटचाल करीतच होती. याच काळांत मराठवाडयातील कांही रंगकर्मीनी व्यावसायिक नाटके रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न केला .पण बहुतांशी त्यांच्या पदरात निराशाच पडली.यात फक्त दोघेजण यशस्वी झाले.त्यापैकी व-हाडकार श्री.लक्ष्मण देशपांडे व श्रीराम संगीत नाटक मंडळी ; पण व-हाडचं यश श्रीराम संगीत मंडळाला मिळालं नाही .

१९८८ साली महाराष्ट्र शासन व अ.भा.मराठी नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने गंधर्व जन्म शताब्दी महोत्सव साजरा करण्यांत आला.डॉ.स.रा. गाडगीळ यांची 'गंधर्व संगीत' या विषयावरील सप्रयोग व्याख्याने व नांदेडच्या संगीत कलावंताचे 'संगीत मानापमान ' हे नाटक, या दोन रंगसाधना शताब्दी महोत्सवांत प्रामुख्याने गाजल्या. 'संगीत मानापमान ' चा प्रयोग दिल्ली येथे झाला त्यावेळी माजी गृहमंत्री कै.ना.शंकररावजी चव्हाण यांनी स्वत: संपूर्ण प्रयोग पाहून कलावंतांचे कौतुक केले होते.याच सुमारास उल्लेखनीय अशी दोन नाट्य शिबीरे श्री.खाडीलकर मुंबई व श्री.यशवंत केळकर, बडोदा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यांत आली व त्याचा लाभ हा त्यावेळच्या कलावंताना घेता आला.

यानंतरचा काळ हा मराठवाडयातील नाट्य चळवळींचा सुवर्ण काळाकडे नसला तरी रौप्य काळाकडे वाटचाल करणारा काळ असे म्हणावयास हरकत नाही. अनेक प्रकारच्या नाट्य स्पर्धा या काळांत उदयास आल्या व या स्पर्धापुढे का होईना मराठवाडयातील कलावंत जिद्दीने नाट्य चळवळीत भाग घेऊ लागले.सुदर्शन स्मृति एकांकिका स्पर्धा, बेंडे एकांकिका स्पर्धा,राज्य नाट्य स्पर्धा, कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धा,संगीत नाटकांच्या स्पर्धा इत्यादी मधून येथील कलावंत आपले कसब पणाला लावू लागले.व्यावसायिक रंगभूमी ,हौशी रंगभूमी,दलित रंगभूमी तसेच संगीत रंगभूमी इत्यादी विविध मार्गांनी रंगकर्मीची वाटचाल होत राहिली.

१९८८ नंतरच्या काळांत अनेक नाट्य संस्था मराठवाडयांत स्थापन होत राहिल्या. पूर्वीपासूनच कार्यरत असलेल्या नाट्य परिषदेच्या नांदेड शाखेने गद्य नाटकांच्या जोडीने' संगीत नाटक' राज्य नाट्य स्पर्धेत सादर करण्याचा उपक्रम सुरू केला .याच दरम्यान नाट्य परिषदेच्या परभणी,लातूर,औरंगाबाद व बीड या ठिकाणी शाखा स्थापन झाल्या व सर्वत्र मराठवाडयात नाट्य चळवळ जोमाने वाटचाल करू लागली.

१९८८ साली 'संगीत मानापमान ' पासून सुरू झालेली संगीत नाटकाची परंपरा नांदेड शाखेने आजपर्यंत कायम ठेवली आहे.१९९३ साली डॉ.स.रा.गाडगीळ यांच्या दिग्दर्शनाखाली' संगीत कटयार काळजात घुसली' .हे नाटक नांदेड शाखेने रंगभूमीवर आणले

.ते राज्य नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांकावर आले. त्याचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत प्रयोगही झाले.

परत एकदा 'संगीत मानापमान' 'कटयार' 'संगीत सुवर्ण तुला' , 'संगीत ययाती देवयानी' ,'संगीत मत्स्यगंधा' , 'संगीत स्वर सम्राज्ञी' अशी संगीत नाटकाची परंपरा नांदेडच्या कलावंतानी जिद्दीने, चिकाटीने व परिश्रमपूर्वक सुरू ठेवलेली आहे

मराठवाडयातील दुसरे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन इ.स२००० साली डॉ.लक्ष्मण देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली परभणी येथे संपन्न झाले. नांदेडच्या १९६५ च्या संमेलनानंतर तब्बल ३५ वर्षांनी परत एकदा मराठवाडयात नाट्य संमेलन झाले.सुरूवातीच्या धिम्या चालीची व १९८८ नंतरच्या वेगाच्या नाट्य चळवळीच्या वाटचालीची मुंबईकरांना नोंद घ्यायला तब्बल ३५ वर्षे लागली. डॉ.लक्ष्मण देशपांडे यांच्या नाट्य चळवळीची योग्य ती नोंद याठिकाणी घेतली गेली. ' व-हाड निघालय लंडनला ' चे हजारो प्रयोग करून ' गिनीज बुकांत ' नोंद झालेली मराठवाडयातील ही पहिली नाटयकृती ! त्यानंतरच्या द्विपात्री नटसम्राट व इतर अनेक नाटके लक्ष्मणरावांनी केली .पण व-हाड चं यश त्याना इतरत्र लाभलं नाही. परभणीचे नाट्य संमेलन मात्र अनेक कलावंताना नाट्य उभारी देऊन गेलं ! महाविद्यालयातील नाट्य विभागांनी वा युवा रंगकर्मींनी नाट्य चळवळ जोमाने पुढे नेण्याकरीता प्रचंड हातभार लावलेला आहे. यामध्ये औरंगाबाद विद्यापीठातील नाट्य विभाग, सरस्वती भुवन महाविद्यालयाचा (औरंगाबाद) नाट्य विभाग,बीडच्या केशरबाई महाविद्यालयाच्या नाट्य विभाग, एम.जी.एम.चा नाटय विभाग व त्याच बरोबर इतर महाविद्यालयातील ,नाट्य विभागांनी ,विविध नाटय सस्थांनी उदाहरणार्थ लातूरच्या गोजमगुंडेची संस्था,अंबेजोगाईतील संस्था,परभणीची करभजन संस्था, हिंगोलीतील बेंडे एकांकिका सादर करणारी संस्था ,तुळजापूर येथील भोसले संस्था, नांदेड मधील तन्मय ग्रुप, सांस्कृतिक मंच आणि मराठवाडयातील ओरंगाबाद,लातूर,बीड ,परभणी व नांदेड या पांच नाट्य परिषद शाखांनी नाट्य चळवळ सशक्त करण्यासाठी जोमाचे प्रयत्न केले आहेत व करीत आहोत.

याचाच परिपाठ म्हणून २००६ मध्ये मराठवाडयातील तिसरे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन नांदेड येथे तेव्हांचे सांस्कृतिक खात्याचे मंत्री व आताचे मुख्यमंत्री ना.अशोकरावजी चव्हाण यांच्या कुशल नेतृत्वाखाली ' न भूतो न भविष्यति'अशा थाटात संपन्न झाले .उत्तम नियोजन ,उत्तम प्रकारची राहण्याची व्यवस्था,रूचकर स्वादिष्ट भोजन व विविध कार्यक्रमाची रेलचेल, त्याचबरोबर काजोल,उर्मिला मार्तोंडकर,सुनील शेट्टी, प्रशांत दामले, स्मिता तळवळकर ,वंदना गुप्ते , मोहन जोशी अशा दिग्दज सिने ,नाट्य कलावंतांची उपस्थिती, विविध प्रयोग, आणि दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राचे वैविध्यपूर्ण कार्यक्रम या अनेक कारणांनी हे संमेलन गाजले .एकांकी, बाल नाट्य, संगीत नाटक व गद्य नाटक या सर्वांनी सादरीकरण व नेपथ्य,प्रकाश योजना व पार्श्वसंगीत यामध्ये नवनवीन प्रयोग या नाट्य संमेलनांत केले. अजरामर संगीत नाटकांना परत एकदा उजाळा व बाल रंगभूमी अधिक सशक्ततेकडे या दोन घटना नाट्य संमेलनाच्या यशस्वीतेच्या मानबिंदू ठरल्या.

वाटचालीतील आणखी एक यशस्वी पाऊल म्हणजे गेल्या दोन नाट्य संमेलनामध्ये आयोजित केलेल्या नाट्य लेखन स्पर्धा ! या निमित्ताने मराठवाडयातील अनेक सुप्त लेखक लिहिते झाले व कांहींनी लेखनाची पारितोषिकेही पटकावली .उदाहरणार्थ देगलूर सारख्या ग्रामीण मराठवाडयातील श्री.वि.ना.भोळे लिखित ' बळी गेला रे' या नाटकाने लेखनाचे तसेच औरंगाबाद येथील राज्य नाटय स्पर्धेत प्रथम पारितोषिक ही प्राप्त केले.

मराठवाडयात उत्तम नाट्य लेखक आहेत, दिग्दर्शक आहेत, कलावंत आहेत, नेपथ्यकार, तंत्रज्ञ आहेत.नवनवीन प्रयोग,दिग्दर्शनातले, नेपथ्यातील ,तंत्रज्ञानातील करणारे रंगकर्मी आहेत. मराठवाडयाच्या रंगभूमीला सशक्त करण्याच

सामर्थ्य असणारे अनेक रंगकर्मी येथे आहेत. त्यांना मुंबई सारख्या ठिकाणी जाऊन व्यावसायिक पातळीवर उतरणे शक्य नाही, पण त्यांनी हौशी रंगभूमी बळकट करण्याचे काम निश्चितपणे केले आहे व करत आहेत. गोपी मुंडे सारखा एक सामान्य चित्रकला शिक्षक पुण्यामध्ये नाट्य प्रशिक्षण घेऊन गंगाखेड सारख्या मराठवाडयातील अती ग्रामीण भागात नाट्य चळवळ जोमाने चालवत आहे. स्वखर्चाने नाट्य शिबीरे घेतो आहे ही मराठवाडयाच्या दृष्टीने कौतुकाची अभिमानाची बाब आहे . मराठवाडयातील शहरांतून, तालुक्यातूनच नव्हे तर ग्रामीण भागातही नाट्य चळवळीला रंग भरू लागला आहे.

डॉ.लक्ष्मण देशपांडे एका लेखात लिहितात की, ङ्कसुदैवाने महाराष्ट्रातील सत्ताधीश पक्ष आणि विरोधी पक्ष , तसेच अन्य पक्ष सांस्कृतिक दृष्ट्या प्रगल्भ आहेत. म्हणून रंगभूमीला,हौशी असो किंवा व्यावसायिक असो.उर्जितावस्थेत आणावयाचे असल्यास विविध विभागातील नाट्य लेखनातून आलेला प्रादेशिक मृदगंध संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवण्याचे कार्य व्यापक सांस्कृतिक दृष्टिकोन स्वीकारून शासनाला करावे लागेल.ङ्क खरोखर असे झाले तर मराठवाडयातील रंगभूमी किंवा महाराष्ट्रातील इतर प्रादेशिक रंगभूमी ख-या अर्थाने समृध्द होईल.

वर नमूद केल्याप्रमाणे असा व्यापक सांस्कृतिक दृष्टिकोन समोर ठेऊन तीन कोटी रूपये खर्चाचे 'नियोजित ' सांस्कृतिक केंद्र नांदेड येथे उभे राहत आहे. मराठवाडयातील सांस्कृतिक चळवळीला गती देण्याचे, कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे,उपेक्षेची भावना दूर होऊन कलावंतां मधील आत्मविश्वास वाढविण्याचे कार्य या होऊ घातलेल्या सांस्कृतिक केंद्राकडून होईल अशी अपेक्षा आहे.

नाटकाचे लेखक , दिग्दर्शक, कलावंत, रंगकर्मी, तंत्रज्ञ यांची नांवे, तसेच या सर्वांनी मिळविलेली पारितोषिके, अभिप्राय ,प्रशंसा, सादर केलेली नाटके ,एकांकी इ.चे यश इत्यादी सर्व गोष्टींचा उल्लेख टाळून केवळ संक्षिप्त वाटचाल देण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे.

या वाटचालीच्या पार्श्वभूमीवर आणि मराठवाडयात झालेल्या, मराठवाडा नाट्य संमेलन १९५८ ,अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची तीन नाट्य संमेलनं १९६५,२०००,२००६ या एकूण चार नाट्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर १३,१४ व १५ फेब्रुवारी २००९ दरम्यान बीड येथे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नाट्य संमेलन होत आहे.मागील नाट्य संमेलनाचे यश व अनुभव गाठीशी असल्यामुळे मराठवाडयातील हे नाट्य संमेलन तितक्याच ताकतीने उभे राहणार आहे यांत शंका नसावी. संगीत व नाट्य क्षेत्राचा प्रचंड अनुभव असलेले दिग्गज पं.रामदास कामत हे या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत .प्राचार्या डॉ.दीपा क्षीरसागर व त्यांचे सहकारी तसेच नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईचे कार्यकारिणी सदस्य, नियामक मंडळ सदस्य जोमाने हे नाट्य संमेलन यशस्वी व्हावे म्हणून कामास लागले आहेत.

या नाट्य संमेलनाच्या यशस्वीतेतून मराठवाडयातील नाटय लेखक,दिग्दर्शक, तंत्रज्ञ ,रंगकर्मी या सर्वांना रंगभूमीची सेवा करण्याची नाट्य चळवळीला अधिकाधिक बल प्राप्त करून देण्याची संधी लाभो या शुभेच्छेसह धन्यवाद !

# माझी रंगमंचीय उमेदवारी

प्रा.डॉ.विजय दिवाण

माझ्या आईच्या अंगी नाना प्रकारचे कलागुण होते.पुण्याजवळ हिंगण्यातल्या महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्री-शिक्षणसंस्थेत ती शिकली होती. तिथे शिक्षणासोबत मिळालेला कलाकौशल्यांचा ठेवा तिनं स्वत: तर आयुष्यभर जपलाच; पण स्वत: च्या मुलाबाळांनाही तो देण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला. १९५४-५५ सालची गोष्ट मला आठवते. तेव्हा मी हैद्राबादच्या विवेकवर्धिनी शाळेत चौथीच्या वर्गात शिकत होतो.त्या वर्षी शाळेत 'विवेक वर्धिनी रेडिओ ' ची अभिनव योजना सुरू केली गेली. शाळेच्या वरच्या मजल्यावरच्या एका खोलीत मायक्रोफोन - अम्लिफायर वगैरे ठेवून तिथे शाळेतल्या मुलांकडून गाणी किंवा नाटुकली करवून घेत आणि त्याचं थेट प्रसारण वर्गावर्गातून भिंतीवर लावलेल्या लाऊडस्पीकर्समधून केलं जाई.शाळेतल्या त्या रेडिओवर मला गायला लावण्याचा चंग माझ्या आईनं बांधला.मग घरी दररोज संध्याकाळी मला घेऊन ती बसायची .भातखंडेबुवांची स्वरलिपीची पुस्तकं तिच्याकडे होती.ती समोर ठेवून यमन रागातलं 'परम विमल तुझे चरण ...' हे गाणं मला शिकवायचा प्रयत्न तिनं सुरू केला.मला कंटाळा यायचा, मी टाळाटाळ करायचो; पण तिनं मात्र जिद्द सोडली नाही. माझ्या गळ्यातून गाणं उमटवण्याची तिची ती धडपड पाहून रेड्याच्या तोंडून वेद वदवण्यासाठी संत ज्ञानेश्वरांना केवढे कष्ट पडले असतील याची पुसटशी कल्पना मला त्या वयात आली ! अखेर महिन्याभराच्या तालमीनंतर कसेतरी ठाकूनठोकून मी ते गाणं ब-यापैकी म्हणू लागलो. मग एके दिवशी खरोखरच शाळेतल्या ' रेडिओवर ' ते गाणं मी गायलो .त्या दिवशी गाणं संपवून मी खाली माझ्या वर्गात परत आलो तेव्हा मला जाणवलं की वर्गात आपण एकदम स्टार झालो आहोत.माझ्या सगळ्या वर्गमित्रांनी माझ्याभोवती गराडा घालून माझ्या पाठीत धपाटे मारायला सुरूवात केली.थोड्या वेळानं सर वर्गात आले तेव्हा त्यांनीही मला उभं करून सगळ्यांना जोरदार टाळ्या वाजवायला लावल्या एका अर्थानं तो माझा पहिला परफार्मन्स होता आणि तो माझ्या आईच्या मेहेनतीतून साकारला गेला होता.

हैदराबादच्या या शाळेत कुर्ढूकर नावाचे आमचे एक सर होते. त्यांनी स्वत:' भक्त पुंडलिक ' नांवाची एक संगीतिका लिहिली होती.ती माझ्या आईला आवडलेली होती.पुढे १९५७ साली मी सातवीत गेलो तेव्हा आमचं कुटूंब हैदराबादेहून लातूरला स्थलांतरित झालं. लातूरला आल्यावर त्या वर्षीच्या गणेशोत्सवात माझ्या आईने ती पुंडलिक संगीतिका आम्हा भावंडाना घेऊन बसवली .लातुरात खोगरे गुरूजी नांवाचे एक पेटीमास्तर होते.त्यांनी या संगीतिकेतली गाणी बसवून दिली. माझी मोठी बहीण सुलुताई आताची कथालेखिका अनुराधा वैद्य ही त्यात पार्श्वगायिका होती. आईनेच बसवलेली संगीतिका, असल्यानं पुंडलिकाच काम अर्थातच मी केलं होतं. शिवाय माझ्या दोन्ही छोट्या बहिणी विद्या आणि अंजली या अनुक्रमे सरस्वती अन् विठोबा झाल्या होत्या.शिवाय खोगरे गुरूजीचा मुलगा असलेला माझा मित्र भास्कर खोगरे आणि माझ्या बहिणीची एक मैत्रीण सुलभा कापडिया यांच्याही भूमिका तीत होत्या.त्या सालच्या गणेशोत्सवात ही संगीतिका भलतीच हिट झाली. त्याच्या पुढच्याच वर्षी, १९५८ साली माझ्या वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी तेव्हाच्या राज्य नाट्यस्पर्धेत भाग घेण्याची संधी माझ्याकडे चालून आली.त्या काळी लातूरमध्ये 'कलोपासक मंडळ' आणि 'नवयुवक नाट्यमंडळ ' अशा दोन हौशी नाट्यसंस्था होत्या कलोपासक मंडळाचं काम आमच्या राजस्थान हायस्कूल मधले माझे शिक्षक राजाभाऊ म्हैसकर (नाट्यकर्मी शरद तळवलकरांचे साडू )हे बघायचे. राजाभाऊ स्वत:ही एक उत्तम नट आणि दिग्दर्शक होते.त्यांनी त्या वर्षी मो.ग.रांगणेकरांच ' रंभा' हे नाटक राज्य नाट्यस्पर्धेत बसवलं होतं. या नाटकांत एका घरंदाज कुटुंबातली कर्तृत्ववान स्त्री बाळंतपणात मृत्यू पावते आणि एका वारांगणेच्या पोटी पुनर्जन्म घेते.मग वयाच्या तेराव्या वर्षी तिच्या गतजन्मीच्या आठवणी जाग्या होतात आणि आपल्या बापाला सोबत घेऊन ती त्या कुटुंबास भेट देते.त्यानंतर घडणा-या खळबळजनक घडामोडीची उत्कंठापूर्ण
मांडणी रांगणेकर मास्तरांनी या नाटकात केलेली आहे.कलोपासकच्या प्रयोगात पुनर्जन्म घेतलेल्या त्या तेरा वर्षाच्या 'आई' ची भूमिका रजनी जोशी नांवाच्या एका मुलीन केली होती आणि तिच्या( पूर्वजन्मीच्या )तेराच वर्षाच्या मुलाची भूमिका मी केली होती.या दोन्हीही भूमिका अत्यंत कठीण होत्या.त्या कशा निभवाव्यात हे वयानं लहान असणा-या आम्हा दोघांनाही कळणं अवघड होत; पण दिग्दर्शकांनी मोठ्या कौशल्यानं आम्हा दोघांकडून त्या नीट करवून घेतल्या .ते दिग्दर्शक राजाभाऊ म्हैसकर यांनी त्या काळात दिलेले अभिनयाचे धडे मला पुढच्या काळातल्या माझ्या संपूर्ण नाट्यप्रवासात उपयोगी पडले, हे इथे नमूद केलं पाहिजे.मी आणि रजनी जोशी या आम्हा दोघांशिवाय या नाटकात स्वत: राजाभाऊ म्हैसकर, त्यांच्या पत्नी मालतीबाई, कमलाकर पुराणिक ,हरिभाऊ बुचके, यांनीही उल्लेखनीय भूमिका केल्या होत्या. संगीताची बाजू लातूरच्या गुरूवार क्लबचे पेटीमास्तर बाबूराव चव्हाण आणि तबलजी महादप्पा मेनकुदळे यांनी सांभाळली होती.त्या काळी राज्यस्पर्धेत भाग घेणारे 'नाट्यसंघ' स्पर्धा केंद्रावर जाऊन नव्हे तर आपापल्या गावातच नाटकाचा प्रयोग करीत असत. नेमलेल्या परीक्षकांची एक जोडी ते प्रयोग पाहत गावोगावी फिरे कलोपासकच्या त्या 'रंभा 'नाटकाला त्यावर्षीच पहिलं की दुसरं, कुठलं तरी पारितोषिक मिळालं होतं. त्या नाटकाचे लातूरपाठोपाठ बार्शी,कुर्डुवाडी ,चाकूर वगैरे ठिकाणी प्रयोग झाल्याचं मला आठवतं.त्या लहान वयात हा सारा अनुभव माझ्यासाठी स्वप्नवत असाच होता.

माझे आई-वडील हे दोघंही हैदराबाद मुक्तिसंग्रामातले उस्मानाबाद, लातूर आणि सोलापूर भागांत पूर्णवेळ कार्यकर्ते होते.स्वातंत्र्योत्तर १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत माझे वडील उस्मानाबाद मधून खासदार म्हणून लोकसभेवर निवडूनही आले होते.माझ्या लहानपणापासूनच आमच्या घरात प्रागतिक विचारांचे वळण होते. साहजिकच १९५८ सालापासूनच मी समाजवादी विचारांच्या राष्ट्र सेवादलाच्या शाखेवर जाऊ लागलो.राष्ट्र सेवादलाच्या मध्यवर्ती शिबिरासाठी दीड महिना मुंबईला जाण्याचाही योग तेव्हा मला आला.तिथे शिबिरात राष्ट्र सेवादलाच्या मध्यवर्ती कलापथकातली बरीच कलावंत मंडळी येऊन जाऊन असायची.शाहीर लीलाधर हेगडे,निळू फुले, सुधा करमरकर ,शाहीर साबळे ही मंडळी आमच्याकडून पोवाडे-दलगीतं वगैरे म्हणवून घेत, नाहीतर राष्ट्रीय वगनाट्यांतले प्रवेश बसवून घेत.तिथल्या तालमी दीर्घकाळ माझ्या स्मरणात राहिल्या, आणि पुढे चालून मी स्वत: लोकनाट्यांमध्ये काम करायला लागलो तेव्हा मला त्यांचा उपयोग झाला.

लातूरला त्याकाळी नव्यानंच स्थापन झालेल्या दयानंद कॉलेजमध्ये माझं महाविद्यालयीन शिक्षण झालं.कॉलेजमध्ये आणि नंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यापीठात गेल्यावर मात्र का कुणास ठाऊक,नाटकबिटक करण्याच्या भानगडीत मी फारसा पडलो नाही.कॉलेजात असतांना तर मी चक्क 'प्लॅनिंग फोरम' चा संयोजक होतो.कॉलेजतर्फे औरंगाबादच्या 'रानडे वक्तृत्व'स्पर्धेत भाग घेऊन तिथलं बक्षीसही जिंकून आलो होतो.नंतर एम.एस्सी. साठी तत्कालीन मराठवाडा विद्यापीठात दाखल झाले तेव्हांही कधी आंतरविद्यापीठीय वक्तृत्व स्पर्धा तर कधी बिहारमध्ये गांधी जन्मशताब्दी शिबिर,कधी बाबा आमटेंच्या सोमनाथमध्ये श्रमसंस्कार शिबीर तर कधी दिल्लीला

एनसीयूएसआय विद्यार्थी शिबीर, अशा गोष्टीमध्ये रमत गेलो. १९६८ साली एम.एस्सी .झाल्यानंतर अंबाजोगाईच्या योगेश्वरी महाविद्यालयात अध्यापक म्हणून नौकरीला लागलो.तेंव्हा तिथे डॉ.द्वारकादास लोहिया यांच्याशी दुस-यांदा भेट झाली.इयत्ता सातवीत असतांना मी मुंबईला राष्ट्र सेवादलाचं जे शिबीर केलं होत, त्यात हे द्वारकादास लोहियाच आमचे दस्तानायक होते.अंबाजोगाईला गेल्यावर त्यांची पुन्हा भेट झाली आणि त्यांनी मला तिथल्या राष्ट्र सेवादलाच्या स्थानिक कार्यक्रमात सहभागी करून घेतलं.अंबाजोगाईत ते सेवादलाच एक कलापथक चालवायचे त्यात मीही सामील झालो .त्यानंतरची चार वर्ष गणेशोत्सवाच्या काळात आम्ही दोनअडीच तासांचा मनोरंजनाचा एक कार्यक्रम दरवर्षी सादर करीत गेलो. त्यात पहिल्या एका तासात समतेची आणि जातिधर्मनिरपेक्षतेची गीत,राष्ट्रभक्तीपर पोवाडे आणि नृत्य सादर होत. मग नृत्य संपल्यावर आम्ही दीड तासाचं एखादं लोकनाट्य सुरू करीत असू.'लोकरंजनातून लोकशिक्षण' या तत्त्वानुसार समतेचा , निरपेक्षतेचा संदेश देणारा हा राष्ट्रीय वग असे. त्या चार वर्षांमध्ये

व्यंकटेश माडगूळकरांचे 'कुणाचा कुणाला मेळ नाही', 'अन बिन बियाचं झाड' हे वग आम्ही सादर केले.शिवाय अंबाजोगाईचे प्रा.रा.द.अरगडे याचं 'राया मला दिल्लीला घेऊन चला 'आणि औरंगाबादचे प्रा.चंद्रकांत भालेराव याच या 'इष्काच्या पायी बुडाले 'ही दोन वगनाट्यही केली.या वगनाट्यांच्या प्रयोगामध्ये डॉ.लोहिया हे नेहेमी पेंद्या नाहीतर सोंगाड्याचं काम करत असत, आणि मी कृष्ण किंवा राजा बनत असे.आम्हा दोघांच्या खटकेबाज संवादांत दररोज आम्ही प्रचलित राजकीय घटनांचे किंवा आसपासच्या ताज्या घडामोडींचे संदर्भ आणून मार्मिक विनोद करीत असू.त्यामुळे वेगळीच धमाल येई.गणेशोत्सवाच्या काळात दररोज संध्याकाळी एका ट्रकमधून अंबाजोगाईत आम्ही परळी,धारूर,केज,बीड,गेवराई अशा गावांमध्ये जाऊन प्रयोग करून सकाळपर्यंत घरी परत जात असू.मग सकाळी घाईघाईनं सगळं आवरून मी कॉलेजमध्ये जात असे आणि दिवसभर काम करीत असे.मग संध्याकाळी पुन्हा एखाद्या नव्या ठिकाणी प्रयोगासाठी रवाना होत असे.आमच्या कलापथकामध्ये कार्यक्रम सर्वच ठिकाणी अगदी हमखास रंगत असत.मैदानात जमलेल्या हजारो प्रेक्षकांची वाहवा घेऊन आम्ही मुक्कामी परत जात असू.अंबाजोगाईचे असे ते विलक्षण भारलेले दिवस होते.

पुढे १९७२ साली मी अंबाजोगाई सोडून औरंगाबादला आलो.तिथे स.भु.विज्ञान महाविद्यालयात नोकरी करू लागलो.औरंगाबादेत माझी थोरली बहीण अनुराधा वैद्य ,तिचे पती शशिकांत वैद्य,श्रीकांत कुलकर्णी, जुन्या जाणत्या विमलाबाई चितळे वगैरेंनी चालवलेली 'पारिजात', नांवाची एक नाट्यसंस्था होती. एवम इंद्रजित ,सारखं चाकोरीबाहेरचं नाटक करण्याचं धाडस या मंडळींनी दाखवलं होतं. औरंगाबादेत आल्यावर मीही या संस्थेत सामील झालो. १९६० आणि ७० च्या दशकांत हिन्दी आणि बंगाली रंगभूमीवर मराठीत प्रचलित असणा-या कौटुंबिक आणि भावनाप्रधान नाटकांपेक्षा थोडी वेगळी आणि वास्तवदर्शी अशी नाटकं आलेली होती. मराठीमध्येही नाटककार विजय तेंडुलकरांनी त्यांच्या 'गिधाडे', 'शांतता कोर्ट चालू आहे' 'सखाराम बाईंडर' वगैरे नाटकांमधून आपल्या समाजात साळसूदपणे होणारी स्त्रीची कुंचबणा आणि उच्चवर्णीय लब्धप्रतिष्ठित व्यक्तींमधली सुप्त खलप्रवृत्ती यांचं वास्तव स्वरूप दाखवायला सुरूवात केली होती.मराठीतल्या मामा वरेरकर, आचार्य अत्रे या नाटककारांच्याच परंपरेला सखोल वास्तवाची एक दिशा देत तेंडुलकरांनी मराठी रंगभूमीला एक नवं परिमाण प्रदान केलं होतं.आपल्या नाटकांतून भावनिकतेला फाटा देत प्रामाणिकपणे आणि स्पष्टपणे मराठी मध्यमवर्गीयांच्या समस्यांचं उघड नागडं वास्तव रूप ते समाजासमोर मांडत गेले.त्यांच्या नाटकांमुळेच सशक्त अशा नागरी रंगभूमीची शक्यता असणारी एकमेव प्रादेशिक भाषा अशी मराठीची एक नवी ओळख जगाला झाली.तेंडुलकरांनी स्वतःच्या नाटकांखेरीज इतर भारतीय भाषामधली अनेक महत्वाची नाटकंही मराठीत भाषांतरित केलेली होती. एक प्रयोग म्हणून त्यांनी भाषांतरित केलेली काही नाटकं रंगमंचावर सादर करण्याचं आम्ही ठरवलं. 'पारिजात' नाट्यसंस्थेतर्फे विजय तेंडुलकरांनी अनुवादित केलेली मोहन राकेश लिखित 'आधे अधूरे 'आणि बादल सरकार लिखित' बाकी इतिहास' ही नाटकं, अन् इंद्र पार्थसारथी यांचं भगवानदास वर्मा अनुवादित 'वर्षा' हे नाटक, अशी तीन नाटकं आम्ही ७२ ते ७५ या काळात राज्य नाट्यस्पर्धेत सादर केली. आधे अधूरे या नाटकात नवरा, मुलगी,मुलगा आणि ऑफिसमधला बॉस यांच्याकडून सूक्ष्म स्तरांवर होणा-या एका पांढरपेशा मध्यमवर्गीन स्त्रीच्या शोषणाचं प्रभावी चित्रण आहे.व्यक्तीच्या परिघातल्या विविध स्तरांवरच्या अनिवार्यता,त्यामुळे निर्माण होणारे गुंतागुंतीचे प्रश्न, त्या प्रश्नामुळे सर्वांचा व्यक्तिगत पातळीवर होणारा कोंडमारा, आणि या सर्व प्रश्नांची उत्तरं शोधण्यात येणारं अपयश,हया वास्तवाची मोहन राकेशांनी केलेली मांडणी अस्वस्थ करणारी आहे.तेंडुलकरांच्या मराठी भाषांतरातही ती जशीच्या तशी उतरलेली आहे.सा-या भारतात नावाजलं गेलेलं असं नाटक सादर करणं हे आमच्यासाठी एक आव्हानंच होतं.पण ते आम्ही पेलायच ठरवलं.अनुराधा वैद्यांनी या नाटकांतली सावित्रीची मध्यवर्ती भूमिका एखाद्या कसलेल्या अभिनेत्रीच्या ताकतीनं केली.त्यांच्या आवाजाची लवचिकता, हालचालींमधली सहजता, आणि संयत भावनाविष्कार यामुळें त्यांना प्रेक्षकांची वाहवा तर मिळालीच.पण राज्य नाट्यस्पर्धेतली उत्कृष्ट अभिनयाचं रौप्यपदकही त्यांच्याकडे जणु चालत आलं.मी स्वतः या नाटकातल्या काळ्या सुटातला पुरूष, महेंद्र जुनेजा, सिंघानिया

वगैरे एकूण पाच भूमिका केल्या होत्या.माझी पत्नी छाया दिवाण,युवा कलाकार ज्योती देशमुख, कमलेश कापडिया यांच्याही त्यात भूमिका होत्या.हे नाटक राज्यस्पर्धेच्या अंतिम फेरीसाठीही निवडलं गेलं. त्या काळी औरंगाबादच्या विद्यापीठात नाट्यशास्त्र विभाग नव्यानंच सुरू करण्यात आला होता.त्या विभागाचे प्रमुख म्हणून आलेले नाट्यकर्मी कमलाकर सोनटक्के यांच्या मौलिक सूचनाही नाटक सादर करतांना आम्हाला फार उपयोगी पडल्या होत्या.

'बाकी इतिहास' हे बादल सरकाराचं नाटक आम्ही १९७४ साली केलं. तेही एक झपाटणाराच अनुभव होता.त्या नाटकातला 'सीतानाथ' कुमार देशमुख यांनी रंगवला होता,तर कनक ही व्यक्तिरेखा अनुराधा वैद्यांनी उभी केली होती.मी त्यात विजय आणि निखिल या दोन भूमिका केल्या होत्या.'बाकी इतिहास 'नंतर एकदा विजय तेंडुलकरांनी 'वर्षा 'या इंद्र पार्थसारथी यांच्या नाटकाची इंग्रजी संहिता मला दिली.आमचे ज्येष्ठ मित्र भगवानदास वर्मा यांनी त्याचं मराठी भाषांतर केलं होतं. एक वयोवृध्द बाप,त्याचा सांभाळ करणारी त्यांची अविवाहित प्रौढ मुलगी, आणि या दोघांच्या मनोव्यापारांशी खिडकीतून दिसणा-या पावसाचा असणारा गूढ संबंध याबद्दलचं हे एक वेधक नाटक आहे.त्यात बापाची भूमिका मी केली होती आणि मुलीची अनुराधा वैद्यांनी .हे संथगतीनं पुढे सरकणारं नाटक असूनही स्पर्धेत त्याच्या प्रयोगाला दुसरं पारितोषिक मिळालं होतं. अनुराधा वैद्यांना त्यातील मुलीच्या भूमिकेबद्दल उत्कृष्ट अभिनयाचं रौप्यपदकही मिळालं होत. ही तीनही भाषांतरित नाटकं शशिकांत वैद्य आणि मी, दोघांनी संयुक्तपणे दिग्दर्शित केली होती.

१९७३-७४ पासूनचं औरंगाबादेत पारिजातप्रमाणेच इतरही अनेक नाट्यसंस्था कार्यरत होत्या.कुमार देशमुख आणि आलोक चौधरी या मनस्वी दुकलीनं चालवलेली 'नाट्यरंग' ही संस्था त्यात आघाडीवर असे.शिवाय जयंत फडके,अविनाश मेंदर्गी, बंकट पाटील या कलावंतांनी चालवलेली एस.टी. कर्मचा-यांची एक नाट्यसंस्था होती, जुन्या औरंगाबादमध्ये सतीश महाजनांची एक नाट्यसंस्था होती,

नागसेन वनात प्रा.त्र्यंबक महाजनांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश त्रिभुवनलिखित ' थांबा रामराज्य येतय् 'सारखी नाटकं देणारी 'दलित थिएटर संघटना' होती; आणि निवृत्त पोलिस महानिरीक्षक श्री.ग.गोखले यांच्या अध्यक्षतेखाली चालणारी अ.भा.मराठी नाट्यपरिषदेची एक शाखाही त्याकाळी औरंगाबादेत होती.पुढे शहरातल्या सिडको भागातून नांदीकार ,परिवर्तन, यांसारख्या संस्थाही आल्या.हया सर्वच नाट्यसंस्थांचा एक समान सद्गुण मात्र वाखाणण्याजोगा होता.ज्या ज्या संस्था राज्य नाट्यस्पर्धेच्या रिंगणात उतरत असत त्यांच्यात आपसांत कमालीची चुरस असे.पण चुरशीचं रूपांतर शत्रुत्वात मात्र कधीही झालं नाही.उलट आपापले नाट्यप्रयोग उभे करण्यात एकमेकांना त्या मदतच करीत असत. उदाहरणार्थ आमची ' पारिजात 'आणि कुमार देशमुखांची
' नाट्यरंग 'या दोन नाट्यसंस्थांची वेगवेगळी नाटकं राज्य नाट्यस्पर्धेत सादर होतं. प्राथमिक फेरीत आपलंच नाटक पहिलं यावं याचा प्रत्येक नाट्यसंघ कसोशीनं प्रयत्न करे.पण त्याच वेळी एकमेकांच्या प्रयोगांत पार्श्वसंगीत , प्रकाशयोजना किंवा नेपथ्य हया बाबीसाठी दोन्ही संघातले कलावंत एकोप्यानं मदत करीत.नाट्यरंगाच्या कुमार देशमुखांच्या 'स्मारक' ,'इस्किलार' ,'आडगांवचे चौधरी','आकाशपक्षी'अशा सा-याच नाटकांची पार्श्वसंगीताची बाजू मी सांभाळली होती माझ्या सगळ्या नाटकांची प्रकाशयोजना आलोक चौधरींनी केली होती.कुमार देशमुखांनी आमच्या 'बाकी इतिहास 'या नाटकातली प्रमुख भूमिका केली होती,तर नाट्यरंगला राज्यस्पर्धेसाठी आयर्विन शाचं' बरी द डेड्' हे नाटक मी भाषांतरित करून दिलं होतं. त्या नाटकाचा नाट्यरंगनं केलेला प्रयोगही बक्षीसपात्र ठरला होता. अनेकदा आम्हा दोन संघामध्येच राज्य नाटयस्पर्धेच्या प्राथमिक फेरीत बक्षिसाच्या क्रमांकासाठी चुरस असे.कधी त्यांच पहिलं अन् आमचं दुसरं, तर कधी त्याच्या उलट, अशी स्थिती असे.त्या काळी पहिलं आणि दुसरं अशा दोन्ही नाट्यप्रयोगांना मुंबईतल्या अंतिम फेरीत प्रवेश दिला जाई.बहुतेक वेळा आमचे दोन्ही नाट्यसंघ उत्साहानं एकाच कंत्राटी बसमधून मुंबईला जात,रविंद्र नाट्यमंदिरात एकत्र राहात, एकमेकांच्या प्रयोगांत लागेल ती मदत करीत आणि खेळीमेळीनं परत येत.त्या काळच्या अशा एकत्र केलेल्या वा-यामुळे कुमार देशमुख,आलोक चौधरी,जयंत फडके,अजित दळवी,भालचंद्र कानगो,चंद्रकांत शिरोळे, सुजाता कानगो, रवी कुलकर्णी, नंदकुमार पत्की,रूस्तुम अचलखांब, प्रकाश तापी वगैरे कलावंत आणि तंत्रज्ञमंडळीशी माझे जे ऋणानुबंध जुळले ते कायम टिकले.त्या काळात राज्य नाट्यस्पर्धेच्या दिवसांत हैदराबादचे भोपटकर नांवाचे एक वयोवृध्द रंगभूषाकार औरंगाबादेत तळ ठोकून असत.शहरातल्या सगळ्या नाट्यसंस्थांच्या कलावंताचं मेकअप तेच करत.परिस्थितीत गरीब पण गुणानं श्रीमंत असणा-या या बोलघेवडया रंगभूषाकाराचं मराठवाडयाच्या रंगभूमीला दिलेलं योगदान मात्र आजवर अनुल्लेखितच राहिलं याची मात्र मला खंत आहे.

नाटक करण्यासोबतच प्रयोगांसाठी नव्या नाट्यसंहितांची भासणारी चणचण पाहून त्या काळी औरंगाबादच्या अनेक नाटकवेडयांनी नाटकं लिहायला सुरूवात केली.नाट्यरंगसाठी कुमार देशमुख नाटकं लिहू लागले.

जी.ए.कुलकर्णींच्या कथेवर आधारित 'इस्किलार ',श्री.रघुनाथांच्या कादंबरीवर आधारित 'आडगांवचे चौधरी ',गजमल माळीच्या 'नागफणा आणि सूर्य ' या काव्यावर आधारलेलं स्मारक ,तुरूंगातल्या कैद्यांच्या आकांक्षाना नाटयरूप देणारं 'आकाशपक्षी'ही आणि आणखीही काही प्रयोगक्षम नाटकं कुमार देशमुखांनी लिहिली.त्यांच्या 'स्मारक' या नाटकाच्या नाट्यरंगनं केलेल्या प्रयोगाला राज्य नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीतही पहिल्या बक्षिसाचा बहुमान मिळाला होता.मात्र मराठवाडयातून ख-या अर्थानं नाट्यलेखक म्हणून व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी पदार्पण करणारे पहिले लेखक म्हणजे अजित दळवी होत.विद्यापीठातल्या अनागोंदीच्या राजकारणाचं यथार्थ चित्रण करणारं 'आपल्या बापाचं काय जातं 'हे धमाल नाटक लिहून सुरूवात करणा-या अजित दळवींनी पुढे चालून व्यावसायिकदृष्टया यशस्वी झालेली 'डॉक्टर तुम्ही सुध्दा' ,'गांधी विरूध्द गांधी' ही विश्लेषणात्मक नाटकं आणि' बिनधास्त',
'ध्यासपर्व','काय द्याचं बोला','मीराबाई नॉट आऊट 'या चित्रपटांच्या कथा-संवादाचं लिखाण केलं.व्यक्तीच्या सकृतदर्शनीच्या अनाकलनीय स्वभावामागे दडलेल्या खोलवरच्या कारणांचा शोध अजित दळवी हे आपल्या संहितामधून घेत असतात हे त्यांच्या 'डॉक्टर तुम्ही सुध्दा' ,'गांधी विरूध्द गांधी' आणि 'संघर्ष' या नाटकांवरून जाणवतं.

ऐंशी-ब्याऐंशीच्या काळात औरंगाबादेत शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयाच्या प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी,प्रतीक्षा आणि प्रतिभा लोणकर, अभय जोशी,आशुतोष भालेराव ,समीर पाटील,जितेंद्र कुलकर्णी आणि श्रीपाद पद्माकर या नव्या दमाच्या तरूण विद्यार्थी-विद्यार्थीनीची टोळी नाट्यक्षेत्रात उतरली.कॉलेजमध्ये गॅदरिंगच्या नाटकांतून एकत्र आलेल्या या तरूणतरूणींनी काहीतरी वेगळं करून दाखवायच्या जिद्दीनं ' जिगीषा' ही नाटयसंस्था सुरू केली.प्रशांतनं नाटकं लिहायची,चंदूनं ती दिग्दर्शित करून बसवायची आणि इतर सर्वांनी त्यांच्या प्रयोगात अभिनय,नेपथ्य,प्रकाशयोजना, अशी त्यांना जी जमतील ती कामं करायची असा परिपाठ झाला.नाटक या माध्यमाबद्दलची विलक्षण सखोल जाण असलेली ही लेखक - दिग्दर्शकाची जोडगोळी अवघ्या औरंगाबादमध्ये चंदू -प्रशांत या नांवानं प्रसिध्द झाली.प्रशांतनं त्याच्या वयाच्या विशीत 'पौगंड',' दगड का माती',ही प्रत्ययकारी नाटकं लिहिली,आणि चंद्रकांत कुलकर्णीनं तेवढयाच ताकतीनं ती रंगमंचावर सादर केली.पुढे या तरूण कलावंतानी केलेलं एक धाडस अगदी उल्लेखनीय आहे.त्यांना जेव्हा जाणवलं की मुंबईत जाऊन नशीब अजमावल्याशिवाय आपल्या सर्जनाची कसोटी लागणार नाही.तेव्हा त्यांनी सर्वांनी एकत्र मुंबईत जायचा निर्णय घेतला.चंदू आणि प्रशांतन तिथे वृत्तपत्रांमध्ये नोक-या धरल्या आणि औरंगाबादहून मुंबईत आलेल्या त्यांच्या बाकीच्या मित्रमैत्रिणींना आधार दिला.तो काळ त्यांच्यासाठी खडतर तपश्चर्येचा काळ होता.पण नेटानं तग धरून ही तरूण मंडळी तिथे राहिली.जिगीषाच्या बॅनरखाली त्यांनी मुंबईत 'मदर्स हाऊस' चे प्रयोग केले. प्रशांतन आणखी नवी नाटकं लिहायला सुरूवात केली.चंदू ती बसवायला लागला आणि मग हळूहळू 'डॉक्टर तुम्ही सुध्दा' ,'चारचौघी', 'देहभान', 'सेलिब्रेशन'अशी अजित आणि प्रशांतची एकाहून एक सरस नाटकं मुंबईत व्यावसायिक रंगभूमीवर या दोघांनी सादर केली.ती सगळीच नाटकं रसिकांनी आणि समीक्षकांनी भरपूर वाखाणली.एका अर्थानं औरंगाबादच्या या तरूण कलावंतानी अवघी मुंबई जिंकली असंच म्हणावं लागेल.

दरम्यानच्या काळात औरंगाबाद मध्ये आकाशवाणीचं केंद्र सुरू झालेलं होतं. त्या केंद्राच्या नभोनाट्यांमध्ये आम्ही सगळेच स्थानिक कलावंत भाग घ्यायला लागलो.इतकी वर्ष स्वत:च पदरमोड करून महिनोन्महिने कष्ट करीत नाटकं बसवल्यानंतर अवघे काही तासच ध्वनिक्षेपकासमोर घालवून तीनचारशे रूपयांची कमाई करण्याचा तो अनुभव आम्हाला सुखावणाराच होता! औरंगाबादच्या आकाशवाणी केंद्रासाठी मी 'नरभक्षक','अस्तित्वोपनिषद','अधोगामी,''पूण्यमुक्ती','घाट,'आणि 'मरेपर्यंत फाशी' ही नभोनाटय लिहिली.ती सारीच्या सारी आकाशवाणीच्या राष्ट्रीय शृंखलानाटय योजनेत गेली आणि विविध भारतीय भाषांमधून प्रसारित केली गेली.पुढे चालून मी त्यातल्या ' मरेपर्यंत फाशी ' या माझ्या नभोनाटयाचं रूपांतर प्रयोगक्षम दोन अंकी नाटकामध्ये केलं.त्या नाटकाचा पहिला प्रयोग आम्ही राज्य नाटयस्पर्धेत केला.स्पर्धेत ते नाटक दुस-या क्रमांकाचं बक्षीस घेऊन गेलं.एका निर्घृण हत्येबद्दल फाशीची शिक्षा झालेला एक कैदी आणि

त्याच्या कुटुंबाची ही कहाणी होती.त्या नाटकात कैद्याची प्रमुख भूमिका मी केली होती.शिवाय अनुराधा वैद्य,नाना पाठक,चंदू सोमण, सौ.जोगळेकर,इत्यादींच्याही महत्वपूर्ण भूमिका त्यात होत्या .स्पर्धेनंतर या नाटकाचे प्रयोग औरंगाबाद,नाशिक,मुंबई वगैरे ठिकाणी केले गेले.नंतर अनेक वर्षांनी मी 'काळशिल्प ' नांवाचं एक नाटक लिहिलं.माझ्या शालेय जीवनात मराठी लघुकथेचे जनक मानले गेलेले दिवाकर कृष्ण केळकर यांची एक कथा मी वाचली होती.वेरूळच्या लेण्यामधील

' कैलास ' लेण्याच्या निर्मितीबद्दलची ही कथा होती. आठव्या शतकाच्या आधी वाकाटकांचा राजा दंतिदुर्ग यानं आपल्या दुर्गावती नांवाच्या मोठ्या राणीसाठी वेरूळला घृष्णेश्वराचं मंदिर बांधून दिलं.ते पाहून धाकटी राणी माणकावती हिनं स्वत:साठी घृष्णेश्वरापेक्षाही जास्त सुंदर मंदिर बांधून द्यावं म्हणून हट्ट धरला.

त्यानंतर डोंगरांमध्ये ' आधी कळस, मग पाया' हया रीतीनं कैलास मंदिराचं खोदकाम सुरू झालं.त्या मंदिरा निर्मिती भोवतीच्या अनेक उत्कंठापूर्ण घटनांवर आधारित माझं ' काळशिल्प ' हे नाटक संगीत – नृत्यमय आहे.या नाटकाचा प्रयोग डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या नाट्यशास्त्रविभागानं त्यांच्या एका वार्षिक महोत्सवात केला.१९८३–८४ मध्ये पारिजात नाट्यसंस्थेतर्फेच विज्ञानकथा लेखक डॉ.यशवंत देशपांडे यांनी लिहिलेलं ' गिनिपिग ' हे नाटक आम्ही राज्य नाट्यस्पर्धेत केलं.त्यातही दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका माझी होती.अनुराधा वैद्य,दिलीप घारे, सदाभाऊ वैद्य, अमृत महाजन, सुधीर सेवेकर,कु.छाया दीक्षित इत्यादींच्या भूमिका त्यात होत्या.विज्ञानकथेवर आधारलेलं मराठीतलं पहिलं नाटक, असे प्रशंसोद्गार त्यावेळी प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून आलेले नाटयकर्मी भालबा केळकर यांनी काढले होते. या नाटकातल्या भूमिकेसाठी राज्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत मला उत्कृष्ट अभिनयासाठीच रौप्यपदक दिलं गेलं.पुढे चालून डॉ.यशवंत देशपांडेच्या याच नाटकावरचं राजदत्त यांनी दिग्दर्शित केलेली एक टी.व्ही.मालिकाही एका दूरचित्रवाणी वाहिनीवर खूप गाजली.

दरम्यान एकदा कमलाकर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सुरू झालेल्या नाट्यशास्त्र विभागात विद्यार्थी म्हणून मी प्रवेश घेतला होता.वर्षभर तिथले वर्गही मी नित्यनेमानं केले,पण वर्ष अखेर मात्र त्या अभ्यासक्रमातला मी पहिला 'ड्रॉप आऊट ' ठरलो.नंतर काही वर्षांनी त्या विभागाशी पुन्हा माझा संबंध आला तो 'हॅम्लेट ' या नाटकामुळे ! त्यावेळी व-हाडकार डॉ.लक्ष्मण देशपांडे हे विभागप्रमुख झाले होते.औरंगाबादेतल्या जिगीषा ग्रूपचे चंद्रकांत कुलकर्णी आणि प्रशांत दळवी ही दोघ त्या वर्षी पदवीसाठी नाट्यशास्त्र विभागात दाखल झाली होती.या दोघांनी विभागाच्या वार्षिक नाट्यमहोत्सवात प्रयोगासाठी शेक्सपियरच्या ' हॅम्लेट' नाटकाची नाना जोग प्रणित मराठी संहिता निवडली.महोत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशीच हे नाट्य करायचं असल्यानं साहजिकच त्यात भूमिका करण्यासाठी नाट्यशास्त्र विभागातल्या विद्यार्थ्यांसोबत शहरातले काही अनुभवी कलावंतही आमंत्रित केले गेले. माझ्या चेहे-यावरचे उपजत भाव पाहून की काय कोण जाणे,पण दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णीनं हॅम्लेटचा चुलता असणा-या क्लाडियसची खलनायकी भूमिका मला दिली.हॅम्लेटची आई असणा-या राणीची भूमिका अनुया दळवींनी केली होती. आलोक चौधरी,चंदू सोमण,मामा पत्की वगैरे जाणती नटमंडळी त्यात होती, आणि शिवाय जिगीषा अन् नाट्यशास्त्र विभागातले तरूण कलावंत होते.त्या प्रयोगात हॅम्लेटची मध्यवर्ती व्यक्तिरेखा जिगीषाच्या अभय जोशी या तरूण कलावंतानं अप्रतिम अशी उभी केली.चंद्रू- प्रशांतची जोडी जिगीषाच्या नाट्यप्रयोगामुळे 'ओरिजिनल 'म्हणून आधीच गाजलेली होती,पण हे नाटक त्यांच्या सर्जनशीलतेच्या चढत्या क्रमाचं प्रत्यंतर होतं.या ' हॅम्लेट' चा पहिला प्रयोग त्या महोत्सवाचे प्रमुख पाहुणे पु.ल.देशपांडे यांच्या साक्षीनं झाला.त्यावेळी मी आतापर्यंत पाहिलेल्या ' हॅम्लेट' नाटकाच्या सर्व प्रयोगांत हा आजचा प्रयोगच उत्कृष्ट होता.अशा शब्दांत पुलंनी त्या प्रयोगाची तारीफ केली. आणि खरोखरच पात्रयोजना,अभिनय, प्रकाशयोजना, नेपथ्य,रंगसंगती,आणि पार्श्वसंगीत या सर्वच अंगांनी हा प्रयोग अत्यंत सरस झाला होता.

मराठी नाट्यपरिषदेच्या औरंगाबाद शाखेनं काही वर्ष शहरातल्या सगळ्या नाट्यसंस्थांच्या कलावंताना एकत्र आणून राम गणेश गडकरी,गोविंद बल्लाळ देवल अशा जुन्या नाटककारांच्या नाट्यदर्शनाचे दिमाखदार कार्यक्रम सादर केले होते.प्रत्येक नाटककाराच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या नाटकांतले महत्वाचे प्रवेश आणि त्यांतली लोकप्रिय गाणी यांच्या सहाय्याने निवेदनासह रंगमंचावर आम्ही सादर करीत असू.या नाट्यदर्शन कार्यक्रमाच्या संहिता सुधीर पत्की लिहित असत.प्रा.त्र्यंबक महाजन यांचं दिग्दर्शन असे आणि लक्ष्मण देशपांडे ,वर्षा उसगावंकर,अनुराधा वैद्य,वसंत दातार, माधुरी दातार, सीमा मोघे, मोहन फुले, आलोक चौधरी,कुमार देशमुख,विश्वास सोळुंके, मी स्वत: आणि इतर अनेक कलावंत त्यांत भूमिका करीत असत.पुढे चालून औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष बाबासाहेब गोखले आणि सुधीर पत्की हे स्थलांतर करून पुण्यास गेले आणि नाट्यपरिषदेचे हे कार्यक्रमही थांबले.

' गिनिपिग ' हे नाटक केल्यानंतरच्या काळात इतर अनेक व्याप माझ्यासाठी लागल्यामुळे स्वत: नाटकाची निर्मिती करणं मी थांबवलं मात्र इतर मित्रांच्या नाट्यसंस्थांत बसवल्या जाणा-या निवडक नाटकांत भूमिका करणं मी सुरूच ठेवलं.त्यानंतरच्या काही वर्षांत मी विविध संस्थांच्या 'इस्किलार' ( नाट्यरंग , हिंदी–ले .दिग्द कुमार देशमुख ), 'संघर्ष ' ( परिवर्तन –ले. दिग्द. अजित दळवी), 'डॉक्टर आप भी' (परिवर्तन–ले.अजित दळवी ,दिग्द चंद्रकांत कुलकर्णी), 'हृदय परिवर्तन ' – (ले.श्याम मनोहर दिग्द.चंद्रकांत कुलकर्णी) ,'म्युलटो ' (दलित थिएटर– ले दिग्द.त्र्यंबक महाजन ) या नाटकांतून भूमिका केल्या.

ह्यातलं म्युलॅटो हे अमेरिकेतल्या ब्लॅक थिएटरचं एक प्रभावी नाटक ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.त्र्यंबक महाजन यांनी त्यांच हिंदी भाषांतर केलं आणि त्यांच्याच दिग्दर्शनाखाली औरंगाबादच्या दलित थिएटरसाठी बसवलं.एका वर्णद्वेषी गो-या अमेरिकन बागायतदाराला त्याच्याच पदरी असलेल्या एका गुलाम निग्रो स्त्रीशी असणा-या संबंधांतून निमगोरी( म्युलॅटो ) अपत्यं होतात.ती सारीच गुलामांसारखी

त्याच्या इस्टेटीवर राबत असतात.पण त्यांच्यापैकी एकजण दूरवरच्या एका शहरात राहून शिक्षण घेऊन जेव्हा परत येतो तेव्हा इथली गुलामगिरी पाहून त्याच रक्त खवळतं. तो जुलमी गो-या बापाविरूध्द विद्रोह पुकारतो ,आणि स्वत: त्याचा पुत्र असल्याचं घोषित करून त्याला आव्हान देतो.या दोघा बापलेकांमधल्या अतीव संघर्षाची ही एक प्रभावी कहाणी आहे.

या 'म्युलॅटो' च्या हिंदी रंगावृत्तीत मस्तवाल गो-या अमेरिकन बागायतदाराची भूमिका मी केली होती.नायिकेची –कोराची – भूमिका विजया शिराळेंनी केली होती.या दांपत्याचा बंडखोर मुलगा बर्ट याची जोमदार व्यक्तिरेखा मधू गायकवाडनं फारच समर्थपणे पार पाडली होती.त्याशिवाय या नाटकात प्रा.नागोरी , साहेबराव गायकवाड, आणि दलित थिएटरची अनेक गुणी कलावंत मंडळी होती.म्युलॅटोचा पहिला प्रयोग पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात झालेल्या पहिल्या दलित नाट्यसंमेलनात केला गेला.नाट्यक्षेत्रातले मान्यवर आणि सर्वसामान्य प्रेक्षक या सर्वांनाच तो प्रयोग अतिशय आवडला.पुढे दलित थिएटरतर्फेच महाराष्ट्र राज्याच्या हिंदी नाट्यस्पर्धेत म्युलॅटोचा प्रयोग आम्ही नागपुरात केला.त्या स्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाचं आणखी एक रौप्यपदक मला मिळालं.

नाट्यकर्मी कमलाकर सोनटक्के यांनी विभागप्रमुखाचं पद सोडल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाची धुरा ब-हाडकार लक्ष्मण देशपांडे यांनी अनेक वर्ष समर्थपणे पेलली .त्यांचा 'व-हाड निघालंय लंडनला 'हा अफलातून एकपात्री नाट्यप्रयोग महाराष्ट्राच्या व्यावसायिक रंगभूमीवर तब्बल चाळीस वर्ष टिकून आहे.इतकी वर्ष रंगमंचावर टिकूनही अद्याप लोकप्रियतेच्या शिखरावर राहणारा मराठीच्या इतिहासातला तो एकमेव नाट्यप्रयोग असावा.अशी एकाच संचात दशकानुदशकं चालणारी नाटकं फक्त न्यूयार्कच्या ब्राडवेबरच पहायला मिळतात. आज पासष्टी उलटलेलें लक्ष्मण देशपांडे पूर्वी इतक्याच चपळपणानं आणि बारकाईन रंगमंचावरच्या व-हाडात जप्पा,त्यांची मंडळी,बबन्या ,काशिनाथ,मथी या व्यक्तिरेखा प्रेक्षकांसमोर जिवंत उभ्या करतात. लक्ष्मण देशपांडेच द्विपात्री ' नटसम्राट ' हे नाटकही व्यावसायिक रंगभूमीवर ब-यापैकी गाजलं.त्यांच्यासोबत अनुया दळवींनी त्या द्विपात्री प्रयोगांत सरकारची उल्लेखनीय अशी भूमिका केली होती. त्यांच्या त्या नाटकासाठी एका वेगळया धाटणीचं पार्श्वसंगीत मी तयार करून दिलं होतं.

नंतर काही वर्षांनी लक्ष्मण देशपांडे यांनी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीसाठी 'कोर्टमार्शल 'हे सैनिकी पार्श्वभूमीवरचं नाटक दिग्दर्शित केलं.त्यात मी एका कर्नल जजची भूमिका केली होती.चंद्रकांत शिरोळे, जयंत फडके,चंदू सोमण,संजय गंगाखेडकर,सुधीर मोघे,जयंत शेवतेकर इत्यादीच्या भूमिका त्यात होत्या.लक्ष्मणरावाचं हे नाटकही दूरदर्शनवर अनेक वर्ष गाजलं.स्वत: नाट्यक्षेत्रातल्या विविध आघाडयांवर काम करीत असतांना उत्तम कसब अंगी असणा-या आपल्या मित्रानांही आपलं कर्तृत्व दाखवण्याच्या संधी मिळवून देणं हा लक्ष्मण देशपांडे यांचा एक मोठा गुण होय.मला स्वत:ला त्यांच्यामुळे अशा काही अपूर्व संधीचा लाभ झालेला आहे.त्यांच्या ' व-हाड ' च्या लोकप्रियतेनंतर महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्यामार्फत अनेक समित्यांवर लक्ष्मण देशपांडेच्या नेमणुका झाल्या.त्यातच देशातल्या सात सांस्कृतिक क्षेत्रापैकी उदयपूरच्या पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या व्यवस्थापन समितीवर ते गेले. १९८५-८६ साली पंतप्रधान राजीव गांधी यांना देशात दर चार वर्षांनी महिनाभर चालणारा एक राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव भरवावा असं वाटलं. देशभराच्या लोकसंस्कृतीचं एकत्र दर्शनानं देशाची एकता जास्त बळकट होईल अशी त्यांची कल्पना होती.म्हणून 'विविधतामे एकता ' या घोषवाक्यानिशी 'अपना उत्सव ' नावाच्या राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सवाची सुरवात करण्याचं ठरलं.राजीव गांधींच्याच राजवटीत स्थापन झालेल्या सात क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्रावर ही जबाबदारी टाकली गेली. १९८६ सालच्या डिसेंबर महिन्यात दिल्ली इथं पहिला 'अपना उत्सव ' भरवण्याचं निश्चित झालं. औरंगाबादच्या विद्यापीठीय नाट्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख कमलाकर सोनटक्के हे त्यावेळी नागपूरस्थित दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे सचांलक म्हणून नियुक्त झाले.त्यामुळे लक्ष्मण देशपांडेनी स्वत: पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या व्यवस्थापन समितीवर असूनही अपना उत्सव पुरतं म्हणून सोनटक्क्यांच्या दक्षिण-मध्य केंद्रात कार्यक्रम दिग्दर्शक म्हणून काम करायचं ठरवलं.मग पश्चिम केंद्राचे कार्यक्रम कोण बसवेल असा सवाल त्या केद्राच्या संचालिका आदिती मेहता यांनी लक्ष्मण देशपांडेसमोर उभा केला.तेव्हा लक्ष्मणरावांनी माझं नांव त्यांना सुचवलं.अशा रीतीनं ८६ साली दिल्लीत झालेल्या अपना उत्सवमध्ये,आणि त्यानंतर चार वर्षांनी १९९० साली मुंबईतल्या अपना उत्सवात पश्चिम क्षेत्रीय केंद्राच्या कार्यक्रमांचा दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली.या पश्चिम क्षेत्र केंद्राच्या अखत्यारीत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि गोवा ही राज्ये होती. या चारही राज्यातल्या सहाशे अस्सल लोककलावंताचे, भटक्या,विमुक्त, आणि आदिवासी कलाकाराचे मूळचे कलाविष्कार सूत्रबध्द रीतीनं गुंफून निवेदनासह ते रंगमंचावर सादर करण्याची जबाबदारी दिग्दर्शक म्हणून माझ्यावर होती. दिल्ली आणि मुंबई इथं प्रत्येकी दीड महिना या लोककलाकारांसमवेत राहून हे कार्यक्रम तेथील अपना उत्सवमध्ये मी सादर केले.माझ्यासोबत मदतीसाठी जी तज्ञाची टीम होती त्यात आलोक चौधरी,राजा जोशी,संजय गंगाखेडकर,किरण काचोळे ही सारी औरंगाबादचीच मंडळी होती.

या दोन्ही अपना उत्सवात महाराष्ट्रातले पोतराज, गोंधळी, वाघ्यामुरळी, दशावतारी सोंगी, आदिवासी नर्तक ,राजस्थानातले शेखावटी नर्तक ,लंगा गायक ,मंगणियार जमातीचे कलावंत, गुजरात मधील राठव भिल्ल, भवई गर्बा कलावंत आणि गोव्यातले शिगमोत्सवी कलावंत, अन् देखणी नृत्याच्या नर्तकी, अशा उपजतचे कलागुण अंगी असणा-या कलाकारांमध्ये वावरत असतांना मला स्वत:ला खूप काही शिकायला मिळालं ! त्यांच्या तालमी मी दररोज दुपारी घेत असे; पण सकाळच्या वेळी मात्र त्यांच्या राहुटयांकडे चक्कर मारून मी त्यांच्याशी गप्पागोष्टी करत असे.त्यांच्या राहुटीत गेलो, की राजस्थान -गुजरातचे काही कलावंत,' पधारिये मास्टरजी ' असं माझं स्वागत करीत, आणि कानाच्या पाळीला हात लावून म्हणत, 'आज और कुछ नया सिखाइये' ,खरं सांगायचं तर तीनतीन सप्तकात लीलया गाऊ शकणा-या त्या लंगा गायकानं असं म्हटलं की माझी मलाच लाज वाटे .पिढ्यान्पिढ्या मांड आणि घुमर गायकीचा वारसा बालपणापासून मिळणा-या या जातीच्या कलावंताना आम्ही पांढरपेशे काय नवीन शिकवणार ? आम्ही त्यांच्या रांगडया कलेचा आस्वाद जरी घेऊ शकलो तरी ते खूप होतं. याच काळाच्या दरम्यान महाराष्ट्र शासनातर्फे चार वर्षासाठी माझी नियुक्ती पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या कार्यक्रम समितीवर झाली .त्या चार वर्षामध्ये केंद्राच्या अनेक कार्यक्रमाच्या नियोजनात सहभागी होता आलं. मराठवाडयातल्या हिंगोली शहरातला पारंपारिक दसरा महोत्सव पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्रातर्फे पुरस्कृत केला जावा असे प्रयत्न मी माझ्या सदस्यत्वाच्या काळात केले.आणि त्याप्रमाणे तो केला ही गेला.!

औरंगाबादेत परिवर्तनतर्फे' हृदय ' आणि 'डॉक्टर आप भी 'ही नाटकं करीत होतो तेव्हा त्याचा दिग्दर्शक असलेल्या चंद्रकांत कुलकर्णी उर्फ चंदू याच्याशी माझा जास्त संबंध आला.नाटक बसवत असतांना नाट्यवस्तूंच नीट आकलन करून घेऊन त्यातल्या प्रत्येक व्यक्तिरेखेकडून नेमकी कशाची अपेक्षा आहे हे ठरवायची, आणि मग ते त्या व्यक्तिरेखा साकार करणा-या नट-नटयाकडून बेमालूम करवून घ्यायची हातोटी चंद्रकांतला साधलेली आहे.हाती घेतलेल्या प्रत्येक नाटकाबद्दल स्वत: पुरेपूर होमवर्क केल्याशिवाय तो तालमींना सुरूवात करीत नाही.नेपथ्य,रंगमंचावरील रचना, पात्रांचा वावर आणि संवादफेक,प्रयोगात वापरायचे कपडे इत्यादी गोष्टीचा बारीकसारीक तपशीलही त्याच्या डोक्यात असतो.त्यानं एखादी गोष्ट करायची ठरवली, की तो ती सहजासहजी बदलत नाही.याचं प्रत्यंतर विद्यापीठात 'हॅम्लेट ' हे नाटक करतांना आम्हाला नेहेमीच येत असे.हॅम्लेटच्याच निमित्तान चंदू आणि प्रशांतच्या प्रॉडक्शन टीमशीही संबंध आला.पुढे ही सारी मंडळी जेव्हा मुंबईत गेली.त्यांनी मुंबईच्या संपर्क ॲडव्हार्टायझर्ससाठी रलीज इंडियाच्या काही कीटकनाशकांच्या जाहिरातपटांची निर्मिती केली. त्यापैकी ' असाटाफ ' आणि 'रोगोर ' या कीटकनाशकांच्या दीर्घ जाहिरात पटांत भूमिका करण्यासाठी त्यांनी मला बोलावलं.जालन्यात आणि मुंबईत चित्रीकरण झालेल्या या दोन जाहिरातपटांमुळे मला फिल्म शुटिंगचा ब-यापैकी अनुभव आला.तसं पाहिलं तर त्या आधीही दिग्दर्शक अजित सिन्हा ( संजय गांधीच्या आग्रहाखातरं बंदी घातलेल्या' किस्सा कुर्सी का 'या चित्रपटाचे निर्माते ) यांच्या 'इतिहास के गवाह 'या मालिकेत दौलताबाद किल्ल्याबाबतच्या एका भागात मी एक छोटासा रोल केला होता.पण त्यावेळी प्रत्यक्ष शुटिंगऐवजी घोड्यावर बसण्याची प्रॅक्टिस करण्यातच माझा जास्त वेळ गेला.!

पुढे,चालून चंदू-प्रशांत आणि त्यांच्या सहका-यांनी मुंबईत जिगीषा ग्रुपचं 'जिगीषा क्रिएशन्स प्रा.लि.'या निर्मितीसंस्थेत रूपांतर

केलं. नंतर त्यांनी तत्कालीन 'अल्फा टी.व्ही'. आताची 'झी मराठी' वाहिनीसाठी 'पिंपळपान 'नांवाची एक मालिका करायला घेतली. मराठी वाङ्‌मयात उत्कृष्ट म्हणून गाजलेल्या कथांवर आधारित बारा-तेरा भागांच्या टी.व्ही. सीरियल्सची निर्मिती त्यांनी सुरू केली.याच पिंपळपान मालिकेत विजय तेंडुलकरांच्या 'कमला ' या गाजलेल्या नाट कावर तेरा भागांची एक मालिका करायचं त्यांनी ठरवलं. मालिकेची पटकथा अजित दळवींनी लिहिली.त्या मालिकेत सुप्रसिध्द अभिनेत्री नीना कुलकर्णी आणि रविंद्र मंकणी यांच्या प्रमुख भूमिका होत्या.'कमला ' या विकल्या गेलेल्या खेडूत स्त्रीची भूमिका तनुश्री नांवाच्या एका बंगाली तरूण मुलीनं केली होती.त्यातील काकासाहेबांच्या पात्रासाठी माझी निवड चंदू आणि प्रशांतनं केली. माझ्याशिवाय अभय जोशी,कमलाकर सोनटक्के यांच्याही महत्त्वाच्या भूमिका त्यात होत्या. तेव्हा टी.व्ही. हे माध्यम माझ्यासाठी पूर्णपणे नवं होत.तेरा भागांच्या टी.व्ही.सीरियलमध्ये मोठा रोल करायचा, आणि तोही नीना कुलकर्णी - रविंद्र मंकणी यांच्यासारख्या कसलेल्या कलावंतासोबत,म्हणून सुरूवातीला माझ्या मनावर चांगलंच दडपण होतं.पण या दोन्ही श्रेष्ठ कलावंतानी खूपच खेळीमेळीनं वागून माझ्यावर जराही ताण येऊ दिला नाही. जिगीषाची सगळी टीम तर एखाद्या कुटुंबासारखीच होती. अभय जोशी जोक्स मारतच सेटवर वावरायचा. प्रतिमा लोणकर आणि समीर पाटील ही दोघं चंदूला दिग्दर्शन विभागात मदत करायचे. रिहर्सलमध्ये आम्ही कुणीही एखादा डायलॉग जरा ब-यापैकी घेतला गेला, की मॉनिटरपुढे बसलेली ही दोघं टाळया वाजवून दाद द्यायाची. दिग्दर्शन विभागातच असणारी भाग्यश्री जाधव ही माझे शॉट्‌मध्ये वापरायचे कपडे किंवा डायलॉगचे कागद हे मला वेळेत आणून द्यायची. दुपारी लंचच्या वेळी सगळे एकमेकाच्या फिरक्या घेत जेवायचे.त्या मुक्त वातावरणात मला माझ्या कॉलेजच्या दिवसांचा 'फील' परत एकदा या तरूण मुलांनी दिला ! त्यामुळ

पहिल्याच शॉट्‌नंतर माझ्यावरचं दडपण पसार झालं. प्रोडक्शन विभागाचे जितू कुलकर्णी आणि श्रीपाद पद्माकर यांची धावपळ तर बघवत नसे.प्रत्येक जण त्यांना हाका मारून ओरडत असे, ' जितू , फिल्टर्स कुठायत , श्रीपाद, अरे जनरेटर आलं का?' आणि ही दोघं तक्रार न करता धापा टाकत सगळयांना गोष्टी पुरवत.हया ' कमला ' सीरियलचा एक गंमतशीर परिणाम असा झाला की मुंबईतल्या एकदोन नाट्यदिग्दर्शकांचे ' व्यावसायिक नाटकांत काम कराल का ?'अशी विचारणा करणारे फोन मला आले.मी त्यांना म्हटलं की तुम्ही दहा वर्षापूर्वी विचारलं असतंत तर मी हो म्हटलं असतं, आता नाही ! कारण तोपावेतो माझे इतर व्याप इतके वाढले होते,की नाटकांच्या दौ-यासाठी आवश्यक असणारे दिवस लागोपाठ देणं मला शक्य नव्हतं. ' कमला ' नंतर जिगीषाच्या ' भेट ' या चित्रपटातही मी एक छोटासा रोल केला.

चित्रपटाच्या शुटिंगचा आणखी एक रोमहर्षक अनुभव माझ्या गाठीशी आहे.औरंगाबादचाच अगदी तरूण असणारा एक महत्वाकांक्षी कलाकार कमलेश महाजन हा एकेदिवशी माझ्याकडे आला त्यानं अनेस्ट हेमिंग्वेच्या 'ओल्ड मन अॅन्ड द सी.' या जगप्रसिध्द कादंबरीवर आधारित एक पटकथा लिहिली होती.त्या पटकथेवर एक छोटा चित्रपट करायचा आहे.आणि त्यातली
' ओल्ड मॅन ' ची मध्यवर्ती भूमिका मी करावी अस त्याचं म्हणणं होतं. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा दृकश्राव्य विभाग त्या विद्यापीठात अभ्यासक्रमात असणा-या पुस्तकांवर फिल्मस तयार करून त्याच्या सी.डी.ज.विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून पुरवत असत. त्या योजनेतहत हा चित्रपट करायचा होता.एका जगद्‌विख्यात कादंबरीवर लघुचित्रपट करण्याची ही कल्पना सुरूवातीला मला फारच धाडसाची वाटली.हा चित्रपट मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा देणा-या बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी असल्यानं त्याची संहिता इंग्रजी मराठी यांची मिश्रसंहिता होती.तेही मला जरा अजब वाटलं पण कमलेशचा उत्साह आणि आत्मविश्वास पाहून मी त्याला होकार दिला.

या चित्रपटात म्हाता-या क्यूबन कोळयाची भूमिका करणारा मी,आणि त्याची काळजी वाहणा-या छोटया मुलाची
भूमिका करणारा पुष्कर कोल्हटकर अशी दोनच पात्रं होती. आम्ही दोघ कमलेशसोबत नाशिकच्या मुक्त विद्यापीठात पोहोचलो.तिथल्या दृकश्राव्य विभागातल्या प्रशांत कुलकर्णी, जगदीश कुलकर्णी या कॅमेरामन तंत्रज्ञमंडळीची भेट झाली.त्यांच्या प्रोडॅक्शन युनिटचे दहाबारा तरूण होते.तेही भेटले.मग दुस-या दिवशी एका खास बसमधून आम्ही सगळे कोकणात रवाना झालो. कोकणातल्या दापोलीजवळच्या हर्णे हया बंदराच्या गावी आम्ही तळ ठोकला .तिथे दररोज बंदरावरून भांडयाची एक मोठी मोटाररॅलीच घेऊन आमचं सगळं युनिट समुद्रावर जाई किना-यापासून तीनचार किलोमिटर्स दूर जाऊन तिथे लाँच नांगर टाकून उभी राहायची.त्या लाँचच्यामागे बांधून एक छोटी होडीही दररोज समुद्रात नेली जाई. ठराविक अंतरावर गेल्यानंतर मुख्य लाँच नांगरून उभी राही होडी समुद्रात भरकटू नये म्हणून पूर्णपणे पाण्यात बुडालेल्या दोरखंडानं ती लाँचला बांधलेली ठेवत.मग मासे पकडायचं जाळं आणि भाला, दोरीचं वेटोळ इत्यादी साहित्यानिशी मला त्या होडीत उतरवत.कॅमेरा आणि संपूर्ण शुटिंग युनिट मोठया लॉचमध्ये , आणि मी एकटाच त्या होडीत, अस दिवसभर शुटिंग चाले.समुद्राच्या उसळत्या लाटांनी ती होडी प्रचंड हेलकावत असे.होडीत भेलकांडत कसाबसा उभा राहून मी शॉटस देत असे.कधीकधी मोठी लाट येऊन मला नखशिखांत भिजवून टाकत असे .सतत हलणा-या होडीतून खाली पाण्यात पडण्याचीही भीती मला वाटत असे.सोबतच्या मुख्य लॉचवर युनिटच्या साथीला सातआठ पट्टीचे पोहणारे कोळीबांधव होते. तेवढाच काय तो आधार होता.दुपारचं जेवण दुस-या एका लाँचन तिथे चित्रीकरणस्थळीच आणलं जाई; पण हलणा-या लॉचवरच्या युनिटमध्ये कमलेश,प्रशांत वगैरेपासून रिफ्लेक्टर्स धरणा-या पोरापर्यंत सगळे जण आधीच ओका-या काढून बेजार झालेले असत.त्यामुळे कुणीच फारसं जेवत नसे .आश्चर्य हे की माझी होडी त्या लाँचपेक्षा जास्त हलत असूनही त्या चित्रीकरणाच्या दरम्यान एकाही दिवशी माझ्या पोटानं मात्र कधी बंड केलं नाही ! एका छोटयाशा होडीत वीसबावीस दिवस समुद्रावर काढतांना सोबत नेलेलं जवळचं अन्न संपल्यावर हा म्हातारा कोळी पोट भरण्यासाठी एका मासा पकडून तो कच्चाच खातो असं एक दृश्य पटकथेत होतं.त्या शॉटसाठी मुख्य लॉचवरच्या युनिटमधल्या एका कोळी मित्रानं मिठाच्या पाण्यात अर्धवट उकडलेला एक अखंड मासा होडीत ठेवला होता.त्या दिवशी तो शॉट सुरू झाल्यावर खिशातल्या चाकूनं तो अख्खा मासा कापून मी खाऊन फस्त केला. त्या संपूर्ण चित्रीकरणाच्या काळात
माझ्यादृष्टीने स्वादिष्ट असणारा तो एकमेव शॉट होता .अशा त-हेने तब्बल बारा दिवस हर्णे बंदराजवळच्या त्या समुद्रात तळपणारं ऊन घोंगावणारं खारं वारं, आणि सतत हेलकावणारी होडी यांचा सामना करीत आम्ही ' ओल्ड मॅन अॅन्ड द सी 'च चित्रीकरण केलं.
ते बारा दिवस माझ्या आयुष्यातले अविस्मरणीय दिवस होते.

आयुष्याची पंचवीस वर्ष रंगदेवतेच्या मंडपात एका दुर्लक्षित कोप-यात अशी कारसेवा करीत घालवल्यानंतर गेली दहा पंधरा वर्ष निसर्ग, पर्यावरण, जंगलं, पाणी ,शेती आणि या सर्वांशी जुडलेलं सर्वसामान्य कष्टक-याचं नातं यांचा उलगडा करून घेण्यात मी गुंतलो .२००८ च्या ऑक्टोबरात मी अमेरिकेत गेलेलो असतांना कळालं की, माझ्या रंगमंचीय लुडबुडीबद्दल महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक पुरस्कार मला देण्यात आला आहे ! अस काही होईल हे माझ्या ध्यानीमनीही नव्हतं. या पुरस्कारामुळे आनंद तर झालाच, पण पुन्हा एकदा तोंडाला रंग लावण्याची ऊर्मीही जागी झाली आहे, हे निश्चित.

# मराठवाड्याचा गौरव श्रीपाद नृसिंह बेंडे एकांकिका स्पर्धा

प्रा.कालिदास कुलकर्णी

प्रबोधन व रंजनाच्या प्रभावी माध्यमांची आपली परंपरा प्राचीन आहे. ती परंपरा जपणे, विकसित करणे व अंकुरीत होऊ पाहणाऱ्या नव्या नवजात कलावंताचा सातत्याने शोध घेणे , ही आपली सांस्कृतिक जबाबदारी असते. हे गृहीत धरता ' श्रीपाद नृसिंह बेंडे एकांकिका स्पर्धा समिती, हिंगोली ' या व्यासपीठाने गेल्या चाळीस वर्षापासून अनेक व्यवधानांना तोंड देत ही नाट्य चळवळ ग्रामीण परिसरात आजही कार्यरत ठेवली आहे व आपली महत्ता महाराष्ट्र पातळीवर सिध्द केली आहे.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात झोडगाव या छोट्या खेड्यातील ७५ वर्षापूर्वी श्रीपाद नृसिंह बेंडे हे मोठे नाटककारांने होऊन गेले .ज्या काळात बालगंधर्वाचे युग सुरू होते. त्यावेळी मराठवाड्याच्या या तरूण नाटककारांनी ' बेबी ' , ' बुवा ', ' पांचाली ' ,अशी एकापेक्षा एक बंडखोर पण सरस नाटके लिहून नाटयक्षेत्र हादरून सोडले होते. प्रसिध्दीपासून पराडमुख हा थोर नाटककार अल्पायुषी ठरला.बेंडेची सगळी नाटके मुद्रितही होऊ शकली नाही, हे मराठवाड्याचे व नाटयकर्मीचे दुर्दैव म्हणावे लागेल पण त्यांच्या कार्याचे अनन्य साधारण महत्त्व जाणून त्यांच्या स्मरणार्थ एकांकिका स्पर्धा ही नाट्य चळवळ आज अख्ख्या महाराष्ट्रात नावारूपाला आलेली आहे.

१९६८ साली हिंगोलीचे नाटककार डॉ.प्रियकर जैन व कै.सी.एम.साकळे यांनी या स्पर्धेची कल्पना साकार केली यासाठी त्यांना अनेक रसिकांनी व नाट्य कलावतांनी मदत केली .पण, १९७० साली डॉ.प्रियकर जैन यांनी स्वत:ला अध्यात्मात वाहून घेतल्यामुळे त्यांना हिंगोली सोडावी लागली.पुढे के.सी.एम.साकळे यांना प्रा.कालिदास कुलकर्णी ,डॉ.जे.एम.मंत्री, फुलचंद मुक्कीरवार,प्रा.बजाज ,गुलाब घुगे, झाडे यांच्या साहाय्याने स्पर्धेचे कार्य चालू ठेवले व स्पर्धेला चांगलीच गती देऊन या छोटया रोपटयाचे वटवृक्षात रूपांतर केले.

**स्पर्धा म्हणजे जगन्नाथाचा रथ ..**

श्री.नृ.बेंडे एकांकिका स्पर्धा हा जगन्नाथाचा रथ आहे. अनेकांचे पवित्र करकमल या रथाला लागले आहेत म्हणूनच ३०-३५ वर्षापेक्षा जास्त काळापासून स्पर्धेचा रथ आजही वाटचाल करीत आहे.अनेक देणगीदार,असंख्य कार्यकर्ते, रसिक नागरीक, कसलेले कलावंत, रंगकर्मी यासर्वांची यादी येथे देणे सोईचे होणार नाही. तसेच स्पर्धेला नावारूपाला आणण्यात पत्रकाराचा वाटा सिंहाचा आहे. शरद जयस्वाल, तुकाराम झाडे, ओमप्रकाश धनमणे,देविदास देशमुख या पत्रकारांचा उल्लेख येथे आवर्जून करावा लागेल.

सातत्य हेच केवळ या स्पर्धेचे वैशिष्टय नाही तर वैशिष्ट्य आहे ते ग्रामीण व नागरी रंगकर्मीचा या रंगपीठाच्या निमित्ताने घडणारा समन्वय.गेल्या ३०-३५ वर्षाचा आढावा घेतल्यास तर या रंगपीठावर मुंबई, नागपूर, पुणे, अमरावती, कोल्हापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, अकोला, लातुर, बीड, नांदेड अशा नागरी भागातून रंगकर्मी येऊन गेलेत.शिवाय आष्टी, इसापूर,झरी,पाथरी,मानवत,सेलू,पूर्णा या ग्रामीण भागातून रंगकर्मीनी हजेरी लावली आहे.तर आदिम रंगकर्मी या व्यासपीठाला नवीन नाहीत. असा नागरी, अनागरी-आदीम कलावंताचा आगळा वेगळा समन्वय खऱ्या अर्थाने एकाच नाट्य रंगपीठावर सापडणे दुर्मीळच !

**ही स्पर्धा म्हणजे एकांकिकेची जननी**

नवनवीन नाट्यकर्मीना प्रोत्साहीत करून नवीन संघ नाट्य कलावंत ,नवीन नाट्य स्पर्धा निर्माण करणारी बेंडे स्पर्धा सर्वांची माता ठरली आहे. या स्पर्धेपासून स्फूर्ती घेऊन तुळजापूर,परभणी,पूर्णा,पुलगांव,उमरगा,वाशिम अशा अनेक ठिकाणी नाट्य स्पर्धा सुरू करण्यात बेंडे स्पर्धेचा फार मोठा वाटा आहे. किंबहुना बेंडे स्पर्धेची नाळ त्या स्पर्धेशी जोडलेली आहे. त्यात सातत्य असेल किंवा नसेल हा भाग वेगळा.

कलावंताना आनंद देणारी स्पर्धा

अत्यंत शिस्तबध्द रसिक प्रेक्षक हे या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्टय सांगता येईल, आज स्पर्धेमध्ये हुल्लडबाजीचे चित्र दिसते, त्याचा जरासाही अंश हिंगोलीच्या स्पर्धेत दिसत नाही. कलावंताची भूमिका आवडो वा नाआवडो कलावंताचा अवमान हिंगोलीत कधीच केला जात नाही. खरा नाट्य रसिक हिंगोलीतच भेटतो,या भावनेतून व आनंदापोटी अनेक कलावंत या नाट्य पंढरीच्या वारीला आवर्जून येतात.पारितोषिक हे त्यांच्या दृष्टीने नगन्य असते फक्त हवा असतो तो निखळ आनंद तो येथेच मिळतो आणि हेच स्पर्धेचे यश आहे.

**अभिरूचीची जडण घडण**

प्रेक्षकांच्या अभिरूचीची जडण घडण करणे हे या स्पर्धेचे मोलाचे योगदान .ताज्या घटना,नवीन संहिता,नवीन तंत्रे, नवीन प्रयोग या रंगपीठावर सादर होत आहेत.यामुळे प्रेक्षक रंगकर्मी दोघांचीही अभिरूची विकसित होताना दिसते.

स्पर्धेने फक्त एकांकिका स्पर्धाच घेऊन आपले कार्य संकुचित ठेवले नाही तर प्रौढ शिक्षण ,बाल कामगार हुंडा बळी या समस्यावर आधारित ग्रामीण भागात शंभराच्यावर पथनाट्य सादर केली आहेत. तर नवीन संहिता लिहिल्या जाव्यात व नवोदित लेखकांना प्रकाशक मिळावा या हेतूने प्रा.विलास वैद्य व अशोक अर्धापुरकर यांनी मेहनत घेऊन स्पर्धेतील एकांकिकेचे संकलन करून ' निवडक बारा एकांकिका ' हे पुस्तक स्पर्धासमितीच्या वतीने थाटामाटात प्रकाशित केले आहे.

मागच्या वर्षी स्पर्धा समितीने आपले आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. मराठवाडयात स्वत:ची व्यावसायिक रंगभूमी असावी या हेतूने मराठवाडयाचे लेखक व मराठवाडयाचेच विविध भागातील कलावंत एकत्रित करून प्राचार्य रा.रं.बोराडे लिखित आमदार सौभाग्यवती हे नाटक महाराष्ट्रात २५ ते ३० ठिकाणी सादर केले.पण यातील प्रमुख भूमिका करणारे प्रा.कुमार देशमुख यांच्या दुर्दैवी निधनांमुळे हे नाटक बंद करावे लागले.नाटकाचे पुढील ३०-३५ प्रयोग त्यामुळे रद्द करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती व स्पर्धा**

विविध भागातील चाळीस पन्नास संघ येतात.या स्पर्धेकरीता पाचशेच्यावर कलावंताची हजेरी त्यात असते, आजचे आघाडीचे लेखक व मान्यवरांची ही हजेरी लागलेली आहे. पूर्वी स्पर्धेचे हे सर्व स्पर्धक होते, हे सांगताना अतिशय आनंद होतो आहे. यात प्राचार्य रा.रं.बोराडे,महावीर जोंधळे, प्रा.फ.मु.शिंदे,प्रा.दत्ता भगत, सतीश आळेकर, दासू वैद्य,प्रा.अजित दळवी,प्रशांत दळवी,श्रीनिवास भणगे,अरविंद विश्वनाथ ,सूर्यकांत सराफ, यशवंत देशमुख,साहेब खंदारे,कुलदीप धुमाळे, प्रा.संजय पाटील देवळाणकर आदी नाट्य लेखक व साहित्यिक स्पर्धक म्हणून येऊन गेले आहेत.

लेखकाशिवाय आजचे सिने व नाट्य कलावंत हे देखील या स्पर्धेचे कलावंत होते.हे उल्लेखनीय यात मकरंद अनासपुरे,रमेश गंगणे,प्रतिक्षा लोणकर,चंद्रकांत कुलकर्णी, दिलीप घारे अशा अनेकांचा सहभाग या स्पर्धेत होता.

**मराठवाड्यातील रौप्य महोत्सव साजरा करणारी एकमेव स्पर्धा**

१९६८ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेने कुठेही थांबा घेतला नाही. अथक प्रवास आजही या स्पर्धेचा सुरू आहे.१९९३ साली मराठवाड्याच्या शिरपेचात रौप्य महोत्सव साजरा करून मानाचा तुरा याच स्पर्धेने खोवला आहे. महोत्सवासाठी श्रीमती लालन सारंग, वि.भा.देशपांडे, कमलाकर सोनटक्के, श्रीनिवास भणगे, श्रीराम गोजमगुंडे ,सतिश आळेकर, डॉ.लक्ष्मण देशपांडे, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, अजित दळवी या पाहुण्यांनी समारंभाला उपस्थित राहून स्पर्धेच्या नाव लौकिकात भर टाकला आहे.या निमित्ताने परिसंवाद, व्याख्याने, नाट्य प्रशिक्षण ,पथनाट्य स्पर्धा

इत्यादींचे आयोजन केले होते.

सतत दोन दिवस हा समारंभ संपन्न झाला होता. जणू हे छोटेसे नाटय संमेलनच होते.

बेंडे एकांकिका स्पर्धेचे निस्पृह परीक्षक

बेंडे स्पर्धेने फक्त मराठवाड्यातीलच परीक्षक नियुक्त न करता प्रतिवर्षी मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात अशा विविध भागातून तज्ञ जाणकार समीक्षक व कलावंत परीक्षकांची नियुक्ती करून कलाकारांना योग्य न्याय दिला आहे. स्पर्धा सातत्याचे गमक यातच सापडते.

स्व.मामा दातार (औरंगाबाद) स्व.पिंगे (औरंगाबाद) ,प्रा.भास्कर कुलकर्णी (परभणी ) श्रीमती पिंगे (औरंगाबाद) ,श्री.देवधर (नगर),श्री.रमाकांत कुलकर्णी (सोलापूर) जयंत दिवाण (मुंबई) ,प्राचार्य,प्रकाश मेदककर (नांदेड) ,सुनेत्रा ओक (औरंगाबाद ) प्रा.पद्माकर दादेगांवकर(हैद्राबाद),जयंत फडके (मुंबई,)रविंद्र गोवंडे (लातूर ) ,अनुराधा वैद्य(औरंगाबाद),सुधीर सेवेकर(नगर) ,भालचंद्र रणदिवे (ठाणे ), देवदत्त म्हात्रे (मुंबई,) विद्याधर सदावर्ते (औरंगाबाद), विद्या गोखले (कल्याण ), मनोहर घारे( नागपूर),अनंत घोगळे (मुबई )मोहन पाठक (वाशीम उमा दादेगावकर (हैद्राबाद) भगवान सवाई (बीड ) सुरेश मुलगे (औरंगाबाद) विजया शिरोळे (औरंगाबाद) प्रा.जगदिश माहोरकर (औरंगाबाद ) वैशाली जोशी (पुणे )श्री.ना.बरवे (मुंबई )प्रा.लता मोहरीर (औरंगाबाद ) डॉ.वि.शं.सहस्रबुध्दे (अमरावती) अरविंद जहागिरदार( दिल्ली) माधूरी दातार (औरंगाबाद) सुरेश गटलेवार (अमरावती ) वसंत दातार (औरंगाबाद )यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले व कलावंतांना न्याय दिला.

गेल्या ४० वर्षापासून स्पर्धा सर्वांच्या सदिच्छेवर ,सहकार्यावर ,वाटचाल करीत आहेत.हे कार्य एकट्या समितीचे कधीच नव्हते,आणि नसेल आम्ही फक्त निमित्तमात्र आहोत.याची नम्र जाणीव आम्हास आहे.

भविष्यात असेच प्रेम,सहकार्य, आशीर्वाद असावेत एवढेच ! ...





## शक्तिपीठातील नाट्य परंपरा

**प्रा.संभाजी भोसले**

श्री.क्षेत्र तुळजापूर हे एक नित्यजागृत शक्तिपीठ आहे.देवी भगवंताच्या कर्त्याने या शक्तिपीठाचा समावेश एकावन्न शक्तिपीठात केलेला असून महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठाचे ते आद्य पीठ आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी,तुळजाभवानी,अंबाई, आई जगदंबा, महिषासूर मर्दिनी अशा वेगवेगळया नावाने आपणास परिचित असलेली छत्रपती शिवराय व आपले कुलदैवत असलेली आई भवानीचं ठाण म्हणजे तुळजापूर .मराठवाडयाचे प्रवेशद्वार पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूरच्या उत्तरेस असलेले हे गाव,तीर्थक्षेत्र म्हणून संपूर्ण भारताला परिचित आहे.तीर्थक्षेत्राबरोबरच या गावामधील संगीत, नाटयपरंपरा ही सुध्दा प्राचीन आहे.या गावामध्ये तसेच तुळजापूरच्या पंचक्रोशीमधील अनेक गावात नाटयपरंपरा १०० वर्षा पूर्वीपासून आजतागायत सुरू आहे.संगीत, कौटुंबिक, ऐतिहासिक, सामाजिक या नाटकापासून प्रायोगिक नाटकापर्यंत सर्व प्रकारची नाटके या परिसरामध्ये सातत्याने होतात.त्यामुळे संगीत नाटकापासून प्रायोगिक नाटकापर्यंत चांगला प्रेक्षक वर्ग याठिकाणी आहे. ग्रामीण भागातून मुंबईच्या व्यवसायिक नाटकामध्ये,चित्रपटामध्ये मालिकामध्ये वेगवेगळया भूमिका करण्यापर्यंत अनेक कलावंतानी झेप घेतली आहे.बीड येथे होणा-या ८९ व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाच्या निमित्ताने गतकाळामध्ये रंगभूमी गाजवणारे परंतू सध्या पडद्याआड गेलेले व नवीन काळात पडद्यावर व रंगभूमीवर झळकणारे या सर्व कलावंताचा आढावा घेण्याची संधी प्राप्त होत आहे. सध्याच्या प्रायोगिक नाटके, बालनाट्ये,एकांकिका स्पर्धा ,बालनाटय कार्यशाळा याचा आढावा घेण्याअगोदर प्रारंभीच्या काळी ज्यांनी नाटय परंपरा जोपासली .नवनवीन प्रयोग केले व पुढील पिढीला प्रेरणा दिली.त्या कलावंताच्या व त्यांच्या संस्थेच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देणे आवश्यक वाटते.

शंभर वर्षापूर्वीची परंपरा : तुळजापूर पंचक्रोशीमध्ये साधारण १८८० च्या काळामध्ये 'बाणासूर ' व 'कालासूर ' ही दोन नाटके दरवर्षी आलटून पालटून करण्यात येत असत. 'बाणासूर ' व 'कालासूर ' या नाटकाने जवळजवळ दोन तप प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले.

पार्श्वसंगीत / प्रकाश योजना : त्याकाळी गायन हे रंगमंचावर होत नसे तर पडद्याआड होत असे.यालाच पार्श्वसंगीत असे म्हणत.त्याकाळी हार्मोनियम नसल्यामुळे गायनासाठी, स्वराची साथ देण्यासाठी तेथील नाट्य कलावंतानी एक क्लृप्ती योजिली .म्हणजे दोन पितळेच्या पातेल्यामध्ये विशिष्ट पातळीवर पाणी ओतून व दोन्ही पातेल्यावर समांतर ठेवलेल्या जोंधळयाच्या मोठया टिप- या ज्यांना त्यामध्ये अडकवून दोन्ही हाताच्या बोटांनी विशेषत: अंगठयाने व पहिल्या बोटाने मागेपुढे ओढीत असत व त्यातून (रॉSSयं रॉSSय)असा स्वर निघत असे यालाच पार्श्वसंगीत म्हणत असत.हा प्रयोग अवघड परंतू त्याशिवाय पर्याय नव्हता.प्रकाश योजना वैशिष्ट्यपूर्ण असे,रंगमंचाच्या दोन बाजूस मोठमोठया टोपल्यामध्ये (घमेल्यात ) ब-याच चिंध्या टाकून गोडतेल ओतून त्याचा जाळ करीत तो जाळ भक्कम व भडक जाळ पडावा म्हणून राळ झोकित किंवा उडवित असत.हे गोडतेल व्यापा-याकडून विनामूल्य दिले जाई. रंगभूषेसाठी पाण्यात पिवळी टाकून चेह-यावर लावण्यात येई.स्त्री पात्र पुरूषच करत असत.त्यांना अलंकार मात्र गावातील लोकांकडून जमा केले जात व ते ख-या सोने चांदीचे असत. पैंजण,तोडे, बोरमाळ असे अलंकार त्या गावातील स्त्रिया उत्स्फूर्तपणे व आनंदाने देत असत. स्त्रियांच्या भूमिका करणा-याला गावात मोठा मान असे.त्याकाळी चहा नव्हता,दुध परवडत नसे म्हणून नाटक संपल्यावर किंवा तालमीच्या वेळेस ताजी गाजरे सर्व नट आनंदाने व उत्साहाने खात असत. तुळजापूर शहरामध्ये १९६० ते १९६५ या काळामध्ये अनेक नाट्यसंस्था निर्माण झाल्या.यामध्ये १९६४ नगर विकास मंडळ,१९६७ नागझरी नाट्यमंडळ,भवानीसमशेर नाट्यमंडळ,रणसम्राट मंडळ,त्रिमूर्ती नाट्यमंडळ,दीपक संघ,जवाहर तरूण मंडळ या संस्थेने तुळजापूरची नाट्य परंपरा पुढे सुरू ठेवली.या मंडळाचे विशेष म्हणजे प्रत्येक मंडळाच्या नाटकाचे विषय, वैशिष्ट्ये वेगळे होते.यामध्ये नागझरी नाट्यमंडळ या संस्थेने दशावतारी पौराणिक आख्यानावर आधारित रचलेली नाटके सादर केली.या संस्थेमध्ये सर्वश्री शहाजी निकम, बाळासाहेब मंडगे हे प्रमुख होते.पुढे याच संस्थेने सामाजिक कौटुंबिक नाटके सादर केली.त्यामुळे प्रेक्षकांच्या अभिरूचीला एक आगळे वेगळे, वळण लावण्याचे श्रेय या संस्थेकडे जाते. लोकशिक्षणाचा खरा आदर्श ही नाटयसंस्था होती.एक स्वतंत्र अभिरूचीचा प्रेक्षक वर्ग या संस्थेमूळे निर्माण झाला असे म्हणण्यास हरकत नाही. या संस्थेची सूत्रे १९७५ ते १९८० या काळामध्ये शिवाजीराव गंगणे व सुरेश दिक्षित यांच्याकडे गेली व त्यांनी चांगल्या रितीने सांभाळली.एकूण १५ नाटकाचे प्रयोग या संस्थेच्या वतीने तुळजापूरच्या रंगभूमीवर सादर करण्यात आले.त्यापैकी 'प्रेमाविना भिकारी', 'विजयाचे वारस आम्ही','अपराध मीच केला', 'अश्रूंची झाली फुले' आणि 'उद्याचा संसार' ही नाटके विशेषत्वाने गाजली व लोकप्रिय झाली.या संस्थेने अखंडपणे ,अविरतपणे,अव्याहतपणे १५ वर्ष नाटके करून नाट्यकलेची सेवा केली.तुळजापूरच्या नाट्यरसिक प्रेक्षकांनी या संस्थेचा व यामधील कलावंताचा मुक्तमनाने गौरव केला.१९८० च्या आसपास त्या संस्थेमधील कलावंताच्या कौटुंबिक व व्यावसायिक अडचणीमुळे या संस्थेने नाट्यसेवा स्थगित केली.या संस्थेमध्ये स्त्रीपात्र,भूमिका करणारे सर्वश्री बापूराव माळी व तानाजी चोपदार संगीत दिग्दर्शक कै.दिवाकरराव महामुनी,दिग्दर्शक जयराज व-हाडे, कलावंत शशिकांत दिक्षित,शिवाजीराव गंगणे, शशिकांत नाडापुडे ,ॲड.एजाज अहमद सिध्दीकी,श्रीकांत नाडापुडे ,राजा सांळुके यांच्या कलाविष्कारांच्या आठवणी आज ही प्रेक्षक विसरू शकले नाहीत.

नगर विकास मंडळ : नगर विकास मंडळ,या नाटय संस्थेची वेगळी वैशिष्ट्य म्हणजे या संस्थेने ऐतिहासिक नाटके जवळ जवळ वीस केली. या संस्थेने ऐतिहासिक नाटके रंगभूमीवर सादर करण्याचा त्याकाळी विडाच उचचला होता. या ऐतिहासिक नाटकाचा प्रेक्षक वर्ग त्यांनी निर्माण केला होता. नाटय चळवळ जोपासत असताना या संस्थेने सामाजिक व राष्ट्रीय हित याचे भान ठेवले होते. भारत,चीन ,युध्दामध्ये शहीद झालेल्या जवानासाठी नगर विकास मंडळाने ,औरंगजेबाचा वध' व तानाजी मालुसरे' हे दोन ऐतिहासिक,नाटकाचे तिकीट लावून प्रयोग करून त्यावेळेस त्यांनी रू.२००० व रू.२५०० असा निधी शासनाकडे वर्ग केला.या संस्थेने २० वर्षे ऐतिहासिक नाटके केली.त्यामध्ये 'गड आला पण सिंह गेला','तानाजी मालुसरे','औरंगजेबाचा वध','धर्मवीर संभाजी','रायगडाला जेव्हा जाग येते','कब्जी कारभारी रयत भिकारी ','शककलेचा न्याय' ,'ग्रामीण नाटकामध्ये मराठ्याची पोर' ,'माझी जमीन','खंडोबाची आण' इ.नाटके गाजली .या संस्थेच्या कलावंताचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे एक कलावंत प्रत्येकवर्षी तीच भूमिका करत असत उदा.औरंगजेबाची भूमिका न.श.राऊत यांनी सतत दहा वर्ष केली. तानाजी ,शिवाजी, संभाजी, गणोजी शिर्के यांच्या भूमिका कै.आण्णासाहेब भोसले, कै.अंबादास पलंगे, कै.शिवाजी भोसले, श्री.माणिकराव सिरसट यांनी अजरामर केल्या त्यांना त्यांच्या जन्म नावापेक्षा नाटकामधील नावानेच लोक ओळखत असत.ऐतिहासिक नाटके २० वर्ष केल्यानंतर जनमाणसाची,प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन लोकनाट्य सादर करण्यास सुरूवात केली व त्यामध्ये 'सख्खे भाऊ पक्के वैरी','शिवार माखलं रक्तान'अशी ग्रामीण लोकनाट्ये सादर केली व त्यामध्ये ते यशस्वी सुध्दा झाले.सतत २५ वर्षे प्रतिवर्षी नाटक करणारी ती एकमेव संस्था होय. नगर विकास मंडळाचे अध्वर्यु प्राचार्य विजयसिंह ( सरकार) भोसले यांनी मंडळाच्या स्थापनेपासून रोप्य

महोत्सवापर्यंतची धुरा यशस्वीपणे सांभाळली.या मंडळाबरोबरच दीपक संघ नाटयमंडळ यांनी सतत १५ वर्षे फक्त लोकनाट्ये सादर केली.याशिवाय,जवाहर तरूण मंडळ,आर्य नूतन मंडळ यांनी संगीत मेळे सलग वीस वर्षे केले. या संस्था फक्त गणेशोत्सवामध्ये व ग्रामीण भागातील यात्रेमध्ये प्रयोग करत.या सर्व संस्थांची सांस्कृतिक चळवळ काळाच्या ओघात समाप्त झाली.

प्रायोगिक नाटके :रंगभूमीवर वेगवेगळे प्रयोग होत असताना तुळजापूरमधील नाट्य परंपरा फक्त गणेश उत्सवापर्यंतच मर्यादित राहिली होती. याची खंत नवीन दमाचे काळा वेळाची,शरीर प्रकृतीची ,पैसा अडक्याची तमा न बाळगता रंगभूमीवर वेगवेगळे प्रयोग करणारा चिंतनशील अभ्यासू दिग्दर्शक श्रीकांत (आप्पा) नाडापुडे,यांना होती. म्हणून त्यांनी स्पर्धात्मक नाटकासाठी व वेगवेगळी विषयांची नाटके सादर करण्यासाठी १९८५ मध्ये पंचरंग सांस्कृतिक कलामंच, संस्था स्थापन केली.तुळजापूरमध्ये त्याकाळामधील पंचरंग ही एकमेव नोंदणीकृत नाट्यसंस्था होती. तुळजापूर मधील प्रायोगिक रंगभूमीवर वेगवेगळया प्रयोगाचा ध्यास घेतलेले श्रीकांत नाडापूडे ,प्रकाश हुंडेकरी, भगवंत शामराज ,संजय कवठेकर व गोविंद धन या पाच रंगकर्मींनी संस्था स्थापन केल्यामुळे पंचरंग हे नाव या संस्थेला त्यांनी दिले.या संस्थेमधील अभ्यासू दिग्दर्शक श्रीकांत नाडापूडे यांनी स्थापनेच्या वर्षापासूनच वेगवेगळे प्रयोग करण्यास सुरूवात केली.त्यामध्ये 'रक्तप्रपात'(प्र.ल.मयेकर),'लस्ट'(विवेक घळसासी ),'लाल मुंग्या चावत नसतात' , (बाळकृष्ण धायगुडे) ,'मैत कुलकर्णी वर्से देशपांडे' ,'काजळकुबडया एकांताला', या एकांकिकाने वेगवेगळया स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळविले. याशिवाय सफदर हाश्मी यांच्या जीवनावरील खेळ पथनाटय यांने जवळ जवळ २०० प्रयोग वेगवेगळया गावामध्ये सामाजिक प्रबोधन म्हणून केले.तसेच 'भाकवान' हे तुषार भद्रे लिखित दोन अंकी नटक पहिल्याच वर्षी राज्यनाटय स्पर्धेमध्ये सोलापूर केंद्रावर सर्व बक्षिसासह प्रथम आले.या नाटकामध्ये १० वर्षाच्या मुलांपासून ६० वर्षाच्या कलावंतापर्यंत एकूण ५० कलावंताचा संच रंगभूमीवर यशस्वीपणे दिग्दर्शक श्रीकांत नाडापूडे यांनी सफाईदारपणे उभा केला.याशिवाय 'कन्यादान','काळोख देतं हुंकार' , 'महाराज म्हेले', 'इथे ओशाळला मृत्यू,' 'काळेबेट लाल बत्ती', 'तरूण तुर्क म्हातारे अर्क,' 'काका किशाचा 'अशी वेगवेगळे नाटके पंचरंगच्या कलावंतानी यशस्वीपणे सादर केली.परंतु या संस्थेला १९९२ ते १९९६ दरम्यान मरगळ आली व या संस्थेची चळवळ थंडावली.

तुषार भद्रे यांचे पालकत्व : १९९७ ला सातारा येथील लेखक ,दिग्दर्शक प्रायोगिक रंगभूमीवर काम करणारे तुषार भद्रे यांनी तुळजापूरमध्ये १५ दिवसाचे नाटय शिबीर घेतले. तुषार भद्रे यांची पंचरंग संस्थेशी स्थापनेपासून जवळीक होतीच.परंतू १९९२ ते १९९६ मध्ये चळवळ थांबल्यानंतर त्यांनी तुळजापूर येथे येऊन प्रतिवर्षी नाट्य कार्यशाळा घेण्यास सुरवात केली व त्यांनी एक प्रकारचे संस्थेचे पालकत्वच स्वीकारले. त्या शिबीरामधून प्रेरणा घेऊन व्यक्ती व संस्था यातील स्पर्धा या संगळयाच्या पलीकडे रंगभूमी म्हणून कांही आहे,अशी एक जाणीव असणारा पंचरंगचा उदयोन्मुख दिग्दर्शक दिलीप भोसले यांनी संस्थेची सूत्रे हाती घेतली.नवीन कलावंताच्या संचासह त्यांनी तुषार भद्रे लिखित 'मच्छर निर्मूलन',डॉ.विभाकर भिरजकर यांचे 'आनादी अनंत' शफाअतखान यांचे 'शोभायात्रा' ही नाटके दिग्दर्शित केली व संस्थेला एक चांगला दिग्दर्शक मिळाला.दिलीप भोसले यांनी 'बोलट' ,'मेल्या आईचा चहा','सर्जा', 'म्याऊ तू कुठ', 'कल्याणकारी राज्य', 'रविवारची सकाळ', 'प्रश्न कायदयाचा आहे' ,'उत्तराई','आमुषा','तमाशा ऑफ ह्युमीनिटी' ,'अंकुर' ,'नाती गोची' ,'खेळ खेळी', या एकांकिका नवीन तंत्र वापरून यशस्वीपणे महाराष्ट्राच्या सर्व स्पर्धेमध्ये सादर केल्या. त्यांना भरघोस यशही मिळाले.

बालनाट्य व महोत्सव : तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने २५ वर्षापासून शारदीय नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून प्रतिवर्षी सांस्कृतिक महोत्सव घेतला जातो. या महोत्सवामध्ये उषा मंगेशकर, अजित कडकडे ,पंडित जसराज, या नामवंत गायकापासून वेगवेगळी नाटके प्रतिवर्षी तुळजापूरवासियांना पाहायला मिळतात. याची प्रेरणा घेऊन दिलीप भोसलेयांच्या संकल्पनेमधून प्रतिवर्षी १०० लहान मुलांसाठी बालनाटयाचे आयोजन करण्यास सुरूवात झाली. यासाठी, तुषार भद्रे , शशिकांत लावणीस यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रतिवर्षी वर्षभर सादर केलेल्या नाटक व एकांकिकाचा महोत्सव संस्थेच्या वतीने आयोजित केला जातो या महोत्सवाला तिकीटे घेऊन प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसादही दिला.

संस्थेला मान्यवरांचे मार्गदर्शन : तुळजापूर हे कुलस्वामिनीचे गाव असल्यामुळे अनेक रंगकर्मींना आमच्या संस्थेच्या वतीने बाहेरगावच्या कलावंताना मार्गदर्शन व देवीचे दर्शन असे दुहेरी निमंत्रण दिले.त्यांनी ते आनंदाने स्विकारून कलावंताना दोन तीन दिवसाच्या कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन केले.यामध्ये प्रामुख्याने वामन केंद्रे ,दासू वैद्य,योगेश सोमण,डॉ.गिरीष ओक, राजू फूलकर , डॉ.लक्ष्मणराव देशपांडे, डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर,तुषार भद्रे इ.नामवंत नाटककारांचे मार्गदर्शन या संस्थेला मिळाले.त्यामुळेच या संस्थेच्या व कलावंताच्या नाट्य जाणिवा अधिक प्रगल्भ झाल्या व संस्थेला एक चांगली दिशा मिळाली.

व्यावसायिक रंगभूमी व चित्रपट : उमेश जगताप ,शंतनु गंगणे, योगेश राऊत ,शशिकांत सिरसट यांनी ललित कला केंद्र,पुणे येथे नाटय शिक्षण घेऊन व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले आहे. यामध्ये उमेश जगताप हा ब्रिटीश कौन्सिल ऑफ इंडियाच्या संस्थेमध्ये ' द मीटस समर नाईट' या नाटकामध्ये भूमिका करत आहे. यांचे अमेरिका ,इंग्लंड,जपान अशा वेगवेगळया देशामध्ये प्रयोग होत आहेत.शंतनु गंगणे हा' सनई चौघडे ' या चित्रपटामध्ये प्रमुख भूमिकेत आहे.तसेच 'अवघाची संसार' व ' सौतेला' इ.मालिकामध्ये तो काम करतोय .योगेश राऊत हा 'मानो या मा मानो'या मालिकेचे सहदिग्दर्शक म्हणून काम करतोय. दिलीप भोसले यांनी व्यावसायिक रंगभूमीवर 'घाशीराम कोतवाल', मधील घाशीराम ,'श्रीमान योगी' मधील अफझलखान तसेच 'कुलस्वामिनी तुळजाभवानी','गाव एक नंबरी','सातबारा' या चित्रपटामध्ये भूमिका तर 'छत्रपती शिवराय','दामीनी' या मालिकामध्ये भूमिका केलेल्या आहेत.ही या संस्थेची आतापर्यतची खरी उत्पत्ती होय.

शंभर रंगकर्मी /रंगधर्मी : सन १९८६ मधील संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत संस्थेने ८०-९० रंगकर्मी निर्माण केले. काहींनी बाहेरगावी जाऊन नाटयसंस्था निर्माण केल्या.यामध्ये संजय कवठेकर (डोंबीवली), उमेश जगताप( मुंबई,) आर.बी.महाजन (लातूर), तर कांही रंगकर्मींनी तुळजापूरमध्येच वेगळया संस्था निर्माण केल्या.यामध्ये रंगकर्मी नाटयमंडळ,नरसिंग बोदले, खंडू ताटे, समरंग शशिकांत क-हाडे इ.वेगवेगळया निर्माण झाल्या .या संस्था जरी वेगळया असल्या तरी ही सर्व उत्पत्ती पंचरंग या संस्थेचीच आहे.हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.आज संस्थेमध्ये ३० ते ४० कलावंत रंगभूमीची सेवा करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने श्रीकांत नाडापूडे,प्रकाश हुंडेकरी, प्रा.संभाजी भोसले,दिलीप भोसले,किर्तीराज पोतदार ,सचिन घोडके, महेश धुमाळ,शिवाजी जेटीथोर,प्रशांत शेटे,राजेश शिंदे,ॲड.गिरीष कुलकर्णी ,कु.ज्योती कुलकर्णी,ॲड.शिला कोळेकर,ॲड.संगिता कोळेकर ,कु.अमृता देशमुख, कु.रेणुका इंगोले यांचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे.

मार्ग - दर्शन पंचरंगच्या नवनवीन निर्मितीमुळे तुळजापूरचा प्रेक्षकवर्ग संस्थेच्या बहुतेक कलावंताना ब-यापैकी ओळखतो.एखाद्या प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीवर काम करणारा रंगकर्मी दर्शनासाठी तुळजापूर शहरात आला की लगेच आम्हा संस्थेच्या कलावंताना गावक-याकडून निरोप पोहचतो व संस्थेचे कलावंत त्या रंगकर्मींच्या दर्शनाची व्यवस्था करून संस्थेच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी घेऊन येतात. या सर्व रंगकर्मींच्या वतीने प्रायोगिक रंगभूमीवर वेगळे प्रयोग करणा-या कलावंतासाठी दर्शन व मार्गदर्शन यासाठी तुळजापूरवासियांचे आग्रहाचे निमंत्रण.

## कोल्हापूरची सांस्कृतिक रंगभूमी – एक आढावा

प्रा.डॉ.एन.व्ही.चिटणीस

कोल्हापूर हे कलापूर म्हणून ओळखलं जात.इथे संगीत,नाटक, चित्र ,शिल्प,नृत्य,आदि कलांचा संगम आहे.म्हणून कलापूर हे नांव सार्थ वाटतं .इथे संगीताच्या, नाटकाच्या ब–याच संस्था कार्यरत आहेत. 'देवल क्लब', 'टि.एफ.टी ;' 'अभिरूची नाट्यसंस्था', 'प्रत्यय हौशी नाट्य संस्था, 'भालजी पेंढारकर कला केंद्र' आहे.शिवाजी विद्यापीठाचे संगीत, नाट्यशास्त्र,चित्रकला, नृत्यकला, वाद्यसंगीत, ऑडिओ, व्हिडीओ, स्टुडिओ अद्‌यावत आहे..

संगीत व नाट्यशास्त्र विभाग

संगीत विभाग १९८४ मध्ये सुरू झाला. मा.मल्लिकार्जून व.सूर यांच्याहस्ते या विभागाचे डॉ.बी.ए. वैशंपायन तसेच डॉ.वायंगणकर कायम स्वरूपी काम पाहताहेत .तसेच नाट्यशास्त्र १९८६ मध्ये मा.पु.ल.देशपांडेच्या हस्ते सुरू झाला.१९९१ मध्ये वाद्यसंगीत विभाग सुरू करण्यात आला.नृत्यशास्त्र विभागांत भरत नाट्यम, कथक, हे ही अंतर्भूत आहेत.या संगीत व नाट्यशास्त्र विभागांतर्गत पदव्यूत्तर पदवी, पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू आहेत. या विभागाने शाहू संगीत रजनी, घराणा संमेलन,शाहू राज्य एकांकिका स्पर्धा,कामगार कल्याण केंद्र स्पर्धा आयोजित केल्या आहेत आणि सहभागही घेतला आहे.

या विभागात बुजूर्ग कलावंत राजन साजन मिश्रा, भिमसेन जोशी, अल्लादियाँ खाँ, बाबा खाँ, पंडित जसराज, अरविंद मुळगावकर, बबनराव हळदणकर, भास्कर चंदावरकर, जितेंद्र अभिषेकी, निवृत्तीबुवा सरनाईक, जयमाला शिलेदार , सुधाकरबुवा डिग्रजकर ,तसेच डॉ.लक्ष्मण देशपांडे, दामू केंकरे, विक्रम गोखले, वि.भा.देशपांडे, निळू फुले, डॉ.मधू आपटे, वाय.जी.भोसले, डॉ.श्रीराम लागू, मोहन जोशी, प्रभाकर पणशीकर आदीं मान्यवरांची या विभागात व्याख्याने आयोजित केली आहेत.तसेच मानद व्याख्याने श्री.संजय तोडकर ,ज्ञानदा मुळे, विजय पवार, सुनील पाठक ही मंडळी कार्यरत आहेतच. नाट्यशास्त्र विभागाने विविध राज्यस्तरीय स्पर्धा ,सहभाग नोंदवून अभिनय ,दिग्दर्शन ,प्रथम क्रमांक मिळवले आहेत. 'बृहन महाराष्ट्र मराठी संगीत नाट्यस्पर्धा' मध्ये या विभागाने संगीत स्वयंवर सादर करून प्रथम क्रमांक मिळवला.तसेच मुंबई येथे संपन्न झालेला नाट्य संमेलनामध्ये संगीत स्वयंवर सादर करण्याचा बहुमानही विभागास लाभला आहे.

गायन समाज देवल क्लब

१८८६ साली गोविंदराव टेंबे यांनी 'गायन समाज संगीत क्लब'ची स्थापना केली. नंतर त्याचे रूपांतर बाबा देवल यांनी , 'देवल क्लब संगीत नाट्य शाखा ' सुरू केली. ती आजतागायत सुरू आहे.या संस्थेत श्री.प्रभाकर वर्तक यांनी सातत्याने , विविध स्पर्धा, नाट्यप्रयोग ,चर्चासत्रे घडवून आणली. या क्लबने 'संगीत सौभद्र', 'एकच प्याला', 'संगीत शाकुंतल', 'संगीत शारदा' 'संगीत स्वयंवर 'इत्यादी संगीत नाटके सादर करून संगीताचा वारसा जपला.प्रभाकर वर्तकांनी १९८० च्या सुमारास सामाजिक, कौटुंबिक ,प्रायोगिक नाटके सादर केली त्यापैकी कांहीचा उल्लेख 'शितू', 'अभिहत', 'महंत', 'हृदय', 'कमल', 'उध्वस्त धर्मशाळा', 'अंधारात मठ्ठ काळा बैल', 'अंधायुग' तसेच वाचिक अभिनय स्पर्धा, विविध कार्य शाळा,संगीत महोत्सव इ.आयोजित केली आहेत.

अविष्कार नाट्यसंस्था

१९८३–१९८४ च्या सुमारास उदय डहाळे, सुनील शिंदे ,आनंद तळवळकर, हेमंत नेटके, संजीवनी तोरो,शाम चिटणीस सुधीर कुलकर्णी या मंडळींनी 'अविष्कार नाट्यसंस्था' स्थापन केली.या संस्थेतंर्गत 'काळी बेबी', 'आणखी एक नारायण निकम, 'महानिर्वाण' तसेच राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले.

अभिरूची नाट्यसंस्था

अभिरूची नाट्यसंस्थेची सुरूवात १९८१ साली श्री.चंद्रकांत जोशी यांनी संस्कार भारतीच्या सहकार्याने सुरू केली.या संस्थेने 'हमीदाबाईची कोठी', 'महापूर','महानिर्वाण','स्मारक','गोची','मिकी मेमसाब''झुंज गर्दभराज','छळछावणी','तुघलक' 'विमोचन','आषाढ का एक दिन','लोककथा ७८' इ.नाटके सादर झाली. या संस्थेमध्ये ,सुधीर कुलकर्णी,मदन दंडगे, कै.अवधूत भट,संजय हळदीकर ,ह्रषीकेश जोशी,स्वाती यारदी इ. मान्यवर मंडळींनी सहभाग घेतला. या व्यतिरिक्त या संस्थेने वसंतराव देशपांडे शास्त्रीय गायन स्पर्धा आयोजित केली आहे.तसेच कै.अवधूत जोशी स्मरणार्थ नाट्यलेखन स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

True Friends Theatre - याची सुरूवात च.प्र.देशपांडे ,दिलीप जगताप,किरण खेबूडकर ,पवन खेबूडकर ,दिलीप बापट, प्रसन्न जी.कुलकर्णी ,अनिल सडोलीकर, दिलीप धोंडो कुलकर्णी, शरद नावरे इ.मान्यवरांनी ही संस्था सुरू केली.या संस्थेच्या माध्यमातून 'आर्य चाणक्य' ,'बाकी इतिहास' ,'पगला घोडा'ही नाटके सादर केली.

प्रत्यय नाट्यसंस्था – डॉ.शरद भुताडिया यांनी ही संस्था नावारूपास आणली.या नाट्य संस्थेच्या 'राजालिअर' नाटकाने संपूर्ण महाराष्ट्र गाजले.त्यांनी सादर केलेली नाटके 'फुटबॉल' , 'एका राजकीय कैद्याचा अपघाती मृत्यू' ,'घोडा' ,'नागमंडलम राशोमान' 'महात्मा ज्योतीराम फुले','माधवराव पेशवे','वाटापळवाटा','उत्तम रामचरित्र','चरणदास चोर' ,'शनिवार– रविवार', 'ऐनवसंतात अर्ध्यारात्री',तसेच डॉ.शरद भुताडिया यांनी 'वर्तमान',(TV Serial ) ' मुक्ता',डॉ.बाबासाहेब आंबेडकर,शाहू सिरीयल (मालिका ) 'ओरखडा' 'राहिले दूर घर माझे' ,' वेडयाचे घर उन्हात 'या मालिका आणि चित्रपटामध्ये सहभाग घेतला आहे. तसेच नुकतेच त्यांनी आईनस्टाईनच्या सापेक्षता वादाचे प्रयोग सुरू केले आहेत.

बहुरूपी कलामंच – विजय पवार, सुनील शिंदे, अर्चना होगाडे ,सागर तळाशीकर ,रघु इनामदार, राजन जोशी, सुकुमार पाटील,इ.मंडळींनी संस्थेचे अभिनव प्रयोग केले.'कविता','सादरीकरण','प्रकटीकरण','खजिन्याची विहीर','वेटींग फॉर गोवा','आदिप्रतिमा''गणनायक','रक्तपुष्पा','कैफियत','श्रीमंत','पक्षपात' या नाटकांचे सादरीकरण केले आहे.

हनुमान नाट्यमंडळ काळम्मावाडी प्रकाश पाटील,संजय मोहिते पाटील, राजश्री खटावकर या मंडळींनी या नाट्य संस्थेची सुरूवात केली.'थेंब थेंब आभाळ','जोगवा' ,'विठोबा','वेडया कुंभाराच काय झाल ? 'ही नाटके केली.

'लक्ष्मीटेक नाट्यसंस्था' – ही साने गुरूजी तरूण मंडळाने संस्था स्थापन केली .या संस्थेअंतर्गत श्री.ज्ञानेश मुळे यांना 'केरळ ते काश्मिर','मुक्काम खुलताबाद','दूत येतो ' आणि 'चुकल्या वाटेचे मनोगत' ,'वादळवेणा','मोहनदास बेपत्ता आहे 'ही नाटके सादर करून त्यांना अभिनयाचे रौप्य पदक ,दिग्दर्शनाचे पारितोषिक ,लेखनाचे पारितोषिक लाभले आहे.श्री.ज्ञानेश मुळे यांनी 'मुक्काम खुलताबाद',तर श्रीधर तिळवे ,जयसिंग पाटील,एकसंबेकर,जितेंद्र देशपांडे या मंडळींनी 'समपुतुलिका' , 'एवंमइंद्रजीत' नाटके सादर झालीत.

सोन्या मारूती नाट्य संस्था - डॉ.निवेदिता फडके सुहास मोघे या मंडळींनी 'सोन्या मारूती नाट्य संस्था' स्थापन केली आणि 'बेबी' 'समोरच्या घरात', 'अखेरचा सवाल' या नाटकांचे सादरीकरण केले.

शिंदे अकादमी - सुनील शिंदे ,ललिता शिंदे यांनी लहानमुलांसाठी 'शिंदे अकादमी 'नावाची बाल रंगभूमी उभी केली आहे .सर्व महाराष्ट्रात त्यांनी प्रयोग केले.शिबीराचे आयोजनही ते करतात.

मुलांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा याकरिता मुख्याध्यापक संघ ,शालेय एकांकिका स्पर्धांचे आयोजन करतो. प्रा.अष्टेकर,चंद्रकांत जोशी,नणदीकर, पाटीलसर ,प्रायव्हेट हायस्कूलचे सेवेकरी इ.मंडळी शालेय एकांकिका स्पर्धा सातत्याने राबवत आहेत. तसेच कोल्हापूरमध्ये बहुतांशी दिग्दर्शक नट,लेखक,आहेत.त्यांच्यापैकी कांहीचा उल्लेख पुढीलप्रमाणे -

टी.रामानामइ, बाबूराव पेंटर,आनंद पेंटर,भालजी पेंढारकर,बाबूराव पेंढारकर, व्ही.शांताराम ,गजानन जहागिरदार यांनी चित्रपट दिग्दर्शक म्हणून काम पाहिले आहे.

सतीश रणदिवे ,चंद्रकांत जोशी, दिनकरराव जाधव,अनंत माने, यशवंत भालकर सारखे चित्रपट दिग्दर्शकही आहेत.

सूर्यकांत ,चंद्रकांत मांडरे, सुलोचना, रमेश देव,सीमा देव, राजशेखर, संभा ऐरा, बी.माजनाळकर, बेबी शकुंतला,मधू आपटे, गणपत पाटील, भालचंद्र कुलकर्णी , च.प्र.देशपांडे इ. व्यावसायिक कलाकार मंडळी आहेत. दिलीप धोंडो कुलकर्णी, जयसिंग पाटील, प्रसन्न जी. कुलकर्णी ,ज्ञानेश मुळे ,हिंमाशू स्मार्त,भालचंद्र नेमाडे,विश्वास पाटील,प्रभाकर पाटील, प्रमोद कर्नाड हे नाटककार म्हणून लाभले आहेत.

तसेच कोल्हापूरमध्ये जागतिक चित्रपटांचे आयोजन करण्यासाठी सुहास एकसंबेकर, प्रसन्न जी .कुलकर्णी या मंडळींनी फिल्म सोसायटीही स्थापन केली.त्यामध्ये ही मंडळी कार्यरत आहेत.अशा या कलानगरीमध्ये सर्वच कला जोमाने वाढत आहेत, फुलत आहेत.तसेच इथले कलाकार मुंबई येथे स्थायिक होत आहेत. त्यापैकी सागर तळाशीकर, अर्चना होगाडे,दीपक कदम, हृषीकेश गोवी,संजय मोहिते पाटील, राजश्री खटावकर नव्याने दिग्दर्शक म्हणून श्री.संजय तोडकर ही पदार्पण करीत आहेत.

अभिजित कोसंबी, प्रसन्नजीत कोसंबी यांनीही संगीतामध्ये बाजी मारली आहे.संयोगिता पाटील हिंने ६६ तास सातत्याने नृत्य करून विश्वविक्रम केला आहे.तसेच प्रशांत जोशी यांनी 'शांतेचं कोर्ट चालू आहे ' या नाटकाचे सलग ३८ तास सातत्यानेच प्रयोग करून विक्रम केला आहे.आज संगीत व नाट्यशास्त्र विभागामध्ये ऑडिओ,व्हिडीओ,स्टुडिओसुध्दा उपलब्ध आहेत. ज्यामुळे कलाकारांना स्वत:ची सी.डी.तयार करता येईल.कलाकारांना व्हीडीओ शुटींग करण्याची सोयही शिवाजी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.

तसेच या विभागाने विविध नाट्यप्रयोग ,एकांकिका सादर केल्या आहेत. त्यापैकी काही नाटकांचा उल्लेख केला आहे ती पुढील प्रमाणे -'संगीत शारदा', 'संगीत स्वयंवर', 'संगीत.शहाशिवाजी', 'ढेकर आख्यान' ( महाराष्ट्र राज्य ) स्पर्धा तसेच 'भगवत ज्युलियम' 'आदिप्रतिमा', 'टॅक्सफ्री' ,'गांधी कधी येणार ? ' ,'साजू', 'कॉकरोच' , 'उंटावरचे शहाणे' , 'युज ॲन्ड थ्रो', असे सातत्याने प्रतिवर्षी चार-पाच प्रयोग, एकांकिका,नाटक, आदि प्रयोग तथा, विद्यार्थी शिक्षक मेळावे, चर्चासत्रे, व्याख्याने ,जाणकारांच्या भेटी तज्ज्ञ परीक्षक असा सर्व सतत नाट्य व्यवहार या विभागात सुरू असतो .

अशा या कला नगरीत सर्वच कला बहरत जात होत्या,जात आहेत.तसेच ग्रामीण विभागात किमान प्रत्येक गावात एक संघ नाटकासाठी सातत्याने काम करीत आहे.आणि काम करीत राहील यात शंका नाही.



# आधुनिक मराठी रंगभूमीचे नामसंकीर्तन

**प्रा.डॉ.दासू वैद्य**

दुसरे महायुध्द संपले आणि इंग्रजी साहित्यात युध्दाचे परिणाम उमटू लागले.यातून आलेली विमनस्कता कथा,कविता , कादंबरी आणि नाटकांतून मांडली जात होती आणि ते स्वाभाविकच होते; पण आपण भारतीयांनी हे महायुध्द किती अनुभवले ? तरीही फॅशन स्वीकारल्याप्रमाणे आपणही आपल्या साहित्यात उसनवारी आणण्याचा प्रयत्न केला.यातच वेगवेगळया अनुवादांची लाट आली. शेक्सपिअरच्या पात्राला झुंजारराव मुरारराव असे नामाभिधान करून त्यांना आपल्या मातीत लोळविण्याचा प्रयत्न झाला.पण हा सगळा खटाटोपच ठरला. बरेचदा पायघोळ झगे घालून ' टू बी ऑर नॉट टू बी 'म्हणणारे आपले पात्र गमतीदारच ठरले .कारण हे आपले प्रश्न नव्हते, आपला मूळ स्त्रोत नव्हता. त्यानंतर वसंत कानेटकरांनी वेगळे काही मांडण्याचा प्रयत्न केला; पण आधुनिक मराठी नाटककार म्हणून खणखणीत एंट्री घेणारे ठरले ते विजय तेंडूलकरच.

आधुनिक मराठी नाटक असे आपण म्हणतो तेव्हा त्यातील आशयाला जगण्याशी असलेला प्रामाणिकपणाच आपल्याला अपेक्षित असतो.तेच ते रटाळ, रोमँटिक विषय, जुनाट विचारसणीतून आविष्कृत होणारे संकुचित जीवनाचं तुटपुंजं दर्शन यांचा अस्त होऊन आधुनिक नाटकाचे आगमन झाले. 'शांतता' , 'कोर्ट चालू आहे.' , 'बेबी', 'गिधाडे', 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाईंडर', अशा एकापेक्षा एक सरस नाटकांतून विजय तेंडूलकरांनी नवा आशय नवनवीन पध्दतीने मांडायला सुरूवात केली. प्रसंगी आक्रमक पध्दतीने सेक्स आणि व्हायोलेन्स मांडणारे तेंडूलकर आधुनिक नाटकाची मुहूर्तमेढ रोवणारे नाटककार ठरले.

तेंडूलकरांना समकालीन म्हणता येतील, असे नाटककार म्हणून रत्नाकर मतकरीचे नाव घेता येईल. आजही विलक्षण गतीने लिहिणारा हा नाटककार बालरंगभूमीवरही कार्यरत आहे. त्याचे 'लुच्चे - बच्चे' आजही बालरंगभूमीवर धडपडताना दिसतात. मतकरींनी तसे विपुल नाट्यलेखन केले आहे. पण 'आरण्यक','लोककथा ७८', अशी नाटकेच त्यांचे नाव तेवत ठेवतील .त्या काळात 'लोककथा ७८' , चा फॉर्म खूपच चर्चेचा विषय झाला होता. भारतीयांप्रमाणेच परदेशीयांनाही ' महाभारत ' हे महाकाव्य भुरळ पाडत असते. म्हणूनच नऊ नऊ तासांचे महाभारत परदेशातही सादर केले जाते. याच महाकाव्याबद्दल मतकरींनी आपला दृष्टिकोन 'आरण्यक',मधून मांडला आहे, तो उल्लेखनीय आहे.

सतीश आळेकरांनी फॉर्मच्या, आशयाच्या आणि भाषेच्या पातळीवरही आधुनिक मराठी रंगभूमीला नवी परिमाणे दिली आहेत. मध्यमवर्गीय धुसमट मांडणारी त्यांची शैली बुध्दीवंत व तिरकस आहे. 'महानिर्वाण' , 'बेगम बर्वे', 'महापूर' ,'अतिरेकी', 'दुसरा सामना' असी काही नाटके व एकांकिका लेखन पाहता खरा इतिहास घडविला तो 'महानिर्वाण' या नाटकानेच. या नाटकातून मृत्युबद्दल आणि जगण्याबद्दल आळेकरांनी केलेले भाष्य विलोभनीय आहे.

महेश एलकुंचवार यांची शैली मराठी रंगभूमीवर अद्वितीय ठरली आहे. 'वाडा चिरेबंदी' , 'पार्टी', 'प्रतिबिंब', 'आत्मकथा',अशा नाटकांमुळे मराठी नाटक खूप लांबपर्यंत पोचले . प्रा.श्रीधर विश्वनाथ कुलकर्णीची कैफियत सांगताना 'उद्ध्वस्त धर्मशाळा मांडणारे' किंवा 'एक वाजून गेला आहे' च्या निमित्ताने माणसामाणसांतील नातेसंबधांची चिरफाड करणारे नाटककार गो.पु.देशपांडे हेही एलकुंचवारांप्रमाणे गंभीरपणे लेखन करणारे, व्यासंगी नाटककार आहेत.

पुरूष सारख्या बहुचर्चित नाटकाद्वारे लेखक जयवंत दळवी यांनीही मराठी नाटकात वेगवेगळे विषय आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अनुभवाकडे तिरकस पध्दतीने बघणारे श्याम मनोहर आपल्या 'यकृत', 'हृदय','यळकोट', 'प्रेमाची गोष्ट','दर्शन'सारख्या नाटकातून एक नवीन वाट मांडतांना दिसतात .मनोहरांचा अनुभव मांडण्याचा घाट स्वतंत्र आहे.

आधुनिक मराठी रंगभूमीचा विचार करताना दलित रंगभूमीचे योगदानही महत्वाचे आहे. दलित साहित्यात प्रामुख्याने आत्मकथा व कविता हा वाङ्‌मयप्रकार जास्त हाताळला गेला असला तरी प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, रामनाथ चव्हाण, प्रकाश त्रिभुवन अशा काही नाटककारांनी आधुनिक पध्दतीने दलित नाटक मांडण्याचा प्रयत्न केला.यात सातत्याने लिहिणारे व ज्यांचे लेखन ब-याच जणांपर्यंत पोचले आहे असे प्रमानंद गज्वी हे प्रमुख नाटककार आहेत. 'तनमाजोरी', 'किरवंत', 'गांधी आंबेडकर' अशी महत्वाची नाटके प्रेमानंद गज्वींच्या नावावर आहेत. त्यांचे 'किरवंत' हे ब्राम्हणामधल्या दलितांवरचे अप्रतिम नाटक आहे.समीक्षा लेखनात रमलेले प्रा.दत्ता भगत हे आपल्या 'वाटा पळवाटा' या नाटकाच्या संयत लेखनाने सुपरिचित आहेत.

संशोधन आणि अभ्यासाच्या पध्दतीने नाटक लिहिणारे अजित दळवी हे महत्वाचे नाव आहे.आपल्या प्रकृतीधर्मानुसार तन्मयतेने लेखन करणारा हा लेखक आपल्या नाटकांतून केवळ महत्वाचे प्रश्नच मांडत नाही, तर माणसाच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न करतो. जागतिकीकरणाच्या नावाने होणारं अध:पतन आणि त्या अध :पतनाचं होणारं समर्थन मांडणारं 'डॉक्टर तुम्ही सुध्दा', किंवा महात्म्यामधला माणूस दाखवणारं 'गांधी विरूध्द गांधी'या नाटयकृती मराठी रंगभूमीला श्रीमंत करणा-या आहेत. कुठेही कृतक आशयाचा, भाषेचा मोह न बाळगता सहज , प्रवाही भाषेचा उपयोग हे त्याचे एक वैशिष्टय आहे.

छबिलदास चळवळीतून पुढे आलेला तरूण नाटककार शफाअत खान अत्यंत गंभीरपणे मोजके आणि नेमके लेखन करणारा हा नाटककार ,'भूमितीचा फार्स' 'राहिले दूर घर माझे', 'शोभायात्रा', अशी महत्वाची नाटके त्यांच्या नावावर आहेत. महान विचार मांडणारे व्यक्तिमत्व आणि सामान्य जीवन यातली विसंगती पकडताना 'शोभायात्रा' हे नाटक नीतिमूल्यांची पडझड आपल्यासमोर मांडते.

अजित दळवीप्रमाणेच मराठवाडयात जडणघडण झालेला प्रशांत दळवी हा महत्वाचा नाटककार आहे. 'चारचौघी', 'ध्यानीमनी' , आणि 'चाहूल' या प्रशांत दळवीच्या नाटकांनी प्रायोगिक नाटक आणि व्यावसायिक नाटक यांच्यातील दरी पुसण्याचे मोठे काम केले आहे. सवंगपणापासून दूर राहून, धीम्या चालीने चालणारा हा नाटककार मराठी नाटकाचा प्रवास मात्र समृध्द करतो आहे.

जयंत पवार व संजय पवार या दोन तरूण नाटककारांनी सातत्याने वेगळे काही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. संजय पवार हा तिरकस पध्दतीने अनुभवाचा शोध घेणारा नाटककार आहे. 'कोण म्हणतं टक्का दिला' सारखे नाटक किंवा त्याचे एकांकिका लेखन या दृष्टीने महत्वाचे आहे.याप्रमाणेच सातत्याने गंभीरपणे नाटयलेखन करणारे राजीव नाईक, चं. प्र.देशपांडे , मकरंद साठे, चेतन दातार, गिरीश जोशी,सचिन कुंडलकर , किरण पोत्रेकर , किरण यज्ञोपवीत, योगेश सोमण, मनस्विनी लता रवींद्र,राजकुमार तांगडे यांचा उल्लेख आवश्यक आहे. ग्रामीण साहित्याप्रमाणे ग्रामीण नाटक रूजविण्याचा प्रयत्न करणारे प्राचार्य रा.रं. बोराडे आपल्या 'आमदार सौभाग्यवती'नाटकाने परिचित झाले आहेत.पु.ल.देशपांडे यांची नाटके अजूनही व्यावसायिक रंगभूमीवर धुमधडक्यात चालू आहेत. याशिवाय सदानंद रेगे व दिलीप

पुरूषोत्तम चित्रे व कवीचे नाटकातले योगदान नोंदविण्याजोगे आहे.

सिनेमात ज्याप्रमाणे स्टोरी असते त्याप्रमाणे नाटकात थीम असते.म्हणजे नाटकात लेखक हा महत्वाचा घटक असतो.किंबहूना लेखकाचा शब्द अंतिम असतो.( सिनेमात मात्र दिग्दर्शक सर्वेसर्वा असतो.) तरीही लेखकाचे शब्द प्रभावीपणे रंगमंचावर आले नाहीत. तर नाटकाला पूर्णत्व येत नाही.शेवटी ही सादरीकरणाची दृकृश्राव्य कला आहे. त्यामुळे लिखित शब्दापलीकडचे अर्थ शोधणारा दिग्दर्शक मिळणे ही संहितेच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट असते.आधुनिक मराठी रंगभूमीची यादृष्टीने ख-या अर्थाने पताका सांभाळली आहे ती सत्यदेव दुबे , विजया मेहता , दामू केंकरे , अमोल पालेकर , अरविंद देशपांडे ,जब्बार पटेल , कमलाकर सारंग, सतीश आळेकर ,विजय केंकरे, वामन केंद्रे, चंद्रकांत कुलकर्णी , अतुल पेठे, संदेश कुलकर्णी, मोहित टाकळकर या प्रतिभावान दिग्दर्शकांनी .बाकी निखळ करमणूक करणा-या नाटकांचेही महत्व अगदीच नाकारता येत नाही. कारण यानाटकांनीच प्रेक्षकांना नाटक बघायला भाग पाडले आहे. पुढे यातलेच प्रेक्षक गंभीर नाटकांकडे वळतात.

मराठी रंगभूमी ज्या पध्दतीने आजही कार्यरत आहे. त्या प्रमाणात इतर भाषांत असे प्रयोग होताना दिसत नाहीत.पण आपली मराठी रंगभूमी, मुंबई,पुण्यात घुटमळतेय. त्यामुळे नाटक सर्वसामान्यापर्यंत पोचत नाही. मग बाहेरच्या लोकांना महत्वाच्या नाट्यप्रयोगांपासून वंचित रहावे लागते. संहिता वाचून किंवा परिक्षण वाचूनच समाधान मानावे लागते. यासाठी राज्य नाट्यस्पर्धा हे एक चांगले व्यासपीठ होते. त्यातुनच घाशीराम सारखे नाटक आले.पण या स्पर्धांना आलेली मरगळ पाहता परिस्थिती गंभीर आहे. त्यातल्या त्यात एकांकिका स्पर्धांना चांगले दिवस आहेत.पण स्पर्धा डोळ्यासमोर ठेवून केलेली एकांकिका टिकाऊ ठरत नाही. हलकं फुलकं देण्याच्या नादात विनोदी नाटकाची लाट आलेली आहे. नाटकातली कलावंत पैसे मिळवण्यासाठी टी.व्ही. मालिकात बुडून जातात .अशा परिस्थितीतही मराठी रंगभूमीवर चार चांगली नाटके उभी राहतात. ही समाधानाची गोष्ट आहे.





# रंगमंचीय भाषेची अप्रतिम अभिव्यक्ती ‘ उचक्का ’

प्रा.डॉ.सतीश पावडे

ख्यातनाम लेखक, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण गायकवाड यांचे गाजलेले आत्मकथन म्हणजे ‘उचल्या’ वडार ,पाथरवट समाजात जन्मलेल्या लक्ष्मणची ही आत्मकथा .या आत्मकथेतून एका समाजाचे संपूर्ण जगणे साकार होते. सामाजिक परिप्रेक्ष्यातून आकारास आलेली,व्यक्तीच्या उन्नयानाची ही प्रक्रिया आहे.या प्रवासातील वास्तवही हिडीस, विद्रूप,आहे ; पण त्या वास्तवावर लक्ष्मणचे झालेले कलम प्रेरणादायी स्वरूपाचे आहे.म्हणूनच अखेर ते एक केवळ आत्मकथन न राहता एका समाजाचे वास्तवदर्शन ठरते.

जगण्याच्या कसरतीतून, सकारात्मक दृष्टिकोनातून लक्ष्मण गायकवाडांचे उचल्यातून झालेल्या उन्नयनाचा साक्षात्कार उचक्कातून घडतो. अशा या आत्मकथनाचे नाट्यरूप‘उच्चक्का’या नाटकाच्या माध्यमातून ख्यातनाम रंगकर्मी आणि दिग्दर्शक अनामिका हक्सर यांनी आगळया वेगळया पध्दतीने सादर केले आहे. सृजनशील दिग्दर्शक म्हणून गाजलेल्या अनामिका हक्सर यांना राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचा वारसा लाभलेला आहे. तर रशियाच्या' स्टेट इन्सिटट्युट ऑफ थिएट्रीकल आर्टस' या जागतिक ख्यातीच्या संस्थेतून दिग्दर्शनातील विशेष पदवी त्यांनी मिळविली आहे.या उच्चतम नाट्यसंस्कारातून त्यांनी सातत्याने नव्या नाट्यभाषेचा, रंगमंचीय भाषेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि या दृष्टीने ‘उच्चका’ हे आगळेवेगळे रसायन अनामिका हक्सर यांच्या हाती लागले त्यांनी या संधीचे सोने केले.

प्रत्येक दिग्दर्शकांचा आपला रंगभूमीकडे बघण्याचा दृष्टिकोण असतो. त्यामुळेच हा रंगमंच त्या दिग्दर्शकाला रंगभूमीवरील सर्व ज्ञात अज्ञात शक्यतांचे आव्हान देत असतो. अशा रंगमचीय भाषेच्या शक्यतांचे आव्हान (Challange of Theatrical language ) अनामिकेने स्वीकारलेले आहे. म्हणूनच ती आपल्या दिग्दर्शकीय भूमिकेत म्हणते, “ एक विस्फोट, एक उलट गती, पवित्र – अपवित्रांच्या पुढे , शोध नव्या शैलीचा ,एका नव्या सौंदर्य ‘ बोधाचा, गुन्हेगारी समाजाची पार्श्वभूमी, अस्तित्वासाठी चाललेला त्यांचा संघर्ष रंगमंचाच्या अवकाशात ते कसे दाखवायचे ? नटांचे जाणे कसे असेल ? येणे कसे असेल ? प्रथम पुरूषी वचनात लिहिलेली ही आत्मकथा .त्याची वाचनशैली कशी असावी ? भुकेची गाथा कशी अभिव्यक्त करावी ? चोरी,लुट ,खिसे कापण्याची कला, विष्ठा विसर्जनाच्या सोबत पोट भरण्यासाठी मेलेल्या डुकरांचे मांस भक्षण .प्रश्न पोटाचा कठीण आणि जबर पोटाचा ,ते कसे दाखवायचे ? कसे ते जिवंत करायचे ? प्रश्न ... प्रश्न ... आणि प्रश्न ...फक्त प्रश्नांचे विस्फोट होते. या विस्फोटातून आकारत गेले उचक्का ” एका दिग्दर्शकांचा हा प्रश्नांकित प्रवासच ‘उचल्या’ ला रंगमंचीय भाषेत (Theatrical Language )सादर करता झाला. तो प्रवाही झाला , संज्ञाप्रवाही झाला.

गुन्हेगार जनजाती अधिनियम १८७१ अन्वये ब्रिटीश कायद्याने ज्या जाती जमातींना गुन्हेगार जाती ठरवल्या, त्यातील एका जमातीत लक्ष्मण गायकवाडांचा जन्म झाला. या जातीस मराठीत वडार तर हिंदीत त्याला पाथरवट म्हणतात. वडार समाजातही अनेक उपजाती आहेत. त्यातील पाथरवट ही एक बव्हंशी भटकी जमात . या जमातीचे जगणे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण पध्दतीने अनामिका हक्सर यांनी साकार केले आहे.मुळातच लक्ष्मण गायकवाड यांनी आपली ही आत्मकथा सरल प्रवाही पध्दतीने अनुक्रम शैलीनुसार मांडलेली आहे.शिवाय निवेदनातून संपूर्ण कथानक वर्णनात्मक पध्दतीने मांडलेले आहे. तेव्हा त्यातले नाट्य पकडून त्याला प्रभावी सूत्रात गुंफणे फार कठीण कार्य होते. शिवाय ही गुंफण करताना लेखकाच्या मूळ अभिव्यक्तीला धक्का न लागू देणे सर्वात महत्वाचे होते. पण ही सगळी आव्हाने अनामिका हक्सर यांनी स्वीकारलेली आहेत. ‘प्रथम पुरूषी एक वचनी निवेदन ’ ज्या कलात्मक पध्दतीने सादर करण्यात आले त्याला तोड नाही. रंगमंचावर येणारे सारेच पात्र कधी तरी लक्ष्मण होतातच. स्थिती–काळ आणि स्थळानुरूप वेगवेगळी पात्रे लक्ष्मणच्या रूपात सादर होत जातात. ज्या रंगमंचीय भाषेचा उल्लेख येथे करण्यात आला त्याची सुरूवातच या तंत्राने होते. रंगमंचाच्या अवकाशात प्रत्येकच पात्र लक्ष्मण होत जातात. त्या त्यावेळची अनुभूती त्या त्यावेळचे अनुभव लक्ष्मणच्या रूपात परावर्तित होत जातात .परावर्तीकरण( Transformation ) हे तंत्र हक्सर यांनी हुकमी एक्क्याप्रमाणे वापरले आहे. मग ती कथा एका व्यक्तीऐवजी समष्टीची अभिव्यक्ती होत जाते.

देश – कालपरिस्थितीच्या माध्यमातून रंगमंचीय भाषेचा उपयोग करताना नेपथ्य, प्रकाश, पार्श्वसंगीत, रंगभूषा, वेशभूषा, या रंगमंचीय मुलद्रव्याचे भान ठेवण्यात आले.शब्दाच्या पलीकडचे ध्वन्यार्थ जिवंत करण्याचे प्रयत्न झाले. देहबोलीच्या प्रभावी उपयोगातून अनुभवांच्या जाणिवांचे विश्व, अनुभूतीच्या पातळी, परिणामाच्या वेगवेगळया स्थिती अवकाशाच्या परिक्रमेतून व्यक्त करण्यात दिग्दर्शकाला निश्चित यश आले आहे. देहबोलीचा आणि त्याला पूरक भावस्थितीचा, मन:स्थितीचा उपयोग अभिनयाच्या दृष्टीने समर्पकदृष्ट्या करण्यात आला, हे एक सलग जीवनदर्शन आहे.त्यातील अनुभव हे एकरेषीय आहेत. म्हणून त्यातील तीव्रता शोधून ते अनुभव बहुरेषीय करणे दिग्दर्शकाच्या कौशल्याचा भाग होता.तो सफाईदार पध्दतीने दिग्दर्शकाने केला आहे. अनुभवविश्वाचे प्रकटीकरण करताना अनुभवाचीच पातळी अभिनयातून व्यक्त होते. ‘ गंदी नाली के किडे ’ जसे घाणेरडया नालीत वळवळतात तशी पात्रे वळवळताना दिसतात .भुकेचा पोटात उसळलेला डोंब भुकीच्या तीव्रतेच्या अभिनयातून आशयापर्यंत नेला जातो .हक्सर यांनी स्थितीत जिवंतपणा ओतल्याने अनुभूती अभिनयसदृश्य होतात. भावना, जाणिवा, देहलबोलीतून मूर्तरूप घेतांना जाणवतात.

अनामिका हक्सर यांनी या नाटकाला सजीव करताना टोटल थिएटरचा पूर्ण उपयोग केलेला आहे. अनेक नृत्यशैली , नृत्यनाट्यशैली यांचा समपर्क उपयोग करण्यात आला.त्यामुळे रंगमंचीय भाषेला आकार देण्यासाठी त्याची खूप मदत झालेली दिसते. या नेपथ्याचा उपयोग सूचकपणे करण्यात आला आहे. रंगमंचीय अवकाश कथानक आणि सादरीकरणाला परिमाण देणारा ठरला.नेपथ्याचा वापर करताना वापरलेला काळा रंग, जीवनाच्या अंधाराला समर्पक वाटला.एखाद्या अंधा–या बोगद्यात घाणीच्या गटारात वळवळणारे किडे अशा प्रकारचे एक वास्तव आशयाला मिळालेल्या जिवंत रूपांसह व्यक्त होणे, ही या नाटकाची जमेची बाजू आहे.नेपथ्य, प्रकाश ,संगीत यांच्यामूळे देहबोलीच्या अनेक शक्यतांची अभिव्यक्ती करण्यातही दिग्दर्शकाला यश मिळाले आहे. लक्ष्मण गायकवाड यांच्या जीवनानुभवांना जिवंत करण्यासाठी शब्दांच्या पलिकडे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते असे अनामिका हक्सर सांगतात, ‘शब्द थिटे पडल्यानंतर त्या भावना, ती मनस्थिती त्यांच्या अंतर्भूत आशयासह व्यक्त करणे हा आमचा उद्देश होता. म्हणून आम्ही शब्दापेक्षा त्यामागील वास्तवाचा शोध घेत राहिलो.’ त्यांच्या भूमिकेतच त्यांचा नाट्यविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो.

स्टॅनिस्लाव्हस्की, मेयर होल्ड, ब्रेख्त, ग्रोटोव्हस्की या महान नाट्यदिग्दर्शकांच्या वेगवेळ्या नाट्यपध्दतींचा उपयोग अनामिकाने

केलेला आहे. पाथरूट समाज जीवनाचे दर्शन घडवितांना , त्या समाजातील अनुभव , त्यांच्या जगण्यातील वास्तवता , त्यांची दु:खे ,त्यांचे दैन्य हे त्या शब्दातील आशयानुरूप व्यक्त करण्यासाठी कलावंताना विशेष प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले..

ख्यातनाम समीक्षक गंगाधर पाटील यांनी रंगमंचीय भाषा (LANGUAGE OF THEATRE ) आणि त्याच्या अंतरंगावर प्रभावीपणे प्रकाश टाकलेला आहे.ते म्हणतात, ' रंगमंच , प्रकाश योजना, संगीत, नेपथ्य, अभिनय या सर्व तांत्रिक बाजूसह नट शरीराच्या माध्यमातून नाट्य, रंगमंचाच्या अवकाशात विखुरतो' ,याचे प्रत्ययकारी दर्शन हक्सर यांनी 'उचक्का'मधून प्रभावीपणे घडविले आहे.रंगमंचीय भाषेत सर्वात महत्त्वाचे आहे ते नटाचे शरीर.या शरीराच्या , त्याच्या देहबोलीतून आशयापर्यंत पोचता येते. शब्द आणि अभिनय यात अंतर उरत नाही. अशा अवस्थेत ही रंगभाषा निर्माण होत राहते.

संवाद ,स्वगते, भाष्य,निवेदने,उद्‌गार हा भाषिक व्यवहार देहबोलीच्या माध्यमातून कृतीत आणि कृतीतून आशयात रूपांतरित होत जातो. मुख्य म्हणजे नाटककाराची भाषा , कथेची भाषा, आत्मकथनाची भाषा, रंगभूमीच्या भाषेत त्याच्या मूलभूत अस्तित्वासह विलीन होत जाते. ही सारी प्रक्रिया, 'उचक्का' मधून प्रभावीपणे पाहता येते. " नाटकात नटाचे शरीर त्याच्या हालचाली आविर्भाव, लकबी, मुद्रा , शब्दोच्चार ,आरोह, अवरोह, आघात, विराग, आक्रोश , किंकाळया, चेहरा, हातपाय , एकूणच त्याने घेतलेली मुद्रा, पोझ यांच्यातील अंतर्गत संबंधाने , साहचर्याने अवकाश व्यापून जातो आणि त्यातले नाट्य जाणवू लागते नव्हे , डोळ्यापुढे नाटक उभे राहू लागते. नाट्यगत शब्दातले नाट्यचिन्ह, रंगचिन्ह मूळ आशयाच्या आकारात परिवर्तीत होऊ लागतात आणि रंगमंचीय भाषेचा (LANGUAGE OF THEATRE ) एक सर्वांग सुंदर अनुभव आपणास घेता येतो."

अनामिका हक्सर यांचे सर्वात मोठे श्रेय हेच आहे की,'उचल्या' त्यांनी रंगमंचीय भाषेतच वाचले, अनुभवले आणि लिहूनसुध्दा घेतले त्याच भाषेत .त्यामुळे या सृजनात्मक प्रक्रियेचे श्रेय अर्थातच त्यांना द्यावे लागेल. दिग्दर्शक कलावंताच्या सृजनात्मक नाते संबंधातून 'उचक्का' स पूर्णत्व लाभले. तांत्रिक बाजू त्यास सवार्थाने पूरक ठरली .पण जी दृष्टी अनामिका हक्सर यांना लाभली त्यातून रंगभाषेचा नाविण्यपूर्ण प्रेरक प्रयोग घडून आला, त्याचे श्रेय अर्थातच अनामिका हक्सर यांचेच .

या नाट्यवस्तुला एक अंत:प्रवाह आहे तो लक्ष्मणच्या प्रबळ, दुर्दम्य इच्छा शक्तीतून निर्माण झाला आहे. म्हणूनच दृश्यांची मालिका खंडित झाली तरी त्या पात्रांचा विकास खंडित होत नाही. एवढेच नाही तर अनेकदा लक्ष्मणचे निवेदन स्त्रियाही करताना दिसतात; पण तेव्हाही रसभंग होत नाही.समूहदृश्याच्या गदारोळातही हा अंत:प्रवाह विचलित होत नाही. प्रकाशाची एकसुरी संगती बाधक होण्याऐवजी साधक बनते. पिवळा,पांढरा,अंधुक प्रकाश पात्रांच्या हालचालींना एक वेगळाच परिणाम देतो. नेपथ्यातील मागची काळीकुट्ट भिंत आणि प्रसंगी त्या भिंतीच्या वरच्या कडेचा संजीवक उपयोग अवकाशाची समर्पक उपलब्धी जाणवून देते. सिमेंटच्या अर्ध्या फुटक्या नालीत घुसलेल्या पाईपचा प्रभावी उपयोग करण्यात आला आहे. रंगमंचीय भाषेचा घटक म्हणून या नाटकाच्या नेपथ्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

प्रकाश केवळ उजेड पाडण्याऐवजी स्थिती अधिक जिवंत करणारा ठरला. 'झोन' ची विभागणी,परस्परांना छेदणारे स्पॉट नाटकाच्या तीव्र अनुभवांना अभिव्यक्त करतात. तर पार्श्वसंगीत नाटक गतिमान करते. समूहाचा उपयोग अनेकदा दृश्यसंबंधासाठी करण्यातही हक्सर यांना यश आले आहे.

'प्रोसेनियम 'आर्च मधील नाट्यदर्शनाच्या सर्व शक्यता दिग्दर्शकाने प्रभावीपणे शोधल्या आहेत. आत्मकथनाचे एकसंघ नाट्यरूप रंगमंचावर सादर करताना पारंपारिक नाट्यसंकेतांना दूर सारून नवे नाट्यसंकेत हक्सर यांनी निर्माण केले आहेत. अभद्र किळसवाणा अश्लाघ्य वाटणारा शौचविधी तोही स्त्रियांचा दाखविला आहे . हे दृश्य या नाटकातील तांत्रिक पार्श्वभूमीवर धक्कादायक अनपेक्षित होते.ते धाडस हक्सर यांनी दाखविले आहे ; पण वास्तवाचा तो रंगमंचीय आविष्कार होता. एक ट्रिक पेक्षा वास्तवदर्शी मुद्दा म्हणून त्याकडे मी बघते, असा अभिप्राय अनामिका हक्सर यांनी दिला आहे. एकूणच रंगमंचाच्या प्रभावी भाषेतून उचल्याच्या जीवनाचे भेदक वास्तव साकारण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. गेल्या अनेक वर्षानंतर भारतीय रंगभूमीवर 'उचक्का' च्या निमिताने रंगमंचीय भाषेची एक सशक्त नाट्यकृती सादर झाली आहे , ही आनंददायी बाब वाटते.


# सौ.के.एस.के.महाविद्यालय
## कर्मचारी सह.पतसंस्था म.,बीड.


प्राचार्य दीपा क्षीरसागर


डॉ.भारतभुषण क्षीरसागर



श्री. राजा गोविंदराव मचाले
अध्यक्ष

श्री. देशमाने व्ही.टी.
सेक्रेटरी

# रंगधर्मी लोटू पाटील

प्रा.ज्ञानेश्वर शिंदे

अजिंठा लेण्यांच अलौकिक शिल्प  व पेंटींग जगाला वेड लावतं.याच लेण्यात रॉबर्टमील व पारो यांच्या नाट्मय प्रेमाची ओळख खास  अंजिठयांच्या पोलीस चौकीमागची पोरोची समाधी देते.त्या अजिंठयाच्या डोंगरामधील डोंगर रांगातून मागच्या बाजूला सोना नदीच्या काठी सोनेरी नाटयपरंपरा सांगणार सोयगाव आजही श्रीराम मंदिराच्या वास्तुतून नाट्यपरंपरेच्या खाणा–खूणा सांगत आहे.      सांगली येथे ५ नोव्हेंबर १८४३ ला विष्णूदास  भाव्यांच्या ' सीतास्वंयवर' या नाटकाने मराठी रंगभूमीची सुरूवात झाली.या संगीत नाटक रंगभूमीला अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गो.ब.देवला यांनी नाविण्यपूर्ण सप्तरंगी स्वरांनी बहार आणला .त्या काळात सोयगावसारख्या गावामध्ये म्हणजे १९०५ पूर्वी कित्येक वर्षे चैत्रातील राम जन्मोत्सवात राम जन्मापसून रावण वधापर्यंत सोंगं होत होती. या उत्सवांना चैती किंवा पंचम्या म्हणतात. रात्रभर मशालीच्या उजेडात हे दशावतारी सोंगं सादर होत होती.

सोयगावचे ऐश्वर्यसंपन्न जाणकार रसिक,नट असलेले रामचंद्र महिपत पाटील उर्फ रामजी पाटील यांच्या नेतृत्वाने नाटयकलेचा उदय झाला.त्या काळात काही पद्यात्मक संवाद लिहून सोंग, भारूड आणि दशावतारी खेळ सादर केले जात.त्यात कटाव,आर्या, ओव्या,अभंग,साकी,दिंडी आणि विविध पदही म्हटली जात.हरहुन्नरी नाट्यप्रेमी रामजी पाटलांनी माधवरावजी पाटील,शिवराम पाटील,पोपटरावजी ,विनोदी नट तुकाराम शेठ,चत्तरसिंग हजारी, रावजी शेठ,तात्या शेठ आणि विठ्ठल शेठ इत्यादी रसिक कलावंताना सोबत घेवून ' बाणासूर',' हरिश्चंद्र',' हिरण्यकश्यप' ,' अहि–महि ',' भक्त प्रल्हाद' आणि ' उषाहरण 'अशी गद्यमय नाटके सादर केली.त्यानंतर कलेची आणि कलावंताची प्रतिष्ठा जपणारा कलेवर निष्ठा असलेला सोयगावच्या रंगभूमीचा  वारस कै.रामजी पाटलांचे चिरंजीव नाटयधर्मी लोटू उर्फ केशव रामजी पाटील यांनी नाट्यकलेसाठी स्वत:ला वाहवून घेतले.महाराष्ट्रात किर्लोस्कर,देवल आणि गडक–यांच्या नाटकांनी लोकांना झपाटून टाकलं होतं. लोटू बाप्पांनी ही गाजलेली सर्व नाटकं पाहिली आणि या नाटकांचा सूक्ष्म अभ्यास केला व अशीच रंगभूमी आपण आपल्या सोयगावी करण्याचं मनोमन पक्क केलं.

लोटू पाटलांनी १९०५ मध्ये श्रीराम संगीत मंडळी, नावाच्या नाट्य मंडळाची स्थापना केली.जवळ जवळ १९२० पर्यंत इथे लोकधर्मी नाट्य रूढ होती. १९२० नंतर लोटू पाटलांनी नाट्यतंत्राप्रमाणे होणा–या  नाटकांचा  प्रत्यय प्रेक्षकांना करून दिला.गोविंद बल्लाळ देवलाचे'मृच्छकटिक 'आणि  'संशयकल्लोळ' हे सोयगावच्या रंगमंचावर  प्रगट झाले. पलित्यांच्या प्रकाशात साजेशी रंगभूषा व वेशभूषा करून हे हौशी कलावंत आपली नाट्यकला सादर करत असत.देवलांच्या नाटकाप्रमाणे खाडिलकरांचे 'संगीत मानापमान'  वीर वामन जोशींचे 'राक्षसी महत्वाकांक्षा'वि.त्रि.मोडक यांचे 'संत तुकाराम' मामा  वरेरकरांचे 'हाच मुलाचा बाप'शंकर जोशीचे 'पंताची सून' अशा अनेक नाटकांनी नाट्यकलेचा विकास होत होता.पुण्या मुंबईच्या नाट्यतंत्राप्रमाणे वेशभूषा ,रंगभूषा,नेपथ्य,रंगमंचावरील पडदे करून घेतले ते आजही टिकून आहेत.त्याकाळातील राजवाड्याचे ,निसर्गाचे सुंदर पडदे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागात आजही बघायला मिळतात.

कै.रामजी पाटलांनी गावातील राम मंदिरात ६० द ६०  चे छोटेसे थिएटर बांधले त्याचा रंगमंच १८ द २४ चा आहे. पण ते नाट्यगृह आणखी मोठे करण्यासाठी लोटू पाटलांनी खास लंडनला तयार होणारे २० ते २५ फुट उंचीचे लोखंडी पोल मागवून राम मंदिराचे भव्य नाट्यगृहात रूपांतर केले. या भव्य मंदिराचे दुसरे बांधकाम शके १८५६ मध्ये झाले, असा उल्लेख मंदिरात आहे. राम मंदिराच्या मूर्तीसमोर ओट्यावर रंगमंच, दोन्ही बाजूला ओट्यावर मान्यवर मंडळी किंवा  महागडे तिकीट काढणारे प्रेक्षक बसत असत.रंगमंचाच्या समोर सामान्य रसिक प्रेक्षक तर मंदिराच्या वर खास स्त्रियांसाठी टोकराची बाल्कनी तयार होत असे.अशा या रंगमंदिरात रंगभूषेच्या वरच्या मजल्यावर एका खिडकीतून लोटू पाटील नाटकातील कलावंताच्या अभिनयाबरोबर प्रेक्षकांच्या चेह–यावरील हावभाव टिपत असत.त्यांच्या शिस्तीने व कल्पकतेने  बसवलेल्या नाटकास प्रेक्षक उत्स्फू र्त प्रतिसाद देत असत.लोटू पाटलांनी स्थापन केलेल्या श्रीराम  संगीत मंडळीचे मॅनेजर(व्यवस्थापक ) काशिराम.टी.देसाई.हे होते. नटवर्य धोंडो आप्पा चौधरी,डी.बी.नाईक,गंगाधर सोमाणी ,तबलजी नामदेव पिंगाळकर,उत्कृष्ट तबलावादक व गायक मास्टर जर्नादन दलाल,दामू लोहार ,सांडू शिंपी,पंढरी पाटील ,दयालराव पाटील,सीताराम गुरव आणि डी.पी.पंगे हे नाट्य कलावंत होते. १९२९ मध्ये या नाट्य मंडळीनी शेंदूर्णी येथे नाटके केली होती. शेंदूर्णी येथील श्रीमंत, शेठ, सावकरांनी लोटू बप्पांना उत्कृष्ठ नाट्य नैपुण्याबददल चांदीची फ्रेम त्यांच्या घेतलेल्या फोटोसहीत अर्पण केली. त्यांचा येथे भव्य सत्कार झाला.औरंगाबाद सरस्वती भुवन शिक्षक संस्थेच्या आर्थिक सहाय्यासाठी'तिकडची  शोभा' हे नाटक औरंगाबाद येथे सादर केले.

गावातील कलावंतासोबत पुढच्या काळात लोटू पाटलांनी पुण्या- मुंबईचे कलाकार आमंत्रित करून त्यांच्यासोबत किंवा त्या रंगकर्मीचे स्वतंत्र नाट्यप्रयोग सादर केले.त्यामध्ये ख्यातनाम नटवर्य व शेवटच्या काळात 'एकच प्याला' मध्ये सुधाकराची भूमिका करणारे सर्वश्री नानासाहेब फाटक, ललित कलादर्शचे ख्यातनाम नट व मालक आण्णासाहेब पेंढारकर ,सुप्रसिध्द नटवर्य नानासाहेब चाफेकर मराठी रंगभूमीचे मालक व मुख्य नट जयराम शिलेदार ,सुप्रसिध्द नट भार्गवराम आचरेकर ,नटवर्य रा.वि.राणे, विनोद मूर्ती वसंत शिंदे, प्रसिध्द नाट्य चित्रपट अभिनेते दामुअण्णा मालवणकर, सुप्रसिध्द नाट्यलेखक व नट बाळ कोल्हटकर,नटसम्राज्ञी सौ.जयमाला शिलेदार, विमल कर्नाटकी, शरद बाला,विमल पाध्ये, हार्मोनियम मास्टर कासेकर ,शंकर जोशी, मास्टर कृष्णराव भाटवडेकर आणि राजा गोसावी अशा त्याकाळातील दिग्गज कलावंतानी या नाट्य पंढरीच्या दिंडीत सहभाग घेतला तर कांहीनी प्रेक्षक म्हणून हजेरी लावली.

लोटू पाटील हे श्रेष्ठ व ज्येष्ठ नट होते, दिग्दर्शक होते, उत्तम प्रशासक होते. असा हा उत्कृष्ठ कलावंत बालगंधर्वांचा समकालीन होता.सोयगावच्या रंगभूमीला प्रगल्भ करण्यासाठी त्यांनी खूप  परिश्रम घेतले व इथल्या पंचक्रोशीतल्या रसिकांवर नाट्य आणि संगीताचे संस्कारही केले.१९४५ नंतर संगीत नाटकांना उतरती कळा आली; पण मराठी नसानसात नाटक असल्याने ते जिवंतच होते. १९४९ नंतर नव्या पिढीला लोटू बप्पांनी प्रोत्साहान दिले.'नूतन नाट्य मंडळी'  या नावाने लोटू पाटलानंतर तिस–या पिढीने नाट्यमंडळ स्थापन केले.विष्णू विठ्ठल काळे हे या नाट्यमंडळाचे मालक होते. या नाट्यमंडळात सोपानमामा जोर्डे, रामराव काळे, अमृत चौधरी, प्रल्हाद काळे, विठ्ठल पठाडे ,प्रभाकर मापारी,गोविंद जोहरे ,नामदेव शेठ ,दगडू  सोनार, पुंजू न्हावी,सुखदेव काळे, सीताराम  देसाई अशा अनेक नाट्य कलावंताचा सहभाग होता.कै.लोटू पाटील ते सोपानमामा बोर्डे यांच्या पिढीपर्यंत झालेल्या नाटकांचे प्रयोग म्हणजे ' द्रौपदी' ' मनोविजय',' सत्य विजय',' तुकाराम',' विक्रम',' शशिकला','योगायोग',' गुंतागुंत' ' वाहतो ही दूर्वाची जुडी',' मानापमान' ' संशय कल्लोळ','राक्षसी महत्वाकांक्षा' ,' पुण्यप्रभाव',' देव माणूस''देवदासी',' बेबी',' स्वंयवर','माझी जमीन',' एकच प्याला',' हाच मुलाचा बाप',' वेगळं व्हायचंय मला','

व्याही विहीण', 'देवावर मात', 'फिर्यादी ', 'पाटलाची औलाद', 'पुंडलिक , 'थांबा थोडं, दामटा घोडं', 'स्वर्गसुंदरी', 'एखाद्याच नशीब', 'सौभद्र', 'भक्त पुंडलिक', 'सौभाग्य', 'तिसरा जावई',आणि 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे होते.

उंडणगाव येथील २९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनानिमित्त सोयगावच्या नाट्य परंपरेवर एका मुलाखतीसाठी आज हयात असलेल्या बुजुर्ग सोपानमामा बोर्डे या ज्येष्ठ नटाने जुन्या आठवणींना उजाळा देतांना ' रायगडाला जेव्हा जाग येते ' या वसंत कानेटकरांच्या नाटकांतील शिवाजी महाराजांचा संवाद साभिनय सादर केला.या वयात इतक्या ताकदीने एक उतारा सादर करणा-या सोपानमामांना बघून माझ्या सारखा छोटा कलाकार भारावून गेल्याशिवाय रहात नाही.

शंभर सव्वाशे वर्षाच्या नाट्य इतिहासाला मराठवाड्यातील बीड येथे ८९ व्या अ.भा.नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने उजाळा देण्यासाठीचा हा प्रपंच आणि रंगधर्मी लोटू उर्फ केशव रामजी पाटलांसारखा रंगकर्मी, नाट्यधर्मी, रंगधर्मी, लोकधर्मींना मानाचा मुजरा.....







## रंगकर्मीनी तुमच्या या बँकेचं काय ..?...

**सूर्यकांत सराफ औरंगाबाद.**

दोन दशकांपूर्वी प्रसारमाध्यमांची व्याप्ती आजच्याइतकी वाढलेली नव्हती. मुलांचा हात सहजपणे संगणकावर जात नव्हता. शाळकरी पोरांपर्यंत इंटरनेट पोहाचलं नव्हतं.वास्तवापासून खूप दूर असलेले रिॲलिटी शोज मुलांसाठी अवतरले नव्हते.मोठया पडद्यावरती छोटया मुलांचा वापर करून लोकांना बनवण्याची युक्ती या वेळी सिनेमा वाल्यांना सापडलेली नव्हती.

पण शाळांच्या स्नेहसंमेलनातून नाटकांचे प्रयोग मात्र होत होते.कथाकथन,नाटयछटा,एकपात्री प्रयोगांसोबतच मुलांनी स्वत: गायिलेल्या गाण्यांवर लोकगीतावर नृत्याचे कार्यक्रम होत होते.भाषाविषयाच्या शिक्षकांकडून अभिनयाचे शास्त्रशुध्द धडे गिरवून मुलं मनोरंजन शोधत होती.माफक अभ्यास करून मुलं पुरेसे खेळ खेळत होती,नाटक खेळत होती.

गणेशोत्सवाच्या मेळयांमधून मुलांच्या अभिनयाला वाव मिळत होता.वेगवेगळया हौशी दिग्दर्शकांकडे वेगवेगळे धडे शिकत ही मुलं एकेका पावलावर अभिनयात प्रवीण होत होती. मोठी झाली की हीच मुलं कॉलेजमध्ये एकांकिका करायला लागायची .हळूच कधीतरी राज्यस्पर्धेच्या नाटकात थोडासा प्रवेश करून तिथे धडपडायची यांच्या अभिनयाची चमक पाहून कुणी ज्येष्ठ दिग्दर्शक एखादी आव्हानात्मक भूमिका द्यायचा आणि त्या संधीचं सोनं करून हा कलावंत मुलगा खूप उशीरा व्यावसायिक नाटकात स्थान मिळवायचा.तिथं पोहोचेपर्यंत आधीच्या प्रत्येक पायरीवर त्याला रंगभूमीची चांगलीच ओळख व्हायची .नकला, नाटयछटा, एकपात्री,शालेय बालनाटय,एकांकिका ......या मार्गानेच तो तीनअंकी नाटकात पोहोचत असे.अगदी कमी वयात उच्चाराचे प्राथमिक धडे गिरवत गेलेल्या अशा मुलामुलींच्या पायाभूत अभ्यास आपोआप होत असे.लहान मुलांसाठीची शाळेतली व शाळेबाहेरची ही रंगभूमी म्हणूनच रंगकर्मीची बँक म्हणवली जात असे.या बँकेतून नाटकासाठी खणखणीत कलावंत मिळवता येत असत.अशा कलावंताच्या प्राथमिक निष्ठा नाटकावरच असत आणि या क्षेत्रातील पूर्वसुरींची तपश्चर्या त्यांच्या कानी असल्याचा एक वेगळा फायदा त्यांच्या वाटचालीत हमखास व्हायचा.

दूरदर्शन आणि चित्रपटाच्या छोटया मोठया पडद्याकडे एक डोळा ठेवून रंगभूमीवर चाचपडत येऊ लागलेले आजचे तरूण कलाकार पूर्वीचा आवाका घेऊन येतांना दिसत नाहीत. या पिढीला मुळातच लाभलेलं बिनधास्तपण आणि केवळ आकर्षणामुळे निर्माण झालेली उत्स्फूर्तता हीच या तरूण कलावंताची बलस्थाने बनलेली आहेत.याच्या जोडीला जर पूर्वज्ञान आणि थोडसा अनुभव असता तर खचित त्यांची समज वाढलेली दिसले असती.परिस्थितीचा खूप खू प बदलली आहे.म्हणूनच पूर्वी सहजगत्या वाटचाल करणारी ही बँक दुर्लक्षित झाली आणि त्याची दुर्दैवी फळे आजच्या रंगभूमीला भोगावी लागत आहेत.

शिक्षण व्यवस्थेत शालेय पातळीवर झालेले बदल याला कारणीभूत आहेत. मकॉरेअरिस्ट फ होऊ लागलेल्या नव्या पिढीला भाषाविषय गौण वाटू लागले हा एक महत्वाचा मुद्दा. शैक्षणिक सांस्कृतिक परिवर्तने, माहिती तंत्र ज्ञानाबद्दलचे गैरसमज,पाश्चात्य कलांचे अनुकरण करतांना सहजपणे आलेले रूचीभिन्नत्व .... या बाबींनी शालेय जगताला ढवळून काढले. त्यात नाटयछटा हरवल्या,नकलांचे रूप बदलले आणि बालनाटयही संपले.बालकांच्या सर्वांगिण विकासावर तर याचा परिणाम झालाच परंतू एक भयानक पोकळी मध्यंतरात निर्माण झाली...आणि तरूण पिढीचा नाटकाकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलून गेली.सकारात्मक किंवा नकारात्मक बदल कुठल्याही चळवळीला पूरकच असतात.त्यामुळे विचार मंथन होते,वाद होतात आणि कालसापेक्ष गोष्टी टिकतात.

मात्र वाद घालण्यासाठी पायाभूत अभ्यासच नसेल तर ....?

मुलांच्या नाटकाविना रंगभूमी पांगळी वाटायला लागतेच.बालविकासाबाबत विचार करणारानां ही उणीव जाणवते आहे.डॉ.यशपाल यांच्या नेतृत्वाखालील समितीने नवा शैक्षणिक आराखडा तयार केला आहे.त्यात कथाकथन नाटयीकरण ,सादरीकरण या कौशल्यांनाच प्राधान्य दिले आहे.

शिक्षण विषयक अधिकारी व्यक्तींना,शिक्षकांना याची अमलबजावणी करतांना खूप अडचणी येतील.एक नवी सुरूवात त्यासाठी करावी लागेल आणि याच एका पध्दतीने मुलांच्या रंगभूमीची पुन:स्थापना होऊ शकेल.या बाबत ज्येष्ठ रंगकर्मीनी पुढाकार घ्यायला हवा.मग्रीप्स थिअेटर फ सारख्या चळवळीची मदत घेऊन मधल्या फळीने त्यांना साथ द्यायला हवी.संगणक युगातील नव्या पिढीला नाटक द्यायचे आहे याची जाण सर्वांनी ठेवायला हवी.बालकांच्या जगातील आजचे जिव्हाळयाचे विषय नाटयसंहितेत यायला हवेत.राजा,परी,राक्षस ,चेटकीण ,जादुगार... यांच्या तावडीतलं बालनाटय अस्ताला जाऊन नव्या युगातलं मुलांचं नवं नाटक समोर यायला हवं.

बदलत्या अभ्यासक्रमाबरोबर हेही बदल साध्य झाले तर रंगभूमी विषयक एक मोठे सामाजिक कार्य साध्य होईल. नव्या पिढीतले वर्तनबद्दल सकारात्मक रूपात समोर यायला लागतील...आणि रंगभूमीची ही बँक पुन्हा एकदा रंगभूमीच्या समृध्दीसाठी मदत करायला लागेल.

**श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि; बीड.**

'' जनाधार भवन '' जालना रोड, बीड. फोन :२२२१५४, २२६०६४ • स्थापना दिनांक १ एप्रिल १९९५

सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली व महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाची बँक .

ग्राहकांच्या सेवेसाठी १६ फेब्रुवारी २००१ पासून कोअर बँकींग सुविधा प्राप्त बँक.

भारतीय रिझर्व बँकेचा प्रथम दर्जा व सतत ऑडीट वर्ग-अ. • रू.१२५ कोटीच्या ठेवीचे उद्दिष्ट पूर्ण. • कर्जावरील कमी व्याजदर. तत्पर नि कार्यक्षम सेवा. • डिपॉझीट इन्सुरन्स कॉर्पोरेशन कडून रू.एक लक्ष ठेवींची हमी. • भारतातील प्रमुख शहरातील ड्राफ्ट मिळण्याची सोय. • लॉकर सुविधा उपलब्ध. • सभासदांना दरवर्षी लाभांश वाटप होत असणारी बँक.

सोप्या आणि सोयीस्कर बँकींग विश्वात आपले मनोमन स्वागत आहे. सुविधा संपन्न बँकींग केवळ आपल्या बँकेत.

| बी.एन.चंदनशिव | अजय पाटील | अर्जुनराव जाहेर पाटील | सत्यनारायण लोहिया |
|---|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | संस्थापक अध्यक्ष | अध्यक्ष |

# कुठे हरवली रंगभूमी ---

प्रा.संयुक्ता थोरात

का कुणास ठाऊक ? पण रंगभूमी हे शब्द कानावर पडताच, मन बेभान होऊन जातं. डोळया समोर येते. स्क्रिप्ट , स्टेज,म्युजिक , लाईटस ,मेक – अप ,तालिम, तालीमची संध्याकाळ, नाटकातील सह - कलाकारा बरोबरचे नाते आणि हळू- हळू ख–या आयुष्यात मिळणारे मित्र मैत्रिण, सुख–दुःखाचे सोबती.तो तालिमीतला हवाहवासा चहा, मध्येच एखाद्या दिवशी आणलेले ते समोसे, अशी कोणती गोष्ट आहे जी रंगमंच , रंगभूमी हे नाव घेतल्यावर आठवणार नाही. रंगीत तालीम, मग प्रयोग आणि प्रेक्षकांची मदार, ते पेपर कटिंग गोळा करणे,आपल्या वर्गात, कॉलेजात एक कलाकार म्हणून वेगळं स्थान निर्माण करणे, किती किती गोष्टी आहेत. की एकदा या क्षेत्राकडे पाऊल उचलेले तर मागे वळून बघावसं देखील वाटत नाही.

असच माझ्या बाबतीत झालं.वयाच्या पंधराव्या वर्षी 'आसमान महल ' आणि 'नो एक्झीट' या नाटकाद्वारे आमचे आगमन झाले. नो एक्झीट खरंच या क्षेत्रात आल्यावर गमन नाही. मी या नाट्य क्षेत्रात खूप जगले अजुनही जगतेच आहे.रंगभूमिशी माझं नातं अतूट आहे. नागपूरमध्ये जन्म झाला आणि नागपूरच कर्मक्षेत्र बनले.आजपर्यंत ब–याच नाटकांमधून भूमिका केल्या. दर्जेदार नाटक आणि नाटककारांद्वारे लिहिल्या गेलेल्या पात्रांना साकार करण्याचं सौभाग्य प्राप्त झालं. नागपूरकर देखील त्यावेळी या नवीन अभिनेत्रीत ब–याच क्षमता असल्याचे मान्य करत होते.नागपूरमध्ये आपल्या नाट्य जीवनाची सुरूवात केली. रंजन दारव्हेकर, रमेश लखमापुरे , सतिश पावडे, डॉ.विनोद इंदुरकर, मदन गडकरी, पराग घोंगे ,संजय पेंडसे इ.नागपुरातील नामवंत दिग्दर्शकांसोबत काम करण्याची संधी मिळाली. राज्य नाट्य स्पर्धा काय ? विदर्भ व राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा काय ? कामगार कल्याण स्पर्धा काय ? की स्वतंत्र स्पॉन्सर प्रयोग काय ? रंगभूमी ही आपल्या सर्वोच्च शिखरावर होती. एकूण ३३ नाट्य संस्था माझ्या माहितीप्रमाणे नागपूरात कार्य करत होत्या .कलाकार नट, दिग्दर्शक ,लेखक, मंच व्यवस्थापक, तंत्रज्ञ , अशी सर्वांची गर्दी असायची धनवटे रंगमंदिर परिसरात ,तन्मय ,तेजस ,थियटर मुव्हमेंट ग्रुप; रंजनकला मंदिर, बंगाली एसोसिएशन आणि बालरंजनसारख्या नावाजलेल्या संस्था नागपूरात सक्रिय कार्य करत होत्या.

माझ्या या नागपूर शहराला दर्जेदार लेखकांनी पण ओळख दिली.सुप्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार यांचे 'वाडाचिरेबंदी'यात आज कुठली अशी क्षेत्रीय भाषा आहे ज्यात उपलब्ध नाही. राष्ट्रीय नाट्य विद्यालयाने 'वाडाचिरेबंदी' चे 'विरासत' या नावाने हिन्दी भाषेत भाषांतर असलेले नाटकाचे भरपूर प्रयोग केले. नामी कलावंतानी यात काम केले आहे. नागपूरमधले दुसरे दर्जेदार लेखक ज्यांचे नाव आवर्जून ध्यावेसे वाटते, ते म्हणजे पराग घोंगे ,यांना हल्लीच त्याच्यां लेखन कार्याबद्दल विदर्भ साहित्य संघ आणि महाराष्ट्रस्तरीय पारितोषिक जाहिर झाले आहे.

प्रकाश एदलाबादकर सारखे सक्रिय नाट्य समीक्षकदेखील आपली सक्रियता दाखवत होते. आवर्जून नाटकांना उपस्थित राहून कुणाचीही भिती न बाळगता नाटकाबद्दल आपले मत व्यक्त करत होते. अशा या उदात्त ,बेभान, गजबजलेल्या रंगभूमीवर वागडणारी मी अनेक स्वप्न डोळयापुढे नाचू लागले, खेळू लागले ,तालिम आणि प्रयोगात स्वतःला झोकून दिलेली, हरवून गेलेली मी -------- अनेक चढ – उतार या भूमीवर बघत होते. आयुष्याच्या अनेक टप्प्याचा अभ्यास होत होता. जीवनाचे धडे मला मिळत होते. रंगमंचावर कायम राहण्यासाठी एका स्त्रीला जसे संघर्ष करावे लागतात.तसा मलाही करावा लागला. घर ,नाते, अभ्यास, कॉलेज आणि अनेक गोष्टीचा विचार न करता मी फक्त एका गणितावर विश्वास ठेवत होते. नाटक एके नाटक आणि नाटक दुने नाटक बस्स असे अनेक संस्कार माझ्यावर घडत होते. यातच मी निर्णय घेतला आपण रंगभूमीसाठीच जागायचं ----- आणि झालही तसंच ,प्रयोग प्रॅक्टीस करत असतांना प्रयोग आणि प्रॅक्टीसच्या पलिकडेही नाटकांचं विश्व आहे, हे मला कळलं आणि मनात एक ध्यास धरला. आपण ते पलिकडचं विश्व जाणून घेतलंच पाहिजे. मग पाऊल अॅकॅडमिक क्षेत्राकडे वळवले. एम.एफ.ए .केलं आणि लखनऊ येथे ऊळश्रिीर ळप ऊीरारींळल अीीं करण्यास गेले,ती नागपूरच्या ब–याच आठवणी मनात घेवून ---- आता मी एक दर्जेदार नाटकांची मुख्य भूमिका करणारी,आतापर्यंत रंगभूमिवर २७– २८ नाटकांतून काम करणारी, एक मॅच्युअर अभिनेत्री झालेली होते. मी लखनऊला ढहशेीू आणि झीरलींळलरश्र अशा दुहेरी गोष्टीतून जात होते.नागपूरच्या आठवणी माझ्या मनात होत्याच. तिथली ती गजबजलेली रंगभूमी अजूनही माझ्या डोळयापुढे होती.एव्हाना मला भारतात आलेल्या रंगभूमीच्या

चळवळीचा प्रत्यय येत होता. तिथे जाऊन मला कळले की महाराष्ट्राची रंगभूमी ही समृध्द रंगभूमी म्हणून ओळखली जाते. मला माझ्या नागपूरच्या रंगभूमीचे महत्त्व पटत होते. बराच काळ हिन्दी रंगभूमिवर काढल्यावर माझे परत नागपूरात ललित कला विभागात नाटक या विषयाची अधिव्याख्याता म्हणून आगमन झाले.मी परत येत असतांना बरेच स्वप्न घेवून आले. एव्हाना मी प्रयोग आणि अलरवशाळल क्षेत्रात प्रगल्भ अशा व्यक्तिमत्वाची झाले होते.नाट्यसंस्था स्थापना किंवा रंगमंडल स्थापना अशा ब–याच गोष्टी आपल्यासोबत परत घेऊन ती आली.पण --- पण मला माझ्या नागपूरच्या गजबजलेल्या रंगभूमीवर भयाण शांतता दिसत होती. बोटावर मोजण्याऐवढे लोकच फक्त कार्य करत होते. नवीन कलाकाराचे आगमन झाले; परंतु परिपक्वता नव्हती, मार्गदर्शकाची कमतरता होती.जुन्या वरिष्ठ मंडळीनी एव्हाना रंगभूमीकडे पाठच केली होती. माझा तर गोंधळच उडाला.मी शोधत होते माझी तीच पूर्वीची कलाकार व प्रेक्षकांच्या गर्दीनी भरलेली रंगभूमी. ढासळून पडलेली ही रंगभूमी उभी राहण्याच्या प्रयत्नात ढासळूनच पडत होती. आज राज्य नाट्य स्पर्धामध्ये देखील ४ व ५ नाटक असतात. कामगार कल्याण स्पर्धाविषयी बोलण्याची गरज नाही. विदर्भस्तरीय एकांकिका स्पर्धा लोप पावल्या. आज परत उठण्याच्या या प्रयत्नात 'सकाळ करंडक ' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धाच पुढाकार घेत आहेत.

पूर्वीच्या नाट्यसृष्टीचा विचार करता अस आढळतं की त्याकाळी कलाकार पैश्याची चिंता न करता स्वखर्चाने देखील नाटक करायचे.नोकरी करून सुद्धा तालमी आणि प्रयोगाच्या वेळा अवर्क्षीीं करायचे;पण तरूण पिढी आज हौशी रंगभूमीपेक्षा व्यवसायिक रंगभूमीकडेच धाव घेत आहे. त्यांना आपल्याला एक झश्ररींषीा मिळतो.आपलं नाव होतेय, आपल्या कलागुणांचे चीज होतेय, अनेक भूमिकांतून काम केल्यावर आपलीच प्रगल्भता वाढते, याच्याशी अजिबात घेणे– देणे नाही.त्यांना हवे असते, मानधन आणि पेट्रोलचा खर्च, त्यांच्या अपेक्षा, गरजा, जीवनशैली फार वेगळी आहे.सत्य परिस्थिति ही आहे, की दर्जेदार नाटक,दर्जेदार कलाकार,असूनदेखील रंगभूमी आज हरवली आहे.

नवीन तरूण कलाकार मुंबईकडे धाव घेऊ पाहतात. त्यांचा कल हा एश्रशलींपळल चशवळर कडेच आहे.माझी ही रंगभूमी आज एकटी झाली. शांत झाली, कलाकारांची वाट पाहत हरवली आहे. पण कुठे हरवली रंगभूमी ? मला खात्री आहे. तो दिवस नक्की उजाडेल जेव्हा पुन्हा एकदा कलाकारांच्या आणि प्रेक्षकांच्या गर्दीने गजबजलेली राहिल माझी रंगभूमी -------

## भाई ..........लाईटस

प्रा.मुस्तजीब खान

तो दिवस आठवत नाही आणि कुठेतरी विसरून जावासाच वाटतो. नाटकातील संवाद वाटतो ; पण ही गोष्ट खरी आहे. त्या संध्याकाळी एक फोन आला .भाई गेले ।. एक ब्लॅक आऊट,परत फेड इन करायची संधीच नाही.दुस-या दिवशीच्या वर्तमानपत्रात बातमी मराठवाडयातील एक हरहुन्नरी तंत्रज्ञ काळाआड ........ ब-याच मोठयामोठया मंडळीचा त्यावर चार ओळींचा शोक संदेश ...... पण आम्हा तंत्रज्ञाचा जो ब्लॅक आऊट झाला तो लवकर फेड इन होईल अस शक्यच नाही.नाटक संपल्यावर लाईट काढताना , त्या लेन्स काढताना ते सगळ तंत्रज्ञान आपल्यानंतरच्या पिढीला आत्मसात व्हावं . अशी इच्छा ज्या भाईकडे होती तोच नव्हतां. या माणसाला सगळे डॉ.आलोक चौधरी म्हणून ओळखत होते.पण आम्हा तंत्रज्ञासाठी तो भाईच.

भाई तसा मराठवाडाभर फिरत होता आणि सगळया नाट्य संस्थाच्या सर्वांवरच त्याच प्रेम मी नांदेडच्या प्रतिभा निकेतन महाविद्यालयातून युवक महोत्सवासाठी वैजापूर येथे आलो असताना भाईशी माझी ओळख झाली. नंतर मी नांदेडच्या 'तन्मय ग्रुप'च्या नाट्य शिबीरात असताना भाई तिथे आले होते . लाईटस ,सेटस आणि मेकअप याबद्दलची ओळख आमच्यासारख्या नवीन लोकांना करून देत . त्यावेळेपासून माझ्यासारख्या नाटकाचं कोणतंच background नसलेल्या एका अनोळखीला भाईनी लाईट काय असतं ते शिकवलं .

त्यावेळी नाटकाचं लाईट करणं म्हणजे Thankless काम होत.परंतु भाईनी याला एक नवीन महत्त्व मिळवून दिलं. आता त्या प्रयत्नामुळेच म्हणा मराठवाडयात एक तंत्रज्ञांची नवीन फळी तयार झाली.मग ते भाई सोबतचे नंदन फाटक असोत वा प्रकाश तापी, या सगळयांना सोबत घेऊन भाईनी एक तंत्रज्ञांची नवीन टीम तयार केली.आमचा सतिश म्हस्के ,शिवा जाधव,सुधीर देऊळगावकर, दीपक मुळे या सर्वांसोबत भाई लाईट अशा प्रकारे डिझाईन करायचे, की प्रत्येकाला त्यात महत्त्वाचा रोल होता. या सर्व प्रकाश योजनाकारांसोबत भाईचे आवडीचे विषय तंत्राशी निगडीत होते. एमएसईबीचे तत्कालीन इंजिनिअर्स भाईचे मित्र, तसं भाई रसायनशास्त्र विषयाशी निगडीत; परंतु त्या नाट्यतंत्राच्या प्रेमापायी नाटकवाले तयार करण्यात त्यानी हयात घालविली.

भाईनी जेव्हा 'नांदीकार अॅकेडमी 'सुरू केली तेव्हा बॅकस्टेजसाठी मी एकटाच विद्यार्थी होतो आणि भाईनी त्यांच्या सिडकोचा राहत्या घरातील तिस-या मजल्यावरील बंगाली पध्दतीच्या खोलीत त्या रंगीत कांचामधून येणारा सूर्यकिरणांचा अँगल समजावीत. प्रकाश योजनेतील रंगसंगती आणि त्याचा पात्रांवर होणारा परिणाम समजावून सांगत.मी इंग्रजी साहित्याचा विद्यार्थी आहे हे जेव्हा भाईना कळालं तेव्हा त्यांनी मला शेक्सपियरच्या हॅम्लेट या नाटकाचा दीर्घांक वा एकांकानं परिवर्तन करावयास सांगितले त्यांच्या आदेशा आणि प्रेमापोटी मी ते केल आणि साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा या प्रात्यक्षिकाच्या निमित्ताने त्यांनी मला अभ्यास घडविला. भाईच्या संगणकात सगळे क्लासिक पुस्तकं इंटरनेटवरून डाऊनलोड केलेले होते . त्यांचं नेहमीच म्हणणं होतं की, ती लाईब्ररी आणखी समृध्द करून विद्यार्थ्यांना सोपवायची आहे.

जेव्हा भाईच्या घरी म्हणा वा त्यांच्यासोबत असू तेव्हा एखाद्या पुस्तकाबद्दल किंवा नवीन तंत्रज्ञानाबद्दल भाई एखाद्या लहान मुलासारखा सतत सांगत राहायचा, कधी इंटरनेट ,तर कधी नवीन संगणकाचं Configuration

भाई नेहमीच नंदन काकाच्या घरी गिरवलीत जाऊन त्यांच्याशी नवनवीन तंत्राविषयी चित्रपटाविषयी, नाटकाविषयी चर्चा करायचे या गोष्टीसाठी स्वत:च्या खिशातून पैसा खर्च करून तिथे दोन तीन दिवस राहून परत यायचे .भाई गिरवलीतून परत आले की, त्यांच्याकडे जाणे वा त्यांच्याशी बोलणे म्हणजे एक मोठं पुस्तक वाचल्यासारखं होतं.ज्यादिवशी त्यांच निधन झालं त्यादिवशीसुध्दा ते इंटरनेटवरून एक सिडी फाईल डाऊनलोड करत होते.

मराठवाडयातील नाटकवाल्यांना आलोकभाई म्हणजे एक आधार होता. नाटक कोणाचं, कोणतही असो भाई आपल्या काईनेटीक होंडावर तिथे हजर, त्या नाटकाच्या संघाला काय तांत्रिक मदत लागते ते सगळं करायला हा माणूस जातीने हजर. मला चांगलं आठवतं भाई फक्त औरंगाबादच नाही तर जालना , परभणीच्या सेंटरवरसुध्दा वेळेआधी हजर असायचे. परभणी नटराज रंगमंदिरासमोरची ती छोटी टपरी ,भाई आले की, तिथे सगळयांना घेऊन पोहे खायचे आणि नंतर लाईट सेट लावयाला स्वत: स्टेजवर उभे असत.

जालन्याच्या सेंटरवर एकदा लातूरच्या कलोपासकच्या संघानी ,मिरजकर सरांच्या टीमनी 'अँटीगनी 'या नाटकाच्या सादरीकरणासाठी येणार असल्याची कुणकुण भाईना लागली आणि भाई तिथे जातीने हजर .FOH लाईट फुलब्रींकर रंगमंदिरच्या छताला टांगले आणि तिथून लाईट का हवी ? याचं जे explanation भाईनी दिलं. तेव्हा लक्षात आलं की, प्रकाश योजनेवेळी नाटकाचा काळ, बाज किती महत्त्वाचा .भाई म्हणाले प्रोसेनियममध्ये एरीना नाटकांचा प्रयोग कमीत कमी लाईट नी एरीनाचा भास निर्माण करायचा . एवढं भाइ सहज बोलायंचे. मग नांदेडच्या सांस्कृतिक मंचचं रातराणी वा संध्याछाया असो राज्यनाट्यच्या प्रयोगाच्यावेळी परभणीला संध्याछायातील वरातीला भाईनी गॅसबत्तीचा जो दृश्य परिणाम दिला वा रातराणीतील रात्री पडणारा प्रकाश या सगळया गोष्टीत भाईची एक वेगळीच केमिस्ट होती.अश्या ब-याच किस्स्यांचा धनी भाई होता.

भाईची ओळख नवीन तंत्रज्ञांना व्हावी यासाठी एक प्रयत्न होणे गरजेचं आहे.परंतु स्वत: एक इन्स्टिटयुट असलेल्या भाईचं documentation त्यांच्या जवळच्यांनी करावं या अट्टहासापोटी हा एक छोटा प्रयत्न .भाईच्या सोबतीचे कुमार सर असतील वा वसंत सूर्यवंशी असतील हे सगळे वरती नाटक करायला एकत्र जमतात आणि आपण खाली असलेले फक्त आठवत राहतो. त्यांच्या कामाला भाईच्या exit ने लाईट चा फेड आऊट ,फेड इन करायचा; पण यासाठी गरज एका त्यांच्याच जवळच्या समवयस्क मित्रांची. ह्या आमच्या आलोक भाईला या नाट्यसंमेलनानिमित्त आमचा सलाम .हॅटस ऑफ दातृत्वाला, भाईच्या ज्ञानाला आणि हौसेला.


पार्वती कॉटन इंडस्ट्रीज
सर्व्हे नं.१९९ घोसापुरी ता.जि.बीड.
फोन नं. ०२४४२ - २३०२९९
हॉटेल सागर
अण्णाभाऊ साठे चौक, जालना रोड, बीड.

## नाटकांशी नातं जोडलेली ग्रामीण रंगभूमी

राजकुमार तांगडे

लेख म्हटलं की ब-याच जणांना अवघड विषयांच्या तासाला बसल्यालगत जांभळी येते. त्यातली तार्कीक भाषा-बोजड शब्द,स्वबुध्दीने काढलेले शब्दांचे अर्थ आणि त्यातले त्यात नाटकावरील लेख ...? ज्यांना सतत लोकांना ऐकवायची -दाखवायची सवय आहे त्यांनी ऐकावं ? नाही..... पण त्यांना बघायला काय हरकत आहे.... दुस-याचं ? दुस-याचं कधी पाहणार.स्वत:चच पण सहज चालता - चालता मागे -पुढे आजू-बाजूला हां मधे मधे अवघड शब्द येणारच नाहीत.

रंगभूमी म्हणजे काय ? पुन्हा आलीच व्याख्या.नाही........ पण तिच्याबद्दलचे आपले अंदाज काय? कशाच्या अधारावर ?,या गोष्टी बघाल्यातर लागतीलच ना.अंधाराचं रूपांतर प्रकाशात करणे म्हणजे ही रंगभूमी पशूतला आणि मानवातला स्पष्ट जाणवणारा फरक म्हणजे रंगभूमी.एखादा भडक रंग जर पशूच्या जवळ अचानक आला तर पशू सैर भैर सुटेल; पण तोच रंग जर मानवाच्या नजरेस आला तर त्याचं कुतूहल जागं होईल.... तो शोध घेईल; पण त्याच्याशी खेळायला लागेल.... आणि कदाचित ते रंग जगण्यातील असतील. मानवाच्या जीवनातील विविध रंग जिथे दाखवले जातात ती रंगभूमी .जाऊदया व्याख्या लिहून कुठे आपल्याला पेपर सोडायचाय ?

बरं रंगभूमीचं नेमक काम काय ? आपण एक ऊदाहरण घेऊ, समजा एक बैल गाळात फसला. तो बरही काढला आणि तो न धुतल्यामुळे वाळला.परिणामी जनावर जखडल्या जातं. जेव्हा आपण त्याला पोहणी पाण्यात घालू तेव्हा तो गाळ गळून पडल्याने जो मोकळेपणा पोहणी पाण्यामुळे जनावराला मिळतो,तोच परिणाम रोजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मानसाच्यावर जो गाळ बाळलेला आहे तो मोकळा करायचं काम रंगभूमी करते. एखादं लहान लेकरू कोप-यात बसून जेव्हा फुंदू फुंदू रडतं. त्याला कुणीही विचारत नाही.अशावेळी जर आपण त्याला जवळ घेऊन विचारलं तर तेव्हा जो त्याचा बांध फुटतो आणि ते लेकरू मोकळ होतं. तेच काम रंगभूमी करते.त्याला जवळ घेऊन मोकळं करायचं काम रंगभूमी करते.रंगभूमी पेरणीचही काम करते. जसं वा-याबरोबर तृण-बीज (गवताचं बी ) चौफेर पसरतं. पाखरांच्या साह्यानेसुध्दा बीज पेरणी होते. तशीच रंगभूमीसुध्दा .... एका पिढीचे अनुभव दुस-या पिढीला सांगते .एका दिशेची संस्कृती ....दुसरीला .त्यामुळे रंगभूमी एक यशस्वी वाहक आहे.रंगभूमीने जिवंत ठेवलाय इतिहास आणि जपल्या परंपरा आणि अगणित लोकांना जिथून ही मेजवाणी मिळाली,ज्यानं मानवाच्या जगण्याला नैसर्गिक तलेजीचं वरदान दिलं.तो ग्रामीण रंगभूमीचा अमृतकुंभ ,झिरपतोय थेंब थेंब समाज जीवनावर सकाळपासून संध्याकाळपर्यंत
दिवसापासून वर्षा पर्यंत .. वर्षानुवर्षापासून आयुष्यभर ... अन् पिढयानं- पिढया.

भल्या पहाटे वेशभूषा करून हरिनाम घेत वाजवत फिरणारा कुडमुडयावाला म्हणजे तिसरी बेल होऊन पडदा उघडतानाच पहिल दृश्य. .पहाटेची आजान असो की मंदिरातली पहाटेची काकड आरती. ग्रामीण रंगभूमीचं पार्श्व -संगीत .सकाळी सकाळी फडर्या आवाजात अल्लख ठोकून भिक्षा मागायला येणारा गोसावी या रंगमंचावरील पात्रच आणि रोजचं नाटक बघत बघत जगणारा समाज आणि रंगमंचावरील पात्रांना जगवणारा समाज .राम प्रहरापासून टाळ वाजवत गल्ली बोळातून घरा-घरात सादरीकरण करणारा वासुदेव .गावामधल्या उंच झाडावर जाऊन घरा घरातल्या प्रेक्षकाचं लक्ष केंद्रीत करणारा पांगुळ, झाडाला रंगमंचाचं ..... घरा घराला आसन व्यवस्थेच रूप देणारा हा कलाकार.भयपटासारखा स्मशानातूनच सजून येणारा शंकराचा भक्त ढोण्या वाजवत छोटया लेकराचं लक्ष वेधून घेणारा मसनजोगी, बालकांनी पहायचं नाट्य म्हणजे बाल नाट्यच घेऊन येतो.ढोलकं वाजवत गावभर फिरून जाहिरात करणारा आणि शेवटी चावडीजवळ खुस-खुशीत विनोद करत तारेवरची कसरत दाखवणारा थरार उभा करणारा डोंबारी..... पुंगी वाजवत गावाला डोलयला लावणारा गारूडी .... आईच्या नावानं गोंधळ घालणारे गोंधळी असो की आयुष्य वाहून देवाची महती जगाला सांगणारे वाघ्या मुरळी एक पात्रीवाला बहुरूपी ...असो, की नंदीवाला ...की गावच्या पिढयानंपिढयाचा बायोडाटा घेउन फिरणारा भाट... सगळेच तुमच्या आमच्या जीवनात रंग भरणारे
रंगभूमीचे कलावंत.अलिखित पण शाश्वत अशा विराट ग्रामीण रंगभूमीच्या डोला-याचे खांब... .जीवन पध्दतीत इतकी प्रचंड झालेली क्रांती पचवून खंबीरपणे उभे ...खरं तर समाजातल्या प्रत्येक घटकास...व्यक्तीस एकदा तरी या ग्रामीण रंगभूमीनं.... रंगमंचावर उभ केलय... मग ते कारण,निमीत्त कुठलंही असो ... हरीपाठाच्या ..तालावर पाऊली खेळणा-या भक्त मंडळीच्या भूमीकेतून असो,की कीर्तन सांगणारे महाराज ..काल्याचा प्रसाद घेण्यासाठी बसलेल्या मंडळींना पाहतानाही तोच भास जाणवणार.तो प्रकार अजून दुस-या व्याख्येतही मांडता येईल. प्रसाद घेण्यासाठी बसलेल्या मंडळीना पाहून... प्रसाद वाटणा-या मंडळीना जो आनंद मिळतो .. तो एक प्रकारे प्रेक्षकांचा आनंद ..जिथे देणारे आणि घेणारे, दाखवणारे आणि पाहणारे एकत्र येतात त्यालाच रंगभूमी म्हणायचं .

बैल पोळयाच्या दिवशी ... संपूर्ण गावाच्या सजवलेल्या बैलांची फेरी निघते तेव्हा चोहो बाजूंनी घडणारं नाट्य आणि मधे प्रेक्षक. हा थाट करणारा अनुभव एकमेव ग्रामीण रंगभूमीचाचं संसाराच्या तापातून थोडस डोक वर काढून ... ग्राम देवतेच्या नावाखाली वर्षातून एकदा भरवल्या जाणा-या यात्रा... आणि त्यातला प्रत्येकाचा रोल प्रतीवर्षी ठरलेल्या तिथीला ठरलेल्या ठिकाणी , ठरलेली मंडळी येउन आपली आपली दुकानं लावतात.अगदी मंदिरा पुढेच पानं टपरी लावता पान फुलवालाच लावणारं ... हॉटेल पुढची पान टपरी... गावाच्या सुरूवातीलाच वाहन तळ लोकांच्या एंट्री ठरलेल्या वाहन तळावरून थेट मंदिरात ... मंदिरातून ..हॉटेलात तिथून करमणुकीच्या ठिकाणी.एंट्री - एक्झीट..मुव्हमेंट ..आणि जनमाणसात असणारा स्पिरीट ..अतुलनियच. यात्रेपूर्वी आणि नंतरचा रिकामा रंगमंच आठवला तर यात्रेच्या काळात जाणून बूजून घडवलेल हे महानाटयच ना... ना संहिता लिखित स्वरूपाची,ना कोणी एक दिग्दर्शक, ना प्रकाश योजना,ना मुद्दाम काढलेल संगीत, ना ठरवलेलं नेपथ्य.. ना प्रेक्षकांचा तोटा, ना कलाकारांचा जे कलाकार तेच प्रेक्षक . फक्त नागपंचमीच्याच दिवशी झोके म्हणजे यापेक्षा अनोखा प्रयोग आणखी काय असतो, आणि हा सनातन वारसा जपणार एकमेव नांव ग्रामीण रंगभूमीचं कारण नगरं ही नव्याच्या शोधात भरकटली.. गावं मात्र जुण्यांचा ठेवा जपली. म्हणूनं तर शहरात वट पोर्णिमेला वडाच्या झाडाचं चित्र काढायची वेळ आली.. आणि ऑक्सिजन -च्या पेटया.इकडे मात्र ती वेळ हे शिलेदार येऊच देणार नाहीत. ग्रामीण रंगभूमीला हातात घेऊन... असच चालायच ठरवलंय त्यांनी ; पण बेडी म्हणून नाही तर घडी म्हणून ..रंगभूमीच कामं यापेक्षा मोठ अजून काय असतयं.. एवढं अलौकिक दुसरी कडे कुठेच नाही.याला साथ आहे ती छोटया - छोटया प्रयोगाची .. रामलीला,दशावतार,सीतास्वयंवर अशी भव्य दिव्य अप्रतिम नाट्य अपत्य.. जगाला अर्पिणारी आमची ग्रामीण रंगभूमीच आहे.

अशा आमच्या परंपरेन आलेल्या अमृत पिऊन ..अविट गोडी अंगिकारलेल्या ग्रामीण रंगभूमीच्या महामेरूला उचलणारी तिची स्वत:ची भक्कम करंगळी तर आहेच; पण आपण ही तिच्या छायेखाली वावरताना छोट्या - छोट्या प्रयोगाच्या लाट्या-काठ्यांनी उचलण्यास हातभार लावून तिचा सुसंस्कृत वारसा पुढच्या पिढीपर्यंत डोक्यावर वाहू या.

# ' लोकल 'कडून ' ग्लोबल 'कडे जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाट्यशास्त्र विभाग

प्रा.डॉ.शशिकांत बऱ्हाणपूरकर

सध्याचा काळ हा जागतिकीकरणाचा काळ आहे.या काळाने समाजापुढे अनेक प्रकारची आव्हाने निर्माण केली आहेत. त्याचवेळी साहित्य आणि कलाक्षेत्रही त्याला अपवाद राहिलेले नाही. संदर्भ जर कलाक्षेत्राचा, कला विषयक शिक्षणाचा असेल तर काळाची पावले ओळखून संबंधित अभ्यासक्रम त्यादृष्टीने पुनर्रचित करणे अत्यावश्यक असते. शिवाय कलेच्या साधनेसोबतच ते उपजीविकेचेही साधन ठरणे महत्त्वाचे असते. जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत कलावंत म्हणून स्वत:ला सिध्द करणे आणि आपल्या अस्तित्वासाठी संघर्षरत राहण्याशिवाय आज कलावंताना पर्याय नाही. त्यामुळे कला-ललितकलेच्या शिक्षणाच्या, प्रशिक्षणाच्या संदर्भात भूमिका घेणे मला महत्त्वाचे वाटते. आणि म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुखपद स्वीकारल्यानंतर या भूमिकेतून विभागाची पूर्नरचना ,पुन:उभारणी करण्याचे ठरविले .यादृष्टीने हे डेलरश्रॆ ञ्रथेलरश्रब्रीद ठरवून विभागाला गती देण्याचा प्रयत्न केला.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित अशी राष्ट्रकुल शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे मला इंग्लंड मधील मॅंचेस्टर युनिव्हर्सिटी मध्ये नाट्यशास्त्रात पीएच.डी.करता आली. युजीन आयनेस्को, मार्टीन एस्लीन ,ऑगस्तो बोवाल अशा आंतरराष्ट्रीय रंगकर्मी आणि तज्ञां सोबत विचारांची देवाण घेवाण करता आली. इंग्लंडमधील विविध नाट्यसंस्थासोबत काम करता आले. युरोपातील पाच वर्षाच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचा मला निश्चितच फायदा झाला हा अनुभव एक नाट्यकर्मी म्हणून मला खूप समृध्द करून गेला.

नाट्यशास्त्राचे उच्च आणि विशेष शिक्षण घेण्याची संधी अशाप्रकारे मला मिळाली. मॅंचेस्टर युनिव्हर्सिटी इंग्लंडबरोबरच रोझ ब्रुफोर्ड कॉलेज, इंग्लंड, बर्लीनर एनसेंबल बर्लीन (जर्मनी) थिएटर कंपनी (पॅरीस) , फ्रांस आणि थिएटर पेडॉगागी, झुरीच
(स्वित्झर्लंड) येथील अभ्यासक्रमही अनुभवता आले. त्यांचा नाट्यशिक्षणविषयक दृष्टीकोन, नाट्यशिक्षण पध्दतीचा प्रभाव मला समृध्द करून गेला. त्यातूनच लोकल टू ग्लोबल च्या दृष्टीकोनाची, भूमिकेची गरज भासू लागली. वैश्विक होण्याच्या दृष्टीने मला ही भूमिका महत्त्वाची वाटते. प्रादेशिकतेचे भान ठेवत आंतरराष्ट्रीय पातळीवर योगदान देऊन वैश्विक पातळीवर कलेच्या प्रांतात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचे नाट्यशास्त्र विभागाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी मी परदेशात जाऊन जे शिक्षण घेतले, अनुभव घेतले, ती शिदोरी निश्चितपणे हा हेतू साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल.

१९७३ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग सुरू झाला. नाटक या विषयाचे शास्त्रीय शिक्षण-प्रशिक्षण देणारा हा उपक्रम आज एक अत्यंत महत्त्वाची विद्याशाखा ठरला आहे. या विभागापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर नाट्यशास्त्र विभाग सुरू झाले आहेत. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही अद्ययावत नाट्यशिक्षणाची प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे पायाभरणी याच विभागाने केली आहे. त्यामुळे नव्या काळाशी हा विभाग कसा सुसंगत होतो, याची उत्सुकता सार्वत्रिक होती. म्हणून नाट्यशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणून माझ्यावरील या अपेक्षांची आणि जबाबदारीची मला जाणीव होती. या जाणिवेतूनच या विभागाचा कायाकल्प करण्यात मला यश आले आहे. सर्वात प्रथम कार्य होते ते या विभागाच्या प्रतिमा निर्मितीचे एक स्वस्थ , सुदृढ वातावरणाची निर्मिती करणे आणि येथे आपले करिअर घडू शकते असा आत्मविश्वास प्रवेश घेणा-यांमध्ये निर्माण होणे आवश्यक असते. हा केवळ एक शैक्षणिक विभागाच नाही तर हे कलेचे माहेरघर आहे. नाट्यचळवळीचे आणि सांस्कृतिक उपक्रमांचे केंद्र आहे अशी भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

विभागाच्या अभ्यासक्रमानुसार प्रात्यक्षिकांवर भर देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. सैध्दांतिक पाठ्यासोबतच कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आम्ही प्रशिक्षित करीत आहोत. नाट्यवाचन, लेखन कार्यशाळेपासून तर व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेपर्यंत, चित्रपट-नाट्य रसग्रहणापासून ते मूकअभिनय कार्यशाळेपर्यंतचे आयोजन आम्ही केले आहे. छाऊ, थांगटा या लोकनृत्य नाट्यावरील कार्यशाळा ,व्हाईस कल्चर कार्यशाळा ,नृत्य संवाद कार्यशाला, अभिनय कार्यशाला, रंगभूषा कार्यशाला अशा विविध कार्यशाळांचे आयोजन सातत्याने करण्यात येते. याशिवाय दरवर्षी होणारा नाट्यमहोत्सव ,एकांकिका महोत्सव आज लोकाभिमुख झाला आहे. विविध स्पर्धा आणि त्यातील या विभागातील विद्यार्थ्यांचे यशही उल्लेखनीय आहे. आज प्रक्रियेतून अनेक विद्यार्थी मनोरंजन उद्योग क्षेत्रात आपला जम बसवित आहेत.आज अनेक नामवंत अभिनेते, दिग्दर्शक,लेखक या विभागाचे विद्यार्थी होते हे सांगताना अभिमान वाटतो.

नाट्यशास्त्र विभागात अनेक रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आम्ही सुरू केले आहेत. 'डिप्लोमा इन टी.व्ही. प्रोडक्शन्स अॅंड बेसिक्स इन फिल्म मेकींग' हा त्यातलाच एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. 'सर्टीफिकेट इन योगा' हा अभ्यासक्रमही या वर्षापासून सुरू करण्यात आला आहे. तर पुढील सत्रापासून मॉडेलिंग , फॅशन डिझायनिंग ,लोकनाट्य ,बालनाट्य चित्रपट रसग्रहण आणि इव्हेंट मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम आम्ही सुरू करीत आहोत.याशिवाय बी.पी.ए. ,बी.डी.हे स्नातक पातळीवरील तर एम.पी.ए. हा स्नातकोत्तर अभ्यास अधिक प्रभावी करीत आहोत. कला क्षेत्रात करिअर करण्यासाठी १२ वी नंतर लगेच बी.पी.ए.च्या अभ्यासक्रमांतर्गत कोणालाही नाट्य,संगीत ,नृत्य या विषयांच्या एकत्रित अभ्यासक्रमासाठी भाग घेता येतो. त्याशिवाय नाटकाच्या कोणत्याही विषयावर पी.एच.डी.करण्याची सोयही या विभागात आहे.

उपक्रमशीलता हे नाट्यशास्त्र विभागाचे वैशिष्ट्य आहे. विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधला जावा. कार्यानुभवाच्या प्रक्रियेतून परिपक्वता लाभावी या उद्देशाने विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले जाते. प्रात्यक्षिकांना प्राधान्य देणारा अभ्यासक्रम असल्याने २४ तासही विभाग उघडा असतो. संगणकापासून वाद्यापर्यंत , वृत्तपत्रांपासून संदर्भ ग्रंथापर्यंतची सेवा विद्यार्थ्यांना पुरविली जाते. सातत्याने तज्ञांचे ,मान्यवरांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.राजदत्त, सागर सरहदी, महेश मांजरेकर , मकरंद अनासपुरे,अजय अंबेकर, सतीश आळेकर,वामन केंद्रे, अनामिका हक्सर, प्रा.दत्ता भगत, दिलीप प्रभावळकर, कमलाकर नाडकर्णी, निळू फुले, निशिगंधा वाड, रा.रं.बोराडे, निरंजन गोस्वामी, न्या.नरेंद्र चपळगावकर अशा अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले आहे. जागतिक ख्यातीप्राप्त रंगकर्मी आणि अमेरिकन फुल ब्राईट स्कॉलर ब्रायन ब्रॉफी यांची दोन दिवसीय कार्यशाळा अतिशय महत्वाची होती. या कार्यशाळेतून जागतिक पातळीवर सुरू असलेल्या अभिनयाच्या, दिग्दर्शनाच्या आणि एकूणच रंगभूमीविषयक भूमिकेची माहिती ब्रायन ब्रॉफी यांनी दिली. याशिवाय प्रादेशिक कलांमध्ये आगळे -वेगळेपण जपणा-या डॉ.विश्वजितसिंग यांच्या 'थांगटा', भूमिकेश्वर सिंग यांच्या' छाऊ' या कलांवरील कार्यशाळाही प्रेरणादायी होत्या. त्याशिवाय मंजुल भारद्वाज यांची' थिएटर ऑफ रिलेव्हन्स ' या विषयावरची कार्यशाळाही समकालीन रंगभूमीवर प्रकाश टाकणारी होती. तर प्रभाकर भावे यांची' रंगभूषा व मुखवटे 'यावरील कार्यशाळा प्रत्यक्ष रंगभूमीवर रंगभूषेचा वेगळा प्रयोग करण्याच्या दृष्टीने प्रेरणा देणारी ठरली.

नाटक हे तर नाट्यशास्त्र विभागाचे मुळ अंगभूत कार्य आहे. पण त्यासोबतच नृत्य , नाट्य आणि साहित्य याविषयी गंभीरपणे काही उपक्रम राबविणे उपयुक्त ठरले.यादृष्टीने नृत्य- नाट्य व कार्यशाळा, नृत्यसंवाद कार्यशाळांचे आयोजन पारंपारिक नृत्यशिक्षणापेक्षा आणखीच उपयोगी पडताना दिसले. ज्ञानासोबत दृष्टी मिळावी. कलासाधनेसोबत व्यावहारिक शिक्षण मिळावे अशी आमची भूमिका आहे. याप्रकारे नाट्यलेखन ,नाट्यवाचन कार्यशाळेच्या वेगळेपणाचाही उल्लेख आवर्जून करावा लागेल. नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत हितकारक ठरू

शकेल असा हा उपक्रम आहे. नवनवीन नाट्यसंहितेचे वाचन त्या अनुषंगाने लेखकांशी चर्चा ,यातून विद्यार्थ्यांनाही नाट्यलेखनाची आवड लागावी. विद्यार्थ्यांमधूनही लेखक तयार व्हावेत ही त्या मागची भूमिका आहे. आज नाट्यशास्त्राचे अनेक आजी -माजी विद्यार्थी स्वतंत्रपणे एकांकिका , नाटक यांचे लेखन करीत आहोत. या कार्यक्रमाची उपयुक्तता आणि महत्व बघून महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय, मुंबईच्या वतीने अशाच एका नाट्यवाचन -नाट्यलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते आणि त्यात खास नाट्यशास्त्र विभागातील नाट्यलेखक विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते . अलीकडे विभागाने आयोजित केलेल्या नाट्यवाचन - नाट्यलेखन या उपक्रमासाठी ख्यातनाम नाटककार सतीश आळेकर ,ख्यातनाम दिग्दर्शक वामन केंद्रे, नाटककार चं.प्र.देशपांडे ,दिलीप जगताप आदी प्रभुती खास या नाट्यवाचन -नाट्यलेखन कार्यशाळेसाठी विभागात आले होते.

विभागाच्या वतीने विशिष्ट प्रसंगी वेगवेगळे कार्यक्रम इतरत्रही सादर केले जातात. ४५ व्या मराठी चित्रपट पुरस्कार वितरणाच्या सोहळयात विभागाच्या वतीने थांगटा आणि भरतनाटयम या दोन नृत्यप्रकाराचे फ्यूजन सादर करण्यात आले .याशिवाय महाराष्ट्राचा लोकलाविष्कार या कार्यक्रमातंर्गत पोवाडा, भारूड, बतावणी, लावणी या लोककलांचेही वैशिष्टयपूर्ण फ्युजन सादर करण्यात आले. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक पध्दतीने हे कार्यक्रम सादर केले.ज्याची पावती प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक एन.चंद्रा यांचेसह इतर अनेक नाट्यचित्रपट कलावंतानी दिली.

जागतिक रंगभूमीसाठी योगदान ठरणा-या 'एन्सायक्लोपिडिया ऑफ एशियन थिएटर ' या जागतिक पातळीवरील एन्सायक्लोपिडियात माझ्या रंगभूमीविषयक १७ लेखांचा समावेश करण्यात आला आहे. हा एकप्रकारे नाट्यशास्त्र विभागाचाही एक सन्मानच आहे. या एन्सायक्लोपिडियाला २००७ सालचा चॉईस मॅक्झीनचा सर्वोत्कृष्ट ॲकेडमिक ग्रंथाचा पुरस्कार मिळाला आहे. शिवाय अमेरिकेतील अमेरिकन लायब्ररीनेही त्यास सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा किताब बहाल केला आहे.

व्यावसायिक रंगभूमीच्या पार्श्वभूमीवर विभागाने आपले स्वत:चे प्रॉडक्शन हाऊस सुरू केले आहे. या अंतर्गत' नटसम्राट ' हे प्रसिध्द नाटक विभागाने बसविले आहे. मराठवाडयात या नाटकाचे प्रयोग सध्या सुरू आहेत. होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी विभागातील प्राध्यापकांच्या अंशदानातून शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. सँटर्ड क्लब अंतर्गत वेगवेगळे उपक्रमही विभागाच्या वतीने राबविण्यात येत आहेत. यावर्षी 'मनस्विनी' हा स्त्री -कला साहित्य उत्सवाचा आगळा वेगळा उपक्रम विभागाने आयोजित केला होता. सर्वच उपक्रमांची यादी देणे शक्य नाही. इतके उपक्रम विभागाच्या वतीने राबविण्यात आले आहेत.

एकूणच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात प्रोफेशनल कॉंपिटंसी कशी येईल हा आमचा प्रयत्न असतो. बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातून आलेले असतात.त्यांच्या स्वप्नांना आकार देण्यासोबतच वास्तवाचे भानही आम्ही त्यांना करून देतो. आयुष्यात कलावंत म्हणून उभे राहण्याची त्यांची ऊर्मी जोपासण्यासाठी त्यांना उर्जा देण्याचा आमचा प्रयत्न असतो.नाट्यशास्त्र विभाग हा मुळातच आगळा -वेगळा विभाग असल्याने आणि मनोरंजन उद्योगाशी संबंध असल्याने अधिक मोठी जबाबदारी या विभागावर आहे. एक विभागप्रमुख म्हणून त्याची मला जाणिव आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे.त्याचे समाधानही आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नागनाथ कोत्तापल्ले आणि विद्यापीठाच्या सर्व अधिकारी मंडळाच्या पाठिंब्यामुळे मला ही जबाबदारी पार पाडता आली.त्याच्यांच पाठिंब्यामुळे पुढेही नाट्यशास्त्र विभागाच्या विकासासाठी मी प्रयत्नरत राहणार आहे.

या विभागासाठी आणखी खूप काही करायचे आहे. ' लोकल' कडून ' ग्लोबल 'कडे जायचे आहे. काही राष्ट्रीय आंतराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी शैक्षणिक करार होऊ घातले आहेत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रम अधिक प्रभावी करायचे आहेत. हा विभाग मराठवाडयातीलच नव्हे तर देशातील कलावंतांसाठी कलेचे माहेरघर ठरावे, अशी माझी इच्छा आहे. याशिवाय माजी विद्यार्थ्यांची एक संघटना आकारास येत आहे. सांस्कृतिक चळवळीची स्पंदने गतिमान व्हावी या दृष्टीने कलावंतांना शक्य तशी मदत नाट्यशास्त्र विभाग करतो आहे.एक संशोधन केंद्र म्हणूनही नाट्यशास्त्र विभागाला आकार यावा यासाठीही प्रयत्न सुरु आहे.नाट्यशास्त्र विभागातील नाटकांच्या ध्वनीफिती, चित्रफितींचा मोठा संग्रह या संशोधन कार्यासाठी तसेच अनेक लघुशोध प्रबंध संशोधनासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या शैक्षणिक सत्रापासून चार नव्या अधिव्याख्यात्यांची नियुक्ती विद्यापीठाने केली आहे. प्रा.डॉ.जयंत शेवतेकर (अभिनय, नृत्य), प्रा.डॉ.सतीश पावडे (निर्मिती ,दिग्दर्शन, नाट्यलेखन) , प्रा.स्मिता साबळे (नाट्यनिर्मिती, दिग्दर्शन) , प्रा.अशोक बंडगर (स्टेज क्राफ्ट) , प्रा.गजानन दांडगे (स्टेज क्राफ्ट) , या सर्व अध्यापक वृंदांच्या प्रयत्नातून नाट्यशास्त्र विभाग अधिक कार्यक्षम व चैतन्यशील होत आहे. नाट्यशास्त्र विभागाच्या विकासासोबतच परिसराच्या सृजनात्मक विकासाचा प्रकल्पही मार्गी लागला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यासाठी मोठी आर्थिक तरतुद केली आहे.

सध्याच्या जगाचा वेध घेत या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना समाधान लाभावे, करिअरच्या दृष्टिने त्यांची तयारी व्हावी,एक चांगले कलावंत, तंत्रज्ञ म्हणून त्यांचे नाव व्हावे यादृष्टीने नाट्यशास्त्र विभाग सदैव तत्पर राहणार आहे. याशिवाय लवकरच दूरदर्शन मालिका, माहितीपट आणि मनोरंजनपर कार्यक्रमांची निर्मितीही विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे.विभागाला फक्त नाटकापुरते मर्यादित न ठेवता त्यास परफॉर्मिंग आर्टस (प्रादर्शिक कला) , विभागाचे स्वरूप मिळावे, यादृष्टीने आमची पुढची वाटचाल सुरू आहे.



# शांतता ! कोर्ट चालू आहे ! विजय तेंडुलकर

प्रा.डॉ.अलका चिडगोपकर

'शांतता ! कोर्ट चालू आहे' या नाटकांच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत आपल्या नाट्यकृतीच्या जन्मासंबंधी बोलताना तेंडुलकर म्हणतात, 'रंगायनच्या जिद्दी कलावंतानी प्रयोगाआधी दोन दिवसपर्यंत चिकाटीने पाठपुरावा करून प्रस्तुत नाटक पूर्ण करून घेतले.' या नाटकाचा विषय आणि या नाटकातून प्रकटणा-या दुय्यम दर्जाच्या व्यक्तिरेखा त्यांना नवरात्रात अभिरूप न्यायसभेचा कार्यक्रम करण्यासाठी पार्ल्यात आलेल्या, काही मंडळांमुळे सुचल्या तर या नाटकाची तांत्रिक बाजू उभी करताना न्यायसभेशी संबंधित अशा नाटक, चित्रपट व पुस्तकांचा त्यांना उपयोग झाला. ' वुई आर नो एंजल्स' या इंग्रजी नाटकावरचा जुना चित्रपट, 'डेंजरस गेम'हा डयुरेनमान या जर्मन कादंबरीकाराची कादंबरी , 'डॉक्टर लागू'या आचार्य अत्रे यांच्या नाटकाचा शेवटचा अंक आणि जे.बी. प्रीस्टली यांचे टाइम फ्लेज यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख विजय तेंडुलकरांनी आपल्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकाच्या प्रस्तावनेत केला आहे.

विजय तेंडुलकरांचे सर्जन प्रक्रियेसंबंधी स्वत: चे असे मत आहे.' मी माझ्या लेखनापासून वेगळा होऊच शकत नाही ' या लेखात त्यांनी म्हटले आहे , ङ्ग वेगवेगळया भाषांतील गुणवत्तापूर्ण साहित्याचे साक्षेपाने केलेले वाचन, तटस्थतेबरोबर आवश्यक असणारी भावनिक गुंतवणूक आणि वैयक्तिक जीवनानुभवातून सहजपणे होणारे प्रकटन हे सर्जन प्रक्रियेला साहाय्यभूत होणारे घटक आहेतङ्ग. (ललित २००८ / पृष्ठ क्र.१०७)' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकात एका अविवाहित स्त्रीकडे समाज किती विकृत नजरेने पाहतो हा सामाजिक प्रश्न अधोरेखित केलेला आहे. या सामाजिक प्रश्नाच्या आवर्तनात खोलवर बुडत जाणारी कु. बेणारे, या मध्यवर्ती पात्राच्या भावानुभूतीच्या आंदोलनाला ' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकात महत्त्व प्राप्त होते. कु.बेणारे ह्या पात्राने परंपरागत कर्मठ समाजव्यवस्थेविरूध्द केलेल्या एकाकी संघर्षाचे चित्रण येते.हा संघर्ष केवळ -प्रौढकुमारिके पुरता मर्यादित न राहता तो कुमारी मातेच्या प्रश्नात पर्यवासित होतो.समाजजीवनाचे प्रतिनिधित्व करणारी या नाटकातील अन्य पात्रे कु. बेणारेच्या संदर्भात अनेक प्रश्नांची वलये निर्माण करून गिधाडीवृत्तीने तिला टोचे मारू लागतात. सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक वातावरणातून निर्माण झालेली समाजाची पारंपारिक मूल्याधिष्ठित विचार प्रणाली व बेणारेसारख्या व्यक्ति निर्मितीतील प्रारंभी स्वच्छंदी ,आक्रमकपण कालांतराने अटळ पराभूततेकडे झुकणारी मनोवस्था ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या तेंडुलकरांच्या नाट्यसंहितेत व्यक्त होते.

या नाटकातील पहिल्या अंकात नाटकाची जाहिरात होते ती मुंबईच्या जागृती सभेच्या अभिरूप न्यायालयाची. रात्रौ ठिक आठ वाजता या अभिरूप न्यायालयात एक काल्पनिक खटला चालविला जाणार होता, तो अण्वस्त्र निर्मितीबद्दल प्रेसिडेंट जॉन्सन यांच्यावर; पण प्रत्यक्षात मात्र वेळकाढू धोरणाच्या नावाखाली या नाटकातील सुखात्मे,श्री व सौ.काशीकर, पोंक्षे, रोकडे, कर्णिक व बेणारे ही पात्रे सामंतला घेऊन एक तालीम करतात. सामंत हे पात्र नाटकाच्या,प्रयोगासंबंधी पूर्णपणे अनाभिज्ञ असते. 'जस्ट टाईमपास' म्हणून नाटकातले नाटक सुरू होते. हे नाटकातले नाटक म्हणजे केवळ रिकामपणचा खेळ .तोही लुटूपुटीचा .या लुटूपुटीच्या खेळात बेणारेला आरोपी ठरवून भ्रूणहत्येचा आरोप तिच्यावर ठेवला जातो .हा ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' ह्या नाटकाचा आरंभ होय.ह्या नाटकाच्या आरंभाचे सूचन तेंडुलकरांनी कु.बेणारेच्या मध्यवर्ती भूमिकेतून कसे केले आहे पहा 'आपले पाय चालत असतात एका अज्ञात संकटाची वाट, लाटेमागे फुटत जाते आंधळी होऊन एकेक लाट' (पृष्ठ क्र.१२) हा झाला नाटकाच्या संविधानकातील पहिला टप्पा. संविधानकातील दुस-या टप्प्यात कु.बेणारेवर केलेल्या आरोपातील साक्षी- पुरावे अन्य पात्रांकडून तपासले जातात.बेणारे वगळता सगळीच पात्रे या लुटूपुटीच्या काल्पनिकतेत बेणारेविरूध्द साक्ष देतात आणि बघता बघता बेणारेवर केलेल्या आरोपातील खेळाला क्रौर्याची धार प्राप्त होते.तिच्या जीवनातील गुपिताची इतर पात्रांना चाहूल लागल्याने त्याची शहानिशा करून बेणारेच्या जीवनातील कटू सत्याचा शोध सुरू होतो. आणि काल्पनिक खेळातील या अभिरूप न्यायालयात प्रोफेसर दामलेंशी असलेल्या अनैतिक संबंधाचे वाभाडे काढायला सुरूवात होते; तेव्हा कु .बेणारे या पात्राला अनेक पेचप्रसंगाना तोंड द्यावे लागते. हा नाटकातील संविधानकाचा दुसरा टप्पा होय.

' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकातील तिस-या टप्प्यावर अभिरूप न्यायालयातील या काल्पनिक खेळात कु .बेणारेची अवस्था पिंज-यात कोंडलेल्या भयभीत जनावरासारखी होते.तिस-या टप्प्यावर नाटकातील सामंत हे पात्र वगळता सगळीच पात्रे तिला बदफैली ठरवून तिच्यावर प्रश्नांचा भडिमार करीत राहतात. कधी चेष्टने तर कधी पोरकटपणाने उत्तरे देणारी बेणारे नाटकाच्या तिस-या टप्प्यावर मात्र आक्रमक न राहता गलितगात्र होते. तिचे सारे अवसानच संपुष्टात येते. आणि भूतकाळात हातून नकळतपणे घडलेल्या पापाची कबूली देते. तद्वतच प्रौढपणी केलेल्या जाणत्या प्रेमाचाही स्वीकार करते. पण ते प्रेम,प्रेम उरत नाही कारण मनाने केलेल्या ह्या प्रेमासाठी, भक्तीसाठी देहाचा नैवेद्य झाला आणि बेणारेचे प्रेम पुन्हा एकदा कलंकित झाले.कारण तो देव नव्हताच तो माणूसच होता, ज्याला फक्त शरीर हवं होतं.पण शरीराने दिलेल्या तृप्तस्वर्गीय क्षणाचा साक्षीदार तिच्या गर्भात वाढतो आहे आणि तोच आता तिच्या जीवनातील प्राणतत्त्व ठरला असल्याची कबुली ती अन्य पात्रांना देते. तथापि ,कोणीही तिचा सहानुभूतीने विचार करायला तयार नसते.

नाटकातील संविधानकाच्या तिस-या टप्प्यावर विवाहाविना मातृत्वाची ,ही समस्या समोर येताच न्यायाधीश झालेले काशीकर, बेणारेला जिवंत ठेवून तिचा गर्भ मरेपर्यंत नष्ट करण्यात यावा अशी शिक्षा देतात; तेंव्हा बेणारे या शिक्षेला विरोध करते. आवेगाने फुटता फुटता निपचित टेबलावर मान टाकते. तिचे नुसतेच उमासे .नाटकाच्या हया शेवटच्या टप्प्यावर बेणारेची जीवघेण्या पेचप्रसंगातून सुटका होते.तेंव्हा एक चौकस चेहरा, बंद झालेला दरवाला उघडून हॉलमध्ये एक व्यक्ती प्रवेश करतो आणि प्रश्न करतो ङ्ग कार्यक्रम सुरू झाला काय ? अभिरूप न्यायसभा ङ्ग(पृष्ठ क्र.९७) आणि सारे भानावर येतात 'जस्ट टाईमपास' म्हणून सुरू झालेला नाटकातील नाटकाचा खेळ संपुष्टात येतो. सगळी पात्रे भराभर नॉर्मलवर येतात.पण गलितगात्र झालेली बेणारे मात्र एकटीच रंगभूमीवर उरते आणि' शांतता ! कोर्ट चालू आहे ' हे नाटक बेणारे हया व्यक्तिमनाच्या शोकात्मतेत अखेर पर्यवसित होते.

विजय तेंडुलकरांच्या ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकातील संविधानक नाटकाच्या मध्यवर्ती सूत्राची दिशा लक्षात घेता टप्प्याटप्प्याने विकसित झालेले दिसते. तेंडुलकरांनी नाटकातले नाटक अशी योजना आखल्याने व हा एक काल्पनिक खेळ आहे याची जाणीव सतत अधून मधून देत राहिल्याने संविधानकाची रचना गुंतागुंतीची झाली असली तरी प्रेक्षकांवर वा वाचकांवर या गंभीर प्रश्नाचा सतत मानसिक ताण न येता या नाटकाचे विषयसूत्र प्रेक्षकांना वा वाचकांना पूर्णपणे अवगत करता आले. नाटक या वाङ्मयप्रकारासंबंधी प्रा.दत्ता भगत म्हणतात, ङ्गनाटकातील घटना आणि प्रसंग यात सुसंवाद असला आणि पात्रांच्या परस्पर वर्तनात एक प्रकारची संगती असली की संविधानकचा परिणाम एकात्म होतो ङ्ग( नाटक / यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ श्री.दत्ता भगत / पृष्ठ क्र.१७ ) या विधानाचा

प्रत्यय ‘ शांतता ! कोर्ट चालू आहे ’ या नाटकात आल्याखेरीज राहात नाही. नाट्यात्म साहित्यकृतीतून अभिव्यक्त होणा-या व्यक्ती म्हणजे पात्र ,पात्रचित्रण हा नाट्यलेखनाचा एक अविभाज्य घटक आहे .नाटक संवादातून रंगमंचावर सादर करण्याचे कार्य पात्रेच करीत असतात. लेखक म्हणजे एक प्रतिविश्वकर्मा होय अशी एक सर्वमान्य कल्पना आहे. या कल्पनेच्या परिभाषेत बोलायचं झाल तर जितकं दु:ख भरलेलं तेंडुलकरांना दिसलं त्यापेक्षाही अधिक दु:ख ज्यात भरलेलं आहे असे एक स्वनिर्मित प्रतिविश्व तेंडुलकरांनी निर्माण केलं. नाटककाराच्या लेखनामागे त्याची अंत:प्रवृत्ती, त्याचे मनोधर्य आणि त्याचे विशिष्ट मनोव्यापार असतात. यादृष्टीने ‘ कटू सत्याचे ’प्रयोग या लेखातील रेखा इनामदार यांचे विधान लक्षात घ्यावे लागते. इनामदार म्हणतात, तेंडुलकरांना विचारप्रणालीच्या पलीकडे जाणारे, गती कुंठित करणारे अनुभव संक्रमित करायचे होते. असे अनुभव येणा-या व्यक्ती त्यांच्या नाटकांच्या केंद्रस्थानी आहेत. यापैकी बहुतेक माणसे विचाराने नव्हे तर अंत: प्रेरणेने बोलतात, वागतात (ललित ऑगस्ट २००८ / पृष्ट क्र. ४२-४३ )तेंडुलकरांनी निर्मिलेले मानवी स्वभावांचे नमुने व त्यांच्या संघर्षातून उभे केलेले पेचप्रसंग वास्तवतेला धरूनच आहेत. वास्तवाप्रमाणेच अघटिताची देखील माणसाच्या मनाला भुरळ पडते. वास्तवाबद्दलची आत्मियता आणि अघटिताच्या दर्शनाची ओढ हे मनुष्याच्या मनाचे दोन्ही धर्म सारखेच प्रभावी आहेत. मातीची बाहुली करून त्यात विधाता फुंकर घालतो आणि त्यांना पृथ्वीवर सोडतो, अशी एक सांकेतिक कल्पना आहे. तेंडुलकरांनी ‘ शांतता ! कोर्ट चालू आहे ’या नाटकातील बेणारे या बाहुलीत(पात्रात)अघटिताची आधी फुंकर घालून मगच तिला रंगभूमीवर उभी केली असे म्हणावयास हरकत नाही. तेंडुलकरांच्या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र कु.बेणारे या केंद्रीभूत पात्राभोवतीच गुंफले गेले आहे. हे नाटक स्त्रीकेंद्रीभूत आहे.कु.बेणारे हे पात्र शाळेतीलएक शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. बेणारे ही शिस्तप्रिय, विद्यार्थ्यांना शिकविण्यात रक्त ओतणारी, स्वत:च्या आयुष्यावर, स्वत:च्या इच्छेवर स्वत:चाच अधिकार सांगणारी, कधी स्वत:तच रमणारी तर कधी अल्लडपणाने वागणारी,कधी स्वत:चे खरे स्वरूप लपविण्यासाठी इतरांना गोंधळात टाकणारी,कधी गंभीर होत जाणारी तर कधी विक्षिप्तासारखी वागणारी तर कधी स्वत:शीच संवाद साधाणारी अशी बेणारेची कितीतरी रूपे तेंडूलकरांच्या ‘ शांतता !कोर्ट चालू आहे’ या नाटकात पाहायला मिळतात.

बेणारे हे पात्र नाटकातील अन्य पात्रांपेक्षा वेगळे आहे. ती प्रौढ कुमारिका आहे, अतिशय बुध्दिमान व स्वत:चे काम चोखपणे पार पाडणारी .पण दु:ख भोगाचा भोगवटा नियतीनेच बेणारेच्या कपाळी गोंदलेला अभिरूप न्यायसभा ही मयसभाच ठरते. बेणारेच्या दृष्टीने अन्य पात्रांनी या मयसभेत ओढल्यावर बेणारेची संभ्रमावस्था तिला त्यातून बाहेर पडू देत नाही. कधी पोरकटपणाने ,तर कधी उपरोधाने, तर कधी स्वत:च्या बुध्दिमत्तेच्या जोरावर इतरांना मूर्खात काढण्याच्या सवयीने ती अन्य पात्रांची खिल्ली उडवित राहते .पण कालांतराने तिची आक्रमकवृत्ती, नकारात्मकतेचा सूर अखेर पराभव स्वीकारत होकारात पर्यवसित होतो. बेणारेच्या जीवनातील दाबून,दडपून टाकलेला भूतकाळ जागा होतो .वर्तमानाचा विसर पडून भूतकाळातील कटू स्मृती तिच्या मनात सजग होतात आणि बेणारे हे पात्र आत्मचरित्रात्मक तपशीलाचे निवेदन करू लागते .तथापि बेणारे हे पात्र तेंडुलकरांच्या भावविश्वाची निर्मितीच असते हे विसरता येणार नाही.

पात्रनिर्मितीत स्वभाववैचित्र्य निर्माण करण्याचे कौशल्य नाटककाराच्या ठिकाणी असावे लागते ते तेंडुलकरांच्या ठिकाणी आहे. आणि ह्या पात्राचे मूळ कथानकांशी संबंध आहेत हे नाटककाराला दाखवून द्यावे लागते. ते तेंडुलकरांनी दाखवून दिले आहे. भारतीय संस्कृतीत विवाहपूर्व प्रेमाला स्थान नसल्याने समाजमान्य मूल्य व्यवस्थेच्या प्रतिनिधी ठरणा-या काही पात्रांचे नियोजन तेंडुलकरांनी केलेले आहे. ही सारीच पात्रे बेणारे विरूध्द संघर्षाचा पवित्रा घेतात व तिच्यावर आघात करीत राहतात .कारण या अन्य पात्रांच्या दृष्टीने प्रसिध्द ग्रीक विचारवंत सिसिरोया म्हणतो त्याप्रमाणे, ‘ नाटक हे जीवनाचे अनुकरण आहे. चालीरितींचा आरसा आहे, सत्याचे प्रतिबिंब आहे’. तेंडुलकरांच्या नाटकातील अन्य पात्रेही कथानकाच्या संदर्भात अपरिहार्य ठरतात. तेंडुलकरांनी न्यायव्यवस्थेशी संबंधित जी पात्रे निर्माण केली त्यात न्यायाधीश ,वकील,आरोपी,साक्षीदार,चोपदार अशी विविध पात्रे आपापल्या स्वभावधर्मानुसार तर अभिव्यक्त होतातच .शिवाय नाट्य कथेलाही गतिमान करतात.

काशीकर हे पात्र न्यायाधीशाची भूमिका रंगभूमीवर वठविते काशीकार हे पात्र ध्येयासक्त आहे. सामाजिक प्रश्नासंबंधी सदैव जागृत आहे. सौ.काशीकरांचा पाणउतारा करण्याची एकही संधी ते वाया जाऊ देत नाहीत.काशीकरांसंबंधी बोलतानां बेणारे म्हणते, काहीतरी प्रधान हेतू असल्याशिवाय काशीकराचं पाऊल सुध्दा पुढे पडणार नाही. (‘ शांतता !कोर्ट चालू आहे’ पृष्ठ क्र.७ )उद्बोधन करणे हा काशीकरांचा आवडता छंद . समाजसेवेत जगाच्या उध्दारात गुंतलेले काशीकर एका अनाथ मुलाला आश्रय देतात.त्याचे नाव बाळू रोकडे तर दुसरीकडे हेच काशीकर बेणारेच्या वयाचा व अनीतीचा प्रश्न निर्माण होताच बालविवाहाचा पुरस्कार करतात, एवढेच नव्हे तर ,सगळयात आमच्या समाजाचं नुकसान कोणी केलं असेल तर ते आगरकरांनी आणि धोंडो केशव कर्व्यांनी असं माझं स्पष्ट मत आहे (पृष्ठ क्र.६५)असे म्हणतात .माणसाच्या व्यक्तिमत्वातील विसंवाद तेंडुलकरांनी अचूक टिपलेला आहे.

बेणारे विरूध्दच्या साक्षीदारांच्या साक्षी रंगात येतात.तेव्हा न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसलेल्या काशीकरांनाही साक्ष देण्याचे स्फुरण येऊन तेही साक्ष देण्याची इच्छा व्यक्त करतात आणि स्वत:ची खुर्ची सोडून साक्षीदाराच्या पिंज-यात येऊन उभे राहतात.न्यायदेवता साक्षीच्या मोहापायी पिंज-यात उभी राहणे हा प्रसंग हास्यास्पद तर ठरतोच; पण काशीकरांच्या स्वभावधर्मावर ही प्रकाश टाकतो. बेणारेला शिक्षा ठोठावण्याचे कार्यही या नाटकात काशीकार या पात्रानेच केलेले आहे.

दुसरे पात्र कायदेतज्ज्ञ सुखात्मेचे.ज्याच्या वाट्याला कोर्टात अडलेला अशीलसुध्दा जात नाही. कोर्टात एकटेच बसून हे पात्र आपल्या कायद्याच्या ज्ञानाने बाररूममधल्या माशा मारत बसते. ‘जस्ट टाईमपास’ म्हणून काल्पनिक लुटूपुटीचा खटला चालविण्याची कल्पना सुखात्मे हया पात्राचीच . इबाई आरोपीच्या पिंज-यात म्हटली की, खटल्याला एक वेगळाच रंग येतो एवढं खरं हं (पृष्ठ क्र.२७) असे म्हणारे सुखात्मे हेच पात्र ‘ शांतता ! कोर्ट चालू आहे ’ या नाटकात बेणारेवर भ्रूणहत्येचा आरोप ठेवतो तो सुखात्मे .तो वकील या नात्याने पोंक्षे, रोकडे, कर्णिक, सामंत, सौ.काशीकर व कु.बेणारे या पात्रांची साक्षीपुराव्यासगट उलटतपासणी करतो. आरोप सिध्द करू पाहणारा सुखात्मे एखाद्या सावध हिंस्र श्वापदासारखा या नाटकात वावरतो. न्यायालयाच्या काल्पनिक खेळात वकिलाचे सारे डावपेच पणाला लावून सत्य प्रकाशात आणण्याचे कसब चोख पार पाडणारा, कुस्तीच्या मैदानावर फड जिंकायला निघालेल्या मल्लासारखा पावले टाकणारा सुखात्मे, त्याच्या हया कृतीतून न्यायसभेतील खटला तेवढ्याच ताकदीने जिंकायला आविर्भावच व्यक्त करतो .सुखात्मे नाटकाच्या पहिल्या दोन अंकात बेणारेच्या विरोधातील वकील म्हणून उभा राहतो तर शेवटच्या अंकात सर्व साक्षीपुरावे संपल्यावर बेणारेचा वकील म्हणूनही उभा राहतो.काशीकर या पात्राच्या भूमिके -प्रमाणेच सुखात्मेची भूमिकाही द्विविध पातळ्यांवरून अभिव्यक्त होते.सुखात्मेची वकिली चाल तेंडुलकरांच्या नजरेने अचूक टिपलेली आहे. पोंक्षे या पात्राचा परिचय करून देतांना बेणारे म्हणते, आणि एक ‘हूं’आहेत.(पाइप तोंडात धरल्याचा आविर्भाव)हूं ! सायंटिस्ट ! इंटरफेल ! (पृष्ठ क्र.८) अभिरूप न्यायालयातील सर्वात महत्त्वाची साक्ष देणारे पात्र म्हणून पोंक्षेचा उल्लेख करावा लागतो.स्वत:ची साक्ष काढावी म्हणून पोंक्षे स्वत:च विनवणी करतो कु.बेणारेच्या पर्समध्ये ‘टिक् ट्वेंटी’ सारखी विषारी

औषधाची बाटली असल्याची माहिती पोंक्षे अभिरूप न्यायालयाला पुरवितो.तसेच बेणारेने आपल्याला लग्नाची गळ घातल्याची ,बेणारे व प्रोफेसर दामले यांच्यातील अनैतिक संबंधाची व बेणारेला दिवस गेल्याचा गौप्य स्फोटही पोंक्षे हे पात्रच या नाटकात करते.यादृष्टी ने पोंक्षे हे पात्र महत्त्वपूर्ण ठरते. सौ.काशीकरांचा परिचयही बेणारे ह्या पात्रानेच करून दिलेला आहे.' मिसेस पाळण्याची दोरी ' बिचारी पाळण्याची दोरी, पाळण्याशिवायच राहिली. बेणारे या पात्रावर प्रकाश टाकतांना उपरोधाने म्हणते,ङ्ग दोघांच्याच ओक्याबोक्या घरात एकमेकांच काही होऊ नये किंवा कंटाळ्यानं जीव जाऊ नये म्हणून एक मुलगा पाळला ,त्याला शिकवला,राबवला,लाचार केला.ङ्ख (पृष्ठ क्र.८) इतरांना लाचार बनविण्याच्या सौ.काशीकरांच्या मनोधर्मावरच येथे प्रकाश टाकला जातो.सौ.काशीकरांना इतरांवर वर्चस्व गाजविण्याची वृत्ती .हया वृत्तीतूनच सौ.काशीकर पुन्हा पुन्हा बेणारेला धरून आरोपीच्या पिंज-यात नेऊन उभी करतात .मिसेस काशीकर ह्या मिळवत्या स्त्रीवर टीकास्त्र सोडणा-या व सनातनी वृत्तीच्या द्योतक आहेत.लग्न न झालेल्या स्त्रीने परपुरूषाबरोबर मोकळेपणानी केलेले वर्तन म्हणजे स्त्री मर्यादेचे उल्लंघन आहे असे त्यांना वाटते.त्यामुळे बेणारे व प्रोफेसर दामले यांच्यातील संबंधावर ती कठोरपणे भाष्य करते.

कर्णिक हा एक नट आहे. त्याचे सारे वर्तनच नाटकी. अभिरूप न्यायालयातील लुटूपुटीचा खेळ चालला पाहिजे हया विचाराचा तो आहे.खोटी असलेली गोष्टही त्याला प्रभावी वाटते. अभिरूप न्यायालयाच्या साक्षीत बेणारेचे वयाच्या पंधराव्या वर्षी आपल्या आईच्याच भावाशी अनैतिक संबंध होते आणि बेणारेने प्रेमनिराशेपोटी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती कर्णिकच आपल्या साक्षीत देतो. रोकडे हा श्री व सौ.काशीकरांचा आश्रित .आज्ञाधारकवृत्तीने वागणारा .साक्षीच्यावेळी त्याच्या अंगाला कंप सुटतो .रोकडे हे पात्र नर्व्हस मनोवृत्तीचे.त्याच्याठिकाणी सभाधीटपणा नसल्याने साक्षीच्यावेळी प्रारंभी त्याच्या तोंडून शब्द फुटत नाहीत.बेणारेच्या शब्दात सांगायचे तर ' कुक्कुलं बाळ' .सौ.काशीकरांच्या गुलामीत राहणारा. पण सौ.काशीकरांनी प्रोत्साहन देताच बेणारेविरूध्द साक्ष देणारा .रोकडे हा बेणारेने आपल्याशी लगट केल्याचा आरोप करतो.तर कर्णिक, रोकडे व बेणारे यांच्यातील संवादावर प्रकाश टाकतो.' मला भीती वाटते .आणि तुमच्या या अशा स्थितीत मी लग्न केल तर जग माझ्या तोंडात शेण घालील.आमच्या घराण्यात असं कुणी केल नाही ङ्ख (पृष्ठ क्र.८२)यावर बेणारे रोकडेच्या श्रीमुखात मारते.असा हा रोकडे समाजात वावरणा-या भित्र्या मनोवृत्तीच्या माणसाचे प्रतीक म्हणून येतो.

सामंत हे पात्र म्हणजे नाटकाचा आरंभ व अंत होय.सामंत हा निष्पापवृत्तीचा समाजातील सज्जन माणसाचे तो प्रतीक आहे.सामंतही अविवाहित आहे.जादू व मोहिनीविद्येचे त्याला आकर्षण आहे. ते त्याच्या दृष्टीने वेळ घालविण्याचे माध्यम आहे. सामंतही इतर पात्रांच्या आग्रहाखातर साक्ष देतो.कारण दामले हे काळे की गोरे हे देखील त्यांनी पाहिलेले नाही.त्यामुळेच अभिरूप न्यायालयाच्या लुटूपुटीच्या खेळातील त्याची साक्ष हणजे त्याने पाहिलेले एक दिवा स्वप्नच. पण अजाणतेपणाने पुस्तकातले संवाद तो साक्षीत बोलत जातो आणि अन्य पात्रांना हवी ती माहिती नकळतपणे तो देत राहतो.सामंतची साक्ष म्हणजे त्याने उभे केलेले एक कल्पनाचित्रच असते.सामंत ह्या पात्राला बेणारे विषयी सहानुभूती वाटते.नाटकाच्या अंती ङ्ग काही न सुचून आपल्या जवळचा कापडी पोपट एका अंतरावरून आदबीने, वात्सल्याने तो तिच्यापुढे हळुवारपणे ठेवतो. ङ्ख (पृष्ठ क्र.९८)आणि पडद्यामागचे एक पात्र म्हणजे प्रोफेसर दामलेंचे.ते रंगभूमीवर अवतरत नसले तरी, अन्य पात्रांच्या संवादातून ते संपूर्ण नाटकभर वावरत राहते.या पडद्यामागचे हे पात्र सूत्रधाराचे जणू द्योतक आहे.सगळयाच पात्रांना पडद्यावर खिळवून ठेवायचे हेच जणू त्याचे प्रयोजन नाटकातील या पात्रावरही भाष्य करते.ती बेणारेच कशी ते तिच्याच शब्दात पहा.ङ्ग एक ' इंटलेक्चुअल पण आहेत.आमच्यात इंटलेक्चुअल म्हणजे आपल्या पुस्तकी बुध्दिमत्तेचा अहंकार बाळगणारे आणि कृतीच्यावेळी पळ काढणारे, तोंड लपवणारे आज आलेले नाहीत. येणार सुध्दा नाहीत, छाती नाही त्यांची ङ्ख (पृष्ठ क्र.८) एक संसारी गृहस्थ ,पाच मुले असलेले सद्गृहस्थ. बेणारेचे व प्रोफेसर दामले यांचे अनैतिक संबंध, पण या अभिरूप न्यायालयात ते गैरहजर असे, हे पडद्यामागचे पात्र .तेंडुलकरांच्या नाटकातील ही सारीच पात्रे या ना त्या रूपात मध्यवर्ती सूत्राभोवतीच वावरतात व नाट्य कथेचे विकसनही साधतात.तथापि हया सा-या पात्रांच्या संदर्भातील तेंडुलकरांनी बेणारेच्या रूपाने केलेले भाष्य एक समाजशास्त्रज्ञ म्हणून महत्त्वाचे ठरते.ते त्यांच्याच शब्दात पहा .ङ्ग (एकेका चेह-यावर प्रकाश येऊ लागतो. सगळे भेसूर, निःस्तब्ध, प्रेतासारखे वाटतात) हे विसाव्या शतकातील सुसंस्कृत माणसांचे अवशेष पाहात कसे एकेकाचे चेहरे रानटी दिसत आहेत. त्यांच्या ओठांवर झिजलेले सुंदर सुंदर शब्द आहेत .पोटात अतृप्त वासना आहेत.ङ्ख (पृष्ठ क्र.९३)

समाजातील पुरूषांची मानसिकता लक्षात घेता अनैतिकतेला बळी पडलेली स्त्री जी 'स्व' शी संबंधित नसेल तर ,तिची निंदा, नालस्ती केली जाते. तिची कुचाळकी करत तिला दोषी ठरविले जाते. तिचा निषेध नोंदवित, सभ्यपणाचे मुखवटे धारण करीत तिच्या नैतिकतेवर भाष्य करीत राहतात. ही पुरूषप्रधान संस्कृती सामाजिक जीवनमूल्यांचा उद्घोष करीत स्त्रीला अपमानित करीत राहते.समाजातील एका गंभीर प्रश्नाकडे अहंकारी वृत्तीने पाहण्याची पुरूषी मनोवृत्ती आणि स्वत:चा प्रामाणिकपणा जपू पाहणारी बेणारे. यांचा संघर्ष तेंडूलकरांच्या नाटकातून व्यक्त होतो. नाटककाराच्या अनुभूती चित्रित करण्याचे संवाद हे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. पात्रांच्या वर्तनाआड लपलेल्या प्रेरणा संवादातूनच व्यक्त होतात.संवाद हे नाटकाचे शरीर असते तर मध्यवर्ती सूत्र या संवादाचा आत्मा असतो.त्यामुळे कोणत्याही नाटकातील संवाद आणि मध्यवर्ती सूत्र यांचा अचूक सांधा जमल्याशिवाय संवाद अर्थपूर्ण होत नसतात.ङ्ख (नाटक प्रा.दत्ता भगत / यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ / पृष्ठ क्र.२०-२१ )विजय तेंडुलकरांच्या ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकातील पहिल्या अंकात बेणारे व सामंत यांच्यात झालेल्या संवादातून व्यक्तीची नावे,त्यांचा दर्जा, पात्रापात्राचे परस्परांशी असणारे नातेसंबंधाचे तपशील संवादातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असतात पात्रचित्रणात आपण पाहिले सुखात्मे, पोंक्षे श्री व सौ.काशीकर,रोकडे व प्रोफेसर दामले हया सगळयाच पात्रांची ओळख बेणारेच्या संवादातून होते.

गंभीर नाटक पाहताना प्रेक्षकांच्या मनावर येणारा ताण कमी करण्यासाठी तेंडुलकरांनी या लुटूपुटीच्या अभिरूप न्यायालयाच्या कामकाजात पात्रांच्या संवादातून अन्य विषयाची चर्चाही घडवून आणलेली आहे.या दृष्टीने बेणारे,सामंत सुखात्मे यांनी झोपेसंबंधी केलेली चर्चा (पृष्ठ क्र.५२ ) तर दुस-या अंकात काशीकरांनी बेणारेंवर भ्रूणहत्येचा आरोप ठेवल्यावर सामंत ह्या पात्राचे होणारे आगमन आणि त्यानंतर सुरू झालेली मसाला पानं व सिग्रेट पाकिटं यांची आपापसातील चर्चा संवादातून व्यक्त होते.तेव्हा नाटकातील गांभीर्य एकदम ओसरलेले असते.(पृष्ठ क्र.३०) तर दुस-या अंका मध्येच (पृष्ठ क्र.४३ वर ) मातेची,कर्णिक या पात्राने केलेली व्याख्या 'बाळंत होते ती माता' आणि या व्याख्ये घडवून आणलेली अन्य पात्रांची चर्चा,ही रसिकांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी योजलेली आहे.तर कधी संवादातून तेंडुलकरांची पात्रे एकमेकांचा उपरोधही करतात.बेणारे व पोंक्षे यांच्या संवादात बेणारेनी सुखात्मे,काशीकर या पात्रांचा केलेला उपरोध या दृष्टीने बघण्यासारखा आहे.पोंक्षे आपल्या साक्षीत बेणारे काय म्हणाल्या ते सांगतात ङ्गम्हणजे सुखात्मे तसा बरा माणूस, पण नशिबाने उबला आहे बिचारा ! वकिली चालत नाही -बाररूममध्ये पेशन्स खेळत बसतो - आपली केस याच्याकडे गेली की जेल नक्की, अशी प्रसिध्दी आहे. म्हणे जज्जपुढं दातखीळ बसतेङ्ख ..... (पृष्ठ क्र.७७) काशीकरांविषयी बोलताना बेणारे म्हणाली , ङ्गकाशीकर रोकडेला फार छळतात,कारण आपल्या बायकोचं आणि त्याचं सूत आहे असा त्यांना सारखा संशय वाटतो.कारण मूल नाही नाङ्ख (पृष्ठ क्र.७८) बेणारेची खोचक वृत्ती यातून

प्रकटते. विजय तेंडुलकरांच्या संवादातून प्रेक्षकांचे,रसिकांचे मनोरंजनही केले जाते. रोकडे व बेणारेच्या संवादात बेणारे म्हणजे ' माझा चेहरा कशाला पडेल ? चांगला उभा होता'(पृष्ठ क्र.४८) तर पोंक्षे हे पात्र शपथ घेताना म्हणते ङ्गपुन्हा शपथ घेऊ ? ऑक्स्फर्ड इंग्लिश डिक्शनरीवर हात ठेवून शपथ घेतो की,इथे गीतेवर हात ठेवून शपथ घेतली जात नाही.तर कधी तेंडुलकरांच्या नाटकातून समाजमान्य अशा सुभाषितांची पखरणच संवादातून केली जाते . ' मातृत्व हे पवित्र 'आहे या सुखात्मेच्या विचाराला अनुसरून मातृदेवो भव:,' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' ,स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकाळची माता आहे,'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' व ' आई थोर तुझे उपकार'यासारख्या काव्यपंक्तीही येतात.अशा ह्या संवादातून व्यक्तिमत्वाचे सर्व दृश्य आणि सुप्त भावनांचे आविष्कारच अशा संवादातून होत असतात.विजय तेंडूलकरांच्या ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकातून प्रकटणा-या स्वगताचा विचारही नाटकाच्या संविधानाकाला पूरक ठरतो.स्वगत हे अबोध मनाचे द्योतक असते.स्वगत म्हणजे स्वत:च स्वत:शी केलेला संवाद. नाटकातील स्वगत म्हणजे, ' पात्राचे आत्मसन्मुख होणे, आत्मविश्लेषण करणे,आत्मटीका करणे,आत्मनिवेदन करणे होय.'

' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकात बेणारे हे पात्र स्वत:शीच हलक्या टाळया वाजवीत 'ओ आय हॅव गॉट ए स्वीट हार्ट ' हे इंग्रजी गुणगुणू लागते. तेव्हा या इंग्रजी गाण्याला स्वगताचे रूप प्राप्त होऊन बेणारेची कोवळया वयातील स्वप्नसृष्टीच जणू सजग होते.ही स्वप्नसृष्टी पुढील घडणा-या घटनेचेही सूचन करते.तसेच पहिल्या अंकाच्या शेवटी येणारे स्वगत एका बडबडगीताने प्रारंभित होते. 'चिमणीला मग पोपट बोले, कां ग तुझे डोळे ओले ?' ह्या बेणारे गुणगुणत असलेल्या बडबडगीताला स्वगताचे रूप प्राप्त होते.हया स्वगतातून बेणारेची अल्लड बालसुलभवृत्ती जशी व्यक्त होते तसेच ह्या स्वगताने संविधानकाचे विकसनही साधले आहे.' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकाचा शेवटही याच बालगीताने होतो.तेव्हा त्यातून आरपार कारूण्यच प्रकटते.जणू तिचा घरटाच उध्वस्त झाल्याचा संकेत तिला प्राप्त होतो.' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकातील तिस-या अंकातील बेणारेचे स्वगत तिच्या संपूर्ण शोकात्म ठरणा-या व्यक्तिमत्वावरच प्रकाश टाकणारे आहे.कु.बेणारेची स्वप्नसृष्टी त्या स्वप्नसृष्टीवर,भावसृष्टीवर झालेले आघात,त्या आघाताने सुंदर जीवन जगण्याचा संपुष्टात आलेला हव्यास,कोवळया वयातील प्रेमभंगाची व्यथा अजाणतेपणात झालेल्या प्रेमभंगाने तिच्या भाववृत्ती उध्वस्त केल्या तर जाणतेपणात झालेल्या प्रेमभंगाने तिची स्वप्नसृष्टी तर उध्वस्त केलीच पण तिला शारीरिकतेची जाणीव करून दिली.जीवनाच्या तत्त्वज्ञानाने तिला फक्त शरीराचीच जाणीव करून दिली .म्हणून ती म्हणते,ङ्गजीवन ही एक महाभयंकर गोष्ट आहे.जीवनाला फाशी दिलं पाहिजे ! ङ्ग न जीवन जीवनमर्हतिङ्घ जीवनाची चौकशी करून त्याला नोकरीवरून काढून टाकलं पाहिजे.ङ्घ (पृष्ठ क्र.९२) तेंडुलकरांनी बेणारेंच्या या स्वगतात जीवनावर भाष्य करता करता जीवन या संकल्पनेचे मानुषीकरण करून टाकले आहे.या स्वगतातून जीवनासंबधीचे तेंडुलकरांचे चिंतन जसे व्यक्त होते.तद्वतच वास्तव दर्शनातून सत्याचा शोध घेण्याची त्यांची मनोवृत्तीही प्रकटते.हे स्वगत म्हणजे तेंडुलकरांच्या काव्यप्रतिभेचा उच्चांक ठरतो.

नाटक ही 'दृक-श्राव्य कला आहे 'त्यामुळे नाटकाच्या सादरीकरणाला महत्त्व प्राप्त होते .नाटककाराने लिहिलेल्या नाटकाला पूर्णत्व प्राप्त होते ते नाटक रंगमंचावर सादर झाल्यानंतरच .त्यामुळे नाटकातील नेपथ्याचा विचारही नाटकाच्या संहितेत महत्त्वपूर्ण ठरतो.नाटकाच्या नेपथ्याच्या विचारात नाट्यसूचना,नेपथ्याचे तपशील व वातावरण निर्मिती या घटकांचा विचार येतो.' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकातील पहिल्या अंकाच्या प्रारंभीच तेंडूलकरांनी नेपथ्याच्या तपशीलाची नोंद लिखित स्वरूपात दिलेली आहे.या नेपथ्य योजनेतील बंद खोली,जुन्या खुर्च्या,पुढा-यांच्या जुनाट तसबिरी,देणगीदाराच्या नावाचा लाकडी फलक हे गतकाळाचे प्रतीक म्हणून येते.बेणारेच्या मनातील भूतकाळाच्या आठवणी हया सा-या गोष्टी सजग करतात. ही बंद खोली बेणारेच्या बंदिस्त होत जाणा-या जीवनाचे प्रतीक म्हणून येते.

नाटकाच्या दालनात एक व्यासपीठ तयार आहे.या तयार असलेल्या व्यासपीठाला अर्थपूर्णता प्राप्त होते ती रोकडे या पात्राने.डाव्या विंगमध्ये पिंजरे आणून ठेवल्याने.रोकडे व कर्णिक आरोपीचा लाकडी पिंजरा आणून बेणारे भोवती मांडतात आणि न्यायालयाची वातावरण निर्मिती साधली जाते.उभ्या केल्या गेलेल्या पिंज-याने नाटकातील न्यायालयाच्या वास्तवाचा आभास निर्माण होतो.पिंजरा हा पोपटाला बंदिस्त करतो ,त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतो.मोकळया अवकाशाला तो पारखा होतो.अशा हया बंदिस्त पिंज-यातील पोपटासारखीच लाकडी पिंज-यात बेणारेची स्थिती झालेली आहे.' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकातील लाकडी पिंजरा अभिरूप न्यायालयाचा देखावा उभा करतो आणि नाटकातील नाटक प्रारंभित होते.कोर्टातील वातावरणाचा परिपोष निर्माण व्हावा म्हणून लाकडी पिंजरा येतो. भिंतीवरील बंद घड्याळ हे थांबलेल्या काळाचे , वेळेचे द्योतक ठरते.नाटकातील नाटक जेव्हा प्रारंभित होते तेव्हा कुनालाच वेळेचे भान राहात नाही.अभिरूप न्यायालयातील बेणारेच्या जिवनातील कटू सत्य बाहेर येईपर्यंत जनू वेळ , काळ बंद पडलेल्या घड्याळासारखा घोटलेला असतो. सत्य बाहेर येताच घड्याळाची टिकटिक ऐकू येवू लागते .म्हणूनच विजय तेंडुलकरांच्या बंद घड्याळालाही एक अर्थवत्ता प्राप्त होते ती त्यामुळेच होय .

तेंडुलकरांच्या नाटकातील कोर्टात शपत घेण्यासाठी' भगवत गीते ' ऐवजी ' इंग्लश डिक्शनरी ' येते.कारण या अभिरूप न्यायालयाचा हा एक लुटूपुटीचा खेळ आहे.यातील साक्षही काल्पनिकच आहे. फक्त आरोपी खरा आहे. हे तेंडुलकर दाखवून देतात.नेपथ्याच्या अशा हया तपशिलामुळे ' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकातील अनुभव प्रभावीपणे रसिकांपर्यंत जाऊन पोहचतो. नाट्यसंहितेत प्रकाश योजना हेही एक महत्त्वाचे अंग मानले जाते.प्रकाश योजनेमुळे स्थलकालातील संदर्भ अधोरेखित करता येतात.' शांतता ! कोर्ट चालू आहे 'या नाटकात पहिल्या अंकातील दालनात असलेल्या जुन्या -पुराण्या वस्तूवर प्रकाश पडतो.तेव्हा हा प्रकाश गतकाळातील घटना जागृतीची भूमिका पार पाडत असतो.तसेच या नाटकातील तिस-या अंकात दिलेले प्रकाश योजनेचे व काळोखाचे तपशील नाट्यसंहितेला एक वेगळीच अर्थपूर्णता प्राप्त करून देतो.प्रकाशाच्या उजेडात सुरू झालेले अभिरूप न्यायालय अंती काळोखाच्या अंधारात संपुष्टात येते.अभिरूप न्यायालयातील निरागस निष्पाप खेळ अखेर क्रौर्याने काळवंडून जातो.

विजय तेंडुलकर यांनी प्रकाशयोजनेचा अतिशय प्रभावी वापर नाटकातील पात्रांच्या भावभावना दृग्गोचर करण्यासाठी केला आहे.कु.बेणारे पात्राची उलघाल व्यक्त करण्यासाठी प्रकाशयोजनेच्या संदर्भात काही नाट्यसूचना संहितेमध्ये दिलेल्या आहेत. त्यामुळेच संपूर्ण नाटकात अभिव्यक्त होणारी अकृत्रिम प्रकाशयोजना तिस-या अंकात काशीकर या पात्राच्या संवादाबरोबर बदलते व अंधार होतो.संपूर्ण नाटकातील पात्रे अंधारातून गडप होतात आणि प्रकाशवर्तुळाच्या रिंगणात उरते ती फक्त एकटी बेणारे. असहाय्य बेणारे कधी हया प्रकाश वर्तुळात तोंड लपवून कळवळते तर कधी भयभीत होते, कधी एखाद्या लहान मुलीसारखी हमसाहुमशी रडते तर कधी किंचाळते, कधी वेदनेने पिळवटते तर कधी काळोख -उजेडाच्या उघडमिटीत निपचित उभी राहते. विविध भावानुभूतीच्या खोल डोहात बुडालेल्या बेणारेची मनोवस्था या प्रकाशयोजनेत अचूक टिपण्यात एक नाटककार म्हणून तेंडुलकर यशस्वी ठरलेले दिसतात .विजय तेंडुलकर हे एक उत्तम दिग्दर्शकही होते असे त्यांचे नाटक वाचताना जाणवल्याखेरीज राहात नाही.

# स्व.विजय तेंडुलकरांची अखेरची मुलाखत

प्रा.डॉ.संदीप बनसोडे

बलभीम महाविद्यालय,बीड येथील मराठी विषयाचे अधिव्याख्याता डॉ.संदीप अ.बनसोडे यांनी ज्येष्ठ नाटककार स्व.विजय तेंडुलकर यांची त्यांच्या निवासस्थानी घेतलेली आणि तेंडुलकरांच्या आयुष्याची अखेरची ठरलेली मुलाखत
दि.२५ डिसेंबर २००५ रोजी

विजय तेंडुलकरांना डॉ.संदीप बनसोडे यांनी विचारलेली प्रश्नावली व स्वतः तेंडुलकरांनी दिलेली उत्तरे.

**डॉ.बनसोडे :** तुमची नाटकं बहुतांशी स्त्रीप्रधान जाणवतात, तेव्हा 'कमला', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'एक हट्टी मुलगी', 'श्रीमंत' अशी स्त्रीप्रधान नाटकंच तुम्हाला का लिहाविशी वाटली ?

**तेंडुलकर :** मी ठरवून काही करत नाही,मी स्त्रीवादी नाही, मनाशी काही कल्पना येते, निमित्त घडतं आणि नाटक मनाशी आकार घेतं ; पण काही वेळेला असं झालेलं आहे.तू म्हणतोस तशी काही नाटकं स्त्रीप्रधान आहेत, खरंय .

**डॉ.बनसोडे :** तुमच्या नाटकात तुम्ही चित्रित केलेल्या स्त्रीचित्रणाबद्दल तुम्ही समाधानी आहात का ?

**तेंडुलकर :** मी जर समाधानी नसतो, तर मी ते नाटक करूच दिलं नसतं.लेखक हा तो जे काही लिहितो त्याबाबतीत तो समाधानी असल्यानंतरच सादरीकरणासाठी ते नाटक देत असतो.

**डॉ.बनसोडे :** तुमच्या अगोदर पु.ल.,वि.वा.;प्र.के. अशी नाटककारमंडळी होऊन गेलेली असताना आम्हाला प्रयत्न करूनही तुमचा पूर्वसुरी नाटककार सापडत नाही,याविषयी तुम्ही काही सांगाल का ?

**तेंडुलकर :** माझा गुरू वगैरे असं कोणी नव्हतं,किंबहुना मी ज्या काळात घडलो,त्या काळात व्यावसायिकनाटकांचं अस्तित्व कुठेच नव्हतं, हौशी प्रयोग यापलीकडे नाटकांकडे पाहिलं जात नव्हतं; म्हणून मी नाटकांच्यावर काही वाढलो नाही.त्या काळातील गडकरी,कालेलकर यांची नाटके मी वाचली ; पण माझ्यावर त्याचा बरावाईट परिणाम काही झाला नाही.त्यामुळे मी नाटक लिहायला सुरवात केली, ते माझ्या पध्दतीने.त्यातल्या त्यात मी प्रथम पत्रकार होतो.नंतर एकांकिका लिहिल्या,त्यामुळे नाटक हे साहित्याच्या अंगाने कसे लिहावे हे समजण्याइतपत मी स्वतःच घडलो होतो.

**डॉ.बनसोडे :** भगत सरांच्या 'निवड' एकांकिकांच्या प्रस्तावनेत तुम्ही म्हटलंय,की मी ठरवून लेखन करत नाही; परंतु तुमच्या नाटकांच्या प्रत्येक अंकाचा शेवट हा कमालीची उत्सुकता निर्माण करणारा जाणवतो,यावरून तुम्ही लेखनाअगोदर ठरवून लेखन करीत नसल्याचे खोटे वाटते, तुम्हाला काय म्हणायचंय ?

**तेंडुलकर :** नाटक ही काही आधी ठरवण्याची गोष्ट नाही,यात जी तंत्र नावाची गोष्ट आहे, ती जमली पाहिजे.जसा तबला वाजवणारा, वाजवताना ठरवून ताल वाजवत नाही. तो डोक्यात चालत असलेले आपले विचार थांबवतो आणि त्याचे हात बोलतात. काही वेळेला त्याच्या डोक्यात दुसरे काही विचारही चालू असतात, तरी तो वाजवतच असतो.याचाच अर्थ असा आहे, की ते माध्यम त्याच्या आतपर्यंत कुठंतरी पोहचलं असतं, आता नव्याने त्याला त्याचे हिशेब मांडावे लागत नाहीत.तसंच नाटककाराचं आहे.त्यात आपोआपचं तंत्र येत मी ते मुद्दामहून घडवत नाही.

**डॉ.बनसोडे :** 'माणूस नावाचं बेट' मध्ये भूक आणि दारिद्र्याचं चित्रण,'गिधाडे' त सर्व प्राथमिक गरजा ढेकर देऊन भागलेल्या आहेत, अशा उच्चभ्रू वर्गाचं चित्रण, 'अशी पाखरे येती' मध्ये एका अतिशय संवेदनाक्षम असणा-या नायिकेचं चित्रण, तर' घाशीराम' मध्ये निर्ढावलेल्या नायकांच चित्रण,' एक हट्टी मुलगी' मध्ये अत्यंत सोशिक अशा नायिकेचं चित्रणं तुम्ही करता, यावरून सर्व स्तरांवर तुमचं लेखन असल्याचं दिसून येतं. असं असूनही तुम्ही केवळ मध्यमवर्गीयांचेच नाटककार आहात असा आरोप तुमच्यावर आहे,याबद्दल तुमचं मत काय ?

**तेंडूलकर :** एक तर असं आहे , की 'घाशीराम कोतवाल','सखाराम बाईंडर','गिधाडे','बेबी'ही काही मध्यमवर्गीयांची नाटके नव्हती. 'शांतता कोर्ट चालू आहे' हे मध्यमवर्गीयांचंच नाटक आहे. त्यामुळे केवळ मध्यमवर्गीयांची नाटके मी लिहिली हे खरं नाही.असं म्हटलं जातं कारण कलेचं क्षेत्र असो की साहित्याचं , एक विशिष्ट प्रकारची लेबलं लावली जातात.हा अमुकवादी तो तमुकवादी असं केल्यानं समोरच्याला ज्याच्याबद्दल जे मांडायचं असतं ते सोपं होतं; पण कुठल्याच लेखकाला लेबलं लावता येतात असं मला वाटत नाही.

**डॉ.बनसोडे :** तुमच्या 'कन्यादान'या नाटकाला सरस्वती सन्मान प्राप्त झाला.या नाटकाच्या रूपाने तुमची समाजातल्या दांभिकतेचं चित्रण करणारी प्रतिभा दिसून येते. या नाटकावर तात्काळ वादळ निर्माण झालं होतं तुम्ही समाजवादी असूनसुध्दा या नाटकात समाजवादी 'आयडॉलॉजी'बाळगणारांच्या दांभिकतेवर तुम्ही प्रहार केल्याचं दिसतं. परंतु मिडियानं याकडं दुर्लक्ष करून दलित मंडळी किती दांभिक वृत्तीचे असतात असं या नाटकात दाखवलं असल्याचं प्रसिध्द केलं. असं का व्हावं ?असं होण्यामागे काही राजकारण घडलं का ? की समाजवादीवाल्यांचा रोष टाळण्यासाठी दलितांना टारगेट केलं गेलं ?

**तेंडुलकर :** आमच्या काळातील पिढी ही अधिक स्वप्नात जगणारी आणि भोंगळ विचार करणारी ,प्रत्यक्षात चुका करणारी ती पिढी होती;तशी ती राहिली.तिच्याविषयी मी बोलतोय.त्यातला एक माणूसमी मध्यभागी ठेवला आणि त्याच्या आयुष्यात ते सगळं जे काही येत आहे,तसा तो मुलगा आहे.त्यामुळे तो मुलगा हा मुख्य नाटकाचा विषयच नाहीये.तसेच हे नाटक जेव्हा आलं तेव्हा त्यावेळी रिझर्व्हेशनचा जो प्रश्न होता तो खूप पेटला होता.त्यामुळं दलितांवर रागावलेल्या पांढरपेशा मंडळीनी वेगळा अर्थ काढला आणि दलितांनीही मी त्यांच्याविरोधात काहीतरी लिहितो असा अर्थ काढला माझ्यावर चप्पलही फेकली होती.नागपूरला (चप्पल फेकणारा –संजय जीवन)दलितांचंच होतं संमेलन ते मी तर असं काही केलं नाही, मात्र 'लेबल'लावून अशा गोष्टी सोप्या केल्या जातात. त्यांच्या मनाप्रमाणे तो एक त्याचा अर्थ काढतात. नाटक कसे बघायचे हे ते लोक ठरवतात आणि त्यातून काय समजायचं हेही ते ठरवणार, मी नाही ठरवणार .माझं लिहिणं एकपदरी नाही. मी मानवी प्रवृत्तीत लपलेल्या गोष्टी दाखवत असतो. म्हणून 'कन्यादान' मध्ये दाखवलेली एका अर्थानआत्मटीका आहे.आम्ही त्या काळात अनेक चुका केल्या.त्या जरी

चांगल्या हेतूने केल्या असतील तरी चूक ही चूकच ना ! ती बरोबर नाही ठरू शकत. नाटकातल्या त्या मुलाला एखादं फर्निचर आणल्यासारखं जेव्हा बघितलं जात,त्या वेळी तो चिडणं साहजिकचं आहे तेव्हा तो रागावणारच.

डॉ.बनसोडे : या नाटकाबद्दल आणखी एक, की हे नाटक नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर लिहिलं गेलं असंही काही जणांचं म्हणणं आहे.ते खरं आहे का ?

तेंडूलकर : माझ्यासमोर दुसरा विषय होता.मला जे दिसलं ते मी या नाटकात मांडलं.ते नाटक बघून नामदेवनं आत्मपरीक्षण केल असेल तर बरं आहे. वाईट काय आहे ? जर मला नामदेवच दाखवायचा असता, तर तो मी दुय्यम पात्र कशाला दाखवेन,असं कसं मी वेडयासारखं करेन.? तो तर जन्मत:च हिरो आहे, त्याला हिरो करून मी लिहीन. त्या हिरोचं पतन मी मांडेन.हे नाटक त्याच्यावर नव्हतं; पण त्याला तसं वाटलं.
आता कुणाला असं वाटलं तर मी काय करू त्याला ?

डॉ.बनसोडे : योगायोगानं तुमच्या नाटकात मध्यमवर्गीय नायक आहेत. तुम्ही तसं सुचवलं नसलं तरी ते जातीनं ब्राम्हण वाटतात (नेपथ्यावरून) ; पण म्हणून तुमच्या टीकेचं लक्ष्य ब्राम्हण आहे असं वाटत नाही, तरी तुम्ही ब्राम्हणविरोधी आहात असं म्हटलं जातं. याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

तेंडुलकर : तो कोणत्याही जातीचा असला तरी तो मध्यमवर्गातला माणूस आहे.त्याची मुख्य जात लिबरल आहे.मी कधीच आडून लिहित नाही. मी तसे ते मांडले, कारण ते मध्यमवर्गातले होते म्हणून मी ते लिहिले .ते जर दलित असते तर मी दलित पात्र रेखाटले असते.

डॉ.बनसोडे : घाशीराम कोतवाल नाटकाच्या प्रयोगानंतर तुम्हाला ब्राम्हण वर्गाचा काही त्रास झाला का ?

तेंडुलकर : ब्राम्हणंच काय पण कुठल्याच वर्गाचा त्रास मला तशा अर्थानं झाला नाही. 'कन्यादान ' च्यावेळी चप्पल फेकणे हा काही दलित वर्गाचा त्रास आहे ,असं मी मानत नाही. ती जशी एक प्रतिक्रिया होती तशी ब्राम्हणवर्गाची एक प्रतिक्रिया होती. मी जे काही लिहितो आहे , त्याचे सगळेच परिणाम मला घ्यायला पाहिजेत.ते मी घेतो, त्याचा त्रासबीस असं काही मी मानत नाही.

डॉ.बनसोडे : काही समीक्षकांच्या मते तुमची नाटके प्रेक्षकानुयायी नाहीत,याबाबत तुम्हाला काय वाटते ?

तेंडुलकर : जे काही रंगभूमीवर प्रयोग झालेत,ते पाहून ते प्रेक्षकानुयायी नाहीत असे जर कोणी म्हटले तर मला आश्चर्य वाटेल. एकच आहे, प्रेक्षकाच्या ज्या काही समजुती आहेत: त्या समजुतींना खतपाणी घालणारी त्यातली अनेक नाटके नाहीत. त्यामुळे ज्यांना असे वाटते,ते चुकीचे आहे.

डॉ.बनसोडे : तुमची नाटके माणसाचा कुरूपपणा तर दाखवतात मात्र कुरूपतेचे मूळ आणि कुरूपतेवर उपाय शोधताना दिसत नाहीत.त्यावर तुमचे मत काय ?

तेंडूलकर : माणूस हा जसा सुंदर आहे तसा कुरूप असतो. असे हे माणसांचे गुणधर्म बदलता येत नसतात .तो संमिश्र आहे.तो जसा आहे त्यापेक्षा त्याला वेगळं दाखवणं किंवा बदलणं मला वेडेपणाचं वाटतं. मुळात माणूस जसा असेल तो तसाच असेल ,त्याच्यावर काय उपाय असू शकतो.उदा.माणसाला दोनऐवजी चार पाय असते तर बरं झालं असतं; पण तसं नाही ,यावर उपाय काय ? मुळात जे आहे आणि तसंच ते राहणारं आहे ,असं मला वाटतं.त्यावर काय उपाय सांगणार ?
उपाय काही नाही. हे असं बघा.मी लक्षात आणून देतो फक्त.

डॉ.बनसोडे : तुमच्या नाटकांवर ब-याच नामवंताच्या समीक्षा आहेत,त्यांनी केलेल्या समीक्षणात्मक टीकेमुळे नाट्यलेखनात त्या त्या वेळी काही बदल केलेत का ?

तेंडुलकर : अशा बाहेरच्या कारणांनी आपण आपलं लेखन बदलुच शकत नाही.कुणी बदललं तर मला आश्चर्य वाटेल. मला जे भावतं ते मी लिहिणार, दुस-याला भावतं ते मी कसं लिहिणार ?त्यामुळे ते व्यक्तिगत आहे.तसंच ते असणार.

डॉ.बनसोडे : तुमच्या नाटकांनी नाट्यस्पर्धेत पारितोषिके मिळवावीत, की त्यासाठी नाट्यगृहावर हाऊस फुल्लचा बोर्ड लागावा ?

तेंडुलकर : मला याबद्दल कुठलही आकर्षण नाही.मला वाटत जो प्रेक्षक नाटक पाहण्यासाठी आलेला आहे, त्यानं प्रामाणिकपणानं पूर्वग्रह न ठेवता, मी काय लिहिलयं ते पाहावं, आणि त्याला जे समजेल ते समजून घ्यावं.यापलीकडे माझी काही अपेक्षा नाही. असेल तो प्रेक्षक नीट बघण्यासाठी आणि ऐकण्यासाठी आलेला असावा.
त्यानं प्रामाणिकपणानं पूर्वग्रह न ठेवता, मी काय लिहिलयं ते पाहावं आणि त्याला जे समजेल ते समजून घ्यावं.यापलीकडे माझी काही अपेक्षा नाही. असेल तो प्रेक्षक नीट बघण्यासाठी आणि ऐकण्यासाठी आलेला असावा.

डॉ.बनसोडे : भारतीय संस्कृतीत स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व दिलं गेलं असतानाही तुम्हाला 'मित्राची गोष्ट ' का लिहावस वाटलं ?

तेंडूलकर : मला असं वाटतं, की माणसामाणसामध्ये लैंगिक संबंधाचे अनेक प्रकार मी लहानपणापासून बघत आलो, ज्याच्याविषयी बोललंच जात नव्हतं, बोलायचं नाही असा ठराव केल्यासारखं सगळं होतं, समलिंगी नातं हा त्यातला भाग होता आणि मग त्यामध्ये असं जर कोणी सापडलं तर त्याची शिकारच करायची अशा पध्दतीची मी उदाहरणं बघत आलो, म्हणून मी नाटक नाही लिहिलं त्या प्रकारच्या व्यक्तिरेखा मला वाढत्या वयाबरोबर दिसल्या,म्हणून मी त्यावर आधी गोष्ट लिहिली आणि नंतर त्यावर नाटक लिहिलं.समलिंगी संबंधावर मी काही लिहितो आहे,असं काही माझ्या मनाशी नव्हतं आणि ती त्या मुलाची गोष्ट आहे.मध्यमवर्गातला तो मुलगा आहे. त्याच्या आयुष्यात

घडलेल्या घडामोडी तो व्यक्त करतो.त्याला धक्के बसत असतात त्याला काहीच कळत नाही; पण त्यासाठी ते नाटक नव्हतं.

डॉ.बनसोडे : आता आताही हायकोर्टानं समलिंगी संबंधांना एक प्रकारची मान्यता दिल्याचे संकेत आहेत.

तेंडुलकर : मला कळत नाही,स्त्री-पुरूष संबंधांना कधी कोर्टाकडून मान्यता घेण्याची गरज पडली नाही, तेव्हा इतर संबंधाना कोर्टाने मान्यता देण्याची गरज पडावी हे मला आश्चर्य वाटतं. हे सगळं आहे आयुष्यात, हे सर्व नवीन नाही, हे पुराणकाळापासून आहे.या प्रकारच्या प्रवृत्ती पुराणकाळा पासून आहेत.त्याच्याविषयी बोलायचं नाही, लिहायचं नाही, असा एक ठराव होता. याबाबतीत कोर्टाला का मध्ये यावं लागावं, हेच मला कळत नाही. माझ्या बायकोचा आणि माझा संबंध हा कधी कोर्टाचा विषय नव्हता, मग एक स्त्री आणि दुसरी स्त्री किंवा एक पुरूष आणि दुसरा पुरूष हा कोर्टापुढे जाण्याचा विषय का आहे, मला अजूनही कळत नाही.

डॉ.बनसोडे : तुमचं आवडतं नाटक कोणतं ?का ?

तेंडूलकर : मला माझी नसलेली अनेक नाटकं आवडतात आज नवीन मुलं लिहितात त्यांतली अनेक नाटकं मला छान वाटतात. मी लिहिली त्याच्याशी त्यांचा काही संबंध नाही. नवी कोरी नाटकं आहेत. त्याचं आयुष्य मुलं नाटकाच्या माध्यमातून मांडताना दिसतात. माझ्या नाटकांमधली कोणती नाटकं आवडतात असं जर तू विचारशील तर तसं काही माझ्या मनाशी नाही .त्या त्या काळात ती ती नाटकं लिहिली, त्याचं त्या -त्या वेळी ' काहीतरी झालं. त्यामुळं अमुक आवडतं ,तमुक नावडत असं काही माझ्या मनाशी नाही.नवीन नाटकांमध्ये 'एका छोटयाशा सुट्टीत' हे एका मुलानं लिहिलेलं नाटक ज्यातून समलिंगी संबंधाचा भाग त्यानं रंगवला; पण अगदी हलक्या हातानं त्यांन ते रंगवल होतं.मराठी नाटकात हे फार पुढचं पाऊल आहे आणि प्रेक्षकही ते तसं घेताना मी बघत होतो .त्यामुळं तो बदल मला दिसून आला. 'सिगरेटस', 'अलविदा' ही अतिशय ताकदीची नाटके आहेत.आताच्या घडीला त्यांच्या आयुष्यातले प्रश्न आणि त्यांच्या मनात काय चालतंय हे दाखवतांना ते दिसतात आणि चांगली नाटकं किंवा चांगला चित्रपट ,चांगली कादंबरी, चांगली कथा ,कविता याचा निकष एकच आहे की, मला जे माहीत नाही ते काहीतरी मला त्यानं द्याव.

डॉ.बनसोडे: तुमची नाटके सध्या व्यावसायिक रंगभूमीवर का दिसत नाहीत ?

तेंडुलकर: हे मला विचारून काही उपयोग नाही.माझा तसा हट्ट नाही. मी असं मानतो , की आजच्या गोष्टी या उद्या जुन्या होतात. मी जे चाळीस पन्नास वर्षापूर्वी लिहिलं, ते आज का येतं, का बघतात माणस? तरूण पोरांना ते अजूनही का करावं वाटतं, बघाव वाटतं याच मला आश्चर्य वाटतं. कुठलीही गोष्ट जुनी होणं आणि नंतर ती मिघून जाणं, माणसाचं जे होतं, ते इतरही गोष्टीचं होतच असतं. त्यामुळे हे अपेक्षित आहे, याचं मला काही दुःखही होणार नाही. एका काळाशी संबंध असतो. आम्ही काही लिहितो त्याचा तो काळ बदलत गेला, की त्याचा रेलेव्हंस ज्याला आपण म्हणतो तो नाहीसा व्हायला लागतो, मग त्या गोष्टीला काही अर्थ उरत नाही. ती कशासाठी लोकांनी बघावी, वाचावी, काय कारण आहे ? असंच नाटकांचंही होणार, असं मी मानतो.

डॉ.बनसोडे : 'कुत्रे', या नुकत्याच प्रकाशित झालेल्या नाटकानंतर तुमचे पुन्हा नव्या नाटकाचे लिखाण चालू आहे का ?

तेंडुलकर : 'कुत्रे'हे नवीन नाही.ते एकदा लिहून बाजूला टाकलं,'सखाराम बाईंडर'नंतर मी ते लिहलं होत आणि मी पार्ल्याचं जे घर बदललं त्यावेळी ते मला सापडलं.ते नवीन नाही.एका तरूणाची ती गोष्ट आहे .माणसातल्या प्रवृत्तीबद्दल ते नाटक बोलतं, हे खर आहे. बाकी काही नाही.

डॉ.बनसोडे : तुमची नाटके आणि वास्तववादी स्त्री अवस्था याबद्दल तुम्हाला काय वाटते ?

तेंडुलकर : आजच्या स्त्रीची जी अवस्था आहे, ती अवस्था अजूनही वेगळी आहे, असं मला वाटतं. आज जर मी स्त्री रंगवली तर ती नक्कीच वेगळी असेल. ती आमुलाग्र बदलली असे नाही; तरी बदल आहेत आणि तेही वेधक आहेत.एका अर्थानं आपण ज्याला' ट्रान्जीशनल पिरीयड' म्हणतो तसं आता आहे.त्यात स्त्रीही आहे .तिच्यात ' ट्रान्जीशन' होतं आहे,तर ती आजची स्त्री .माझ्या नाटकातील स्त्रीही त्या काळातील आहे. क्वचित असं होतं, की त्यातही काही आजचेपणा नकळत आलेला असतो. तो काही मी जाणूनबुजून आणलेला नाही; पण तो आलेला आहे.उदा. 'बेबी', 'मित्राची गोष्ट', 'शांतता कोर्ट चालू आहे !' मी माझ्या काळातील स्त्री म्हणूनच रंगवलं होतं ; पण ते आज रेलेव्हंट होत असतं. मला माहित नाही कशामुळे. उदा. मी पंचवीस वर्षाचा असताना एक कथा लिहिली होती, 'आमच्यावर कोण प्रेम करणार ?' मी आज अठ्ठयाहत्तराव्या वर्षात आहे , तेव्हा त्या कथेला आजच्या मुलांनी एकांकिकेत रूपांतरित करून सादर केलं आणि त्याला पारितोषिके मिळताना दिसतात. तेव्हा हे तर काही माझ्या नजरेत नव्हतं; पण ते झालं.

डॉ.बनसोडे : 'पाहिजे जातीचे' नाटकाबद्दल काही सांगा.

तेंडुलकर : 'पाहिजे जातीचे' , यात मी माझ्या मित्राच्या अनुभवाला नाटकाचे स्वरूप दिलं. अनुभव काही विनोदी नव्हता त्याचा त्याला खूप त्रास झाला. त्याला मांडतांना मी एका वेगळया पध्दतीने त्याचं काही तरी केलं ; पण त्यात असं काही गंभीरपणानं एखादा विषय मांडण्याची इच्छा नव्हती, इरादा नव्हता, अनेक गोष्टी त्यात येऊन जातात, निसटते विषयही येऊन जातात.म्हणजे उदा .त्या वेळेला मराठा लोक माझ्यावर का चिडले नाहीत याचं मला आश्चर्य वाटतं. ९६ कुळी मराठा कुटुंबातली मुलगी मी त्यात आणलेली आहे.ती अन् तिचा काका, मला मराठा समाजाविषयी काही लिहायचंही नव्हतं, त्या व्यक्तिरेखा म्हणून आलेल्या आहेत; पण ते तेव्हाच होतं.

त्यामध्ये मला ते काही घ्यायचं नव्हतं. त्या काळातली शिक्षणाची अवस्था तशीच होती.आज जर सुधारली असली तर माहीत नाही.तेव्हा मी कॉलेजेस सगळी छोट्या शहरांच्या बाहेरची बघत होतो. ती तशीच होती, अनेक कारणांनी असतील. तर ते सगळं चित्रण आहे. पण मला हसवणं यापलीकडे या नाटकात काही करायचं नव्हतं.

डॉ.बनसोडे : 'दंबद्वीपचा मुकाबला ' हे नाटक सर्वसामान्यांना समजलं नाही, यावर तुमचं मत काय ?

तेंडूलकर: हौशी काळातील प्रयोगाची आर्थिक अवस्था काही चांगली नसते आणि तो काळही तसा होता. त्यामुळं नाटकं एका अर्थानं रेटणं, त्याचे प्रयोग एका गतीनं लावणं हे जमत नसे. त्यामुळं माझी अनेक नाटकं त्या काळात काही एका संख्येनंतर प्रयोग होण्याची थांबली, त्या वेळेला छोट्या थिएटरची कल्पना नव्हती. सर्व नाटकं मोठ्या थिएटरमध्ये करावला लागायची आणि आर्थिक जो काही तोटा होता तो घेत राहण, हे संस्थेला कठीण व्हायचं. त्यामुळे अनेक नाटके थांबली.त्यांतलं ते होतं. खरं तर प्रेक्षकांना त्या काळात ते समजत होतं, आणि आवडत होतं. भक्ती बर्वे होती, त्यावेळी जेवढे प्रयोग झाले तेवढे लोकांनी खूप 'एन्जॉय'केले.कारण इंदिरा गांधी सत्तेवर येऊन पोहचल्याचा तो काळ होता. त्याच्याविषयी आहे ते खरं, त्या सत्तेवर येऊन पोहचल्या त्या काळात हे नाटक मी लिहिलं. नाटकाच्या शेवटी ईमरजंसी मी प्रेडीट केली असं लोक म्हणतात. मला कुठं हे माहिती होतं ; पण साधारणपणे महत्वाकांक्षी विशेषत: स्त्री ही कुठपर्यंत जाऊ शकते,याचा एक अंदाज त्यात होता. त्यात शेवटी मी हे दाखवले आहे.ती पेटलेली असते, त्यामुळं तिच्या पध्दतीने शेवटी ती निर्णय घेते; पण इंदिरा गांधींनी तो निर्णय घेतलेला मला माहीत नव्हतं.

डॉ.बनसोडे : तुमचं एखादं नवीन नाटक लिखाण चालू आहे का ? किंवा लिखाणाबद्दल काही ठरवले आहे का ?

तेंडूलकर : मला जे म्हणायचंय ते व्यक्त करण्यासाठी कादंबरी हे माध्यम मला अधिक जवळचं वाटतं. नाटकाचं मला माहित नाही, होईलही न होईलही ; पण कादंबरीला मला कष्ट पडतात.ते माध्यम माझ्या हातात बसलेलं नाही. नाटकाचं असं आहे, की डोक्यात आलं, की आठ –पंधरा दिवसांत होऊनही जाईल,माहीत नाही मला ; पण आता तरी नाटकाकड नाही मी . काहीतरी कादंबरीचं लेखन मी करतोय ते काही महत्वाकांक्षी नाही.ते प्रकाशित होईल असंही मी गृहीत धरत नाही.कारण काही वेळेला त्यातला माझा रस जातो.तेव्हा सोडून देतो,दुसरं काही तरी चालू करतो.मुख्यत: माझा वेळ जाणं महत्वाचं आहे.कारण मी आयुष्यभर लिहित आलो आणि लिहिलं नाही तर मला झोप लागत नाही ,म्हणून मी लिहितो ; पण त्या लिहिण्याला त्यापलीकडचा अर्थ आता आहे, असं मला वाटत नाही त्यातलं काही झालं पुढे आणि बरं वाटलं माझं मला तर पुढे जाईलही. मला माहीत नाही.

डॉ.बनसोडे : नाना आज मी तुमच्याकडे मुलाखतीसाठी आलो, आणि यासाठी तुम्ही मला जो वेळ दिलात त्याबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानतो आणि तुम्ही लिहित असलेल्या कादंबरीला हार्दिक शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

बलभीम महाविद्यालय ,बीड.





## ज्योतीने तेजाची आरती

प्रा.संपदा कुलकर्णी

मराठी भाषेचे आद्यकवी मुकुंदराज साहित्याचे नवकोट नारायण मुकुंदराज, पासोडीकर दासोपंत आणि स्वामिनी योगेश्वरीचं अधिष्ठान असलेलं आडवळणाचं, आमच छोट गाव, अंबाजोगाई.

साहित्यिक आणि आध्यात्मिक अधिष्ठानाबरोबरच शैक्षणिक वारसा या गावाला लाभला . तो ब्रम्हीभूत स्वामी रामानंद तीर्थ, परमपूज्य बाबासाहेब परांजपे यांच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या रूपाने पन्नास वर्षांपासून प्रगतीची दीपकळी सतत तेजस्वी ठेवण्याचे काम इथल्या शिक्षण संस्थानी केले आहे.शिक्षण आणि साहित्य,अध्यात्म आणि इतिहास यांचे मोठे संचित इथे आहे.त्यामुळे इथले कल्चरच वेगळे आहे. कलानिर्मिती ,कलाप्रेमी रसिकांचा संग्रह असा मोठा वारसा अंबाजोगाईला आहे. याची सुरूवात मुळी झाली ती मराठी सारस्वताच्या वाढविस्तारात भर घालणा-या दासोपंताकडून शास्त्रीय संगीत ,ताल नृत्य यासोबतच दासोपंतानी ललीत या पद्य लोकनाट्याची रचना इथे केली आणि अंबाजोगाईच्या लोक रंगभूमीचा पाया रचिला १५ व्या शतकाच्या या काळापासून.दरम्यान बरीच स्थित्यंतरे झाली जागतिक घडामोडी घडल्या प्रसार, प्रचार माध्यमासाठी नाटक वापरले जाऊ लागले .त्याला अंबाजोगाई ही अपवाद राहिली नाही.

कै.गोविंदराव देशपांडे यांनी ललीतांच्या पदांचे पुनर्लेखन केले आणि दासोपंतांनी स्थापन केलेल्या आनंद संप्रदायाच्या एकमुखी दत्त संस्थानात नवरात्राच्या शेवटच्या दिवशी ललीत करण्याची प्रथा पडली ती आजतागायत सुरू आहे.ललीत म्हणजे सोंगे आणून केलेले कीर्तन यात पद्याचा भाग अध्यात्मिक व देवाच्या कीर्ती गायनाचा असतो तर संवादाचा गद्य उत्स्फूर्त भाग मनोरंजनाचा असतो .अशा लोकनाट्य कला प्रकारापासून अंबाजोगाईच्या नाट्यभूमीचा आढावा घ्यावा लागतो.ह्या नाट्यविष्काराचा प्रारंभच जणप्रबोधन, मनोरंजन यासाठी हे सादरीकरण असा होत असे.प्रबोधनासाठी नाट्य करणारे आणि मनोरंजनासाठी नाटक करणारी मंडळी दोन्ही पातळ्यांवर अंबाजोगाईचा नाट्यलौकिक वाढवणारी कलावंत मंडळी इथे होती व आजही आहेत.नाटकाच्या मुलभूत घटकांची पूर्तता इथे होते. प्रथितयश लेखक ते चोखंदळ प्रेक्षक व समीक्षक सर्व घटकांनी अंबाजोगाई परिपूर्ण आहे. १९१३ च्या सुमारास कै.गोविंदराव देशपांडे यांनी 'सतीमदालसा' आणि' विवेकोत्कर्ष मनोदय' ही दोन संगीत नाटके लिहिली व त्या काळच्या पध्दतीने सादर केली.पू.स्वामी रामानंद तीर्थ व पू.बाबासाहेब परांजपे यांनी सहका-यांच्या मदतीने १९३५ - १९३६ च्या सुमारास योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना केली या शाळेतील शिक्षक कर्मचा-यांनी स्वातंत्र्य, शिक्षण यांचे महत्त्व पटवण्यासाठी नाटके करण्यास सुरूवात केली. त्यांनी 'कला केंद्र' नावाची पहिली नाट्यसंस्था स्थापन केली. यात गो.भ.सराफ , वसंतराव देशपांडे ,टी.डी. गोस्वामी, भिकाजी राखे, त्र्यंबकराव वसेकर ,रामपूरकर गुरूजी, साधू गुरूजी, आर.डी.देशपांडे, रा.स.देशपांडे, गोपाळराव पांडे , माणिकचंद संचई, वासुदेवराव कुर्डूकर ,ज्ञा.मा.खोडसकर इ.नाट्य कलावंत ,गायक कलावंत, या मंडळात होते .कोणत्याही प्रकारचे नाट्य प्रशिक्षण नसताना नाट्य वैभवाची मुहूर्तमेढ या शिक्षक व कलाकारांनी इथे रोवली.त्यांच्या अभिनयाच्या नाट्यनिर्मितीच्या स्मृती आजही चवीने सांगितल्या जातात . त्यांची प्रेरणा घेवून पुढे अनेक नाट्यसंस्था निघाल्या . त्यात अग्रक्रम लागतो तो 'कलासंगम ' या हौशी नाट्यमंडळाचा महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात अंबाजोगाईच्या नावाचा दबदबा निर्माण करण्याचे काम या नाट्य संस्थेने केले .नाट्याभिनयाची चळवळ सार्वत्रिक करून अनेक नव्या गोष्टीचे पायंडे कलासंगमने पाडले.

कै.रामभाऊ मुकदम या सृजनशील दिग्दर्शक नाट्यलेखकाने नाट्यपरंपरा निर्माण केली .संगीतकाराच्या अमूर्त संकल्पनांना मूर्त रूप 'कलासंगम' मध्ये मिळाले. १९६२ पासून जवळपास १९८० पर्यंत या मंडळाने आपला नाट्य यज्ञ चालवला. स्वत: राम मुकदमसह प्रा.प.श्री. संभूस ,प्रा.रा.द.अरगडे यांच्यासारखे नाट्यलेखक या मंडळात होते. रामकाका मुकदम,संभूसाच्या नाटकाने ललिताबाई मुकदम या गुणी स्त्री अभिनेत्रीला अलौकिक यश मिळवून दिले.राज्य नाट्य महोत्सवात सतत सहा वर्ष सहा वेळा प्राथमिक आणि अंतिम फेरित अभिनयाचे रौप्यपदक त्यांना मिळाले.त्यांच्या भूमिका महाराष्ट्रभर गाजल्या त्यांच्या अभिनयाला अनेक मान्यवरांची दाद मिळाली.तसेच पुरूष कलावंत म्हणून ॲड.व्ही.के. चौसाळकर यांच्या अभिनयाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.अभिनयाचे रौप्यपदक त्यांना मिळाले. त्यांनी अनेक नाटकात भूमिका केल्याचे स्मरण आजही प्रेक्षकांना आहे.सौ.ललिताबाई मुकदम आणि व्ही.के.चौसाळकर ही हौशी रंगमंचावरची नायक,नायिका जोडी चांगलीच गाजली व स्मरणात राहिली.लेखन, दिग्दर्शन , अभिनयाच्या घटकांनी रसिकांची मने तृप्त करण्याचे काम कलासंगमने केले. प्रा.संभूस सरांचे व प्रा.रा.द.अरगडे यांचे नाट्यलेखन चांगलाच काळ गाजवणारे ठरले.प्रा.अरगडे सरांचे नाट्यलेखन पहिले प्रचारकी वगनाट्य म्हणवले जाते. शब्द सामर्थ्यामुळे ,त्यातील भाषेमुळे याचकाळात अरगडे सरांची नाटके राष्ट्र सेवादलाच्या पथकानी दिल्लीपर्यंत नेली. त्यात सौ.डॉ.शैला लोहिया, डॉ.द्वारकादास लोहिया, प्रा.माधव मोरे, सौ.मंगला मोरे ,सौ.जोगदंड यांच्या भूमिका विशेष गाजल्या या नाट्यातील नृत्यसंगीत डॉ.शैला लोहियांचे मनोवेधक नृत्यसंगीत प्रामुख्याने स्मरणात राहील असे होते.प्रा.रा.द.अरगडे ,प्रा.प.श्री.संभूस यांच्या सोबतच ज्येष्ठ कादंबरीकार प्रा.रंगनाथ तिवारी यांनी नाटके त्यांनी 'नाट्यआराधना' या हौशी नाट्यसंस्थेसाठी नाटके लिहिली .या संस्थेतील प्राचार्य के.ज. पुरोहित ,कै.प्रमोद महाजन ,रेखा महाजन ,प्रा.केशव देशपांडे, डॉ.दिलीप घारे ,प्रा.यशवंत देशमुख या हरहुन्नरी व गुणी कलाकारांनी तो काळ चांगलाच गाजवला .नाट्य सादरीकरणाची विविधता , बदलते संदर्भ, नव्या जुन्याचा संगम, अंबाजोगाईच्या सगळयाच नाट्यमंडळात दिसून येतो . अगदी नाट्यसंस्थेच्या नावांपासून नाट्य आराधनेपासून काही तरूणांचा एक चमूवेगळा होवून त्यांनी' फिनिक्स 'नाट्यमंच काढला.अनेक कलाकारांना संधी मिळावी हाच याचा हेतू होता. श्री . कृष्णा भोकरे, श्री.मुकूंद हस्तक, श्री.रविंद्र गंगाखेडकर, श्री.विश्वास तांबोळी, श्री.श्रीरंग सुरवसे इ.नव्या दमाच्या या कलाकारांनी आपल्या नाट्यजाणीवांची साक्ष दिली. स्वकर्तृत्वाची व अभिनय कौशल्याची झलक दाखविली.फिनिक्स हे नाव सार्थ केले.

१९७३ साली या मंडळाची व्यापकता अधिक वाढवण्यासाठी योगेश्वरी नाट्यमंडळ पुढे आले.यात प्राचार्य लवंदे ,प्राचार्य टेकूरकर ,प्रा.अरूण भाटे, प्रा.खोत,प्रा.केशव देशपांडे ,प्रा.प्रकाश प्रयाग ,डॉ.दिलीप घारे,प्रा.सुधीर वैद्य या तरूण कलाकारांनी आपल्या समर्थ नाट्यगुणांचाप्रभावी परिणाम साधला.राज्य नाट्य स्पर्धा,कामगार कल्याण केंद्र आणि अन्य ठिकाणी हौशी रंगमंचाची प्रगल्भता या चमुने सिध्द केली. स्वत:ची केवळ हौस म्हणून,नाटकांची चोखंदळ निवड,भूमिकांची कसून तयारी,प्रायोगिक दिग्दर्शन अशा अनेक अंगानी त्यांची नाटके गाजली.वेगवेगळया विषयांत तज्ञ असणारीही मंडळी नाटकाशी संलग्न असल्याने त्यांचे विद्यार्थीही त्यांच्या बोटाला धरून पुढे आले.याच काळात श्री.केशव देशपांडेची राष्ट्रीय नाट्य विद्यालय,दिल्ली येथे निवड होणे, प्रा.दिलीप घारे नाट्यशास्त्राचे प्राध्यापक होणे,प्रा.शशिकांत ब-हाणपूरकर नाट्यशास्त्राचे डॉक्टरेट होणे या सर्व भूषणावह अभिमानाच्या संधी केवळ स्वत:च्या क्षमता, गुणांनी त्या काळात त्यांनी प्राप्त केल्या. ही अंबाजोगाईच्या नाट्यभूमीलाही परंपरागत अभिमानाची गोष्ट होती व आहे. राज्य नाट्य महोत्सवातील वाढती आवड व चुरस लक्षात घेता आणि मुख्य म्हणजे तरूण विद्यार्थी कलावंत घडविण्यासाठी स्थानिक नाट्य महोत्सवाचे आयोजन अंबाजोगाईत केले जाऊ लागले.त्यामुळे चोखंदळ रसिक प्रेक्षकांची पिढी तयार झाली. १९८९ साली योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या, स्वामी रामानंद तीर्थ कला वाणिज्य महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग सुरू करण्यात आला . हौसेला,आवडीला शिक्षणाची जोड मिळाली आणि नाट्यशास्त्र शिक्षण घेणे हा करिअरचा भाग बनला. या

विभागातील विद्यार्थी, नाव परंपरा असलेल्या गावातील रंगकर्मी या सर्वासाठी 'अंकूर प्रतिष्ठाण योगेश्वरी क्रीडा सांस्कृतिक मंडळ' आणि 'रंगवेध' या नाट्य मंडळाची स्थापना केली गेली. महाराष्ट्र राज्य नाटयाच्या जालना ,औरंगाबाद या केंद्रावर दहा पैकी पाच नाटके अंबाजोगाईची होवू लागली. अनेक विद्यार्थी कलाकरांना राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाची पारितोषिके आपल्या गुरूंच्या मार्गर्शनाखाली मिळू लागली.प्रा.केशव देशपांडे,प्रा.संधीर वैद्य , डॉ.प्रकाश प्रयाग यांना दिग्दर्शन निर्मीती, लेखन तसेच वैद्य यांना अभिनयासाठी पदके मिळाली .तर संपदा कुलकर्णी ,अश्विनकुमार मुकदम ,अरूंधती लोहिया, सविता पाठक, प्राजक्ता देशपांडे, संजय सुगावकर,प्रकाश देशपांडे, गणेश मुडेगावकर, बाबा देशपांडे या विद्यार्थ्यांना अभिनयाची प्रमाणपत्रे ,दिग्दर्शनाचे पुरस्कार मिळाले.तसेच अन्य नाटयतंत्रातही विद्यार्थी कलावंताची नव्याने कलात्मक निर्मितीक्षमता वाढली.रंगतंत्रात नंदन फाटक ,नितीन जोशी, डॉ.संदानंद ,डॉ.संतोष कुलकर्णी ,आनंद क-हाडे , श्री.मसारे, राउत ,देवगावकर, कानसुरकर, राजू वाघमारे  हे दिग्दर्शन ,नेपथ्य ,निर्मिती, अभिनयात जाणकार होवून स्वत:च्या संकल्पना मूर्त रूपात साकारण्यासाठी धडपडू लागले. आजही गावाचा सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी विविध स्तरावर जो तो धडपडतो आहे. क्षेत्र वेगळे झाले तरी प्रत्येकाची नाटकाशी नाळ जोडलेलीच आहे.इतिहासाची पाने चाळताना केवळ आठवणीत रमून जाण्यापेक्षा धडपडणा-या नाट्यकर्मीकडून गावाला भरपूर अपेक्षा आहेत.नव्या आविष्काराची प्रतिक्षा आहे. लेखनाच्या क्षेत्रात अमोल अरगडे, प्रकाश देशपांडे, दिग्दर्शन निर्मिती क्षेत्रात संपदा कुलकर्णी ,अश्विनकुमार देशपांडे,राजू वाघमारे यांच्याकडून तर अभिनयात वैशाली गोस्वामी,प्रा.संपदा कुलकर्णी क ल्पना लोहिया,मिलिंद मुकदम,महेश सबनीस या मंडळींकडून अंबाजोगाईचा नाटयवारसा सतत प्रयोगाकरिता होण्यासाठी कार्यरत व्हावा हीच या निमित्ताने अपेक्षा व सदिच्छा.!अंबाजोगाईच्या शाळा महाविद्यालयातूनही  दर्जेदार सांस्कृतिक  ( संगीत -नृत्य - नाटय )कार्यक्रम होतात.विशेषत: शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे,प्राचार्य,डॉ.संतोष मुळावकर,कांता प्रसाद मुक बधीर विद्यालय हे लेखक म्हणून प्रसिध्द आहेत. खोलेश्वर विद्यालय,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सर्व विभाग याठिकाणी शैक्षणिक रंगभूमी विकसित व्हावी म्हणजे अंबाजोगाईची रंगभूमी परिपूर्ण होईल आणि असा वारसा अधिक संपन्न करण्यातूनच नाट्य इतिहासाचे वैभव वाढेल. यात आव्हानात्मक क्षेत्र इथे आहे ते म्हणजे बालरंगभूमीचे प्रा.संपदा कुलकर्णी , डॉ.शुभदा लोहिया यांनी आविष्कार या उपक्रमाच्या माध्यमातून बाल कलावंताचा एक कुशल गट निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.प्रतिवर्षी वासंतिक शिबिरातून नाट्याभिनयाचे संस्कार विविध संहिताच्या सादरीकरणातून केले जातात. ही भविष्यातील कलावंतासाठी उमलत्या कळयांना योग्य दिशेने फुलण्याचे व फुलवण्याचे कार्य केले जात आहे. ही अत्यंत आशादायी व  प्रोत्साहक बाब आहे.तसेच स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग व संगीत विभाग उगवत्या पिढीला कलात्मक दृष्टया घडविण्यासाठी सज्ज आहे.योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष व इतर  पदाधिकारी यांनीही या विभागाला प्रोत्साहन देण्यासाठी सतत प्रयत्न केला आहे.नव्या उमेदीने या ललित कलांना फुलविण्याचे कार्य या शहरात होते.शैक्षणिक संस्था व हौशी नाटयसंस्था, अंबानगरीतील रसिक प्रेक्षक या सर्व कला सेवकांना प्रेरणा देण्यास सिध्द असतात ही फार मोठी जमेची बाजू आम्हा प्रयोगशील नाट्य प्रेमींना मोलाची वाटते.     शतकानुशतकाची कला, साहित्य व शिक्षणाची भक्कम पार्श्वभूमी असणारे बीड जिल्हयातील हे शहर बदलत्या स्थितीतही कलासंपन्न राहिल ही आशा वाटते.... आम्ही चालवू हा पुढे वारसा हा दृढ प्रयत्न करून नवी पिढी या क्षेत्रात उतरते आहे . ही खूपच आशादायी  पोषक व  प्रेरक बाब आहे. यास  प्रतिसाद मिळत  राहो हीच सदिच्छा !





# मराठी सामाजिक नाटकाची वाटचाल

प्रा.डॉ.ललित अधाने

नाटक हा वाङ्.मय प्रकार इतर वाङ्.मय प्रकाराप्रमाणेच महत्त्वाचा असल्याने त्याच्या अंतर्बाह्य वेगळेपणामुळेच तो जनमानसावर आजपावेतो अधिराज्य करत आलेला आहे.या नाट्यवाङ्म.याच्या संदर्भाने या नाट्यकलेच्या जन्माची कथा अतिशय रंजकपणे सांगितली जाते.भरतमुनींनी आपल्या नाट्यशास्त्रात नाट्यकलेला चौसष्ठ कलांपैकी संगीत,नृत्य,शिल्प,वास्तु,याप्रमाणेच महत्वाचे मानून तिला 'पंचम वेद 'असे संबोधले आहे.भारतीय नाट्यपरंपरेत नाटकाची बीजे विद्वानांनी थेट ऋग्वेदापर्यंत शोधलेली दिसतात.र.पं.कंगले यांनी नाटकासंबंधी विवेचन करताना,
ङ्ख नाटक हा साहित्यप्रकार केवळ वाचनाचा किंवा चिंतनाचा ,मननाचा नसून तो दृश्य व श्राव्य प्रकार आहे.ऐकणे आणि पाहणे या दोन्ही क्रिया एकाच वेळी रसास्वादाच्यावेळी घडत असतात म्हणून त्याला 'दृश्य-काव्य' असेही संबोधतातङ्खअसे म्हटले आहे.

रंगभूमीच्या विकासातला पहिला टप्पा म्हणजे विष्णुदास भावे यांचा काळ होय. या काळात मराठी रंगभूमी बाल्यावस्थेत बाळसेदार रूप घेऊ लागल्याचे दिसते.कारण वेगवेगळ्या नाटक मंडळींनी नवनवीन प्रयोग करून नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न केला.याच काळात 'बुकिश' नाटकांचा ओघ'आंग्ल' शिक्षित लोकांनी मराठीत आणला.त्यामुळे मराठी रंगभूमीला नाट्यतंत्राचे आणि नव्या दृष्टीचे पाठ वाचावयास मिळाले. या मराठी रंगभूमीच्या विकासात अण्णासाहेब किर्लोस्कर समकालीनांनीही महत्त्वाची भर घातली.त्यांच्या युगाला मराठी संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग मानले जाते.

मराठी रंगभूमीचा विकासक्रम पाहता नाट्यवाङ्मयात विविध प्रवाह दिसून येतात.पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक,राजकीय,रूपांतरित,प्रायोगिक,चरित्रात्मक, विडंबनात्मक यासारखे प्रवाह मराठी नाटयाच्या संदर्भात दिसून येतात.

मराठी रंगभूमीवरील जवळपास सर्वच नाटककारांनी सामाजिक नाटके लिहिलेली असून सामाजिक नाटकांचा प्रवाह अतिशय समर्थपणे पुढे नेला.त्याचप्रमाणे तो वैविध्यपूर्णही आहे.लेखक हा समाजाचा एक घटक असतो.त्यामुळे तो समाजामध्ये राहूनच आपले लेखन करत असतो.कोणतीही कलाकृती ही स्थलकालसापेक्ष असते.म्हणजेच प्रत्येक कलाकृतीमध्ये तत्कालीन समाजाचे संदर्भ आपणास सापडतात.लेखक हा समाजाकडे डोळसपणे पाहत असतो आणि या समाजातूनच आपल्या लेखनासाठी विषय निवडत असतो.मराठी सामाजिक नाटकाचा विचार करता यामध्येही
समाजजीवनातील विविध परिवर्तने,मानसिक आंदोलने,सामाजिक तसेच विविध प्रश्न,विचारप्रवाह यांचे सूक्ष्म चित्रण सामाजिक नाटककारांनी केले आहे.त्यामुळे सामाजिक नाटके ही त्या त्या काळातील समाजजीवनाचा आरसा आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये.इ.स.१८५० ते १९२० या कालखंडातील मराठी नाटकाचा विचार करतो.

मराठी सामाजिक नाटकाची सुरूवात महान विचारवंत व समाजसुधारक म.जोतीराव फुले यांच्या १८५३ मध्ये
'तृतीय रत्न' या नाटकाने झालेली आहे.प्रा.सीताराम रायकर यांनी एप्रिल –जून १९५९ पुरोगामी सत्यशोधक या त्रैमासिकात प्रथम' तृतीय रत्न' प्रकाशित केलेले आहे. या नाटकाबद्दल डॉ.दादा गोरे यांनी म.जोतीराव गोविंदराव फुलेकृत ,तृतीय रत्न या संपादनात ङ्खजोतीराव फुले यांनी ज्ञानरूपी तिसरा डोळा उघडून तत्कालीन ब्राम्हण समाजावर हल्ला केला आणि बहुजन दलित समाजाची मानसिकता बदलण्याचे कार्य आपल्या टोकदार लेखणीने केले.तृतीय रत्न म्हणजे लक्ष्मी ही समुद्र मंथनातून तिसरे रत्न म्हणून बाहेर आली.या लक्ष्मीसाठी,पैशासाठी ब्राम्हण काय काय धार्मिक ढोंग करून समाजाला लुबाडतो,असे फुले यांना दाखवून दयायचे आहे. ङ्खहे विचार महत्वाचे वाटतात. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील शोषणाची बलस्थाने उद्ध्वस्त करण्यासाठी तृतीय रत्न हा नाट्यरूपी आसूड म.फुले यांनी वापरला. यात कुठलाही संदेह नाही. यानंतर गो.ना. मांडगांवकर यांचे व्यवहारोपयोगी हे नाटक प्रकाशित झाले .या नाटकामध्ये बालविवाहाचे वैयर्थ्य आणि लग्नात होणारे खर्चाचे नुकसान दाखवले आहे.यानंतर महादेव बाळकृष्ण चितळे यांचे 'मनोरमा' (१८७१) हे सामाजिक नाटक रंगभूमीवर आले.यामध्ये कुंटिणाच्या प्रश्नाला बळी न पडणा–या मनोरमेचे जीवन चित्रित केलेले आहे. या दोन्ही नाटकांचा विचार करता या नाटकातील विषय हा सामाजिक असला तरी ही नाटके स्वतंत्र नाटके नाहीत.त्याच दृष्टीने ही नाटके उच्च पातळीवरीलही नाहीत.त्यामुळे त्यांना स्वतंत्र सामाजिक नाटके किंवा मराठीतील आदय सामाजिक नाटके म्हणणे योग्य ठरणार नाही. पण मराठी सामाजिक नाटकाची बीजे या दोन्ही नाटकांत सापडतात असे आपणास म्हणता येते . या दृष्टीने विचार करता मराठीतील स्वतंत्र आणि पहिले सामाजिक नाटक म्हणून गो. ब. देवल यांच्या 'संगीत शारदा' या नाटकाचा उल्लेख करता येतो.समस्या प्रधानता हा या नाटकाचा मूळ गाभा आहे. शारदा या नाटकामधून तत्कालीन समाजामध्ये रूढ असलेल्या जरठकुमारी विवाहावर लेखकाने चाबकाने फटकारे ओढले आहेत.सामाजिक गंभीर विषयावरील हे स्वतंत्र नाटक असल्याने ख–या अर्थाने गो.ब.देवल यांचे 'संगीत शारदा ' हेच पहिले स्वतंत्र व सामाजिक नाटक ठरते.

गो.ब.देवल यांनी 'संगीत शारदा' या नाटकाबरोबरच 'दुर्गा', 'मृच्छकटिक' 'विक्रमोर्वशीय', 'झुंजारराव, 'शापसंभ्रम', 'संशयकल्लोळ' उर्फ 'तसबिरीचा घोटाळा' ही सामाजिक नाटके देवलांनी लिहिली आहेत.पण ही सर्वच नाटके रूपांतरित व भाषांतरित आहेत.त्यामुळे त्यांना स्वतंत्र सामाजिक नाटके म्हणता येत नाही.

१९२० पर्यंतच्या सामाजिक नाट्यलेखनाच्या प्रवासामध्ये श्री.कृ.कोल्हटकर यांचे स्थान महत्वपूर्ण आहे.त्यांनी 'मूकनायक' , 'वीरतनय' , 'गुप्तमंजुषा' , 'मतिविकार' , 'प्रेमशोधन', 'वधूपरीक्षा', 'सहचारिणी' , 'परिवर्तन' ही सामाजिक नाटके मराठी रंगभूमीवर आणली.त्यांच्या नाटकामधून पुनर्विवाह ,मिश्र विवाह, प्रेममूलक विवाह, स्त्रीशिक्षण,स्त्री–पुरुष समानता,जातिभेद बाल–प्रौढ,विवाह असे काही सामाजिक प्रश्न हाताळलेले आहेत; पण त्यांची नाटके करमणूकप्रधान असल्यामुळे सर्वच नाटकांची कथानके ही कल्पितावर आधारित आहेत; त्यामुळे गो.ब. देवल यांनी संगीत शारदा या नाटकात सामाजिक प्रश्न ज्या गांभीर्याने हाताळले आहेत, ती गांभीर्यता गो.ब.देवलांचे समकालीन असूनही श्री.कृ.कोल्हटकर यांच्या सामाजिक नाटकांत दिसत नाही.

रा.ग. गडकरी यांचे नाट्यलेखन याच कालखंडातील आहे.गडकरी यांनी आपल्या नाट्यलेखनाने सामाजिक नाटकांच्या प्रवाहाला दर्जेदार नाटकांची देण दिली आहे. त्यांनी आपल्या नाट्यकृतीतून सामाजिक प्रश्नांची हाताळणी उत्कृष्टपणे केली आहे.सामाजिक प्रश्न गांभीर्याने हाताळण्याचे त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. त्यांच्या सामाजिक प्रश्नांच्या हाताळणीतही वैविध्यता जाणवते. प्रेमसंन्यास या नाटकातून त्यांनी विधवा विवाहाचे दुष्परिणाम व पुनर्विवाहाची गरज प्रतिपादित केली आहे.तर 'पुण्यप्रभाव'या नाटकात पतिव्रता स्त्रीचा महिमा सांगितला आहे. 'भावबंधन' या नाटकात बेजबाबदारपणा आणि गर्व यांचा दुष्परिणाम दाखवला आहे.गडकरी यांचे सामाजिक प्रश्न हाताळण्याचे कौशल्य अपूर्वच आहे.रा.ग.गडकरी यांचे सर्वात गाजलेले नाटक म्हणजे 'एकच प्याला' हे होय. 'एकच प्याला' ही दारूच्या व्यसनामुळे उद्ध्वस्त होणा–या एका कुटुंबाची कथा आहे.सुधाकर सिंधू यांच्या भावजीवनाची आणि मूल्यांच्या पराभवामुळे, दारूच्या व्यसनामुळे निर्माण झालेल्या

त्यांच्या जीवनाची ही ' शोकात्मिका 'आहे.मराठी सामाजिक नाटकाच्या प्रवाहामध्ये एक दर्जेदार शोकात्मिका म्हणून या नाटकाचा उल्लेख करावा लागतो.यापूर्वीही दारूच्या दुष्परिणामाचे चित्रण ' मूकनायक ' ,' विद्याहरण' या नाटकांतून आले आहे.पण एकच प्याला हे नाटक त्यामध्ये क्रमांक एकचे ठरते यामध्ये संशयाचे कारण नाही.या नाटकातील सुधाकर ,रामलाल,तळीराम यांचे व्यक्तिमत्व आणि स्वभावचित्रेही लीलया रेखाटली आहेत.त्यामुळे प्रेक्षकांच्या -हदयावर या नाटकाने अधिराज्य गाजवले.

गो.ब.देवल यांचे 'संगीत शारदा' आणि रा.ग.गडकरी यांचे 'एकच प्याला' ही या काळातील दर्जेदार व गंभीर सामाजिक नाटके होत. पण इतर नाटकांमध्ये हे गांभीर्य फारसे आढळत नाही.याची कारणे परंपरावादी समाजव्यवस्था, परिवर्तनाला नसलेले पोषक वातावरण आणि पौराणिक नाटकांचा लोकमानसावरील जबरदस्त पगडा अशी असू शकतात. त्यामुळे हा कालखंड सामाजिक नाट्यलेखनासाठी फारसा अनुकूल नव्हता असे म्हणता येते.तरीही या कालखंडात सामाजिक प्रश्न काही नाटककारांनी आपल्या लेखनाद्वारे मांडले,त्यांचे कार्य वादातीतच आहे असे आपणास दिसते.

१९२० ते १९५० या कालखंडातील सामाजिक नाटकांचा प्रवाह अत्यंत महत्वपूर्ण आहे.कारण या कालखंडातील सामाजिक नाटकांमध्ये कालसुसंगतता आणि अद्यावतपणा मोठया प्रमाणात जाणवतो.या काळातील सामाजिक नाटकांनी तत्कालीन समाजजीवनातील अनेक प्रश्न मराठी रंगभूमीवर आणले.त्यात भा.वि.वरेरकर,अनंत काणेकर,श्री.वि.वर्तक, प्र.के. अत्रे,पु.ल.देशपांडे ,मो.ग.रांगणेकर आदी नाटककारांचे नाट्यकर्तृत्व महत्वपूर्ण आहे.भा.वि.वरेरकर हे या कालखंडातील सर्वात महत्वाचे नाटककार होत.त्यांनी आपल्या नाटकांमधून मोठया प्रमाणात सामाजिक प्रश्न हाताळलेले दिसतात.विपुलता आणि विविधता हे त्यांच्या नाट्यलेखनाचे महत्वाचे वैशिष्ट्य होय.त्यांची नाटके ही हेतूप्रधान आहेत. कोणतातरी हेतू मांडण्यासाठी ,प्रकट करण्यासाठी त्यांनी नाट्यनिर्मिती केलेली दिसते.

भा.वि.वरेरकर यांचे 'हाच मुलाचा बाप' हे नाटक हुंडयाच्या प्रश्नावर आधारित आहे.तर त्यांनंतरच्या 'तुरूंगांच्या दारात' या नाटकातून हिंदू समाज रूढी -प्रथारूपी तुरूंगाच्या दारामध्ये कसा अडकला आहे, याचे चित्रण केले आहे.यामध्ये अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्नही मांडलेला दिसतो .'सत्तेचे गुलाम', या नाटकामध्ये त्यांनी कोर्टातील भांडणामुळे पैशाची कशी धूळधाण होते, हे दाखवले आहे.'जागती ज्योत' मध्ये स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार तर 'नया जमाना ' मध्ये स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार केला आहे.'सोन्याचा कळस'हे त्यांचे गिरणी मजूरांच्या प्रश्नावर आधारित नाटक आहे . हे नाटक त्यांच्या ' धावता धोटा ' या कादंबरीचे रूपांतर आहे.त्याचप्रमाणे त्यांनी 'कोरडी करामत','पापी पुण्य सहा बंदिवान', 'समोरासमोर' ही भा.वि.वरेरकर यांनी सामाजिक प्रश्नांवर नाटके लिहिली आहेत .ती लिहिताना त्यांनी इब्सेन तंत्राचा वापर केलेला दिसतो . बोलीभाषेचा वापर करून त्यांनी नाटक अधिक दर्जेदार केले.१९२० नंतर मराठी बोलपटांच्या आक्रमणामुळे मराठी नाटकांना ओहोटी लागली होती.त्यामुळे १९२० ते १९३० हा कालखंड मराठी नाटकाच्या दृष्टीने अंधारयुग समजायला हरकत नाही.या काळात मराठी नाटकाला सावरण्याचे काम 'नाट्यमन्वंतर' या संस्थेने केले. 'नाटयमन्वंतर' या संस्थेने श्री.वि.वर्तक यांची 'आंधळयाची शाळा' 'लपंडाव' आणि 'तक्षशिला' ही नाटके मराठी रंगभूमीवर आणली .ही तीनही नाटके सामाजिक नाटके आहेत 'आंधळयाची शाळा ' या नाटकांमध्ये स्त्रीने कलंकित पुरूषाशी विवाह का करावा ? हा प्रश्न उपस्थित केलेला असून या नाटकांसाठी इब्सेन तंत्राचा वापर करून मराठी नाटकाला स्थैर्यता प्राप्त करून देण्याचे काम 'नाट्यमन्वंतर' या संस्थेने आणि श्री.वि. वर्तक यांनी केले.त्यामुळे त्यांचे मराठी नाट्यवाङ्मयातील स्थान महत्त्वपूर्ण आहे.

१९२० नंतर विपुल प्रमाणात नाट्यलेखन करणारे प्र.के.अत्रे यांची सामाजिक नाटके महत्त्वाची आहेत.त्यांनी ' साष्टांग नमस्कार' या पहिल्याच नाटकात माणसाच्या छंदिष्टपणाचा उपयोग करून घेतला आहे. ' घराबाहेर'मध्ये घराबाहेर पडणा-या स्त्रीची समस्या आहे, तर ' कवडीचुंबक' यानाटकात पैशाला पैसा लावून ठेवणारे श्रीमंत लोक कसे नीरस जीवन जगतात यांचा उपहास केला आहे.' लग्नाची बेडी', हे त्यांचे गाजलेले नाटक .पुरूषाच्या चंचल वृत्तीला लग्नाच्या बेडीचे बंधन हवे, तरच संसार सुखाचा होईल हे तत्त्व या नाटकातून मांडले आहे.डॉ.लागू या नाटकात पैशासाठी पेशंटला ठार मारणारा डॉक्टर तर ' बुवा तेथे बाया 'मध्ये स्त्रियांना फसवणारे बुवाबाज यांचा समाचार घेतला आहे. याप्रमाणेच त्यांची ' पराचा कावळा', ' जग काय म्हणेल',' पाणिग्रहण', ही सामाजिक नाटकेही महत्त्वाची आहेत.अत्रेंच्या नाटकांचा विचार करता प्र.के. अत्रेंची सामाजिक नाटकेही समस्याप्रधान आहेत. समाजातील भोंदूगिरी दांभिकपणा आणि व्यक्तिस्वभाव यावर अत्रे यांनी विडंबनात्मक लेखन केलेले दिसते. इब्सेन तंत्राचा वापर, चटपटीत संवाद, आटोपशीरपणा, खुसखुशीत विनोद यामुळे त्यांचे नाटक लक्षणीय ठरलेले आहे .'नाट्यनिकेतन' या नाट्यसंस्थेची त्यांनी स्थापना केली.त्यांचे नाट्यलेखन हे व्यवसायासाठी केलेले दिसते.'आशीर्वाद' या पहिल्याच नाटकात दारिद्र्यामुळे मुलगी घरातून लग्न होऊन गेल्यानंतर आपल्याकडे पाहणारे,काळजी घेणारे घरात कोणी राहणार नाही.त्यामुळे आपल्या मुलीने हे लग्न करू नये असे बापाला वाटते. अशा मुलीच्या लग्नाचा प्रश्न हाताळला आहे.'कुलवधू' या नाटकात पुरूषप्रधान कुटुंबपध्दतीने स्त्रियांना कराव्या लागणा-या तडजोडीचा मुद्दा मांडला आहे.कर्तृत्व असूनही भानुमती नव-याच्या मत्सर व अहंकारामुळे गृहिणी बनते, असे या नाटकामध्ये दाखवले आहे.'नंदनवन', या नाटकात स्त्रियांनी घर सोडून बाहेर जाता कामा नये, हा संदेश दिला आहे.'अलंकार' या नाटकामध्ये स्त्रीचा खरा अलंकार पतीच असतो.त्यामुळे या नाटकातील नायिका वत्सला आपल्या पतीचा छळ सहन करते. आपल्या घराची बिघडलेली घडी बसवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. याप्रमाणेच मो.ग.रांगणेकरांनी 'भटाला दिली ओसरी','माझे घर','वहिनी','एक होता म्हातारा','धाकटी आई 'या सामाजिक नाटकांतूनही अनेक सामाजिक प्रश्न हाताळले आहेत. उत्तम संवादामुळे त्यांच्या या कुटुंबकथा अधिकच प्रभावी ठरल्या आहेत.

मो.ग.रांगणेकरांप्रमाणेच अनंत काणेकर यांनीही सामाजिक नाटके लिहिली आहे.'निशिकांताची नवरी' १९३८ 'घरकुल', 'फास','पतंगाची दोरी','झुंज'ही त्यांची नाटके महत्त्वपूर्ण आहेत; पण ही सर्व नाटके रूपांतरित असल्यामुळे त्यांचा विचार सखोलपणे प्रस्तुत ठिकाणी केला नाही. १९२० ते १९५० या कालखंडामध्ये मराठी नाटक मोठया प्रमाणात समाजाभिमुख झाल्याचे दिसते.भा.वि.वरेरकर ,प्र.के.अत्रे,अनंत काणेकर, मो.ग.रांगणेकर ,श्री.वि.वर्तक या महत्त्वाच्या नाटककारांनी या काळात मोठया प्रमाणात लेखन करून मराठी सामाजिक नाटकाचा प्रवाह समृध्द केला आहे. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले ही घटना भारतीय जीवनाच्या दृष्टीने लक्षणीय आहे.कारण स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजजीवन झपाट्याने बदलले.समाजीवनात मोठया प्रमाणात परिवर्तन झाले.यातून काही नव्या समस्याही निर्माण झाल्या.स्वातंत्र्याने प्रश्नाचे बदललेले स्वरूप तत्कालीन साहित्याच्या माध्यमातून पाहावयास मिळते. १९५० नंतर मराठी नाटकाचा विचार करता मराठी रंगभूमीवर अनेक सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह सामाजिक नाटकांनी केलेला दिसतो.बदललेले प्रश्न ,विचार आणि नवी मूल्ये यांची उत्तम मांडणी या काळातील सामाजिक नाटकांमध्ये आलेली दिसते.त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर मराठी नाटक अधिकाधिक प्रगल्भ आणि समाजभिमुख होत गेलेले दिसते.स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये फक्त सामाजिक समस्यांचे चित्रण मोठया प्रमाणावर झाले; पण स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र सामाजिक समस्यांबरोबरच तत्कालीन माणसाची मानसिकता, त्याच्यातील विकृती यांचे चित्रण मनोविश्लेषणाच्या पातळीवर झालेले दिसते. त्याचप्रमाणे या नाटकामध्ये प्रयोगदृष्टया वैशिष्ट्यपूर्ण बदल झालेला दिसतो .त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंड मराठी नाटकाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

स्वातंत्र्योत्तर सामाजिक नाटकाचा विचार करता शिरवाडकरांचे 'दूरचे दिवे'हे स्वातंत्र्याच्या एक वर्ष अगोदरच लिहिलेले नाटक लक्षणीय आहे. आदर्शवादाच्या कल्पना म्हणजे 'दूरचे दिवे'आणि म्हणून ते दुरूनच पाहावेत हा विचार या नाटकात मांडला आहे .वि.वा.शिरवाडकरांचे हे

एकमेव सामाजिक नाटक १९५३ आहे.पु.ल.देशपांडे यांची सामाजिक नाटके स्वातंत्र्योत्तर काळात महत्वाची आहेत.पु.ल. देशपांडे यांचे 'अंमलदार' हे नाटक  मध्ये रंगभूमीवर आले.'सुरंगवाडा'  तील भोळसर लोकांमुळे त्याठिकाणी विश्रांतीसाठी थांबलेल्या इनामदाराच्या मुलावर अंमलदाराची भूमिका घेऊन पडते आणि तो ही भूमिका रूबाबात पार पाडतो, असे कथानक घेऊन अधिका-यांच्या, व्यापा-यांच्या वागणुकीचे उपरोधपूर्ण चित्र या नाटकात रेखाटले आहे.भाग्यवान  या नाटकात शिंदबा रद्दीवाल्याला तीस हजारांचे बक्षीस मिळते ;पण ते बक्षीस तो एका प्रसूतिगृहाला दान देतो.असा भावनात्मक जगणारा शिंदबा आणि त्यांच्या विरोधी स्वभावाचा  श्रीपतराव यांच्यातील वैचारिक संघर्ष परिणामकारक आलेला आहे.तर 'तुज आहे तुजपाशी या नाटकामध्ये गांधीवादी विचाराने जगणा-या आचार्यांची शोकात्मिका मांडली आहे.

मराठी रंगभूमीवर स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये दर्जेदार नाट्यलेखन करणारे आणि ज्यांची नाटके वादग्रस्त ठरली असे नाटककार विजय तेंडूलकर हे होत.'श्रीमंत'हे त्यांचे सामाजिक नाटक १९५५ मध्ये रंगभूमीवर आले. या नाटकामध्ये त्यांनी कुमारी मातेचा प्रश्न हाताळला आहे . तर 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकात कुमारी माता आणि भ्रूणहत्या हे विषय हाताळले आहेत.' माणूस नावाचं बेट'  या नाटकामध्ये पोटासाठी जगणे महत्त्वाचे;  पण तेही स्वाभिमानाने अशा काही मानवी भावभावनांचे चित्रण केले आहे.'सखाराम बाईंडर' आणि 'गिधाडे' या सामाजिक नाटकांतून त्यांनी समाजामध्ये नीतिमूल्यांचा होत असलेला -हास ,मानवाची पशू प्रवृत्ती आणि लैंगिकतेचे चित्रण केलेले आहे.'कमला', 'बेबी 'या नाटकामधून लैंगिक व आर्थिक शोषणाचा बळी घेणा-या स्त्रिया चित्रित केल्या आहेत.या सर्वापेक्षा 'घाशीराम कोतवाल' हे नाटक सर्वस्वी वेगळे आहे.  नाना आणि त्यांचा काळ या निमित्ताने -हासकालीन समाजाचे चित्र या नाटकातून रेखाटले. ही  ऱ्हासकालीन समाजव्यवस्था आणि राज्यव्यवस्था एखादया भस्मासुराला जन्म देते व हा भस्मासुर या समाजाचा  कसा  छळ मांडतो आणि या छळाच्या अतिरेकातून त्याचा कसा नाश होतो .हे सूत्र नाटककाराने अतिशय सूक्ष्मपणे रेखाटले आहे.याप्रमाणेच त्यांची 'सफर', 'मित्राची गोष्ट' ही सामाजिक नाटकेही  महत्त्वपूर्ण आहेत.

चि.त्र्यं.खानोलकर हे याच कालखंडात लेखन करताना दिसतात.त्यांनीही दर्जेदार अशी सामाजिक नाटके लिहिली असून त्यामध्ये विविधता दिसून येते.'एक शून्य बाजीराव' हे त्यांचे पहिलेच नाटक प्रयोगशील नाटक आहे.विषयाच्या नाविन्यतेमुळेही ते इतरांपेक्षा वेगळे ठरले आहे.बाजीराव एक नट आहे.सर्वांना तो हसवतो ; पण त्याच्या मनातील दु:ख व एकाकीपण तो विदूषकाच्या मुखवट्यामागे लपवतो .गौरीवरच्या एकतर्फी प्रेमाची सांगता तिच्याच हातचे विष पिऊन मरण्यात होते.त्यांचे यानंतरचे 'श्रीमंत पतीची राणी' ही हलकीफुलकी सुखात्मिका आहे.'अवध्य' हे खानोलकराचे सर्वाधिक चर्चा झालेले नाटक आहे.त्यामध्ये विकसित माणसातील पशुप्रवृत्ती किंवा आदिम पशुत्व दाखवण्यात आले आहे.तर 'कालाय तस्मै नम:' मध्ये नियती आणि स्वातंत्र्य यांच्यातील संघर्ष दाखवला आहे.काळापुढे कुणाचे काही चालत नाही हे सूत्र या नाटकात आहे.'रखेली ' या नाटकातून पिता-पुत्री यांचा संबंध दाखवला आहे.नकळतपणे होणारी ही चूक असते,त्यामुळे हे   नाटक गंभीर बनले आहे.त्याचप्रमाणे त्यांनी 'सगेसोयरे' ,'संगीत', 'अभोगी' ही नाटकेही लिहिली आहेत.

जयवंत दळवी यांची सामाजिक नाटके या काळातच रंगभूमीवर आली.जयवंत दळवी यांच्या पहिल्याच 'सभ्य गृहस्थ' या नाटकाचा विषय पुरूषाच्या मनातील स्त्रीविषयीच्या स्वाभाविक आकर्षणाचा आहे.मध्यमवर्गीय समाजामध्ये राहणा-या एका चाळीमध्ये हे नाटक घडताना दिसते.'संध्याछाया 'या नाटकाचा विषय मुलापासून दूर राहिल्यामुळे सर्व सुखसोयी असूनही वृध्दाचे जीवन दुःखमय असते.अशा एका वृध्द जोडप्याच्या मनाचा होणारा कोंडमारा म्हणजे हे नाटक होय.महासागर १९७९ या नाटकात स्त्री-पुरूष संबंध असूनही कोणत्याही विकृतीचे चित्रण नाही.उलट शरीरसुखाच्या बाबतीत प्रत्येक माणसाचे मन 'महासागर' आहे हे सूत्र या नाटकातून मांडले आहे. त्याप्रमाणेच जयवंत दळवी यांनी 'बॅरिस्टर', 'दुर्गी ','सावित्री', 'मुक्ता', 'पर्याय', 'स्पर्श','किनारा','कालचक्र' ही सामाजिक नाटके लिहून त्या त्या काळातील सामाजिक प्रश्न,मानवी विकृती ,मनातील गुंतागुंत यांचे  चित्रण या नाटकांतून केलेले दिसते.

महेश एलकुंचवार यांचे 'रूद्रवर्षा' हे पहिले नाटक स्त्री पुरुष संबंधीची अर्थपूर्णता आणि मानवी जीवनातील एकूण दु:खाचे स्वरूप हा या नाटकाचा विषय होय.महेश एलकुंचवार यांनी आपल्या लेखनाची सुरूवात एकांकिका लेखनापासून केली असली तरी'गार्बो'या नाटकापासून त्यांनी संपूर्ण नाटकेच लिहिलेली दिसतात.त्यांनी आपल्या सामाजिक नाटकातून समाजातील अनेक प्रश्न मांडले आहेत. 'गार्बो ' मध्ये अध:पतित माणसे ,'वासनाकांड 'मधून लैंगिक संबंध व कलावंताचा निर्मितीसापेक्ष जीवनहेतू ,मर्म, पार्टी मधून स्पष्ट होते. पार्टीतील माणसांच्या स्वभावाचे , ढोंगीपणाचे चित्रण ,'प्रतिबिंब' मधून अस्तित्ववादी जाणीव असे अनेक प्रश्न , समाजातील वेगवेगळया जाणिवा त्यांनी आपल्या नाटकांतून मांडल्या आहेत.'वाडा चिरेबंदी,' हे त्यांचे सर्वात गाजलेले  व सर्वार्थाने वेगळे असलेले नाटक आहे.ही त्रिनाट्यधारा आहे.यानंतर 'मग्न तळयाकाठी'  व 'युगान्त' हे त्याचे दोन भाग आहेत. मानवी जीवनातील घडामोडी, मानवी नातेसंबंध , नात्यातील गुंतागुंत आणि या गुंतागुंतीचे स्वरूप याचा सूक्ष्म वेध या नाटकामध्ये घेतलेला दिसतो.त्यांची आत्मकथा 'वासांसि जीर्णानि '  ही नाटकेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

' महानिर्वाण'१९७४ हे प्रयोगशील आणि वेगळ्या ढंगाचे सामाजिक नाटक लिहून सतीश आळेकर यांनी आपल्या नाट्यलेखनाची सुरूवात केली.भाऊराव या मध्यमवर्गीय माणसाच्या मृत्युचे सूत्र पकडून सामाजिक, धार्मिक रूढींचे , मानवी मनाचे, सामाजिक उदासीनतेचे ,कामवासनेच्या प्रबळतेचे वास्तव चित्रण त्यांनी या नाटकात केले आहे.मृत्युसारखा गंभीर विषयही त्यांनी मांडणीच्या दृष्टीने चिंतनशीलतेकडे घेऊन जातो .यानंतर त्यांची 'महापूर' 'बेगम बर्वे'व 'शनिवार-रविवार'ही सामाजिक नाटके रंगभूमीवर आली.याद्वारे त्यांनी सामाजिक मानसिकता,मानवी नात्यातील गुंतागुंत ,ढासाळलेली मानवी मूल्ये, स्त्री समस्या यांचे चित्रण करून मराठी रंगभूमी अधिक प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे मराठी रंगभूमीवरील त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.स्वातंत्र्योत्तर मराठी सामाजिक नाटकांच्या प्रवाहामध्ये वरील काही महत्वाच्या नाटकाकारांप्रमाणेच इतर अनेक  नाटककारांनी मोठया प्रमाणात सामाजिक  विषयावर नाट्यलेखन केले आहे.त्यांची संख्या फार मोठी आहे .त्यामुळे प्रस्तुत ठिकाणी त्यांचा विस्ताराने विचार करणे शक्य नाही. यामध्ये नागेश जोशी यांचे 'फुलपाखरं', 'देवमाणूस' , 'मुक्ताबाई दिक्षित यांचे 'जुगार', 'अवलिया','अंधारातून' पु.भा.भावेंचे 'विषकन्या','स्वामिनी' ला.कृ.आयरेंचे 'मायेचा संसार''फिर्याद','बुध्दिभेद',बाबुराव गोखलेचे 'पेल्यातील वादळ','करायला गेलो एक' ,'संसार पाहावा मोडून',बाळ कोल्हटकरांचे 'मुंबईची माणसे','मला निवडून द्या',विद्याधर गोखलेचे 'स्वर सम्राज्ञी', 'सुवर्णतुला', 'मंदारमाला', 'मेघमल्हार', 'चमकला ध्रुवाचा तारा '  पुरूषोत्तम दारव्हेकरांचे 'व-हाडी माणसं', 'चंद्र नभीचा ढळला','कटयार काळजात घुसली', गो.पु.देशपांडेचे 'उदध्वस्त  धर्मशाळा ','एक वाजून गेला आहे,''अंधारयुग',प्र.ल.मयेकरांचे 'अथं मनुस जगतं','अग्निपंख','गंध निशिगंधाचा ',अच्युत वझे यांचे 'षड्ज','सोफा कम बेड','सायसाखर','पावसाचे नाटक' इ.नाटके महत्वाची आहेत. सर्वच नाटकामधून सामाजिक प्रश्न अत्यंत सूक्ष्मरीतीने चित्रित केलेले आहेत.समकालीन प्रश्न ,समस्या,याचा वेध या काळातील नाटकांनी घेतलेला दिसतो.त्याचप्रमाणे माणसाच्या मानसिकतेचे चित्रण अतिशय वेधक आणि उत्कृष्टपणे केल्याने या नाटकांतून समकालीन समाजाचा  वेधच घेतला आहे.माणूस हा मुळातच क्रूर आणि भित्रा प्राणी आहे. याचाही विचार स्वातंत्र्योत्तर नाटकात आला आहे.त्याचप्रमाणे स्त्री- पुरूष संबंध, कौटुंबिक ताणतणाव ,स्वातंत्र्योत्तर समाजातील प्रश्न,आदिम काळापासून माणसाला छळणारे एकटेपणा, ते घालवण्यासाठी कामप्रेरणेकडे त्याचा असलेला कल,त्यातून निर्माण झालेले लैंगिक प्रश्न आणि या सर्वाचा समाजजीवनावर व लोकमानसावर होणारा परिणाम या सर्व प्रश्नांचा विचार सामाजिक नाटकांनी मांडला.वास्तववादी मराठी नाटके या काळात  मोठया प्रमाणात लिहिली गेली.त्यामुळे एकूणच स्वातंत्र्योत्तर मराठी सामाजिक नाटकांनी आपल्या नाट्यलेखनातून हा कालखंडच चित्रित केला आहे.

# खेडयातील नाटक

**प्रा.डॉ.कांचन पाडगावकर**

ज्या काळात करमणुकीची काहीच साधने उपलब्ध नव्हती अशा काळात मराठी नाटक हाच मराठी माणसाचा श्वास होता.१९२० पूर्वी मराठी संगीत नाटकाची अभूतपूर्व मेजवानी मराठी माणसाला मिळाली .'संगीत सौभद्र' ,'संगीत एकच प्याला' ,'मानापमान' ,'संगीत शारदा' अशा एकापेक्षा एक संगीत नाटकांनी मराठी प्रेक्षकवर्ग छान तयार झाला होता.विशेषत: 'कशी या त्यजू पदाला','कधी करिशी लग्न माझे तुज ठावे ईश्वरा' ही पदे मराठी माणसाच्या ओठावर नाचत होती.पण १९२० नंतर काही काळ पुन्हा: मराठी रंगभूमीवर अंधार दाटून आला आहे.असे वाटत असतानाच काही नाट्यसंस्था आणि प्रतिभावंत नाटककाराच्या नाटकांमुळे मराठी नाटक पुन्हा: जनमानसाच्या गळयातील ताईत झाले.नाट्यमन्वंतर,बालमोहन नाटक मंडळी आणि नंतरच्या काळात नाट्यनिकेतनने मराठी रंगभूमीला सावरून धरले,नव्हे बोलपटाच्या जमान्यात मराठी नाटकाला टिकवले.संलिखित केले.मामा वरेरकर,आचार्य अत्रे,श्रीधर विनायक वर्तक,मो.ग.रांगणेकर अशा प्रतिभावंत नाटककारांच्या नाटकांनी धमाल केली.पुणे,मुंबई,कोल्हापूर यासारख्या महानगरातून रसिक प्रेक्षक तर तयार झाला होताच; पण महाराष्ट्रातील खेडयापाडयातूनही मराठी रसिक प्रेक्षक तयार झाला होता.

१९४० ते १९५० च्या सुमारास रेडिओशिवाय कोणतेही करमणुकीचे साधन नव्हते.रेडिओची गाणी ऐकतच माणसं खूश होती.माणसं माणसांशी संवाद करूत होती.लेखक,कवी,नाटककारांनी निर्माण केलेल्या साहित्याशी अंतरीचं नातं जुळवत होती.विशेषत: खेडयातील माणूस जो काय साक्षर होता,त्याला या जगाचे भारी कौतूक होते.खेडया पाडयात उत्सव ,जत्रा भरत .अशा उत्सवातून, जत्रातून करमणूकीचे कार्यक्रम करणे भारी आनंद होता.रामलीला ,दशावताराचे खेळ,तमाशा,कीर्तन, भजन यातून मराठी माणसाची भूक भागत होती.रामायण,महाभारत,भागवत ,पुराणे अशा धर्मग्रंथातील कथांनी घडलेले समाजमन नवनवीन सृजनासाठी आसूसलेले होते.आणि अशाच काळात पुण्या मुंबईकडे समृध्द झालेली रंगयात्रा खेडयाच्या वाटेनेही वळण घेत होती.कंपनीची नाटके मोठया शहरातूनच होत .कारण मोठ मोठी नाट्यगृहे होती.वीज होती .ध्वनीक्षेपक होते.सर्व सुविधा उपलब्ध असतील अशाच ठिकाणी नाटक होत होते. शहरातील माणसांची भूक भागत होती.पण खेडयाचे काय ? कारण त्यावेळेस आजच्यासारखी दळणावळणाची अजिबात चंगळ नव्हती.बस सुध्दा खेडयात आडवळणाच्या ठिकाणी जाऊ शकत नव्हत्या.त्यामुळे खेडयातील माणूस शहराकडे धावत नव्हता.आज माणसाच्या जीवनात वाहने,दूरदर्शन,भ्रमणध्वनी,संगणक,इंटरनेट यामुळे सुखाचा स्वर्गच निर्माण झाला आहे.पण साठ- सत्तर वर्षापूर्वी माणसाला सुख शोधण्यासाठी ,आनंद मिळवण्यासाठी धडपड करावी लागत होती.अशा धडपडीतून त्यानी मिळवलेला आनंद हा खरोखरच अक्षर अमृत योग होता.

कंपनीची नाटके पहायला मिळणं शक्यच नव्हतं.कलावंतांचीही ओळख नव्हती. कोणी दिग्दर्शक माहित नव्हता.अशा काळात मला आठवतात माझ्या आजोळची पन्नास वर्षापूर्वी
गावक-यांनी सादर केलेली नाटकं . माझं आजोळ गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग ,आड-वळणाचे गाव, तिथ त्यावेळेस बीडहून बस जात नव्हती. जीपही कधी तरी एखादी डोक्याला दिसे .बैलगाडया, छकडे घोडे वाटेवरून धावत.आम्ही भावडं हिरापूरपर्यंत बसने जात आणि नंतर मावशीच्या आहेर चिंचोलीतून येणा-या बैलगाडीची वाट पहात असू.आहेर चिंचोलीहून नंतर बैलगाडीनेच शिरसमार्गला जात असू .सिंदफणा नदीच्या काठी वसलेले शिरसमार्ग नाट्यपंढरीच होते.

शिरसमार्गला वैशाख शुध्द पौर्णिमेला संतूबाईची यात्रा भरते.या यात्रेच्या निमित्ताने गावकरी दरवर्षी मराठी नाटक बसवत.या शिरसमार्गप्रमाणेच मराठवाडयातील खेडयापाडयातून ग्रामदेवताच्या होणा-या यात्रेत त्या काळात नाटक बसवली जात.हनुमान जयंती,देवीची जत्रा ,राम -नवमी अशा उत्सवाच्या जत्रेच्या निमित्ताने नाटक बसवणे हा खेडयातील हुन्नरी लोकांचा छंद होत.दिवस दिवस कष्टाची कामे करायची. कोणी पांगळे असत ,कोणी भिक्षुक असत,कोणी शेतकरी असत, कोणी स्वयंपाकी असत, कष्टकरी आणि श्रीमंत असा भेद कलावंतात नव्हता. मात्र कलागुण असणारीच माणसं अशा गोष्टीत रस घेत. नाटक कोणतं निवडायचं यापासून चर्चा होई.नाटक आणून त्याचं सामुहिक वाचन होई.वाचता वाचता विनोद,चेष्टा, मस्करी आणि लगेच अभिनयही करत.यातूनच पात्र निवड सर्वानुमते होत असे .नाटक वाचनाच्या वेळी जमलेल्या मंडळीत गायक, वादक,नर्तक असत .अर्थात कोणत्याच प्रशिक्षण शिबिरात न गेलेली ही मंडळी स्वत:च्या प्रतिभा शक्तीच्या बळावर नाटकाचा हा मेरू पर्वत उचलून धरण्याचे धाडस करत .वीज नाही ,पाणी नाही, रस्ते नाही अशी कोणतीच सुविधा नसताना गावात नाटक बसवण्याच्या या धाडसाचे आता मला खरोखरच आश्चर्य वाटते .सात आठ वर्षाची होते तेंव्हा कळत नव्हते. फक्त नाटक पहायला आजोळी आलो हा आनंद होता.

त्याकाळात प्रसाधन, शृंगाराचीही विशेष दुकाने बीड शहरात असतील असे मला आठवत नाही. मोठ मोठया कापड दुकानाच्या पेठाही नव्हत्या आणि मुख्य म्हणजे खूप मोठा खर्च करावा एवढा पैसाही लोकांजवळ नव्हता. दामाजीपंताची वानवा असताना नाटक करण्याचा हा छंद म्हणजे सांस्कृतिक भूक भागवण्याची ही मोठी तहान होती .त्या तहानेपोटीच निष्कांचन असणारी ही माणसं तीन तीन महिन्यापासून नाटक बसवीत. पाठांतर करणे, सारख्या तालमी घेणे आणि एकमेकाचे दिग्दर्शक होत नाटक बसवणे म्हणजे कला पंढरीचा हा सोहळा खरोखरच कौतुकाच्या पलिकडचा होता.

माझ्या आईच्या मामाचे घर तिच्या माहेर शेजारीच भटाचे घर म्हणून ओळखले जाई. बापूदेव जोशी,भिक्षुकीचा व्यवसाय करत.पण हा व्यवसाय करत त्यानी कलेची आराधना केली. स्वत:ची मुले तशी तयार केली .नाट्यकलेची भूक भागवण्यासाठी अवती भवतीची माणसं तयार केली.रंगनाथदेव ,लक्ष्मणदेव या आपल्या मुलांना नट म्हणून तयार केले.आज त्यांचा लक्ष्मणदेव भिक्षूकी व्यवसायात स्थिर आहे. त्याकाळात त्यांनी ' माझी जमीन ' , ' राजा हरिश्चंद्र ' , ' कवडी चुंबक', 'बेबंदशाही' ही नाटके सादर केली.गावच्या वेशीजवळ लाकडी रंगमंच अथक परिश्रमातून उभा केला जाई. मागचा मोठा पडदा दृश्य असलेला अर्थात निसर्ग सौंदर्य रंगवलेले आहे असा असे आणि पुढचा पडदा त्याच्या दोन्ही बाजूला ओढणारी माणसं असत.नाटक सुरु होण्यापूर्वी नारळ फोडला जात असे. पडद्याला मोठा हार असे .सुरूवातीला गणपतीचे स्तवन होई आणि नंतर नाटकाला सुरूवात होत असे. पात्रांना प्रॉमटींग करणारा दृश्य पडद्याच्या आड बाजूला बसलेला असे.प्रत्येक पात्र स्वत:ची वेशभूषा,रंगभूषा स्वत:च करत असे.अथवा साक्षीदाराची मदत घेत असे.असे हे नाटक बघण्यासाठी अवती भवतीच्या छोटया वाडया,खेडी येथून प्रेक्षक येत असत. कंदिलाच्या दिव्यात बसलेला प्रेक्षकवर्ग आणि रंगमंचकावर बत्तीचा उजेड अशा या प्रकाश योजनेतील ही सादर झालेली नाटके म्हणजे आजच्या समृध्द संपन्न रंगभूमीचा मोठा सन्मानचा होता.ख-या अर्थाने नाटक इथे जगले. मोठे झाले. आजही कंपनीची नाट्यगृहातील नाटके पहाताना मला संतूबाईच्या यात्रेत बसवलेले शिरसमार्गचे नाटक आठवते.

## अजून त्या झुडपाच्या मागे ---------

प्रा.वैशाली गोस्वामी

मराठवाड्यातील अंबाजोगाईच्या 'स्त्री' कलाकारांनी सतत तीन वेळा प्रशस्ती पत्र, मान्यवरांची प्रशंसा मिळविली. आणि आजच्या प्रथितयश स्त्री कलावंताच्या स्पर्धेतही पारितोषिके मिळविली. जबाबदारीतून पाय काढून मुंबईकडे पाऊल उचललं असतं तर हा चेहरा आज छोटया मोठया पडदयावर नक्कीच दिसला असता. तो चेहरा म्हणजे सौ.ललिता दत्तात्रय मुकादम !

त्यांच्या नाट्य प्रवासासंदर्भात त्यांच्याशी प्रा.वैशाली गोस्वामी यांनी केलेली बातचित.

प्रश्न – तुमच्या अभिनयाबाबतीत मी – आम्ही खूप ऐकलंय; पण VDO Shooting त्यावेळी नसल्यामुळे आम्हांला आता ते पाहायला मिळत नाही.तुमच्या या नाटकाच्या वाटचालीबद्दल सांगा.

सौ.ललिताकाकू. मला गाण्याची खूप आवड होती हैद्राबादला मी गाणं शिकतही होते.माझा भाऊ अंबाजोगाईला नोकरीला आला. त्यामुळे आम्ही इथं राहिलो कॉलेजात मि.मुकादमांची गाण्यामुळंच ओळख झाली.गाण्याच्या भेंडयात त्यांना गाण्याची भेंडी चढवली ती कायमचीच. मला त्यांचा आवाज खूप आवडायचा .गाण्याच्या प्रेमापोटी यांच्या घरात आपलं गाणं चालू राहिल असं वाटलं. वडिलांना स्टेजवर गायलेलं आवडायचं नाही.आम्ही लग्न केलं. ! घरून लग्नाना खूप विरोध होता.पण शेवटी नाईलाजाने आमचं लग्न करून दिलं.पण माझं गाणं बंद झालं. संसाराचं रडगाणं सुरू झालं. पटापट दोन मुली झाल्या त्याकाळात हे 'कलासंगम'चे सेक्रेटरी होते.माझी भावजय नाटकांत उत्तम काम करायची.त्यांना विचारायला हे गेले, तेंव्हा तुम्ही दुस–याच्या बायकांना काय हो विचारता ? तुमच्या बायकोला करायला लावा की, काम.अहो पण ती गाणं म्हणते, तिला नाटक नाही जमत ' हे म्हणाले.जमत कसं नाही केलं की जमतं ! त्या म्हणाल्या.हे तडक घरी आले.मला म्हणाले ,'तुला नाटकांत काम करायचंय', तुला केलंच पाहिजे''अहो,पण मला कसं जमेल?', मी म्हणाले .केलं की येतं बरं'मला प्रचंड भीती वाटत होती. पण माझे सासरे केशवराव मुकदम,चुलत,सासरे राम मुकादम यांनी मला आग्रह केला. आणि संभुसांचं'प्रीत दुधारी सुरा' हे पहिलं नाटक मी केलं. नाटकाच्या वाचनातच माझी सगळयांनी प्रशंसा केली. पूणे येथे नाटकाचा प्रयोग मा.बा.ल.कुलकर्णींनी रंगमंचावर येवून अभिनंदन केलं. मला प्रशस्ती पत्र मिळालं. माझा आत्मविश्वास वाढला.नंतर'वाजे पाऊल आपुले', 'अडीच घर वजिराला','माझा कुणा म्हणू मी?'अशी अनेक नाटकं केली. खरं म्हणजे'अक्षांश रेखांश' च्या पार्श्वगायनापासून सुरूवात झाली.

प्रश्न : साधारण किती नाटकांमधून तुम्ही काम केलंत ? आणि तुम्हाला सर्वात जास्त आवडलेली भूमिका कोणती ?

सौ.ललिता काकू : ६७–६८ पासून नाटकांना सुरूवात झाली. आणि एखादं–दुस–या वर्षाचा गॅप पडला असेल; पण मी सलग १५ वर्षे नाटकं केली. १२ ते १३ नाटक झाली.सर्वच भूमिका मला आवडल्या पण त्यातल्या त्यात 'कस्तुरीमृग' मधील'देवदासी' ची भूमिका करायला मला खूप आवडलं;. ही भूमिका करताना भीती ,दडपण आणि आव्हानही होतं. त्या काळात ही भूमिका धीटपणाचीच होती. या नाटकाच्या प्रयोगानंतर जयवंत दळवींनी'सती'साठी आणि इतर सहा नाटकांच्या कॉन्ट्रक्ट –साठी विचारलं. पुण्या –मुंबईत राहण्याची अट घातली.पण माझी नोकरी ,लहान मुलं, घरात सासरे शरपंजरी पडलेले, इच्छा असूनही मी जावू शकले नाही.

प्रश्न याची खंत वाटते का हो ?

सौ.ललिता काकू : हो तर , वाटते ना ! माझ्याबरोबर स्पर्धक म्हणून असलेल्या रोहिणी हट्टंगडी, सुहास जोशी, सुलभा देशपांडे भक्ती बर्वे (इनामदार) या तर आता नाहीत, पण इतरांना छोटया – मोठया पडदयावर पाहिलं की, मनांत येतच, मी पण अशीच पडदयावर दिसले असते. कारण या सर्व स्पर्धकांच्या स्पर्धेत मला तीन वेळा उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता.अनेक वेळा प्रशस्तीपत्र मला मिळालेली होती. असो , मी भूमिकांविषयी सांगत होते.'माझा कुणा म्हणू मी ?' केलं, त्यातली विधवेची भूमिका करताना घरच्यांचाच रोष पत्कारावा लागला.बीड ला नाटकं होतं. मोठया नणंद ,आई, नाटक पाहायला आल्या होत्या .मला विधवेच्या रूपात पाहून, त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली .त्यांनी मला, रामकाकाला सगळयांनाच फैलावर घेतलं. नाटक बंद करा म्हणून बजावलं ; पण यांनी खंबीरपणे त्याला उत्तर दिलं .मी साक्षात मंगळसूत्र , कुंकू तिच्यासमोर असताना कसली भीती ? मला धीर दिला.खरं म्हणजे या गोष्टीचं आज काहीच वाटत नाही; पण त्यावेळी होतं.

प्रश्न या नाटकांचं दिग्दर्शन , गीतं, प्रॅक्टीस कोण करीत असे ? तुम्ही नोकरी नाटकं कस सांभाळलंत ?

सौ.ललिताकाकू. सगळं काही रामकाका करायचे. गीतांना चाली दयायचे, दिग्दर्शन करायचे.
नुकतीच लागलेली नौकरी, ती परळीला गरोदरपण ,शाळेतून यायला उशीर व्हायचा. नाटकाची प्रॅक्टिस , रात्री २ पर्यंत चालायची, पहाटे तीनला पाणी यायचं ,झोपच मिळायची नाही.पण घरून आधार होता.लोकही बोलायचे; पण सास–यांनी मला जवळ घेऊन सांगितलं ,नाटकं सोडायचं नाही.

प्रश्न मराठवाडयांत तुम्हाला स्पर्धक म्हणून किती जण होते ?

सौ.ललिता काकू औरंगाबादचे किशोर देशमुख, लातूरचे श्रीराम गोजमगुंडे , गोवंडे सर यांच्या संस्था होत्या.मी गोजगुंडेच्या 'बंदीशाला'या नाटकात भूमिका केली होती. ते नाटक अंबाजोगाईला होतं आणि एक दिवसात संपूर्ण नाटकाची तालीम आणि नाटक मी पाठ केल होतं. रसबहार लातूरचं 'चकवा'हे नाटक मी केलं.यात अभिनयाचं प्रशस्तीपत्र मिळालं, मुंबईला अंतिम फेरीतही प्रशंसा झाली.

प्रश्न 'नटसम्राट'च्या कावेरी बद्दल सांगा.

सौ.ललिता दुय्यम भूमिका असलेली कावेरी पण मला त्यात पारितोषिक मिळाले आणि मा. प्रभाकर पणशीकरांना लातूरच्या काकू गोवंडे सरांना माझ्याबरोबर नटसम्राट करण्याची इच्छा होती. ती मात्र राहून गेली.

प्रश्न आजची नाटकं, तुमच्या वेळची नाटकं यांच्या लेखन, सादरीकरणात काय बदल जाणवतो ?

आजच्या नाटकांविषयी काय वाटत ?

सौ.ललिता. काकू. विषय आधुनिक आहेत;पण त्यावेळेपेक्षा आता अडचणी कमी आहेत; पण मेहनत कमी होते अस वाटतं थोडया काकू प्रशंसेनं आजची मुलं हरकुन जातात. आम्ही पडेल ते काम करायची, स्वत: ड्रेसिंगसाठी प्रयत्न करायचा, नाटकाचं वेड होतं आम्हाला. आता पैसा, वेळ याचं समीकरण सोडवणं कठीण होऊन बसलंय.
या पिढीत बाळू भाऊजी (बाळू मुकद्दम) आहेत. पण सगळी टीमच झटली पाहिजे.

प्रश्न तुम्हाला जो आवडतो तो संवाद आम्हाला ऐकवा .

सौ.ललिता. काकू. वसंत कानेटकरांच्या 'कस्तुरीमृग' मधील अंजनीचा (देवदासी) हा संवाद आहे मला आता पाठ नाही मी वाचून दाखवते. वयाच्या ६६ व्या वर्षीही संवाद म्हणतांना वाक्याची फेक, आवाजाची लवचिकता ,गोडवा, मद्य घेतल्यानंतरची आवाजातली नशा, आर्ततेने फोडलेला टाहो यांनी अंतर्मन हलवून टाकलं. संवाद पूर्ण झाला तेव्हा त्या स्वत: तर रडतंच होत्या;पण आम्हा सर्वजणांचे डोळेसुध्दा पाणी गाळत होते.त्यांना बोलण्याची संधी मिळाली याचं समाधानही वाटलं .मनातून या नटसम्राज्ञीला सलाम केला.त्यांच्या चेह-यावरची खंत मात्र अखेरपर्यंत लपली नाही.







## बीडचं पाणी !

**अरविंद जगताप**

बीड - खरंतर बीड हेच नाव का ? की नावापासूनच अस्तित्वाची लढाई ? कुण्या एका मोहम्मद कासीम फरीश्ताने त्याच्या 'तारीक - ए फरीश्ता' मध्ये बीडचा उल्लेख 'भीर' असा केलाय.आणि तोही सतराव्या शतकात !

कशामुळे बरं 'भीर' म्हणाला असेल तो आमच्या गावाला ? त्याच्या अरेबीक भाषेत 'भीर' म्हणजे विहीर ! आणि 'भीर' म्हणजे पर्शियन भाषेत पाणी ! आणि कुणी म्हणतात बालाघाटाच्या पायथ्याशी एखाद्या खड्डयासारखे वाटायचे बीड.म्हणून नाव पडलं असेल 'बीळ'आणि नंतर झालं 'बीळ' चं बीड. बीडच्या नावाचा इतिहास असा पाण्याभोवती का म्हणून तरंगत असावा ? बीडच्या पाण्यात नक्कीच काहीतरी असलं पाहिजे. असणारच ! नाहीतर मुहम्मद तूघलकाचा दात बीडमध्येच काय पडावा आणि त्याने त्याचेच स्मारक काय बांधावे ! मनस्वी आणि कलंदर बीडची साक्षच नाही का ही ? बीडच्या इतिहासात डोकावण्याचा मोह झाला तो एवढ्यासाठीच की काय असेल असं या पाण्यात ? या मातीत ? जगण्याचं ( तेही स्वाभिमानानं आणि अस्तित्वाची पताका फडकवत ) असं कुठलं बळ आहे ?

निसर्ग थोडयाफार कालावधीने नियमित घेत असतो परीक्षा.भूकंप असो,पूर असो,कावीळ असो किंवा प्लेग ! सगळया संकटातून बीड तावून सुलाखून निघालंय .कदाचित एवढया संकटांना सामोरं जाण्याचा अनुभव पाठीशी असल्यानेच बीडची माणसं प्रत्यक्ष क्षेत्रात कणखरपणे ऊभी आहेत.

कलावंताचं व्यक्त होणं अस्सल आणि कसदार असण्यासाठी त्याने तेवढं भोगलेलंही असावं म्हणतात.म्हणून प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असणा-या बीडचे, खेडयातून आलेले नाट्यकलावंत स्वतंत्र ओळख निर्माण करत आलेत.अनवाणी पायाला टोचलेली धसकटं, आंब्यावरच्या सूरपारंब्या,भाकरी रानात वायला उशीर झाला की, म्हशी समोरची पेंड टाकलेली,तोंडात एक म्हणता दोन तुकडे आणि विहिरीतल्या सापाला घाबरवण्यासाठी डोळे मिटून काठावरून टाकलेली उडी, शाळेत मिळणारी सूकडी आणि डोंगराची सिताफळं.

अस्सल जीवनानुभव म्हणता तो हाच ! थोडयाफार फरकाने प्रत्येक गावातला.पण घरातल्या खाणा-या तोंडांना बघून शेतातल्या सूर्यफुलाने तोंड वासायला सुरूवात केली आणि सगळं बदलत गेलं. शिक्षणाचं महत्त्व ख-या अर्थाने दुष्काळाने पटवून दिलं.रस्त्यावर खडी फोडणा-या आई-बापांना बघून पोरांनी शाळेची वाट धरली.

आज महाराष्ट्राच्या कुठल्याही कोप-यात बीडचा अधिकारी भेटतो,डॉक्टर भेटलो तो त्यामुळेच !

पुन्हा दुष्काळ आठवून वेदना होत नाहीत. कला कशाशी खातात हे माहित नसलेल्या घरादारातून आलेली पोरं आज श्रेष्ठ कलावंत झालेली आहेत. बीडला नाट्यशास्त्र विभाग आला त्याच काळात बीडचे वामन केंद्रे मुंबईच्या पोरांना नाटक शिकवणा-या विद्यापीठाचे विभाग प्रमुख झाले होते.लहानपणी बीडच्या टॉकीजमध्ये वाळूत बसून सिनेमा बघणारा मकरंद अनासपुरे महाराष्ट्राच्या सगळया टॉकीजचा लाडका झालाय.

बीडच नव्हे तर संपूर्ण मराठवाडयातून सशक्त कलावंतांची फौज निर्माण करणारे डॉ.दिलीप घारे आणि डॉ.शशीकांत बऱ्हाणपूरकर हे दोन द्रोणाचार्यही बीडचेच .डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,मुंबई विद्यापीठ आणि सरस्वती भूवन महाविद्यालय अशा तिन्ही महत्त्वाच्या नाटयशास्त्र विभागाचे प्रमुख बीड जिल्ह्याचेच आहेत हा योगायोग नाही.हे नाट्य कलेविषयीचं गांभीर्य आहे.तंत्रशुध्दतेचा आग्रह आहे.

ॲडव्होकेट सूभाष निकम सारखे सामाजिक भान असणारे ज्येष्ठ रंगकर्मी रंगभूमी व रंगकर्मींना योग्य दिशा देण्याचं कार्य करतांना दिसतात.खरंतर, पडद्याआड असणारे असे कितीतरी रंगकर्मी आहेत ज्यांनी बीडच्या प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमीला समृध्द करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

औरंगाबाद सारख्या शहरात 'वारी- दर शनिवारी' हा दर आठवडयाला एकांकिका सादर करण्याचा उपक्रम आम्ही चालवला .त्याला यशस्वी करण्यात संदीप पाठक ,डॉ.सुधीर निकम, गणेश देशमूख ,संजय बनवे या कलावंताचा महत्त्वाचा वाटा आहे.या बीडच्या कलावंतांनी पहिल्यांदा मूक-नाट्य,शॅडो-प्ले सारखे प्रयोग सादर केले.

लोककलांच्या बाबतीत बीड जिल्हा प्रसिध्द आहे.अलीकडे काही व्यावसायिक विद्रोही लोकांनी लोककलेची संभावना ' भीक मागणाची कला 'अशी केली आहे.पण जागरण-गोंधळ, भूपाळी किंवा भारूडा सारखे प्रकार पूर्वीही आणि आता ही समाजजागृतीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावतांना दिसतात.आणि बीड जिल्ह्यातील लोककलावंत याबाबतीत आदर्श आहेत.

मेळे, कीर्तन, तमाशा ह्या कलांचा लहानपणापासूनचा पगडा जिल्ह्यातल्या रंगकर्मींना समृध्द बनवत आला आहे. आणि मुंबईच नव्हे तर दिल्लीतही रंगकर्मींनी आपल्या यशाची पताका फडकावली आहे.प्रा.वामन केंद्रे, डॉ.दिलीप घारे ,मकरंद अनासपूरे यांनी तर सातासमुद्रापार आपली कला नेली आहे.

प्रा.केशव देशपांडे , संजय सुगावकर, प्रा.दासू वैद्य यांचा बीडच्या नाट्यक्षेत्राला वेगळी ओळख देण्यात महत्त्वाचा वाटा आहे.

जुन्या-नव्यांची यादी खूप मोठी आहे.बीडातलाच नंदू काळे टीव्ही मालिकेचा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ठरतो तेही हिंदी .बीडवाल्यांनी निसर्गाला सांगितलंय आमच्याकडे कलावंतांचा दुष्काळ नाही.गेल्या पाच-सात वर्षात केएसके

कॉलेजने महाराष्ट्रातल्या महत्त्वाच्या स्पर्धा जिंकून सिध्द केलंय.डॉ.सुधीर निकमच्या एकांकिका बीडचं पाणी वेगळंच आहे.


नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) चे

**कला वरिष्ठ महाविद्यालय,तेलगाव.**

ता.वडवणी, जि.बीड.





डॉ.भारतभूषण क्षीरसागर
सचिव

उमाकांत भद्रशेट्टी
प्राचार्य

सर्व कर्मचारी वृंदातर्फे अखिल भा.नाट्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा

# राष्ट्रसेवादल कलापथकाच्या : नाट्य चळवळीचा एक टप्पा

डॉ.शैला लोहिया

अभिनयाची आवड मला अगदी लहानपणापासून होती. नृत्य जणू माझ्या अंगात सतत लहरत असे.माझी आई बाजाची पेटी उत्तम वाजवी.अगदी लहान असतांनाच धुळयाच्या पं.श्रीपाद शास्त्रीकडे संगीत शिक्षणासाठी ती मला तासभर पाठवी.आदरणीय अण्णा शास्त्रीजी हे बडोद्याच्या राजदरबारातील पं.फैय्याजखांचे शिष्य.शाळेत असतांना नृत्य,नाट्य,संगीतात नेहमी सहभाग असे .आंतरशालेय नाट्य स्पर्धेत 'देवमाणूस ' या नाटकात मी दादाची भूमिका केली होती.त्यात जिल्ह्यात प्रथम पुरस्कार मिळाला.महाविद्यालयात गेल्यावर एकांकिकांतून काम करू लागले.तिथे पुरुषोत्तम पाळंदसारखे समर्थ दिग्दर्शक लाभले.पुणे आकाशवाणीच्या श्रुतिकांमधून काम करण्याची संधी लाभली.उत्तम नाटके पहाण्याची संधीही लाभली.

धुळयाच्या महाविद्यालयात आल्यावर तिथेही नाटकांतून कामे केली. तेथे 'मनोरंजन मंडळ ' नाट्यप्रेमी आणि नाट्यकर्मींनी स्थापन केले होते.त्याच्या वतीने नाटके ,बालनाट्य बसविण्यात आम्ही गर्क होतो.अरूण देवधर,रावसाहेब गरूड,सुषमा गरूड,शरद थानगांवकर ,सुलभा कुलकर्णी... असे अनेक जण .त्यावेळी आम्ही 'प्रेमा तुझा रंग कसा ?'हे नाटक बसवत होतो.नटवर्य मामा पेंडसे नाटकाची तालिम पहायला आले होते. त्यांना माझे काम अत्यंत आवडले .दरम्यान मी डॉ.द्वारकादासांशी विवाह करून अंबेजोगाईला आले होते; पण मी त्यांच्या लक्षात होते. ते 'खडाष्टक' आणि इतर दोन नाटके रंगभूमीवर आणणार होते.त्यांनी डॉक्टरना ड्ट मी तिची माझ्या लेकीसारखी काळजी घेईन.तिला तुम्ही १५ दिवस तालमींसाठी व नंतर प्रयोगासाठी पाठवावेड्ढ असे पत्र लिहिले होते.ही झाली १९६१ /६२ ची गोष्ट ते विवाहानंतर शक्य नव्हते.मी राष्ट्रसेवादलाच्या कलापथकांतूनही काम करीत असे. 'कुणाचा कुणाला मेळ नाही' ,'पुढारी पाहिजे', 'बिन बियाचे झाड' इत्यादी वगातून निळुभाऊ फुले, रामभाऊ नगरकर यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली.कवी वसंत बापट,सुधाताई बर्वे ,लीलाधर हेगडे यांच्या पुढाकाराने बसवलेल्या महाराष्ट्र दर्शनमध्ये काम करण्याची संधी लाभली.आवाज बरा असावा. कै.स्नेहल भाटकरांना माझी बैठकीची लावणी,भारूड आवडत असे. त्या नादात असतांना १९६२ च्या अखेरीस अंबेजोगाईला आले. 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हा राष्ट्रसेवादल कलापथकाचा नारा मनातनात घुमत होताच. १९६३ च्या गणेशोत्सवासाठी चिनी आक्रमणाचा फार्स ,बंजारा ....धनगर.... कोळी..... शेतकरी लोकनृत्ये ,राष्ट्रभक्तीची समूह गीते आम्हा दोघांच्यापुढाकाराने बसवली.कै.प्रा.अर्जुनराव दर्शनकार ,कै.प्राचार्य भगवानराव सबनिस,कै.पुरूषोत्तमराव चौधरी हे शिक्षक,उत्तम ढोलकी वाजवणारे बायफचे प्रा.एस.एन.जोशी गुरूजी, प्रा.विजय दिवाण, पेटी वाजवणारे वयस्क खोगरे गुरूजी, व्हायोलिनिष्ट मास्टर शंकरराव असे शिक्षक प्राध्यापक,कर्मचारी,विद्यार्थी एकदिलाने उंचाडया बाबू,उत्तरेश्वर ,जगन्नाथ जोगी, जेठा आहुजा असे विद्यार्थी, अंजली कुलकर्णी,चौधरी ,मंजुषा फडके ,विजया चौधरी ,ज्योती बर्वे ..अशा अनेक मुली काम करीत .मुलींना पालक विश्वासाने काम करण्यास परवानगी देत.नांदेड,हिंगोली,औरंगाबाद ,लातूर,उदगीर, निलंगा,परभणी,अहमदपूर,परळी अगदी जामखेडही असा पूर्ण मराठवाडा आम्ही हिंडत असू. आपला जेवणाचा डबा आपण घ्यायचा.आणि मालट्रकमधून प्रवास.डॉ.द्वारकादास लोहिया, इतर प्राध्यापक याशिवाय कन्हैय्यालालजी मंत्री,गणेशलालजी लखेरा,विठ्ठलराव जाधव यांसारखे प्रतिष्ठित व्यापारीही बरोबर.दुवा एकच राष्ट्रसेवादलाचे संस्कार आणि कलेची आवड .हे कलापथक सतत १३ वर्षे सुरू होते. आणीबाणी जाहीर झाली ; पण कलापथकाबद्दल समाजात अपार आस्था .मग आम्हीही कार्यक्रम बसवले .राजा पांडुरंगजी जाजूचे नातू ललित मोहन व इतर तरूण काशिनाथ कापसे, गंगणे, ज्ञानेश रेड्डी असे अनेक यांनी धाडसी सहकार्य केले. मात्र १/२ कार्यक्रम झाल्यावर पोलिसांनी परवानगी नाकारली .या राष्ट्रसेवादल कलापथकाचे उद्दिष्ट 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे होते.विशेषत: गणगवळण,बतावणी,सोंगाडया खूप रंगे .जत्रेतल्या तमाशापेक्षा लोकनाट्याला सांस्कृतिक दर्जा .असतो,त्यात पांचट,अश्लिल विनोद नसतात याची जाणीव समाजात रूजली .अक्षरश: दहा-दहा हजार प्रेक्षक कार्यक्रमास येत.सुरवातीलाच डॉ.द्वारकादास नम्रपणे शिट्टया, घाणेरडया कॉमेंटस न करण्याचे आवाहन करीत.कलापथकातील प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत आणि सुशिक्षित आहे.समाजाला भारतीय घटना,भारतीय मूल्ये यांचे शिक्षण रंजनाद्वारे देण्याच्या ध्येयाने आम्ही आपल्याशी नाते जोडत आहोत असे सांगत .शिट्टी वा अश्लिल कॉमेंट आली तर कार्यक्रम बंद करू असे बजावत. परंतु एकही कार्यक्रम बंद पडला नाही. आणीबाणीनंतरही १९८० पर्यन्त कार्यक्रम केले.

धर्मनिरपेक्ष ,विज्ञाननिष्ठा,जातीयता न मानणारा एकात्म समाज हे पू.सानेगुरूजींचे आणि राष्ट्रसेवादलाचे स्वप्न... ध्येय.आजही मराठवाडयातील पन्नाशीच्या स्त्री पुरूषांना कलापथक आठवत असेल.विशेषकरून स्त्रिया या कार्यक्रमांना प्रचंड संख्येने येत .त्यावेळी ना घराघरात टी.व्ही,ना रेडिओ. रंजन ही माणसाची मूलभूत गरज आहेच. प्रा.रा.द.अरगडे यांनी 'राया मला दिल्लीला घेऊन चला 'आणि मणि मधुकरच्या 'दुलारी बाईचे रूपान्तर लाडली बाई 'ही वगनाट्ये लिहिली. 'कळली किमया टोपीची' हे बहुदा निळूभाऊंचे वगनाट्य. प्रा.चन्द्रकान्त भालेरावांनी या 'इष्काच्या पायी बुडाले' हे वगनाट्य खास लिहून दिले.त्याचे अनेक प्रयोग अगदी तिकिट लावून केले. मराठवाडयातील त्यावेळच्या प्रत्येक जिल्ह्यात ,त्यांतील तालुक्यात कलापथक पोचले होते. ४६/४७ वर्षापूर्वी एक तरूण विवाहित स्त्री वगनाट्यात नऊवारी लुगडं नेसून काम करते.पेटी वाजवते आणि म्हणजे याचे लोकांना अप्रुप वाटे .परंतु त्या वगनाट्यात निखळ विनोद,तात्कालिन राजकीय, सामाजिक घटनांवर खुसखुशित निर्भिड कॉमेंटस....यामुळे सर्वपक्षांचे पुढारीही कार्यक्रमास येत.कार्यक्रम एकमिनिटही उशीरा सुरू होत नसे.डॉ.द्वारकादासचा सोंगाडया,न्हावी,धोबी या भूमिका खूप गाजल्या.तर मनातलं गुपित खडड्यात ओरडून मन मोकळं करणारी न्हावीण.काही काळ राजा बनलेल्या धोब्याची राणी या माझ्या भूमिका सर्वांनाच आवडत.एस.एन.जोशींच्या ढोलकीने धमाल केली. आम्ही शिक्षक,प्राध्यापक,डॉक्टर ,कलाकार एक पैसा मानधन घेत नव्हतो. छोटया मुलांना मात्र सुंदर पुस्तके,आकर्षक भेटी दिल्या जात.एस.टी.एम.एस.ई.बी. महाविद्यालये याशिवाय गणेशमंडळे इत्यादी संस्था कलापथकाला मानधन देऊन कार्यक्रम निश्चितच करीत .पहिला कार्यक्रम देवीच्या मंदिराजवळील योगेश्वरी शाळेच्या पटांगणावर झाला.तेव्हा आदरणीय कै.एकनाथराव गुरूजींनी पाकिटात दहा रूपये घालून सर्वसमक्ष दिले होते.ती 'मानवलोक-मराठवाडा नवनिर्माण लोकायत' या स्वयंसेवी संस्थेची नांदी ठरली.१३ वर्षात जमा झालेल्या पैशातून आज धडपड कार्यालय उभे आहे.ती जागा म्हणजे राजा पांडुरंगजी जाजूंचा जुना गाय वाडा.जाजूंच्या कुटुंबाचे डॉ.द्वारकादास मेडिकल ॲडव्हायझर-वैद्यकीय सल्लागार होते.ते तो वाडा काहीही देवाणघेवाण न करता घ्या म्हणत होते.परंतु ' दान नादान करते' या तत्त्वावर सेवादलाचा विश्वास असल्याने अवघ्या ७५ पैसे चौरसफुटप्रमाणे जागा विकत घेतली.आणि आणीबाणीनंतर गजाआडून मुक्त झाल्यावर त्या जागेवर ' मानवलोक'उभारण्याचे स्वप्न पेरले जे आज सधनरूप घेत आहे. राष्ट्रसेवादल कलापथक,अंबाजोगाई केवळ 'लोक रंजनातून लोकशिक्षण' एवढयावर न थांबता आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय,वैचारिक परिवर्तनाचा (पक्षीय राजकारणापासून दूर राहून ) वसा घेऊन शेकडो,हजारोंच्या सहकार्याने नवा डाव मांडत आहे.

आणि म्हणूनच बीड जिल्हयातीलच नव्हे तर मराठवाडयातील नाट्यचळवळींचा आढावा घेतांना राष्ट्रसेवादल कलापथकाचा चिमुकला बिंदु लक्षात घ्यावा असे मनोमन वाटते.

# राष्ट्रसेवादल कलापथकाच्या : नाट्य चळवळीचा एक टप्पा

डॉ.शैला लोहिया

अभिनयाची आवड मला अगदी लहानपणापासून होती. नृत्य जणू माझ्या अंगात सतत लहरत असे.माझी आई बाजाची पेटी उत्तम वाजवी.अगदी लहान असतांनाच धुळ्याच्या पं.श्रीपाद शास्त्रीकडे संगीत शिक्षणासाठी ती मला तासभर पाठवी.आदरणीय अप्पा शास्त्रीजी हे बडोद्याच्या राजदरबारातील पं.फैय्याजखांचे शिष्य.शाळेत असतांना नृत्य,नाटय,संगीतात नेहमी सहभाग असे .आंतरशालेय नाट्य स्पर्धेत 'देवमाणूस ' या नाटकात मी दादाची भूमिका केली होती.त्यात जिल्ह्यात प्रथम पुरस्कार मिळाला.महाविद्यालयात गेल्यावर एकांकिकांतून काम करू लागले.तिथे पुरूषोत्तम पाळंदसारखे समर्थ दिग्दर्शक लाभले.पुणे आकाशवाणीच्या श्रुतिकांमधून काम करण्याची संधी लाभली.उत्तम नाटके पहाण्याची संधीही लाभली.

धुळ्याच्या महाविद्यालयात आल्यावर तिथेही नाटकांतून कामे केली. तेथे 'मनोरंजन मंडळ ' नाट्यप्रेमी आणि नाट्यकर्मींनी स्थापन केले होते.त्याच्या वतीने नाटके ,बालनाट्य बसविण्यात आम्ही गर्क होतो.अरूण देवधर,रावसाहेब गरूड,सुषमा गरूड,शरद थानगांवकर ,सुलभा कुलकर्णी... असे अनेक जण .त्यावेळी आम्ही 'प्रेमा तुझा रंग कसा ?'हे नाटक बसवत होतो.नटवर्य मामा पेंडसे नाटकाची तालिम पहायला आले होते. त्यांना माझे काम अत्यंत आवडले .दरम्यान मी डॉ.द्वारकादासांशी विवाह करून अंबेजोगाईला आले होते; पण मी त्यांच्या लक्षात होते. ते 'खडाष्टक' आणि इतर दोन नाटके रंगभूमीवर आणणार होते.त्यांनी डॉक्टरना ह्न मी तिची माझ्या लेकीसारखी काळजी घेईन.तिला तुम्ही १५ दिवस तालमींसाठी व नंतर प्रयोगांसाठी पाठवावेह्न असे पत्र लिहिले होते.ही झाली १९६१ /६२ ची गोष्ट ते विवाहानंतर शक्य नव्हते.मी राष्ट्रसेवादलाच्या कलापथकांतूनही काम करीत असे.'कुणाचा कुणाला मेळ नाही', 'पुढारी पाहिजे', 'बिन बियाचे झाड' इत्यादी वगातून निळुभाऊ फुले, रामभाऊ नगरकर यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली.कवी वसंत बापट,सुधाताई वर्दे ,लीलाधर हेगडे यांच्या पुढाकाराने बसवलेल्या महाराष्ट्र दर्शनमध्ये काम करण्याची संधी लाभली.आवाज बरा असावा. कै.स्नेहल भाटकरांना माझी बैठकीची लावणी,भारूड आवडत असे. त्या नादात असतांना १९६२ च्या अखेरीस अंबेजोगाईला आले. 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हा राष्ट्रसेवादल कलापथकाचा नारा मनातनात धुमत होताच. १९६३ च्या गणेशोत्सवासाठी चिनी आक्रमणाचा फार्स ,वंजारा ....धनगर.... कोळी..... शेतकरी लोकनृत्ये ,राष्ट्रभक्तीची समूह गीते आम्हा दोघांच्यापुढाकाराने बसवली.कै.प्रा.अर्जुनराव दर्शनकार ,कै.प्राचार्य भगवानराव सबनिस,कै.पुरूषोत्तमराव चौधरी हे शिक्षक,उत्तम ढोलकी वाजवणारे बायफचे प्रा.एस.एन.जोशी गुरूजी, प्रा.विजय दिवाण, पेटी वाजवणारे वयस्क खोगरे गुरूजी, व्हायोलिनिष्ट मास्टर शंकरराव असे शिक्षक प्राध्यापक,कर्मचारी,विद्यार्थी एकदिलाने उंचाडया बाबू,उत्तरेश्वर ,जगन्नाथ जोगी, जेठा आहुजा असे विद्यार्थी, अंजली कुलकर्णी,चौधरी ,मंजुषा फडके ,विजया चौधरी ,ज्योती बर्वे ..अशा अनेक मुली काम करीत .मुलींना पालक विश्वासाने काम करण्यास परवानगी देत.नांदेड,हिंगोली,औरंगाबाद ,लातूर,उदगीर, निलंगा,परभणी,अहमदपूर,परळी अगदी जामखेडही असा पूर्ण मराठवाडा आम्ही हिंडत असू. आपला जेवणाचा डब्बा आपण घ्यायचा.आणि मालट्रकमधून प्रवास.डॉ.द्वारकादास लोहिया, इतर प्राध्यापक याशिवाय कन्हैय्यालालजी मंत्री,गणेशलालजी लखेरा,विठ्ठलराव जाधव यांसारखे प्रतिष्ठित व्यापारीही बरोबर.दुवा एकच राष्ट्रसेवादलाचे संस्कार आणि कलेची आवड .हे कलापथक सतत १३ वर्षे सुरू होते. आणीबाणी जाहिर झाली ; पण कलापथकाबद्दल समाजात अपार आस्था .मग आम्हीही कार्यक्रम बसवले .राजा पांडुरंगजी जाजूचे नातू ललित मोहन व इतर तरूण काशिनाथ कापसे, गंगणे, ज्ञानेश रेड्डी असे अनेक यांनी धाडसी सहकार्य केले. मात्र १/२ कार्यक्रम झाल्यावर पोलिसांनी परवानगी नाकारली .या राष्ट्रसेवादल कलापथकाचे उद्दिष्ट 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे होते.विशेषतः गणगवळण,बतावणी,सोंगाडया खूप रंगे .जत्रेतल्या तमाशापेक्षा लोकनाटयाला सांस्कृतिक दर्जा .असतो,त्यात पांचट,अश्लिल विनोद नसतात याची जाणीव समाजात रूजली .अक्षरशः दहा-दहा हजार प्रेक्षक कार्यक्रमास येत.सुरवातीलाच डॉ.द्वारकादास नम्रपणे शिट्टया, घाणेरडया कॉमेंटस न करण्याचे आवाहन करीत.कलापथकातील प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत आणि सुशिक्षित आहे.समाजाला भारतीय घटना,भारतीय मूल्ये यांचे शिक्षण रंजनाद्वारे देण्याच्या ध्येयाने आम्ही आपल्याशी नाते जोडत आहोत असे सांगत .शिट्टी वा अश्लिल कॉमेंट आली तर कार्यक्रम बंद करू असे बजावत. परंतु एकही कार्यक्रम बंद पडला नाही. आणीबाणीनंतरही १९८० पर्यन्त कार्यक्रम केले.

धर्मनिरपेक्ष ,विज्ञाननिष्ठा,जातीयता न मानणारा एकात्म समाज हे पू.सानेगुरूजींचे आणि राष्ट्रसेवादलाचे स्वप्न... ध्येय.आजही मराठवाडयातील पन्नाशीच्या स्त्री पुरूषांना कलापथक आठवत असेल.विशेषकरून स्त्रिया या कार्यक्रमांना प्रचंड संख्येने येत .त्यावेळी ना धराघरात टी.व्ही,ना रेडिओ. रंजन ही माणसाची मूलभूत गरज आहेच. प्रा.रा.द.अरगडे यांनी 'राया मला दिल्लीला घेऊन चला 'आणि मणि मधुकरच्या 'दुलारी बाईचे रूपान्तर लाडली बाई 'ही वगनाटये लिहिली.'कळली किमया टोपीची' हे बहुदा निळूभाऊंचे वगनाट्य. प्रा.चन्द्रकान्त भालेरावांनी या 'इष्काच्या पायी बुडाले' हे वगनाट्य खास लिहून दिले.त्याचे अनेक प्रयोग अगदी तिकिट लावून केले. मराठवाडयातील त्यावेळच्या प्रत्येक जिल्ह्यात ,त्यांतील तालुक्यात कलापथक पोचले होते. ४६/४७ वर्षांपूर्वी एक तरूण विवाहित स्त्री वगनाट्यात नऊवारी लुगडं नेसून काम करते.पेटी वाजवते आणि म्हणजे याचे लोकांना अप्रुप वाटे .परंतु त्या वगनाट्यात निखळ विनोद,तात्कालिन राजकीय, सामाजिक घटनांवर खुसखुशित निर्भिड कॉमेंटस....यामुळे सर्वपक्षांचे पुढारीही कार्यक्रमास येत.कार्यक्रम एकमिनिटही उशीरा सुरू होत नसे.डॉ.द्वारकादासचा सोंगाडया,न्हावी,धोबी या भूमिका खूप गाजल्या.तर मनातलं गुपित खड्डयात ओरडून मन मोकळं करणारी न्हावीण.काही काळ राजा बनलेल्या धोब्याची राणी या माझ्या भूमिका सर्वांनाच आवडत.एस.एन.जोशींच्या ढोलकीने धमाल केली. आम्ही शिक्षक,प्राध्यापक,डॉक्टर ,कलाकार एक पैसा मानधन घेत नव्हतो. छोटया मुलांना मात्र सुंदर पुस्तके,आकर्षक भेटी दिल्या जात.एस.टी.एम.एस.ई.बी. महाविद्यालये याशिवाय गणेशमंडळे इत्यादी संस्था कलापथकाला मानधन देऊन कार्यक्रम निश्चितच करीत .पहिला कार्यक्रम देवीच्या मंदिराजवळील योगेश्वरी शाळेच्या पटांगणावर झाला.तेव्हा आदरणीय कै.एकनाथराव गुरूजींनी पाकिटात दहा रूपये घालून सर्वसमक्ष दिले होते.ती 'मानवलोक-मराठवाडा नवनिर्माण लोकायत' या स्वयंसेवी संस्थेची नांदी ठरली.१३ वर्षात जमा झालेल्या पैशातून आज धडपड कार्यालय उभे आहे.ती जागा म्हणजे राजा पांडुरंगजी जाजूंचा जुना गाव वाडा.जाजूच्या कुटुंबाचे डॉ.द्वारकादास मेडिकल अॅडव्हायझर-वैद्यकीय सल्लागार होते.ते तो वाडा काहीही देवाणघेवाण न करता घ्या म्हणत होते.परंतु ' दान नादान करते' या तत्वावर सेवादलाचा विश्वास असल्याने अवघ्या ७५ पैसे चौरसफुटप्रमाणे जागा विकत घेतली.आणि आणीबाणीनंतर गजाआडून मुक्त झाल्यावर त्या जागेवर ' मानवलोक'उभारण्याचे स्वप्न पेरले जे आज सधनरूप घेत आहे. राष्ट्रसेवादल कलापथक,अंबाजोगाई केवळ 'लोक रंजनातून लोकशिक्षण' एवढयावर न थांबता आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय,वैचारिक परिवर्तनाचा (पक्षीय राजकारणापासून दूर राहून ) वसा घेऊन शेकडो,हजारोंच्या सहकार्याने नवा डाव मांडत आहे.

आणि म्हणूनच बीड जिल्हयातीलच नव्हे तर मराठवाडयातील नाट्यचळवळींचा आढावा घेतांना राष्ट्रसेवादल कलापथकाचा चिमुकला बिंदु लक्षात घ्यावा असे मनोमन वाटते.

# मराठी नाटकात प्रतिबिंबीत झालेल्या स्त्री समस्या

प्राचार्य,डॉ.कांचन शृंगारपुरे

१९ वे शतक हा भारताच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण कालखंड आहे. हजारो वर्ष चालत आलेल्या आपल्या इतिहासात इंग्रजी राजवट आल्यानंतर सामाजिक जीवनामध्ये मोठया प्रमाणात परिवर्तन झाले.इंग्रजी राजवटीमुळे इंग्रजी संस्कृतीचा व साहित्याचा परिचय भारतीयांना झाला.त्यामुळे वैचारिक, राजकीय ,सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतराबरोबरच साहित्याच्या क्षेत्रातही अमुलाग्र बदल झाला.मराठीतील कथा,कादंबरी, कविता, नाटक इत्यादी वाङ्.मय प्रकाराचा उदय, स्वरूप आणि विकास यावर १९ व्या शतकातील स्थित्यंतराचा परिणाम झालेला आहे. नाटक व वाङ्.मय प्रकाराला संस्कृत भाषेतील परंपरेचा वारसा असला तरी आज जे आधुनिक नाटकाचे स्वरूप आपण पाहतो त्या नाट्य प्रकाराचा उदय हा १९ व्या शतकामध्ये घडलेल्या सांस्कृतिक घडामोडीतून झालेला आहे.

नाटक हा वाङ्.मय प्रकार कथा, कादंबरी, कविता यापेक्षा वेगळा आहे.कादंबरी जितकी मुक्त आहे तितके नाटक बंदिस्त आहे. ङ्म नाटक ङ्घहा केवळ वाङ्.मय प्रकार नसून ती एक ललित कलाही आहे.नाटकाचे
साहित्यमूल्य कितीही महत्त्वपूर्ण असले तरी त्याची निर्मिती प्रयोगासाठी आहे,हे विसरून चालत नाही.नाटकाच्या निर्मितीमध्येच प्रयोगाचे अविभाज्य अंग आहे.प्रा.वसंत कानेटकरांच्या मते, ङ्म संहितेतील शब्दरूप नाट्य नाट्यकलेच्या माध्यमात संस्कारीत होण्यावरच नाटकाची नाटक म्हणून यशस्वीता अवलंबून आहे.त्याआधी नाटकाचे नाटकपण सिध्द केले पाहिजे.नाटकाचा कस प्रयोगात लागतो, ही तितकीच महत्त्वाची बाब ."

१९ व्या शतकाअखेरच्या महाराष्ट्रातील समाज विचारांचे आणि तत्कालीन नाटकांचे असणारे नाते,स्त्री सुधारणेच्या चळवळीच्या घडमोडीत या नाट्य वाङ्.मयाचे मूल्य,तत्कालीन सुधारणावाद परंपराप्रियता नाटकांतून प्रतिबिंबीत झालेली आहे.

१९७५ ते १९२० या कालखंडामध्ये स्त्री सुधारणा विषयक प्रश्नांची सुरूवात नाट्य वाङ्.मयातून प्रभावीपणे झाली.लोकजागृतीचे एक साधन या दृष्टीने कथा,कविता, कादंबरी, निबंध इत्यादी वाङ्.मय प्रकारापेक्षा नाटक हा दृश्य आणि एकाच वेळी अनेकांशी संवाद साधणारा वाङ्.मय प्रकार निश्चितच प्रभावशाली आहे.नाटकाच्या या अंगभूत प्रभावशक्तीचा त्या कालखंडातील स्त्री सुधारणाविषयक साहित्यिकांनी भरपूर उपयोग करून घेतला .या कालखंडामध्ये स्त्री शिक्षणाचा प्रश्न घरोदारी चर्चेचा विषय झाला होता.त्यामुळे अधिकाधिक नाटके आणि प्रहसने या विषयावर लिहिली जावू लागली.

उदा- सुशिक्षित स्त्री नाटककार –एक स्त्री शिक्षण सुधारणे इच्छुक ,'गोदावरी' अथवा 'दुर्देवी सून' ( म.गो.लोंढे ) ,'परीक्षा सत्र (माधवराव पाटणकर) ,'संगीत सावित्री' (अ.मा.जोशी) ,'गुप्त मंजुष' (श्री.कृ.कोल्हटकर) ,'शूर स्त्री प्रभाव'( बा.दि.वैध ),'ब्रहम निरसन' (वि.वि.गुर्जर) ,'संगीत दामिनी' (हिराबाई पेडणेकर) इत्यादी .

नाटकाचा प्रभाव व जनमाणसावर होणारा त्याचा अनुकूल परिणाम लक्षात घेता त्या काळातील स्त्रियांच्या विविध समस्या नाटकातून प्रतीत होणे साहजिकच होते.त्यात बालविवाह , बालजरठ विवाह , हुंडाविषयक,विधवा पुर्नविवाह या व अशा अनेक स्त्री समस्यांचा वेध नाटककारांनी नाटकातून घेतला. बालविवाह विषयक नाटकात' मनोरमा' ( म.बा.चितळे ) ,'कन्या विक्रयदुष्परिणाम' ( मो.वि.शिंगणे, बा.बा.आचार्य) 'सद्य:स्थित्यदर्शक' अर्थात आजची सामाजिक स्थिती ( ह.रा.पाठक ), 'संगीत रूढी विनाशन' ( द.ल.मराठे ) इत्यादी नाटकात बालविवाह समस्यांची उकल केली गेली.

महादेव बाळकृष्ण चितळे यांनी लिहिलेल्या 'मनोरमा' नाटकातील चारही मुलींची लग्न लहानपणीच झालेली असतात. या नाटकातील नायिका मनोरमा हीच सुखी दाखविली आहे. बाकीच्या तिघींचे जीवन दु:खी आहे. ठकुला इतक्या लहानपणी वैधव्याचे दु:ख भोगावे लागले.याचे कारण बालविवाह आहे .त्याचप्रमाणे गंगू आणि तिचा नवरा यांचाही बालविवाह झाल्याने त्यांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीची कल्पना आधी लक्षात न आल्याने व विजोडपणामुळे त्यांच्यात दु:ख निर्माण होते.

बालविवाहाप्रमाणेच बालजरठ विवाह ही स्त्री समस्याही नाटकातून रेखाटली आहे.बालजरठ विवाह हा विषय गो.ब.देवल यांनी 'संगीत शारदा ' या नाटकातून अत्यंत प्रभावीरित्या मांडला आहे. या नाटकात जरठकुमारी विवाह आणि कन्याविक्रय या दोन्ही निंद्य गोष्टींवर कटाक्ष आहे. स्त्रीचे जगणे असह्य करणा–या जरठकुमारी विवाहसारख्या गोष्टींबाबत प्रतिकूल मत तयार करण्याचे कार्य या नाटकाने प्रखरतेने केले आहे. या नाटकातील नायिका शारदा ही चौदा वर्षाची असून तिचे वडील कांचन भट तिचे लग्न पंच्च्याहत्तर वर्षाच्या म्हाता–या भुजंगनाथाशी निश्चित करतात. शारदाची अगतिकता, असहाय्यपणा या नाटकांतून मांडला आहे.परिस्थितीच्या बुडाशी असलेली स्त्रियांची असहाय्यता आणि समाजाची पुरूषप्रधानता संगीत शारदाच्या कथानकातून ध्वनीत झालेली आहे. स्त्री सुधारणाविषयक नाटकांमध्ये संगीत शारदा नाटकाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. सुधारणेचा विषय घेऊनच समाजाच्या ह्दयाशी भिडण्याची कला या नाटककारास प्रथम साधली.

हिंदु धर्मात विवाह एक प्रकारचे दान मानलेले आहे. दानाची पूर्तता दक्षिणेशिवाय होत नाही,ही हिंदू धर्मातील प्रचलित समजूत आहे. त्यामुळे विवाहात कन्यादानानंतर वधूपित्यांनी स्वखुशीने दिलेली वरदक्षिणा पुढे हुंडयाच्या प्रथेत रूढ झाली. हुंडयाच्या अतिरिक्त मागणीमुळे मुलींचे लग्न जमविणे कठीण होवू लागले.स्त्रियांची स्थितीदारूण बनण्यास ही हुंडयाची प्रथा कारणीभूत झाली. कन्याविक्रयाप्रमाणे हुंडा या प्रथेला सामाजिक रूप प्राप्त झाल्याने त्यात सुधारणा घडवून आणण्याची गरज काही समाजसुधारकांबरोबर नाटककारानांही वाटू लागली. ना.ह.भागवत यांनी १८८७ मध्ये 'हुंडा प्रहसन' हे हुंडा विषयक प्रश्न मांडणारे नाटक लिहिले तर मामा वरेरकरांनी १९१६ मध्ये ङ्घहाच मुलाचा बापङ्घ हे नाटक लिहुन हुंडा समस्येला वाचा फोडली.

त्याकाळात विधवांची दयनीय स्थिती होती. एक तर त्यांना त्यांच्या मृत पतीबरोबर चित्तेमध्ये उडी घेवून सती जावे लागे किंवा केशवपन वगैरे करून तिची मानहानी केली जात असे. कोणत्याही शुभकार्यात तिला सहभागी करून घेतले जात नसे. तिचा अत्यंत शारीरिक व मानसिक छळ समाजाकडून होत होता. म्हणून अशा विधवांचा पुनर्विवाह करून समाजात त्यांना पुन्हा मानाचे स्थान मिळावे असे समाजसुधारकांना वाटू लागले. विधवा पुनर्विवाह हाच विषय नाटकातूनही नाटककारांनी मांडला .सि.ग.देवधराचे 'संगीत सुविचार विजय', ल.गो.देशमुख यांचे ' प्रौढ विधवा विवाह', ' विधवा पुनर्विवाह' ह्या विषयावर नाटक लिहिले. कोल्हटकर हे सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे होते. म्हणून त्यांनी ङ्ममतिविकारङ्घ या नाटकाची रचना केली. विधवा सुधारणेच्या संदर्भातङ्घ प्रेम संन्यासङ्घ हे नाटक लिहून राम गणेश

गडकरी यांनी पारंपारिकतेला धक्का दिला. कोल्हटकरांच्या ङ्ग मतिविकारङ्ग या नाटकास म्हणावे तसे यश मिळाले नाही. परंतु गडक-यांच्या ङ्ग प्रेमसन्यासङ्ग या नाटकाचा प्रभाव प्रेक्षक व समिक्षक दोघांवरही पडला. या नाटकात विधवा विवाहाचा सामाजिक प्रश्‍न त्यांनी मांडला. यातील लिला ही बालविधवा आहे.तिचे जयंतवर प्रेम आहे.जयंत हा तिच्या प्रेमात पडलेला आहे. परंतु तो विवाहीत आहे. गडक-यांनी त्याची पत्नी जयंताच्या मनोविश्वाशी एकरूप न होणारी अशी दाखविलेली आहे. या नाटकामध्ये गडक-यांनी विधवेचा विवाह न दाखविताही नाटक शोकान्त केले असले तरी तरूण विधवांचे एकाकीपण,अंधःकारमय आयुष्य आणि त्यांच्या मनात जाग्या होणा-या नैसर्गिक अशा प्रेमाच्या व मिलनाच्या भावना यांची गडक-यांनी लिलेच्या चित्रणातून चांगली जाणीव करून दिली.

स्त्री शिक्षणामुळे स्त्री अर्थाजनाकडे वळू लागली.त्यामुळे पारंपारीक स्त्रीपेक्षा वेगळी असणारी नवी स्त्री व तिच्या समस्या याचेही चित्रण नाटकांमधून घडू लागले. 'बनावट सही,'जागतिक ज्योत,'गृहदाह','माझे घर','आशीर्वाद','कुलवधू', (मो.ग.रांगणेकर ) 'जग काय म्हणेल ? '(प्र.के.अत्रे ) ,'बाधा'( सरिता पत्की ) ,'अरे संसार संसार' ( रविंद्र भट ) ,'दिवा जळू दे सारी रात', 'हे फुल चंदनाचं' ( मधुसूदन कालेलकर ) ,'काचेचा चंद्र', 'मला उजर हवय',( सुरेश खरे ) इत्यादींतून आधुनिक व कमवत्या स्त्रियांच्या समस्या चित्रित करण्याचा नाटककारांनी प्रयत्न केला .मो.ग.रांगणेकरांच्या "कुलवधू "या नाटकात पत्नीने अभिनय क्षेत्रात मिळविलेल्या यशाने पतीला तिचा हेवा वाटतो.त्यातून त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो.शेवटी नायिका नव-याचे घर सोडून जाते.या नाटकात इब्सेनच्या डॉल्स हाऊसचा प्रतिध्वनी उमटला आहे.' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकात तेंडुलकरांनी कौर्य व हिंसा याचे समर्थपणे दर्शन घडविले आहे. कौमार्य अवस्थेत गरोदरपणा आलेल्या तरूण मुलीच्या बाबत समाजाचे कौर्य कसे प्रगट होते, हे एका अभिनव आविष्काराद्वारे ' शांतता ! कोर्ट चालू आहे ' या नाटकातून विजय तेंडुलकरांनी दाखविले आहे.सुरेश खरे यांनी मिळवत्या स्त्रियांच्या समस्यांवर बरीच नाटके लिहिली. 'काचेचा चंद्र' या नाटकात स्त्री अर्थाजन करू लागली. कलेच्या क्षेत्रात नामवंत झाली तरी तेवढयाने ती स्वतंत्र, मुक्त झाली असे होत नाही. कित्येकदा तिचे कुटुंबीयच तिच्या पैशाचे अपहरण करतात .स्वार्थासाठी तिला आपल्या इच्छेनुसार वागायला लावतात. काचेचा चंद्र' मधल्या नटीचा भाऊच तिच्याशी जबरदस्तीने अनैतिक संबंध ठेवून तिला बंदिस्त जीवन जगायला लावतो. उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेच साधन उपलब्ध नसेल तेव्हा देहविक्रय करून पैसा मिळविणे हाच एक मार्ग स्त्रीसमोर असतो व ती वेश्‍या व्यवसायाकडे वळते.सामाजिक नीतीमत्तेच्या चौकटीत बसणा-या या स्त्रियांवर व त्यांच्या समस्येवर वि.आ.पाठारे यांनी 'कलावंतीण',ना.बा.पराडकर ' धरंदाज',मो.ग.रांगणेकर यांनी 'कोणे एकेकाळी' शं.ना.नवरे यांनी 'गुंतता हृदय' हे ही नाटके लिहिली. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष त्यानंतर १९७५-८५ हे महिलादर्शक म्हणून जाहीर केले. त्यातून स्त्री मुक्तीचे विचार समाजात रूढ होवू लागले तरी सुध्दा स्त्रियांच्या समस्या अजूनही संपलेल्या नाहीत. वैवाहिक ,कौटुंबिक,हुंडाविषयक समस्या आजही समाजात दिसून येतात.

१९८३ साली विजय तेंडुलकरांनी ' कन्यादान' या नाटकातून आधुनिक स्त्रीच्या निर्धाराचे प्रश्‍न मांडलेले आहे. हे नाटक पूर्णतः स्त्री मुक्तीच्या विचारांवर प्रकाश टाकणारे नसले तरी विजय तेंडुलकरांनी या माध्यमाद्वारे स्त्रीमुक्तीच्या वैचारीक चौकटीत बसणा-या काही विचारांना दिशा देण्याचे कार्य नक्कीच केले आहे.स्त्री शक्तीचा प्रत्यय या नाटकातून जाणवतो.

हुंडाबळीचा विषय घेवून आपल्या कुटूंब व्यवस्थेत सासरी येणा-या तरूण मुलीचा कसा छळ केला जातो आणि मुलीही सगळे अन्याय मूकपणे कसे सहन करतात याचे प्रभावीपणे चित्रण जयवंत दळवींनी 'पर्याय' या नाटकातून केले आहे. पण समस्यांचे केवळ चित्रण करून ते थांबले नाहीत तर या समस्येवरचा एक उपायही त्यांनी सुचविला आहे.कुटुंबातील सत्प्रवृत्त माणसांनी सक्रीय व्हावे.समाजातील तरूणांनी हुंडाबळी सारखे अन्याय, अत्याचार थांबविण्यासाठी संघटीत होवून अन्याय पीडित महिलांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करावे हे बंडाच्या संघटनेद्वारे त्यांनी दाखविले आहे. स्त्रीचा छळ पुरूषाकडूनच होतो असे नव्हे .हुंडयापायी केल्या जाणा-या छळाला स्त्रीच वैरी बनते हेही त्यांनी दाखविले आहे. हुंड्यामुळे स्त्रीचा होणारा छळ हा विषय रत्नाकर मतकरी यांनी ' अग्निदिव्य' या नाटकांतूनही मांडला आहे.

आपल्या संस्कृतीत मातृत्वाचा वेळोवेळी गौरव करण्यात आलेला आहे. अपत्याशिवाय आयुष्याची परिपूर्ती नाही. स्त्री ही शिक्षणाची पत्नी व अनंतकाळाची माता असते त्यामुळे समाजात जी स्त्री निपुत्रिक असेल तिच्या वाटेला आजही अवहेलनाच येते.त्यातून स्त्रीने स्त्रीची केलेली मानहानी तिच्या जीवनात वैफल्यनिर्माण करते. अनिल बर्वे यांनी 'पुत्रकामेष्टी' या नाटकातून अपत्य प्राप्तीसाठी गर्भाशय भाडयाने देणे ' सरे गेटसदर 'हा विषय मांडला आहे. शतकानुशतके पुरूषप्रधान संस्कृतीने घालून दिलेल्या बंधनाच्या बेडया पायात अडकवून स्त्री वाटचाल करीत आली आहे. तिच्यासाठी एक आणि पुरूषासाठी वेगळे नियम असलेल्या समाजव्यवस्थेत बदलत्या काळानुसार तिला नित्य नव्या आव्हानांना तोंड द्यावे लागलेले आहे. स्त्री ही नेहमी निर्णयासाठी दुस-यांवर अवलंबून राहणारी एक शोभेची बाहुली, आज्ञाधारक ,त्यागी, सोशिक आणि उपभोग्य वस्तू म्हणून तिचा वापर पुरूषांनी केला आहे. ती कधीही हाडामासाची व्यक्ती नसते. तिला पुरूषासारख्या विकार,वासना नसतात.स्वतंत्र विचार करण्याची शक्ती तिच्यात नसते. चाकोरीबाहेर जाण्याची हिंम्मत नसते.अशाच स्त्री प्रतिमा भारतीय चित्रपटांमधून व नाटकातून चित्रित केलेल्या आहेत.परंतु अलीकडच्या काळात मात्र स्त्रीला या साचेबंद प्रतिमेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न काही मोजक्या चित्रपटांमधून व नाटकांमधून होताना दिसत आहे. त्यात प्रशांत दळवी यांचे 'चारचौघी' या नाटकाचा नक्कीच उल्लेख करावा लागेल.'चारचौघी' या नाटकातील आई, विद्या,वैजू,वीनी या स्वतंत्र विचारांच्या व कणखर वृत्तीच्या स्त्रिया स्वतःचे निर्णय स्वतः ठामपणे घेतात. त्याच्या परिणामांची काळजी करीत बसत नाहीत. आपल्या वाटेला आलेले भोगही त्या समर्थपणे भोगतात; पण आपल्या भावनाशिलतेचा गैरफायदा दुस-याला घेवू देत नाहीत. या चौघीजणी व्यक्ती स्वातंत्र्याच्या लाटेवर आरूढ झालेल्या आहेत.

आधुनिक महत्त्वाकांक्षी,बुध्दीमान असणा-या स्त्रियांना स्वतःचे करिअर उंचावण्यासाठी पतीची व मुलांची साथ मिळतेच असे नाही, बहुतांशी ती मिळतच नसते. गजेन्द्र अहिरे यांनी 'आईचे घर उन्हाचे ' या नाटकातून जिद्दीने आपल्या बुध्दीमत्तेच्या जोरावर परिश्रमपूर्वक प्रयत्न करणारी 'क्षमा' परंतु तिची प्रगती बघुन पुरूषी अहंकाराची भावना दुखावलेला नवरा,याचे चित्रण केलेले आहे.हाच विषय 'उंच माझा झोका गं ' या नाटकातून गजेन्द्र अहिरे यांनी मांडला आहे. आपले करिअर करताना कौटुंबिक ,सामाजिक,वैयक्तिक पातळीवर ही स्त्रीला पदोपदी संघर्ष करावा लागतो.ती आपल्या ध्येयाशी पोहचते; पण पारंपारिक पध्दतीने आपल्या यशा-पशाचे ताळेबंद मांडले. ' उंच माझा झोका गं ' मध्ये अहिरे यांनी एका महत्त्वाकांक्षी मुलीची स्त्री समस्या मांडली आहे.स्त्री समस्यांवर प्रकाश टाकणारे अनिल बर्वे यांचे 'हमीदाबाईची कोठी',जयवंत दळवींचे 'पुरूष','सावित्री','बॅरिस्टर',राम जोगळेकर यांचे 'आनंदी गोपाळ',वसंत कानिटकर यांचे 'पंखांना ओढ पावलांची ,विजय तेंडुलकरांचे 'कमला',ज्योत्स्ना देवधरांचे 'कल्याणी',श्री.ना.पेंडसेंचे 'रथचक्र',रत्नाकर मतकरींचे 'दुभंग',सई परांजपेचे 'माझा खेळ मांडू दे',विवेक लागू यांचे 'सर्वस्वी तुझीच' इत्यादी नाटकांमधूनही स्त्रीयांच्या समस्यांचे मार्मिकपणे चित्रण केलेले दिसते.

## प्रायौगिक कला - एक चिंतन

प्रा.केशव देशपांडे

आपण आज २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या मावळतीच्या जवळ आहोत. भारत देशाच्या भूप्रदेशावर आपला जन्म म्हणून भारतीय तर महाराष्ट्र प्रांती वास्तव्य म्हणून मराठी. आपल्या देशाचा हजारो वर्षाचा इतिहास. परंपरा संस्कृती साहित्य,महाकाव्य शास्त्र विविध कला हे आपलं संचित, तर ज्या प्रदेशात वास्तव्य आहे.त्यामुलूखातली भाषा, संस्कृती, मूल्यधारणा रीती-रिवाज,रूढी परंपरा,उद्योग,राहणीमान ,वेश,आहार-विहार,इतिहास आदींचे संस्कार जन्मल्यापासून प्रतिदिन कळत -नकळत पाठीशी घेवून त्या समाजात आपण जीवन-जगत असतो.त्या समाजाच्या धार्मिक, आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक, नैतिक जीवन घटकांत आपण समाविष्ट असतो. म्हणून हजारो वर्षाच्या प्रवासानंतर विविध कालखंडात अनेक युध्द,आक्रमणं, धार्मिक ,सांस्कृतिक लढे,राजकिय संघर्ष,रक्तपात,गुलामगिरी,यांत ही आपली जीवन मूल्य सांभाळित ,विकास व अधोगतीचे टप्पे ओलांडित आपण भारतीय म्हणून जगमान्य झालो आहोत.गुलामगिरीच्या प्रदीर्घ प्रवासाचा इतिहास आहे तरी, विविध शास्त्र, कला,जगण्याची ,मूल्याची एक विशिष्ट जीवनशैली याच पूर्वजांनी पिढीदर पिढी सांभाळीत ,जोपासत आपल्या पर्यंत आणली आहे. भारतीय परंपरेत ६४ कलांना कलाप्रकार म्हणून मान्यता आहे.त्या ललित कलांना विशेष प्राविण्य अपेक्षित आहे म्हणून प्राधान्य. तर संगीत, नृत्य,नाटक याला प्रयोगशील कला म्हणून विशेष प्राधान्य आहे .त्यांना कलावंताचा दर्जा आहे.व हे जे संचित आपल्यापर्यंत आलं आहे ते तितक्याच शुध्द रूपात पुढच्या पिढीच्या हवाली करणं हे आपलं कर्तव्य आहे.

या तीन प्रयोगशील कलांचा विचार प्राधान्याने व्हायला हवा.कारण एकूण सर्वच कला जेव्हा नाटक - रंगभूमीच्या सान्निध्यात येतात तेव्हा त्या नाटयकलेस साहयभूत होतात व नाट्यधर्मी कार्य करतात. या कलांचा भूतकाळातील प्रवास व विकास या विषयी खोलात अन तपशीलात न जाता आजचं तिचं अस्तित्वात असलेलं रूप, बदलेललं रूप लक्षात घेतलं तरी पुष्कळ आहे.

या कला अवस्थांचा स्वतंत्रपणे आयसोलेटेड विचार करता येणार नाही ; कारण त्या कला व त्यातील कलावंत व निर्माते हे समाज घटकांचा एक अविभाज्य घटक आहे.आपण जगतो त्या सामाजिक ,आर्थिक ,राजकीय व इतर घटकांतील बदलाचे परिणाम कलांवर व साहित्यांवर होणे अपरिहार्य आहे. कलां व साहित्य निर्मिती ही या समाजजिवनाशी बांधलेली आहे, नव्हे तिच्या निर्मितीचं ते प्रयोजनच आहे.

त्यासाठीं थोडा भूतकाळाचा मागोवा घेतला तर या आर्थिक-सामाजिक बदलांचा वर्तमान अधिक स्पष्ट होईल .

स्वातंत्र्योत्तर काळानंतर आपण संसदीय लोकशाही तत्त्व प्रणाली स्वीकारली व त्या मार्गांनी पुढची देशाची वाटचाल चालू आहे. या मार्गावरून जात समृध्द भारताचे स्वप्न आपण पाहिले व रचनात्मक कार्याला सुरूवात केली औद्योगीकरण, व विज्ञानाधार घेवून त्यातून आर्थिक संपन्नता व सामाजिक न्याय संपादन करण्याचा संकल्प आपण सोडला.त्याच काय झालं याची मी चर्चा करीत नाही पण आपली कार्यपध्दती व नीती काही योग्य तो परिणाम साधू शकली नाही. मिश्र अर्थव्यवस्था,परमिट लायसन राज,उद्योगाला पब्लिक सेक्टरची आखणी,यातून जे कांही फलित मिळालं ते काहीं समाधान कारक नव्हतं.पुढ चळली ऐवजी चळली ळपर्वीिीीू (लघुउद्योग संवर्धन )

गरीबी हटावचे जे कांही परिणाम उद्योग जगतावर झाले .त्यातून अंदाजे २० एक वर्षापूर्वी आर्थिक सुधारासाठी आपण, खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकारला केला.हा तो २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकातला पूर्वार्ध होता व राष्ट्राला २१ व्या शतकाच्या स्वागतास सामोरे जावयाचे होतो. खुल्या अर्थव्यवस्थांमुळे , उदारीकरण ,खाजगीकरण , जागतिकीकरण या नव्या पध्दतींचा स्विकार झाला .तेंव्हा मागच्या अंदाजे १५-२० वर्षात काय घडल ?

पहिली गोष्ट - पब्लिक सेक्टरच महत्त्व संपलं व खुल्या स्पर्धात्मक औद्योगीकरणाची सुरूवात व खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना प्राधान्य आलं.

दुसरी गोष्ट म्हणजे सेवा कार्याला व व्यवस्थापनाला महत्त्व प्राप्त झालं. स्पर्धा वाढली .उत्पादनासाठी चढाओढ होताच ग्राहक खुष झाले. आता स्वस्त व उत्तम माल, वस्तु बाजारात उपलब्ध होवू लागल्या.ज्यांच्या हातात पैसा आहे तो उपभोग्य वस्तुंचा उपभोग घेवू लागला .त्यातून नागर श्रीमंत, नवश्रीमंत, उच्चवर्गीय उच्चमध्यम वर्ग, मध्यम वर्ग यांच्यात चंगळवाद माजला. खाजगी सेक्टर व औद्योगिकरणाच्या वाढीसोबत जागतिकीकरणांमुळे मल्टीनॅशनल कंपनी भारतात उतरल्या त्यांनी अनेक उद्योग वाढले व त्यासाठी प्रचंड संपत्ती ओतली व नफा मिळविण्याच्या साठी प्रचंड स्पर्धा उभी केली व ही स्पर्धा प्रचंड वेगानं वाढली.स्पर्धेच एक नव युग निर्माण झालं व विज्ञानानं नवी नवी साधनं फ्रीज ,टी.व्ही., ॲटो उद्योग इ.अनेक उत्पादन त्यात आली.त्यात आता संगणक अन जगातील माहितीच्या खजिन्याची गुहा उघडली.स्वत:च्या घरी जगाची घरं उघडली व माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती आली. ही वाढ इतक्या झपाट्याने अन् वेगाने झाली की, सर्वच क्षेत्र ढवळून निघाली. तंत्रज्ञानाच्या ,तंत्राच्या,व्यवस्थापनाच्या, औद्योगिक उत्पादनाच्या, कामगारांच्या,वाहतुकीच्या ,माहितीच्या , कम्युनिकेशनच्या ,(फोन ,मोबाईल ) ,गृहउपयोगीवस्तु ,चैनीच्या वस्तु ,सौंदर्य प्रसाधन इ.इ.अनेक क्षेत्रात प्रचंड वेगानं बदल दिसू लागले. नवश्रीमंताचा एक वर्ग जो कधीपासूनचा पाश्चात्य संस्कृतिच्या प्रभावाखाली होता तो पूर्णतया आधिनच झाला.ही गती भारतीयांसाठी इतकी प्रचंड होती की काय काय आणि कुठं, कुठं, काय बदललय हे कळायला, समजायला यायच्या आत नवीन नवीन व्यवस्था येत होती, विकसित होत होती, व राबविली जात होती . भारतीय स्थितीशील मन गोंधळून गेलं. विस्मयानं चकित झालं. गेल्या पन्नास शंभर वर्षात झाली नाही त्यापेक्षा कितीतरी पट अधिक प्रगती मागच्या पंधरा वर्षात झाली व नागरी व मध्यमवर्गापर्यंत ती जाणवू लागली.उद्योगातून तयार होते ती संपत्ती .

या संपत्तीच्या आधारावर आधी असलेली वर्ग व्यवस्था अधिक स्पष्ट झाली. गरीब, मध्यमवर्ग उच्चमध्यमवर्ग, श्रीमंत,नवश्रीमंत हे वर्ग ठळक जाणवू लागले अन गरिबी-श्रीमंतीतली दरी वाढली.मध्यम वर्गाचे पगारदाराचे जीवनमान सुधारले .नवश्रीमंत वर्ग समाजाचं धुरीणत्व स्वीकारू लागला. त्यात राजकीय पक्षांना गरज पडेल तेव्हा सोईनुसार वापरायला सुरूवात केली व त्यांनाही अंकित केले.

व्यापारात,उद्योगात खुली स्पर्धा वाढल्यामुळं व कारखान्यात उत्पादनासाठी कुशल,हुशार,शिक्षित कामगार हवे होते .इतकेच नव्हे तर ते करण्यासाठी व समाजस्वास्थ्य सांभाळण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक, प्राध्यापक ,डॉक्टर,नर्सेस, इंजिनिअर्स, सनदी नोकर, व्यवस्थापक ,शास्त्रज्ञ ,सामाजिक कार्यकर्ते ,राजकीय सोईसाठी ,सवलतीसाठी राजकीय पुढारी, पाठीराखे ,जे या व्यवस्थेला हवे होते त्याची मागणी वाढली. रोजगार उपलब्ध झाला. शैक्षणिक संस्था, विद्यापीठं हे सर्व कामी लागले व शिक्षित , तंत्रकुशल, तरूणांना
प्रशिक्षित करून त्याची पाठराखण केली. काम, नोकरी, जोडधंदा, उद्योगधंदा,यात प्रचंड परिवर्तन या

पुर्नरचनेत घडलं. ज्ञान,विज्ञान,माहिती,तंत्रज्ञान या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. मोठे मोठे बदल समाजातल्या सर्व थरात कमी जास्त प्रमाणांत दिसू लागले. चंगळवाद फोफावला .कारखान्यातील उत्पादनाला ग्राहक व मोठी बाजारपेठ मिळाली.अनेक कार्यात वेगवान बदल तसेच कामाच्या नव्या पध्दती विकसित झाल्या. संगणकाचा मुक्त वापर ,कामाचं स्वरूप बदललं व त्यांनी जुन्या कार्यपध्दतीला ,जुन्या मान्यतेला निकाली केलं वा मागे टाकलं.

आपला माल बाजारपेठेत खपविण्यासाठी ग्राहकाला लुभावणं सुरू झालं. जाहिराती ,कधी नफा कमी करणं, सवलती (३ साबणावर एक मोफत) कधी उत्पादनाच्या मालावर दुसरं उत्पादनाची वस्तू भेट इ. यासाठी योजनाबध्द कार्यक्रम व आवश्यक ती लवचिकता असं एक नव कॅरेक्टर (Character) सगळीकडे दिसून येवू लागलं. आता कुशल व कल्पक माणसं हवी आहेत. पूर्वी आतापर्यंत माणसं जगण्यासाठी कामधंदा करीत होती आता कामधंद्यासाठी जगणं झालं आहे. जागतिकीकरण ,तंत्रज्ञान विकासाबरोबर कामाच्या जागा, स्थळ बदलली जावू लागली.देशांत मोठी महानगरं, तर देश व परदेशातही राहणीमान बदललं, लठ्ठ पगाराच्या नोक-या, सवलती, परदेशात व देशांतर्गत ही समाजजीवन झपाटयानं बदललंय आता कुटुंबातले पालकही मुलांना असच शिक्षण देवू लागले आहेत की ,त्यांना स्वत:च्या जीवनांत आर्थिक समृध्द पायावर उभं राहता येईल. जगता येईल. कुठंही पृथ्वीच्या पाठीवर कामासाठी जा प्राविण्य मिळवा, स्किल वाढवा ,जा ग्लोबलव्हिलेज . समाज विकासाच्या या टप्प्यावर ठळक चार बदल दिसतात. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण,औद्योगीकरण - नागरीकरण , माहिती व तंत्रज्ञानातली क्रांती या १५-२० वर्षात सामाजिक जाणिवा अनेक अर्थी बदलल्या, पैसा मिळविणे, नफा कमावणे हे ध्येय मानणारी संस्कृति तयार झली.पैशानं सर्व मिळतं, विकत घेता येत. आम्ही मिळवणार त्याचा उपभोग घेणार. वापरणार, उपभोग संस्कृती ,पब संस्कृती,कॅफे संस्कृती ,फास्ट फुड कल्चर इ.अनेक तर सध्या शासनपुरस्कृत वाईन कल्चर सुध्दा.

दुसरं म्हणजे घर, कुटुंब ,नाती एवढंच काय-तर Sex ( सेक्स ) स्त्री-पुरुष संबंधाविषयीच्या धारणा झपाटयानं बदलत आहे. कुटूंब-वृध्दाश्रम,विवाह संस्था.अरेंज मॅरेज, प्रेमविवाह ,कॉन्ट्रॅक्ट मॅरेज ते विवाह बाहय संबंध या धारणा ही बदलत चालल्या आहेत. समाज रूप बदलतय .गरीबांबद्दल कणव आहे ती आपल्या सुखाच्या नंतरची त्यात आमच्या सुखात लुडबूड नको.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व अर्थ व्यवस्थेबरोबर एक नवा उद्योग भरभराटीला येतोय डीशरींळींश एलेपू व तो जगभर वेगाने वाढतोय .पसरतोय ,अनेक कंपन्या ,कारखाने, प्रांत,देश या उद्योगाच्या प्रभावाखाली आणले आहेत.

एक नवा,ताजा,व्यापार उद्योग उदयाला येतो आहे.पूर्वी व्यापारात होत्या उत्पादन करणा-या कंपन्या, कारखानदार तथा त्यांना कच्चा माल पुरविणारे उत्पादक परंतु या नवीन उद्योगात ज्यावर मोठी चर्चा होतेय, सर्व विकसित व विकसनशील राष्ट्रात होते आहे व जी भारतीयांना नवी आहे ती म्हणजे (Creative Industry) ( क्रिएटिव्ही इंडस्ट्री ) पुढील कालखंडात जगात सर्वात अधिक लाभ देण्याचं (पोटेंनशियल ) क्षमता असलेला हा उद्योग आहे.

तुमची कल्पकता तुमची प्रतिभा हे या उद्योगाचं साधन आहे .भांडवल आहे. कशातून पैसा उभा करायचा तर जी तुमची पारंपारिक कलेची धारणा आहे. कुशलता आहे. प्रतिभा आहे. उदा.गायन,वादन,नर्तन,कथाकथन,संगीत,चित्रपट इ.इ.त्यात नविन तंत्र वापरायचं कुशल देखणी मांडणी करावयाची,त्याला छान धंदेवाईक रूप द्यायचं व त्यातून पैसा मिळवायचा, उद्योग करावयाचा, व्यवसाय करावयाचा यात सर्व प्रयोगशील कला ,संगणक गेम, टेलिव्हिजन ,वास्तुकला, फॅशन,कला कौशल्य, रेसीपीज,डिझायनींग ,व्हीडीओ ,रेखाचित्र,ग्राफीक डिझाईन ,व्हिज्युअल आर्ट, साहित्य लिखान,प्रकाशन इ.इ.अनेक गोष्टींचा समावेश होतो.

आता या उद्योगातली कंपनी कुठलंही उत्पादन करीत नाही.निर्मिती करीत नाही. असे अनेक दूरदर्शन चॅनेलचे मालक, पब्लिशर, इंटरटेनरर्स ,मनोरंजन क्षेत्रातले लोक या व्यवसायात आहेत. त्यांची संख्या वाढलेय.श्रीमंत होतातेत .त्याचं उत्पन्न दरवर्षी ५% ते २०% नी वाढतय.सध्या संगीत, नृत्य,अभिनय,चित्रकला व साहित्य यावर आधारित हा उद्योग, व्यापार, व्यवसाय आहे.

(United Kingdom) चा सरकारी रिपोर्ट असा आहे की, (cultural Industry) नी मिळविलेलं उत्पन्न व त्यांनी नेमलेला नोकरवर्ग हा खूप मोठा असून आमच्या Automotive उद्योगापेक्षा तो सहापट मोठा आहे.

यु एस.ए.मध्ये या उद्योगाची क्षमता ही अॅटोमोटिव्ह,शेती, Aerospace/defense पेक्षा जास्त आहे.तेव्हा आपल्याला हे लक्षात येईल की कलात्मक निर्मिती ही एकाच वेळी आर्थिक निर्मितीचा मोठा स्त्रोत आहे तसेच कलात्मक निर्मितीचापण आहे.आपल्यासाठी ही कल्पनाच मुळात विचित्र व नवी आहे.आपली कलेकडे व विज्ञानाकडे पाहण्याची परंपराच ,दृष्टिकोनच मुळात पूर्णतया भिन्न आहे.त्यांची विचार पध्दतीच वेगळी आहे. different school .

औद्योगिक विकासाबरोबर आर्थिक संपन्नता येते व कलेसंबंधीच्या धारणा बदललेल्या दिसत आहेत नवीन विचारसरणीत खरे म्हणजे जगण्यामध्ये कलेला काही स्थान नाही.कारण जगण्यासाठी पैसा पाहिजे व तो आपलं स्किल वापरून मिळविला पाहिजे. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेची जागा औद्योगिक अर्थव्यवस्थेने घेतली.आता औद्योगिक व्यवस्थेची जागा (cultural Industry) घेणार .आता ते दुसरीकडे जाताहेत .तिथं कच्चामाल कोळसा,लोखंड नाही तर मूल्यवान गोष्ट आहे कल्पकता, प्रतिभा ते त्यांची निर्मिती मशीन वा वस्तु नाही तर खारसळपरीलेप आहे. उदा.नायकी किंवा Coco-cola कोकोकोला या कंपन्या काय करतात ? त्यांची स्वत:ची फॅक्टरी नाही. निके-इतर फॅक्टरीकडून शूज ( Shoes) तर कोकोकोला पेय तयार करून घेते. त्याचं सगळं उत्पादन दुस-या फॅक्टरीज तयार करतात.त्यांची निर्मिती अनुषंगिक आहे.ते त्या वस्तुची व पेयाची 'जाहिरात ' करतात.त्यासाठी ती जी भाषा व प्रसार ,प्रचार करतात ती विश्वलेषणाची किंवा भाववाचक नसते तर ती कथेक-याची वा मनोरंजन करणा-या विदूषकाची असते.

नव्या युगाच्या नेतृत्व करणा-यांची आघाडी सांभाळणा-या लोकांची निर्मितीक्षेत्र (Creative Industry) आहे. त्याची एकूणच जी नवी पध्दत मांडणीची, रचनेची आहे ते परंपरावाद्यांना समजणे शक्य नाही किंवा समजून घेण अवघड आहे किंवा ते त्यांना समजण्यापलिकडचे आहे. बहुतेक चॅनेलचे हे वितरक आंतरदेशीय आहेत. हे चॅनेल त्यांच्या ताब्यात आहेत व त्यातही मोठे मासे ,छोटे मासे व त्यांच्या संघटना आहेत व त्या कार्यक्षमपणे कार्यभार करतात .संपूर्ण कलात्मक परिपूर्णता, तांत्रिक परफेक्टपण व व्यापारी अनुसंधान यांनी नविनतम, नाविण्यपूर्ण असं प्रॉडक्ट अत्यंत आकर्षक होऊन तयार केलं जातं. ते नवीन कलाकार त्यांत आवश्यक ते बदल व पध्दती किंवा तंत्र बदलाची लवचिकता दाखविली जाते.

भारतातही अशा त-हेने काम करणा-या अनेक कंपन्याचा उदय झाला आहे.ते इतरांच्या वस्तुंना, मालाला प्रसिध्दी देतात.स्वत: कांही निर्माण वा निर्मिती करीत नाहीत आणि प्रचंड आर्थिक उलाढाल करतात.अनेक देशी व परदेशी वाहिन्याचे चॅनलसचे हेच उद्देश आहेत. जूऩ्या गाण्याच्या रिमेकिंग, वस्तूंच्या जाहिराती,खेळ,क्विज,सिनेमे, गाण्याचे अल्बमस ,सिरीयलस ,चर्चासत्र इ.इ.नी आपण परिचित आहात.ते

ही करमणूकही अत्यंत स्वस्त व चीप देतात. आताशा हे क्षेत्रही लाचलुचपत ,काळा पैसा व गुन्हेगारीने वेढले आहे.

तर अशा सांस्कृतिक संक्रमण काळाच्या सीमारेषेवर आपण भारतीय प्रयोगशील कला-संगीत, नृत्य, नाटक रंगभूमीचा विचार करीत आहोत कारण त्याही समाजमनाच्या एक घटक आहेत.त्यांना वेगळं काढून त्यांचा स्वतंत्र विचार हा अपूरा ठरेल.

संगीत व नृत्य ही भारतीयांची विशेष ठेव आहे. ब्राह्म् संगीत,वैदिक संगीत, धृपद -धमार गायकी, ख्याल-संगीत व त्यांच्या विविध घराण्याच्या शैली व त्यातही प्रादेशिक विशेषतः वेगळेपण आहे.स्वर संगीत तसं सूर संगीत व ताल वाद्य इ.इ.यांची भारतीय पध्दतीची स्वतंत्र मांडणी आहे व ती पूर्ण देशी आहे. जगभरापेक्षा ती स्वतंत्र आणि वेगळी आहे. कष्टप्रद साध्य आहे. स्वतंत्र व स्वयंभू आहे.अनेक पिढयांनी वारसा म्हणून जतन करीत राखली आहे. निरनिराळया घराण्याच्या शागिर्दांनी ती सांभाळली आहे व आपली स्वतंत्र शैली जतन केली आहे.आपली सुरवाद्य व तालवाद्य एकदम आगळे वेगळे आहेत. सतार, सरोद,संतूर आदि तंतूवाद्य याची रचना व मांडणी जगावेगळी व भिन्न आहे.त्या सर्वांच एक शास्त्र आहे. व हे जगासाठी कुतुहल आहे.भारतीय संगीत हे मानवजातीचा अनमोल ठेवा आहे. हिन्दुस्थानी ,कर्नाटकी, रविंद्र संगीत असे नाविण्य, शिवाय लोकसंगीत ,लोकगीत अशा विविध प्रकारांनी व विविधतेने नटलेलं आहे. याच आधुनिक काळांत भावगीत ,सिनेसंगीत आपली स्वतंत्र ओळख ठेवून आहे. जनमानसावर त्याची प्रचंड मोहिनी आहे.

आपलं भारतीय शास्त्रीय नृत्य,भरतनाट्य ,कुचिपूडी ,कथ्थक इ.नृत्यशैली व त्याची शास्त्रीय बांधणी तसेच अनेक प्रकारची प्रादेशिक लोकनृत्य,आदिवासी नृत्य अनेक पिढयांनी जोपासली आहेत व ती कलाही कष्टप्रद साध्य आहे.

संगीत व नृत्य हे ईश्वरी आराधनांच रूप घेवून School जोपासल्या गेल्या.आपल्या भारतीयांचा या कलांकडे पाहण्याचा दृष्टीकोण भिन्न आहे. त्याचं व आपलं स्वतंत्र आणि वेगळं आहे.

या दोन कला आता नव्या औद्योगिककरणाच्या व Creative Industry च्या विळख्यात अडकल्या आहेत.नव्या या तथाकथीत प्रगत जगात जगताना कलेला जीवनात किती स्थान आहे ? काय स्थान
आहे ? त्याचा सुखाशी ,आनंदाशी ,किती संबंध आहे ? पैशाच्या धारण करण्यात जी सुख उपभोगता येतात त्यात या ललित कलांना किती आणि कोणतं स्थान आहे ? त्या कलांकडे व कलावंताकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे ? क्रिएटिव्ह इंडस्ट्रीजच्या विळख्यात अनेक क्षेत्र आली आहेत. क्वचितच एखाद क्षेत्र सुटलं असेल व ते म्हणजे रंगभूमी,नाटक. कारण त्याचं व्याकरण व घटक धारणानं भिन्न आहेत. लिखित किंवा अलिखित संहितेचा ,प्रयोगकारांनी,प्रेक्षकांसमोर केलेला आदान-प्रदानाचा, ताण तणावांचा खेळ होतो तेव्हा तिथे रंगभूमी सिध्द होते.नाटक हे जीवन खेळाचं लक्षण आहे. नाटकाचं व्हीडीओ रूपांतर केलं तर त्याला दुसरं नाव द्यावं लागेल .त्याला नाटक म्हणता येणार नाही. कारण त्यात जिवंतपणा नाही व
प्रेक्षकही नाहीत.इतर सर्व कलांचा नाटकांत अनुप्रवेश असतो. त्या सर्व कला आपलं सगळं व्याकरण, संकेत व्युह सांभाळून नाटकात येतात व त्या नाट्यधर्मी होऊन जातात.नाटकाचा हेतू व आशय प्रेक्षकांपर्यंत पोंहचविण्याचचं त्या कला काम करतात. नाटक ही बहुजिनसी कला आहे व त्यात येणारे इतर कलाप्रकार नाटकाचे इतर घटकही परस्परपूरक,परस्पराश्रयी व परस्परावलंबी होऊन कार्य करतात.

संगीत,नृत्य, नाटक या कलाप्रकारांचं भावी काळातलं रूप कसं असेल, त्यांच्या समोरील आव्हानं
कोणती हे समजावून घेण्यासाठी ही सद्यस्थितीची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी.जागतिकीकरण
औद्योगिककरण,उदारीकरण ,ग्लाबलाईज व्हिलेज, पैसा,संपत्तीचा मोह व सर्व पातळयावर होणारं सांस्कृतिक आक्रमण व आदान प्रदान अनेक भिन्न विचारांचं ,विचारप्रणालीचं मिलन व मिश्रण झाल्याने फार मोठा फरक पडेल किंवा भ्रष्टता येईल वा कांही परंपरा नष्ट होतील अशी भीती स्थितीशील मनाला वाटणं सहाजिक आहे.

या उदारीकरणामुळे जुनी मूल्यव्यवस्था ,कुटूंब व्यवस्था ,जातिभेद ,वर्णभेद ,प्रादेशिकता ,विविध भाषा,वेशभूषा ,जीवनपध्दती ,आहार-विहार, शिक्षण पध्दती,विवाह संस्था ,राजकारण ,समाजजीवन बदलत आहे .हा बदल भला की बुरा, योग्य की अयोग्य असावा की नसावा याचा विचार करायलाही वेळ नाही इतकं वेगानं संक्रमण होत आहे.

भारतीय रंगभूमी मराठी, बंगाली, कन्नड ,गुजराथ प्रांतात विकसित आहे.मराठी व बंगालमध्ये ती व्यावसायिक रूपात अस्तित्वात आहे.मागच्या १०-१५ वर्षात मराठी रंगमंच अडचणीत आहे.प्रेक्षकांची उपस्थिती ही चिंतेची, काळजीची बाब झाली आहे. दूरदर्शन व इतरही कारणांनी तो विकलांग झाला आहे. नाटकाचाच असा विचार आयसोलेशनमध्ये स्वतंत्रपणे करणे योग्य होणार नाही.

२० व्या शतकाच्या शेवटी दूरदर्शन आले व ते निदान नागरी वस्तीत तरी घरोघरी झपाटयाने पोंहचले .त्यामुळे या नव्यानं आलेल्या दृक-श्राव्य माध्यमाशी थोडी स्पर्धा होणं अपरिहार्य होतं.

पूर्वी ४०-५० दशकात चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम आलं तेंव्हाही रंगमंचाची अशीच अवस्था झाली होती. वाताहात झाली होती. तेंव्हाही नाटकाला प्रेक्षक मिळत नव्हते. रंगभूमी विकलांग झाली होती. हिन्दी सिनेमाच आक्रमण होत पण जेंव्हा मराठी सिनेमा ही विकलांग झाला तेव्हा मराठी प्रेक्षक ही पुन्हा ५०-५२ च्या आसपास मराठी नाटकाकडे वळला. आता जेंव्हा नाटक टीव्ही शी स्पर्धा सुरू झाल्यानं नाटक अडचणीत आहे.

दूरदर्शनची आज असलेल्या स्थितीकडे पाहा ज्या कारणांसाठी व उद्देशाने दूरदर्शन आले तो उद्देश तो हरवून बसला आहे. ते एक करमणूकीचे व जाहिरातीचे साधन बनले आहे. जाहिरातदारांकडे प्रसारभारतीच्या हातातून सूत्र केंव्हाच गेली आहेत. Cultural Industry ने त्यांना गिळलं आहे. आज निर्माता टी.व्ही.चा जाहिरातीला प्रेक्षक विकतो आहे. जोवर जाहिरातदारावर तो आर्थिक दृष्टयावर अवलंबून आहे व जोवर जाहिरातदार पाठीशी आहे तोवर निर्माता निर्मितीबाबत बेफिकीर आहे.मग क्विज शो, एमटीव्ही असो .जोवर प्रेक्षक पाहाताहेत त्याच्या गुणवत्तेला महत्त्व नाही. त्यात काम करणारे नट, अभिनेते हे ' उपभोक्ता सामुग्री ' झाले आहेत.

हे आक्रमण जोरात येणार.पाश्चिमात्य संस्कृतिच्या अनुकरणाचं आधीच आपल्याला आकर्षण आहे.एकत-हेच्या गुलामगिरीची मानसिकता तर आहेच आता जग हेच खेड झालं आहे .आता अनेक भारतीय झपाटयाने परदेशी वास्तव्य करताहेत .तेथील श्रीमंतीचं, संपतीचं आकर्षण आहे .भारतीय उच्चवर्गीय व नवश्रीमंताना, इतकेच नव्हे तर राजकारण्यांना आपल्या महानगराना शांघाय करण्याचे डोहाळे लागले आहेत.

या सर्वाचा आश्रयदाता कोण ? तर प्रेक्षक .या सर्व प्रक्रियेत प्रेक्षक नावाचा घटक दूर्लक्षित आहे.एखाद नाटक चांगल की वाईट हे कोण ठरवितं. ? प्रेक्षक .

प्रेक्षकांची प्रतिक्रिया व उपस्थिती ही सगळयांत महत्त्वाची .आजही,ती स्थिती बदलली आहे का ? नाही .झालं काय की मधल्या काळात, नाटक दिग्दर्शक व नट हे प्रस्तुतित अडकले व प्रेक्षक दूर्लक्षित झाला.

दूर्बोध ते सरळसोट नाटकांनी तर प्रेक्षकांची टवाळकी केली. कलात्मक निर्मितीचे हे नवे रूप प्रेक्षकांच्या डोक्यावरून जात आहे अशा भ्रमांत दिग्दर्शक स्वांतसुखाय झाले व नवे आशय ,विषय,शैली,रीतीच्या कलात्मक शोधात प्रेक्षकांचे भान विसरले व प्रेक्षक दुर्लक्षित झाला. एक कलेसाठी कलावादी,हे एक टोक वा एकदम धंदेवाईक नाटक हे दुसंर टोक .आताशा नाटक एक तर बंद खोलीत अभ्यासासाठी होतात. दिग्दर्शक नट, सर्जनशील कलाविश्वाचा अविष्कार व शोधाच्यासाठी प्रेक्षकांना सुबुध्द जाणकार समजून नाटक निवडतांना दिसत नाही किंवा ठराविक प्रेक्षकाचा वर्ग डोळयांसमोर ठेवून (पूणे, मुंबईचा मुख्यत:)नाटक करीतो व तो प्रेक्षक नाटक पहायला येत नाही.या दोन महानगराबाहेर ही प्रेक्षक आहे.दर्जेदार व चांगल्या नाटकांना त्यांचा प्रतिसाद होता व आहे नाटकांचे दौरे पूर्वी होते ते बंद झालेसे वाटतात. प्रेक्षकांची ही वाण दूर करावयाचा विचार गंभीरपणे रंगकर्मींनी करावला हवा.नव्या नव्या युक्त्या व पर्याय शोधणे आवश्यक आहे. शासनाधार, जाहिरातदार , स्पॉन्ससर हे नाट्यकलेचे आधार तकलादू आहेत. प्रेक्षक हा जनाधार हा मुलभूत अन शाश्वत आधार आहे. अनुनय करावयाचा झालाच तर तो या माय बाप प्रेक्षकांचा करावा लागेल. आजच्या संक्रमण अवस्थेत या सांस्कृतिक आक्रमणाने आपण मिटून गेलो, नष्ट झालो, पराभूत झालो असं वाटेल. काही बुरूज ढासळतील .विवाहसंस्था, कुटूंब व्यवस्था मोडकळीस आली आहे असं वाटेल नवी पब संस्कृती, मॉल संस्कृती पंचतारांकीत संस्कृती अगदी वाईन संस्कृती फोफावताना दिसेल. लाचखोरी, संधीसाधूपणा , गुन्हेगारी ,वाढून अराजक दारात उभे आहे असे वाटेल. पाप-पुण्य, शील अश्लिल ,भल-बुरं हयाच्यातील सीमारेषा पूसट होतील. सामान्यत: भीती वाटेल वाढेल .मग पुन्हा समाजमन ढवळून येईल. आत्मभान वाढेल .आपण जे टाकलं ते योग्य होत असं भान येईल. भोगाचा ही तिरस्कार वाढेल.

आपण आर्थिक संपन्नतेचं एक टोक गाठताच पुन्हा आपलं सांस्कृतिक पूर्ननिर्माण उभं राहिल. भारतीय नीतीमूल्य अंकूरतील, फोफावतील. आपला जूना अनुभव ही असाच आहे की, सशक्त, संपूर्ण, संपन्न, तेजोमय धारणांचा कधी कधी पराभव होतो पण त्या नष्ट होत नाहीत. कारण त्या समाज मनाच्या हुंकारातून निर्माण होतात. या स्पर्धेत जे अस्सल आहे ते टिकेल, बेगडी, तकलादू आहे ते कालौघात नष्ट होईल. प्रयोगशील कला बाबतीत आपण ही असंच आशावादी व शाश्वत असायला हवं कारण समाजमनसुध्दा सुवर्णाप्रमाणे ताऊन सुलाखून अग्नीतून निघालं की ,अधिक शुध्द होऊन तेजोमय होऊन निघतं.

भारतीय कलांचा सुवर्णकलश सदैव मानवी जीवनाचं सांस्कृतिक मंदिर सुशोभित करेल.


संस्थापक



कै.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकु)

सर्वांना आपलं मानणारी आपली बँक

अध्यक्ष



श्री.जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर (अण्णा)

# श्री गजानन नागरी सहकारी बँक म.,बीड.

सागर हाईटस्, बसस्टॅण्डसमोर, बीड. फोन (०२४४२) २३०४९५, २३२४५१, फॅक्स नं.२३१५०९

ठेवीदार व कर्जदार दोघांनाही इथे न्याय !
जाणूनी आपुल्या भावना, आम्ही योजितो उपाय ।।

## बँकेची प्रगती दर्शक आकडेवारी

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | १११.६२ | ठेवी | २९४१.४६ |
| राखीव व इतर निधी | ३०४.४६ | गुंतवणूक | ११२५.१८ |
| कर्ज येणे | २१२२.३० | खेळते भांडवल | ३५४७.१९ |
| नफा | ६०.३० | | |

मन्मथ शंकर स्वामी (व्यवस्थापक)
श्री.चाऊस अहेमदबीन अबुद (उपाध्यक्ष)
श्री.जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर (अध्यक्ष)

विद्यमान संचालक मंडळ - श्री.जगदीश वासुदेवराव काळे, श्री.दत्तात्रय बाजीराव आघाव, श्री.अरूण बाबासाहेब डाके, श्री.अरुण दशरथराव गोरे, श्री.नविदुज्जमा फकरुजमा सय्यद, सौ.प्रतिभाताई जयदत्त क्षीरसागर, सौ.मंदाकिनी कालिदास थिगळे, श्री.रमेश सोहनलाल सारडा, श्री.मन्मथअप्पा शिवलिंगअप्पा हेरकर, श्री.रावसाहेब लक्ष्मणराव पाटील, श्री.गिरीष पांडुरंगराव देशपांडे, श्री.दिनेश लाला पवार, श्री.राजेश सोपानराव तांगडे, अॅड.श्री.दत्तात्रय सत्यभान डोईफोडे, श्री.हेमंत बप्पा जगन्नाथ औटे

## पारंपारिक लोककलांचा मानसपुत्र – तमाशा

अॅड.सुभाष निकम

महाराष्ट्राच्या विविध भागात विविध जातीधर्माचे लोक आपआपली लोकसंस्कृती अनादिकाळापासून एका कडून दुस–याकडे हास्तांतरीत करत .जमेल त्या परिस्थितीत लोकसंस्कृती जतन करताना आज आपण पाहतो.विविध क्षेत्रात प्रगतीच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते.पण आज याच प्रगतीच्या ओघात आपण महाराष्ट्रीयन् पिढयानपिढयापासून जतन केलेली आपली लोकसंस्कृती व त्यातील लोककला मागासलेपणाच्या नावाखाली कोनाडयात टाकण्याचा प्रयत्न करत आहोत.

मुळात कुलधर्म,कुळाचार,विधी,परंपरा,श्रदधा,मनोरंजन उदबोधन ,प्रापंचिक गुजरान यातून लोकांनी लोकांसाठी लोककला निर्माण केल्या.लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचं एक अविभाज्य अंग असणा–या लोककलांमधून ग्रामीण जीवनातील समूह गतपिढ्यांच्या आधाराने बोलका होतो.लोककथा,लोकगीत,लोकनृत्य, यातून तो अभिव्यक्त होतो.लोककलांचा कर्ता जरी अज्ञात असला तरी त्या आजही समकालीनता टिकवून असतात.त्या जरी वेळोवेळी एका पिढीकडून दुस–या पिढीकडे हस्तांतरीत होत असल्यातरी मुख्य बाज टिकवून आहेत.हस्तांतरीत होतांना काळानुरूप काही बदल होणे स्वाभाविक आहे;परंतु त्या संशोधनात्मक बदलांना नवी पिढी स्वीकारून लोककलांना समाजामध्ये स्थिरस्थावर करत असतात.

जवळपास सर्वच लोककलांमध्ये धर्मश्रद्धा व प्रादेशिक देवदेवतांना प्राधान्य देतात.अशीच एक लोककला म्हणजे तमाशा .मुळात तमाशा हा कलाप्रकार विशुद्ध कलाप्रकार आहे.१७ व्या शतकाच्या शेवटी किंवा १८ व्या शतकाच्या आरंभी हा कलाप्रकार जन्माला आला असे अनेक मान्यवरांचे मत आहे.'तमाशा 'तसा मुळ फार्सी शब्द. फार्सी भाषेतून तो उर्दू भाषेत कळू लागला आणि मग उर्दूतून तो मराठीत आला .काही शास्त्रज्ञांनी तमाशाचा व्याकरणीय अर्थ काढला तम + आशा लागून राहणे असा आहे ; परंतु तमाशाची कृती पाहता हा अर्थ त्या शब्दाचा असावा असे मला तरी वाटत नाही.आयुष्यातील संपूर्ण अंधार याद्वारे दूर होवून त्यांच्या आयुष्यामध्ये प्रकाश यावा अशी सुद्धा एक व्याख्या होवू शकते.तमाशा उद्बोधन आणि सामाजिक जनजागृतीसाठी मनोरंजनाची एक परिपूर्ण झालर तमाशा या कलाप्रकाराच्या मांडणीत आपल्याला दिसते.

तमाशाची उत्पत्ती काहीच्या मते वर सांगितल्याप्रमाणे म्हणजे १७ व्या शतकाच्या शेवटी किंवा १८ व्या शतकाच्या आरंभी असे म्हटले जाते. उत्तरेकडून भारतात आलेल्या मुस्लीम फौजांच्या मनोरंजनासाठी काही लोककलावंत जात .त्यात प्रामुख्याने कोल्हाटी डोंबारी आदी असत.आजपण ही कला हा समाज आस्थेवाईकपणे जपताना पाहतो. कुल +उट्या म्हणजे काठीवरील खेळ करणारा हा समाज मुस्लीम फौजांपुढे कला सादर करून बिदागीच्या स्वरूपात कौटुंबिक उदरनिर्वाहासाठी धान्य मिळवीत .तर हा झाला काहींच्या मते उत्पत्तीचा भाग ; परंतु काही अभ्यासकाचे मत असे आहे की, कुठलीही कला एखाद्या प्रांतात जन्म घेते आणि झपाटयाने फोफावते असं होत नसतं. त्या कलेला आधाराच्या रूपात पार्श्वभूमीच्या रूपात,रूपात,समाजमान्यतेच्या रूपात एक भक्कम प्रेरणा असते.आजच्या सादरीकरणातील तमाशा जर पाहीला तर इ.स.पूर्व पहिल्या शतकात हळ राजाच्या प्रतिष्ठान राजधानीमध्ये रतिक्रीडा नावाचा कलाप्रकार सादर होत असे.श्रीकृष्ण,राधा ,यशोदा ,पेंद्या यांच्या माध्यमातूनच ते सादर होई. शृंगाररसासह ,भक्ती,वीर,हास्य हे रसही आजच्या तमाशाप्रमाणे प्रमुख रस होते.म्हणजे इ.स.पूर्व पहिल्या शतकापासून हा रतिक्रीडा प्रकार काही ठिकाणी प्रचलित होता. त्याचेच काळानुरूप Recycle होत. त्या आधारावर आजचा तमाशा उभा असावा.असो. तमाशाच्या उगमाविषयी अनेक मतमतांतरे आहेत हे मी तरी मानतो. तमाशाची निर्मिती ही फक्त मनोरंजनासाठी झाली.समूह रंजन करून घेण्यासाठी त्याठिकाणी गोळा होवू लागला आणि सादरकर्त्याला वैचारिक अधिष्ठान प्राप्त व्हावे या हेतूने हळूहळू उद्बोधन् जन्माला येवू लागलं.

तमाशा हा मुळात सर्व रंजनात्मक कलाप्रकार जरी असला तरीही इतर लोककलांची उद्बोधनात्मक प्रेरणा यात दिसते.तमाशा हा स्वयंस्फूर्त आहे की निर्माण केला गेला हा जरी संशोधनाचा विषय असला तरी तमाशाचा एकूण बाज पाहता महाराष्ट्राच्या इतर पारंपारिक लोककलांची प्रेरणा याला मिळालेली आपल्याला पाहावयास मिळते. इतर लोककलांमधील एक एक घटक जशाच्या तसा तमाशा कलाप्रकारात आलाय असं दिसतं .नाटकाप्रमाणेही तमाशाच्या मंचावर स्पर्धेच्या आणि उत्कृष्ट दर्जाच्या निकषावर विविध प्रयोग झाले असण्याची शक्यता आहे.फार पूर्वी म्हणजे सुरूवातीला महाराष्ट्रामध्ये गोंधळ, जागरण, हे विधिनाट्य शाहीरी वाड्मयाची निर्मिती असलेले बखरी, कवणं,पोवाडा, संतवाड्मयातून जन्माला आलेले भजन,कीर्तन, पूजा अर्चा, गायन, लोकप्रबोधन करणारे वासुदेव, पांगुळ असे अनेक लोककला प्रकार होते.

या सर्वांची प्रेरणा घेत तमाशा हा उभा राहिलेला आपण पाहतो. तमाशामध्ये सुरूवातीला हलगी ,ढोलकीची जुगलबंदी असते.पारंपरिक प्रत्येक लोककलाप्रकारांमध्ये वादयवृंदाचा आवाज, एखादया वस्तुंचा नाद ती कला सादर होण्यापूर्वी वापरलेला आहे.समुहांसाठी ,सामुहिक अथवा वैयक्तिक स्वरूपातील या कलांचे सादरीकरण आता सुरू होत आहे.प्रेक्षकांनी, श्रोत्यांनी लवकर यावं यासाठी रंगभूमीवर आपण देतो ती त्यांची तिसरी घंटा का
नसावी ? कारण त्याकाळी पलीते , टेंबे , मशालीमध्ये कलाप्रकार सादर होत असत. ध्वनिक्षेपणाची कुठलीही साधने त्यावेळी उपलब्ध नसल्याने प्रत्येक कलाप्रकाराच्या आरंभीला अशा वाद्यांची गरज असावी असे मला वाटते. या हलगी–ढोलकीच्या जुगलबंदीनंतर गण हा प्रकार तमाशात सादर होतो. ग कार रूपी ईश्वर श्रीगणेशाचे वंदन यात असते .त्याच्यासोबत क्षेत्रिय देवता वेतोबा, खंडोबा,मरीआई, लखाआई ,लोकदैवते ,ग्रामदैवते ,आराध्यदैवते आदिना पण वंदन केले जाते.प्रत्येक लोककला प्रकारामध्ये गण हा असतोच. तोच गण तमाशाप्रकारात आला. फक्त सादरीकरणाचा लहेजा थोडा बदलला. तमाशातील गण हा थोडा टिपेचा असतो. त्याला कारण हेच की, पूर्वीपासून शृंगार या मुख्यरसाच्या व्याप्तीमुळे प्रेक्षकांचा ओढा जास्त होता.नाटकामध्येही नांदी हा कलाप्रकार ईशस्तवन म्हणूणच आलेला आहे.

लोककलांच्या कुठल्याही प्रकारामध्ये गण गायन करतांना महिलावर्ग सहभागी नसतो.तमाशामध्येही गणात शाहिरासह झिलकरी सोबत असतात. महिला नर्तकी कधीच नसते .गणाची निर्मिती ही लोकसंस्कृतीतून झालेली आहे. कारण श्रदधापूर्वक लोककलावंतानी या लोककलांचे सादरीकरण केलेले आहे .समाज व्यवस्थेचा, धर्मपरंपरेचा व परिवर्तनाचा खूप अभ्यास लोककलावंतानी केलेला आहे,असे आपणास त्या कलाप्रकाराच्या सादरीकरणाच्या मांडणीच्या गाभ्यावरून कळेल. भरतमुनींनी नाट्यशास्त्राला पंचमवेद म्हणून रंगमंचाची विभागणी ९ भागात केली. तमाशासह इतर लोककला प्रकारांमध्येही ही विभागणी आपल्याला आढळते. मुख्यमंचाच्या पुढच्या मध्यभागात

(प्रेक्षकदर्शनी) गणपतीचे अधिष्ठाण मानले जाते.म्हणून त्याठिकाणी गण सादर करतात तर त्याच्या शेवटच्या भागात दृश्यबंध पडदा , (नेपथ्य रचना) येथे सरस्वती या कलेच्या देवीचं स्थान असतं. नाटकांमध्ये श्रीगणेश, रिध्दी-सिदधीसह येतो.तर तमाशामध्ये सरस्वती सोबत येतो.महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये पुरूषाचं स्थान हे घराच्या दर्शनी म्हणजे बैठकीत, दिवानखाण्यात आहे तर स्त्रियाचं स्थान स्वयंपाकघरात म्हणजे वाडयाच्या मागच्या खोलीत आहे. गणात तमाशातील नायक गणपतीची आवभगत विनवणीरूपात करून त्याला प्रेक्षकदर्शनी भागात बसवतो तर त्याच्यासह आलेली कलेची देवी सरस्वती हिची आवभगत तमाशातील लोकनर्तकी करते.सरस्वती प्रेक्षकांसमोर अधिष्ठीत होते.म्हणून नर्तकी तिला समोरून वंदिते. म्हणून मुजऱ्यामध्ये नर्तकी प्रथम पाठमोरी असते. या पाठमोऱ्या नर्तकीची पाठ ही सहसा पदरमुक्त असते तर तिने पदराचा दोन हातांनी आकार तयार केलेला असतो .प्रेक्षक आजही नर्तकीच्या या प्रवेशाला अज्ञानापणामुळे शृंगारिक समजतात; परंतु वास्तवात ती नर्तकी आपल्या पदराचा मोरासारखा पिसारा फुलवून (सरस्वतीचे वाहन मोर )तिला वंदन करीत असते, मुजरा करीत असते आणि नंतर आलेल्या सगळया देवदेवतांना म्हणजे संपूर्ण रंगमंचावरील भागात ती मुजरा करते व शेवटी रसिक मायबापालाही मुजरा करून जाते आणि आपण तिच्या भक्तीला एखादया भोक्त्या प्रमाणे पाहतो आणि उघडया पाठीला पाहत ,मयुरनृत्य नजरेआड करत,टाळया शिट्या वाजवतो .प्रेक्षकांना नर्तकीने दाखवलेल्या पाठीमुळेच नाटकातील रंगकर्मी सावध झाला असावा आणि रंगमंचावर पाठ दाखवू नये हा कर्ता अज्ञात असलेला इशारा पाळत असावा या तिनही प्रकाराच्या मांडणीनंतर गवळण हा कलाप्रकार सादर होतो .संत वाङ्मयाच्या गवळण या काव्य प्रकारातून हा प्रकार प्रेरणारूपी तमाशात आला.यात हाळीची गवळण ,तक्रारीची गवळण व विणवणीची गवळण सादर होते. रतीक्रिडेप्रमाणे यातही श्रीकृष्णाच्या सवंगडयासोबत गवळणींशी झालेल्या संवादाबरोबर विविध लीलांचे दर्शन होते. हाळीच्या गवळणीमध्ये गोकुळातील गवळणी ऐकमेकांना हाळी म्हणजे बोलावून कृष्ण मथुरा ,वाटचाल ,मेनु ,तिची परिस्थिती यात व्यक्त करत असते तक्रारीच्या गवळणीमध्ये श्रीकृष्णाची तक्रार त्या यशोदाकडे अथवा त्यांच्या समुहातील ज्येष्ठ स्त्रीकडे करतात तर विनवणीच्या गवळणीमध्ये सर्व गवळणी भगवान श्रीकृष्णापुढे शरण जातात आणि त्याला वाट सोडण्याची विनवणी करतात. हा कलाप्रकार रतिक्रिडाची प्रेरणा घेवुन आलेला आहे. सादरीकरणाच्या निकषात यशोदा पात्र गळुण गेलं आणि आजची मावशी हे प्रतिनिधीक रूप जन्माला आलं. दगडू साळी यांनी तमाशात सर्वप्रथम मावशी हे पात्र आणलं.यानंतर तमाशात बतावणी सादर होई. बतावणी म्हणजे निष्फळ बडबड करणे. त्यातून समाजाचे पुरावे देवून विनोद निर्मिती करणे हा मुख्य हेतू सादरीकरणामध्ये पाहावयास मिळतो. हा बतावणी कलाप्रकार बहुरूपी कलाप्रकाराची प्रेरणा घेवून ठरवून करण्यात आलेला आहे. कारण यापूर्वी सादर झालेल्या गवळण या प्रकारातील मुख्य स्त्री पात्र धारण केलेल्या कलावंताना यानंतर सादर होणाऱ्या रंगबाजी कलाप्रकारात लावणी सादर करण्यासाठी रंगभूषा, वेशभूषा ,बदलण्यासाठी काही कालावधी मिळावा ,लावणीत गीत, नृत्यांचे सादरीकरण करण्यासाठी पुन्हा बळ मिळावं म्हणून अप्रत्यक्ष मागणी लक्षात घेवून आणि प्रेक्षकांचा कार्यक्रमातून रसभंग होवू नये म्हणून बतावणी जन्मास आली .

यानंतर मागील तयारी पूर्ण झाल्याची चाहूल लागताच बतावणी आपला गाशा गुंडाळते आणि शाहीरी परंपरेची प्रेरणा घेवून त्यांची लावणी तमाशाच्या रंगबाजीत सादर होते .मग त्यात अदाची, चौफ्याची ,माडीवरची,अंधाराची,हौदयाची, पंढरपुरी बाजाची ,छक्कड फटका ,कलगीतुरा असे विविध प्रकार सादर होतात.रंगबाजी ही तमाशाची शान होती .परंतु ढोलकी फडातून रंगबाजीने ऑर्केस्ट्राचे रूप धारण केलेले आपण पाहतो.या रंगबाजीनंतर इतक्यावेळ बसलेल्या प्रेक्षकांना उसंत मिळावी म्हणून मध्यंतर होते. जशी नाटकात अंक निहाय मध्यंतर संकल्पना आहे.तशीच संकल्पना लोकरंभूमीवर तमाशात आहे.कारण उत्तर रंगामध्ये सादर होणाऱ्या वगनाटयाची पुरक तयारी करण्यासाठी उसंत मिळावी हा प्रमुख सादरीकरणातील हेतूही आहे.तमाशातील पूर्वरंग-उत्तररंगाची प्रेरणा संपूर्ण लोककलांतून मिळाली आहे.

यानंतर उत्तररंगाला सुरूवात होते. पोवाडयातील गीतरूपात दृश्य प्रेक्षकांपुढे मांडणाऱ्या चौकबंध मांडणीत शाहीर कथानकाची पार्श्वभूमी कटावातून मांडतो आणि वगनाट्य सुरू होते . समकालीन निहाय, समाजप्रबोधन ,शूरवीरांच्या कर्तृत्त्वाची ओळख , व पडदयामागील वास्तववाद अशा विषयांना केंद्रस्थानी ठेवून साभिनय वग सादर केला जातो.विविध लोककलांमध्ये उत्तररंगामध्ये कथासूत्र सादर होतात याचीच प्रेरणा वग या प्रकाराने घेतली.

शेवटी सर्व कलाप्रकारांप्रमाणे भैरवीने तमाशाचा शेवट होतो व लोकदिक्षीताप्रमाणे हा तमासगीर बिदागी घेवून त्या गावातून दरवेशी होतो.म्हणूणच तमाशा हा कलाप्रकार सर्व लोककलांच्या प्रेरणेने जन्माला आला आहे. वासुदेवाकडून त्याने घुंगरू व मंजीरी घेतली, मृदंगाच्या प्रेरणेतून ढोलकी घेतली.गोंधळातून तुणतुणे,गण,पूर्वरंग, उत्तररंगात कथासूत्र घेतले .जागरणातून मुरळी घेतली.बहुरूपीकडून बतावणी,शाहीरांकडून प्रत्यक्ष शाहीर, त्याची लावणी,कटाव ,डफ ,कडी घेतली.डवरी गोसाव्याकडून एकसुरी पेटी घेतली, पोतराजाकडून हालगी,कडाकणी घेतली. संत वाङ्मयातून ईश्वराची लीला, अभंग,गवळणी घेतल्या. भारूडातून कुटप्रश्न, समाजाचे होत असलेले शोषण घेतले. कीर्तनातून, भजनातून ,भगवंताचे स्मरण, भैरवी घेतली आणि पिढयान्-पिढयांच्या रसिक तेतून काळानुरूप प्रायोगीकता घेतली. म्हणून तमाशा हा कलाप्रकार आपण समजतो तेवढा वरवरचा नसून समग्र लोककलांचा तो मानसपुत्र आहे. ज्याच्या रूपाला रंगभूमीही आपलसं करण्यासाठी भाळलेली आहे.



## 'नाटक' -नितीमूल्यांचे जतन करणारी कला

प्रा.प्रशांत ना.सौंदत्तीकर

नाटक हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम असून व्यक्ती विकासात प्रगती पथाकडे नेणारी, नितीमुल्यांची जोपासना करणारी कला आहे. नाटक हे चांगला माणुस घडविण्याचे साधन आहे. समाजाला दिशा देण्याचे काम नाटक करते त्यामुळे शालेय, शिक्षणात नाट्य अभ्यासक्रम अंतर्भूत होणे गरजेचे आहे.

आज समाज असुरक्षित असून त्याचे मुळ संस्कृतीच्या अध:पतनात आहे. आज समाजात अनेक अपप्रवृत्ती बोकाळल्या आहेत. नितीमुल्यांचा ऱ्हास होऊन समाजाची वाटचाल चंगळवाद व भोगवादाकडे होत आहे. याला पालक, कुटुंब, सामाजीक, शैक्षणिक घटक, अंधश्रध्दा जबाबदार आहेत. नाट्यशास्त्रासारखे विषय शालेय शिक्षणात समाविष्ट करण्यात आले तर मुलांवर चांगले संस्कार होऊन, संस्कारक्षम पिढी निर्माण होईल. त्यासाठी बालरंगभूमीचा पाया मजबूत होणे गरजेचे आहे. तरच भावी पिढी विचाराने प्रगल्भ व परिपक्व होऊ शकते. मानवतावादी विचारांची होऊ शकते.नाटक हा संमिश्र कला प्रकार आहे. एक व्यापत संज्ञा आहे. एखादा अनुभव सुनियोजीत पध्दतीने योग्य माध्यमाद्वारे व्यक्त करणे किंवा मानवी भाव भावना योग्य रितीने व परिणामकारक पणे नियोजीत पध्दतीने सादर करणे यासाठी नेपथ्य, प्रकाश, रंगभुषा, वेषभुषा, केशभुषा, चित्रकला , शिल्पकला, नृत्य, आदी कलांचा आधार घेऊन हे सादरीकरण केल्यास निश्चितच परिणामकारक ठरते. यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने नाटकाचा अभ्यासक करणे आवश्यक आहे.

जग ही एक रंगभूमी आहे. इथल्या प्रत्येक माणुस हा कलाकार आहे. वेळेनुसार तो विविध सोंग घेत असतो याचाच अर्थ विविध भुमीका आपल्या आयुष्या मध्ये करीत असतो. प्रसंगानुरूप चेहऱ्यावर चेहर चढवत असतो. वेगवेगळे मुखवटे धारण करीत असतो. हे सर्व प्रत्येकाच्या आयुष्यात कळत न कळत घडत असते. हे समजण्यासाठी नाट्य कलेचा उपयोग होऊ शकतो. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना व घडामोडीतूनच नाटक तयार होत असते. त्यासाठी समाजातील बारीक सारीक घटना निरीक्षण करता यायला हवे. यातूनच नाट्य संहिता तयार होत असते. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबींब नाटकात उमटत असते. कल्पनेला वास्तवतेची जोड दिल्यास नाटकाच्या मनोरंजन, शिक्षण व प्रबोधनासाठी चांगला उपयोग होऊ शकतो. या जगात प्रत्येक समुहाचे प्रश्न वेगवेगळे आहे. या प्रश्नांचा उहापोह नाट्यकला अविष्काराने केल्यास बऱ्याच अंशी परिणाम कारक ठरू शकतो.

महाविद्यालयीन पातळीवर युवकांसाठी युवक महोत्सव, एकांकिका, नाट्य स्पर्धा, एक पात्री अभिनय, अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून नाट्यकलेला वाव दिला जातो. त्या तुलनेत बालरंग भूमीवरून असे प्रयोग फार मोठया प्रमाणावर होत नाहीत. त्यासाठी सर्वात प्रथम पालकांचा नाटकाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. माझा पाल्य फक्त डॉक्टर, वकील, इंजिनिअर किंवा आय.टी.प्रोफेशनल झाला पाहीजे हा हट्ट पालकांनी सोडला पाहीजे. अगोदर तो चांगला माणूस झाला पाहीजे. चांगला माणूस घडविण्याचे काम नाट्यकला करते. केवळ पुस्तकी किडे होण्यापेक्षा कमी शिकलेली माणसे ही जीवनात यशस्वी झालेली आहेत.

मराठी माणूस हा नाट्य वेडा आहे. आपली नोकरी, व्यवसाय सांभाळून ही तो नाटकांचा आस्वाद घेतो. परंतू महानगरा शिवाय इतरत्र नाटकाला पोषक वातावरण दिसत नाही. तशा सुविधा ही इतरत्र उपलब्ध नाही. यासाठी शासकीय पातळीवर नाटकासाठी आवश्यक त्या सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करून दिल्यास, रंगभूमी सशक्त होईल. रंगभूमीचा चहरा मोहरा बदलण्यासाठी ग्रामीण कलावंत निष्णात होणे गरजेचे आहे. त्यांना योग्य ते व्यासपीठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. कारण ज्यांना अशी संधी मिळाली त्यांनी तीचे सोने केले आहे. ग्रामीण भागातील कलावंताकडे तुच्छतेने न बघता त्यांच्यातील चांगल्या गुणांची कदर केली पाहीजे. म्हणजे त्यांच्यातील दुर्गुण आपोआप गळून पडतील. सर्वत्र कलावंत होतील, अभिनेते होतील असे नाही. कलावंत हा जन्मावा लागतो असे म्हटले जाते. परंतू त्याही पलीकडे जाऊन असे म्हणता येईल की, जन्मलेल्या कलावंताला संधीच मिळाला नाही तर तो त्याच्यातील मोठे पण कसे सिध्द करणार ? त्याच्या प्रयत्नाशी शिकस्त करण्याची धमक आहे. पण सुविधा नसल्यामुळे ग्रामीण कलावंताचा विकासच खुंटतो आहे त्याचे काय ?

हिंदी महासागरापासून ते हिमालयापर्यंत वाळवंटापासून ते ब्रह्मपुत्रेपर्यंत पसरलेला आपला विशाल भारत अनेक धर्म, पंथ, वंश, भाषांची गौरवशाली परंपरा असलेला देश आहे. परकीय अक्रमणे झाली, सांस्कृतीक संकटे आली, साम्राज्यवाद्यांनी शोषण केले. तरी हा देश झुकला नाही. आज ही तो ताठ मानेने उभा आहे. तो केवळ कला, संस्कृतीच्या जोरावरच त्यावेळीही विचारवंत, चिंतन, मनन करणारे लोक होते. त्यांनी त्यांच्या कलाविष्काराने लोकांना प्रेरणा देण्याचे काम केले. आजची अवस्था काही वेगळी नाही. सामाजीक, सांस्कृतिक विघटनाचे काळे ढग देशावर धिरट्या घालत असतांना कलेद्वारे एकात्मता साधू शकते. यासाठी कलेचे संस्कारहे बालपणापासूनच व्हायला पाहिजेत. त्यासाठी शालेय शिक्षणात नाट्य विषयक अभ्यासक्रम आणणे गरजेचे आहे. नाट्यविषयक तंत्रशुध्द व परिपुर्ण असे शिक्षण मिळेल व भावी पिढी उज्जवल भारताला अधिक उत्कर्षाकडे नेईल.




८९ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!
माजलगांव सहकारी साखर कारखाना लि.
सुंदरनगर
रजि.नं.बीएमआर/एमजीएन/पीआरजी/अे २७ एम ८९ दिनांक. १.११.८९
तार : '' सुंदरनगर '', माजलगांव. फोन : (०२४४३) २४१५०७ फॅक्स : (०२४४३) २४१५०६
कारखान्याची वैशिष्ट्ये
वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी बु. पुणे यांचा हंगाम ९८-९९ व ९९-२००० साठी उत्तर पूर्व झोनमधील '' तांत्रिक कार्यक्षमतेचा '' प्रथम पुरस्कार प्राप्त.
नॅशनल फेडरेशन, नवीदिल्ली यांचा देश पातळीवरील उत्कृष्ट सहकारी साखर कारखाना म्हणुन '' वसंतदादा पाटील पुरस्कार '' व तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार प्राप्त. तसेच हंगाम ९९-२००० साठीचा उस विकासातील द्वितीय पुरस्कार प्राप्त.
इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनामिक स्टडीज्, नवी दिल्ली यांचा '' उद्योगरत्न '' व '' श्रेष्ठता '' पुरस्कार प्राप्त.
महाराष्ट्र राज्य सह. साखर का.संघ लि., मुंबई यांचा '' उत्कृष्ठ तांत्रीक कार्यक्षमतेचा '' प्रथम पुरस्कार प्राप्त.
माजलगाव परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधणारी '' कामधेनू ''.
नॅशनल फेडरेशन, नवीदिल्ली यांचे कडून गळीत हंगाम २००५-०६ साठी जास्तीत जास्त साखर निर्याती बद्दलचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार.
सन २००८-०९ चा गळीत हंगामात २.६५ लाख मे.टन उस गाळप व ९.८९% सरासरी साखर उताऱ्यानिशी २.६५ लाख साखर पोत्यांचे उत्पादन.
सन २००८-०९ गाळप हंगामासाठी २.६४ लाख मे.टन उस गाळप उद्दिष्ट.
प्रतिदिन ४५०० लीटर क्षमतेचा आसवणी प्रकल्प ८ महिण्यात उभारणी करण्याचे नियोजन.
शेतकऱ्यांचे हेक्टरी उत्पादन व कारखान्याचा उतारा वाढविण्यासाठी नियोजनबद्ध उस विकास व कृषी सिंचन विकास कार्यक्रमाची आखणी.
सभासदासाठी '' संजीवन सभासद योजने '' चा प्रारंभ करुन आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध
सुंदररावजी सोळंके
संस्थापक
आ:प्रकाशदादा सोळंके
चेअरमन
धैर्यशिलकाका सोळंके
व्हाईस चेअरमन
विलास डी:सोनवणे
प्र. कार्यकारी संचालक
आणि सर्व संचालक मंडळ

८९ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

# कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड.

मार्केट यार्ड, कुर्ला रोड, बीड. फोन नं. २२२३३७/२२२४२६/२२६८४४



## बाजार समितीचे ठळक वैशिष्ट्ये

शेतीमालाची जाहीर लिलावाने विक्री
माल विक्रीनंतर २४ तासात पेमेंटची व्यवस्था
प्रतवारीप्रमाणे मालाच्या किंमतीची हमी
अद्यावत सोई सुविधायुक्त मार्केटयार्ड
शेतमाल तारण कर्ज योजनेची सुविधा
बाजार समितीकडे बाजारभाव मिळविण्यासाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध
बाजार समितीची सुसज्ज इमारत व टि.एम.सी.प्रकल्प

विनीत

| रमेशराव पोकळे | झेड.एस.काझी | अरुणराव डाके |
|---|---|---|
| उपसभापती | प्र.सचिव | सभापती |

व सर्व संचालक मंडळ : सर्वश्री जगन्नाथराव मोटे, विलासराव आमटे, राजाभाऊ घुमरे, प्रभाकर नांदे, शेख अय्युब, वैजीनाथ तांदळे, सखाराम मस्के, श्रीमंतराव सोनवणे, ॲड.संग्राम तुपे, बाबूराव दुधाळ, अशोकराव कुलकर्णी, अरुणराव गोरे, विष्णूदासजी बियाणी, माणिकराव वाघमारे, सौ.सविता शिंदे, सौ.सरस्वतीबाई काळे.



८९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा...!
श्री गजानन महाराज रिफायनरी
ॲण्ड ऑईल इंडस्ट्रीज
मार्गदर्शक
मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर
माजी उर्जामंत्री
एक लिटर ते १५ लिटर
पॅक मध्ये उपलब्ध
योगी
रिफाईंड सोयाबीन तेल
सोमनाथ दशरथ गिरि
प्रो. सुरेश दशरथ गिरि
अरुण(बबनराव)दशरथ गिरि
संचालक–कृ.उ.बा. समिती
संचालक–गजानन ना.स. बँक
प्लॉट नं. सी./७सी/८ एम.आय.डी.सी. एरिया, बीड–४३१ १२२.
दुकान : २२३९४१, २२०९६२ मिल : २२७११९, २२५४७७ निवास : २२२३८४
दुकान : २२९२७७ फॅक्स : (०२४२) २३१४७८



HCC

www.hccindia.com

## Dream it. Build it.

The HCC Group spans Construction, Real Estate and Infrastructure development and specializes in technically complex, new-age construction in infrastructure projects, as well as EPC, BOT, Integrated projects and townships. HCC brings alive the infrastructure needs of the nation, as currently underway for the Bandra Worli Sealink Project in Mumbai. This 4.7 kms long sealink is an engineering marvel, built to ease the commute time between Bandra and Worli from 40 minutes to 6 minutes.

HCC's other engineering projects include the world's longest barrage at Farakka in West Bengal, India's first underground metro at Kolkata as well as the metro in New Delhi, the Mumbai-Pune Expressway, India's first six-lane expressway and the unique double curvature arch dam at Idukki in Kerala. HCC is also developing free India's largest Hill Station, Lavasa, spread across a picturesque landscape of 100 sq kms, located at a mere 4 hours of drive away from Mumbai.

For more information, please contact the Corporate Communications Department.

Hindustan Construction Co Ltd
Hincon House, L. B. S. Marg, Vikhroli (W), Mumbai - 400 083, India. Tel: +91 22 2577 5959 Fax: +91 22 2577 7568

321 BRIDGES | 2,227 KMS ROADS | 11 NUCLEAR REACTORS | 18 HYDEL POWER PROJECTS | 43 DAMS & BARRAGES | 100 KMS TUNNELS

# पदाधिकारी व कार्यकारिणी मंडळ

## मा.जयदत्त क्षीरसागर

स्वागताध्यक्ष

## डॉ.भारतभूषण क्षीरसागर

कार्याध्यक्ष

कार्यकारिणी सदस्य

**प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर**

प्रा.डॉ.विद्यासागर पाटंगणकर प्रा.डॉ.संजय पाटील देवळाणकर श्री.उदय कसरेकर, श्री.भारत लोळगे ॲड.मधुकरराव गोडसे

### वित्त व्यवस्था (अनुदान समिती)

मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर
श्री.जगदिश काळे
श्री.अरूण डाके
श्री.विलास बडगे
श्री.अनिल ढवळे
श्री.रमेश सारडा
श्री.गोपीकिशन अग्रवाल
श्री.बबन गोरे
श्री.तेजस ठक्कर
श्री.वैभव क्षीरसागर

### कार्यालय व व्यवस्थापन समिती

प्राचार्य डॉ.अरुण भस्मे
श्री.योगेश पवार
प्रा.डॉ.संजय पाटील देवळाणकर
डॉ.सुधीर निकम
श्री.उदय कसरेकर
प्रा.रमेश टाकणखार
श्री.कुलदीप धुमाळे

### जाहिरात समिती

श्री.दिलीप खिस्ती
प्रा.ए.बी.नखाते
प्रा.एस.व्ही.लामतुरे
श्री.आर.एन.शेख
प्रा.सी.जी.शास्त्री
प्रा.जे.यू.कोळेकर
प्रा.एस.जी.काळे
प्रा.एस.एम.तळेकर

### स्मरणिका समिती

प्रा.डॉ.सुहासिनी इर्लेकर
डॉ.सौ.दीपा क्षीरसागर
प्रा.खांडे सहदेव साहेबराव
